17-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1


**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामराव वडकुते)**

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा
**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला.)

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, काल गट नेत्यांच्या बैठकीत निर्णय झालेला आहे की, आज "विशेष बैठक" बोलावून त्यामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा व माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण करावे. माझी आपणास विनंती आहे की, आपण सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास आठ ते दहा मिनिटांचा कालावधी दिल्यास आपणास ही चर्चा पूर्ण करता येईल अन्यथा या वेळेत ही चर्चा पूर्ण होणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत त्यापैकी आता सभागृहात जे सदस्य उपस्थित आहेत, त्यांना आपण बोलण्यासाठी प्राधान्य द्यावे अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर हे ऑनलेग आहेत. त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भातील सत्य परिस्थिती रेकॉर्डवर आली पाहिजे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या भागात पर्जन्यमान कमी असल्यामुळे त्या भागात खूप मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सात-आठ तालुक्यांमध्ये बारा महिने दुष्काळ असतो. आटपाडी, माण, खटाव, जत हे तालुके कायम दुष्काळी आहेत. तेव्हा या तालुक्यांचा एक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जिल्हा करावा अशा प्रकारचा प्रस्ताव तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील यांनी आणला होता.

..2..



ॲड.रामहरी रुपनवर....

सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यात 32 साखर कारखाने आहेत. त्यापैकी पुढील वर्षात चारसुद्धा कारखाने सुरु होणार नाहीत इतकी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. साखर कारखान्यांच्या माध्यमातून सरकारकडे मोठ्या प्रमाणात महसूल जमा होतो. जवळपास 2 कोटी लोकांना त्यातून रोजगार मिळतो. हे साखर कारखाने सुरु झाले नाहीत तर त्या कारखान्यातील लोखंडाचे करायचे काय असा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. साखर कारखान्यांची परिस्थिती गिरणी कारखान्यांसारखी निर्माण होईल की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. साखर कारखान्यांची इतकी वाईट अवस्था असताना त्याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही, त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्र अशी घोषणा करण्यात आली. परंतु या मेक इन महाराष्ट्रामध्ये काम करण्यासाठी प्रशिक्षित कामगारवर्ग कोण तयार करणार ? आयटीआय संस्था प्रशिक्षित कामगार वर्ग तयार करते. शासकीय आयटीआय संस्थेला सर्व सुविधा देण्यात येतात. ज्या खाजगी आयटीआय संस्था आहेत, खरे म्हणजे त्या खाजगी आयटीआय संस्था नाहीत कारण त्यांना शासकीय मान्यता आहे. काही खाजगी संस्था शासनाच्या मान्यतेने स्वत: आयटीआय संस्था चालवितात त्याबाबत शासनाचे नेमके काय धोरण आहे ? आता हा विभाग तंत्र शिक्षण विभागाकडून कौशल्य विकास विभागाकडे गेल्यामुळे तेथील अधिकारी सांगतात आम्हाला अजून शासनाचे धोरण माहीत नाही. आयटीआय संस्था काढण्यासाठी खूप जाचक अटी आहेत आणि संस्थांना शासनाकडून एक रुपयांची मदत मिळत नाही. परंतु या संस्थांवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजे पाटलाची परवानगी घेतल्याशिवाय माळावर बोंबलायचे नाही असे झाले. शासनाच्या जाचक अटींमुळे आयटीआय संस्थामध्ये फार मोठी चिलबिचल आहे.आयटीआय कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये फार मोठी अस्वस्थता आहे. आयटीआयमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना कोणत्याही प्रकारचा आधार नाही, त्यांना वेळेवर पगार मिळत नाही. या संदर्भात सरकारने धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. जर सरकार "मेक इन इंडिया" करीत असेल तर आयटीआयच्या माध्यमातून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सुशिक्षित कामगार वर्ग तयार करण्यासाठी तरतूद केली पाहिजे. परंतु अशाप्रकारची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, याबद्दल मी खेद व्यक्त करतो.



ॲड.रामहरी रुपनवर....

सभापती महोदय, भटक्या विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यासाठी आश्रमशाळा आहेत. परंतु या आश्रमशाळांना मागील दोन वर्षापासून अनुदान देण्यात आलेले नाही. तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार मिळालेला नाही. शिक्षकांना सहा-सहा महिने पगार नाही. यापूर्वी असे कधी घडले नाही. सरकारचा भटक्या विमुक्त जातीच्या लोकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन कोणता आहे ? भटक्या विमुक्त जातीची लोकसंख्या खूप आहे. आपण इतर जातीच्या लोकांना वेळेवर सवलती देता, मग या लोकांना वेळेवर सवलती का देत नाहीत ? भटक्या विमुक्त जातीचे लोक शांत बसतात, त्यांची गाऱ्हाणी मांडायला कोणी नाही, आपणास ते जास्त त्रास देत नाहीत म्हणून त्यांच्या बाबतीत आपण विचार करायचा नाही काय ? विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या आश्रमशाळांसाठी तरतूद केली पाहिजे. आपण या बजेटमध्ये तरतूद केली तर निदान त्यांना एप्रिल महिन्यात पैसे मिळतील.

सभापती महोदय, मागील सरकारच्या काळात डाळीचे भाव 70 रुपये होते त्यावेळी आताचे माननीय मुख्यमंत्री त्यावेळी म्हणायचे की, हे पापी सरकार आहे. परंतु त्यांच्या सरकारच्या काळात डाळीचे भाव 150 ते 200 रुपये झाले आहेत, तेव्हा या पुण्यवान सरकारला, आम्ही त्यांना पापी म्हणणार नाही, ते आमचे मायबाप असल्यामुळे पुण्यवान सरकारने महागाईकडे लक्ष देण्याची गरज आहे. आपण रेट कंट्रोल होल्डींग ॲक्ट रिव्हाईज केला नाही अशी माझी माहिती आहे. आपण तो ॲक्ट रिव्हाईज केला पाहिजे. पूर्वीचे सरकार तसे करीत होते त्यामुळे भाव नियंत्रणात राहत होते. आपण त्यामध्ये लक्ष घालून भाव नियंत्रण ठेवले पाहिजेत असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, एस.सी., एस.टी., विमुक्त जाती व भटक्या जमाती, ओबीसी आणि आर्थिक मागास विद्यार्थ्यांना आपण अनुदान देतो, त्यांची फी भरतो. परंतु मागील दोन वर्षापासून सरकारने या विद्यार्थ्यांची फी भरलेली नाही त्यामुळे त्यांना कॉलेज उभे करीत नाही. त्यांची फी भरण्यासाठी आर्थिक तरतूद केली पाहिजे. यापूर्वी विद्यार्थ्याची फी दिली नाही असे कधी झाले नाही. फी देण्यास उशीर झाला तरी ती जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात देण्यात येत होती. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विद्यार्थ्यांची फी न भरल्यामुळे या विद्यार्थ्यांनी करायचे काय? सरकार या विद्यार्थ्यांची फी भरत असेल तर ती फी कॉलेजमध्ये वेळेवर भरली पाहिजे. या गोष्टींचा अभिभाषणामध्ये ऊहापोह व्हावयास पाहिजे होता, तो झालेला नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो. ..4..



ॲड.रामहरी रुपनवर....

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडतो. सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व वीटभट्ट्या बंद केल्या. फक्त एका जिल्ह्यात असे होऊ शकत नाही. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सारखे धोरण असले पाहिजे म्हणून मी त्या संदर्भात लक्षवेधी सूचना दिली. ही लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली त्यावेळी या सभागृहाचे नेते आणि माननीय महसूल मंत्री यांनी उत्तर देताना सांगितले की, एका जिल्ह्यामध्ये एक कायदा आणि इतर जिल्ह्यांमध्ये वेगळा कायदा असे असू शकत नाही. सोलापूर जिल्ह्यामध्ये ज्या विटभट्ट्या बंद आहेत त्या सुरु करण्याचे मी आदेश देत आहेत. वीटटभट्ट्यांच्या संदर्भात ज्या काही अटी असतील त्या राज्यभर लागू राहतील, त्यासाठी काही कालावधी दिला जाईल आणि राज्यभर एकसंघपणा आणला जाईल. मी सोलापूर जिल्ह्यातील वीटभट्ट्या सुरु करण्याची परवानगी देत आहे. असे असताना सोलापूरचे जिल्हाधिकारी म्हणतात, कोण विधिमंडळ ?

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

त्यांचे म्हणणे आहे की, मला आदेश प्राप्त झालेले नाहीत. मुळात विधिमंडळामध्ये माननीय महसूल मंत्र्यांनी जाहीर केल्यानंतर त्या विभागाच्या अधिकाऱ्यांचे त्या विषयी अंमलबजावणी नाही तर काय करण्याचे काम आहे ? त्यांनी सभागृहातील निर्णय खालच्या अधिंकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजेत. मी हा विषय मंत्रालयात जाऊन विभागाच्या प्रधान सचिवांच्या निदर्शनास आणून दिला. त्यांनी सुध्दा कपाळावर हात लावला. त्यांचे सुध्दा म्हणणे होते की, विधिमंडळात दिलेल्या आदेशाची अधिकाऱ्यांनी पूर्तता केली पाहिजे. माझ्या माहितीनुसार काल-परवा त्यांनी या बाबत शासनाकडे विचारणा केली आहे. परंतु त्यापूर्वी त्यांनी माढा तालुक्यात जेसीबीच्या साह्याने वीटभट्टया उद्ध्वस्त केल्या. त्या जिल्हाधिकाऱ्याने लोकांचे लाखो रुपयांचे नुकसान केले आहे. त्यांच्याकडून विधिमंडळात केलेल्या घोषणांची अंमलबजावणी केली जात नाही. माननीय महसूल मंत्र्यांनी घोषणा करुन सुध्दा त्यावर कार्यवाही होत नाही. त्यामुळे आम्ही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर विशेषाधिकार भंगाची सूचना देणार आहोत. मी विचारु इच्छितो की, राज्यामध्ये आज काय सुरु आहे ?, विधिमंडळात ज्या घोषण्ा केल्या जातात त्यानुसार कार्यवाही केली जाते असा जनतेचा समज आहे. अधिकारी हे मंत्र्यांचे ऐकत नाही हे आम्ही ऐकले होते. परंतु विधिमंडळाला अधिकारी जुमानत नसतील तर ती अतिशय गंभीर बाब आहे. कायद्याने चाललेल्या सभागृहात दिलेल्या आश्वासनाचे अधिकाऱ्यांकडून पालन होत नाही, ही बाब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद करावयास पाहिजे होती. एवढेच नव्हे तर दोन्ही सभागृहातील चर्चेच्या अनुषंगाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे हे सुध्दा नमूद करावयास हवे होते. परंतु ही बाब नमूद केली नाही त्यामुळे मी खेद व्यक्त करतो. शेवटी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल माझा खेद व्यक्त करुन येथेच थांबतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्य विधानमंडळाच्या 2016 या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनात दिनांक 9 मार्च, 2016 रोजी माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले त्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी सर्वप्रथम आपल्याला धन्यवाद देतो आणि या प्रस्तावाचे समर्थन करतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होत असताना सभागृहातील अधिकाऱ्यांच्या लॉबीमध्ये अधिकारी मंडळी उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांनी उपस्थित राहण्याबाबत आपण निदेश द्यावयास पाहिजेत. माननीय मंत्री हे सकाळपासून सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सुध्दा उपस्थित राहण्याबाबत आपण सूचना द्याव्यात.

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा जो मुख्य उद्देश आहे तो मुद्दा क्र.2 मध्ये व्यक्त करण्यात आलेला आहे. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, जनतेच्या न्याय्य मागण्यांची पूर्तता करणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे, यांसाठी माझे शासन कटिबध्द आहे. शासनाच्या कटिबध्दतेबाबत नमूद केल्यानंतर पुढे असेही नमूद केले आहे की, या प्रयोजनासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये जनतेच्या कल्याणार्थ अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. महोदय, राज्य सरकारकडून जे निर्णय घेण्यात आलेले आहेत त्या निर्णयांची घोषणा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आलेली आहे. त्यातील काही घोषणांचा उल्लेख मी करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे अराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील राष्ट्रीय स्मारक, रायगड महोत्सव, वर्धा-सेवाग्राम-पवनार परिसराचा विकास, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती प्रित्यर्थ 'समता व सामाजिक न्याय वर्ष' घोषित करुन विविध उपक्रम राबविणे, मागासवर्गीय मुलींसाठी 50 नवीन वसतिगृहे बांधणे, पुणे, नागपूर व मुंबई येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी तीन वसतिगृहे बांधणे इत्यादी विविध मुद्दे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद केलेले आहेत.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार....

सभापती महोदय, आज राज्यामध्ये दुष्काळाचे सर्वात भीषण संकट निर्माण झालेले आहे. दुष्काळामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. राज्यातील नागरिकांना पिण्याचे पाणी न मिळणे, गुरांना चारा न मिळणे आणि अन्नधान्याचा तुटवडा या बाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात मुद्दा क्र.11 ते 37 असे एकूण 27 मुद्दे नमूद करण्यात आलेले आहेत. त्यातील काही घोषणांचा उल्लेख मला या ठिकाणी करणे आवश्यक वाटते.

सभापती महोदय, राज्यामध्ये अवर्षणबाधित एकूण 15750 गावे आहेत. केंद्र सरकारकडून राज्याला सहाय्य म्हणून 3049 कोटी रुपये मिळविण्यात राज्य सरकारला यश आलेले आहे. यापैकी 2536 कोटी रुपये अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेले आहेत. तसेच पीक कर्जावरील तीन महिन्यांचे व्याज माफ करणे, कर्जाची पुनर्रचना आणि कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याचे काम राज्य सरकारने केलेले आहे. याचा राज्यातील 5.5 लाख शेतकऱ्यांना फायदा देणे हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील महत्त्वाचा भाग आहे.

सभापती महोदय, कृषी संजीवनी योजनेच्या धर्तीवर स्थानिक संस्थांच्या सुमारे 50 हजार पिण्याच्या पाण्याच्या योजनांना लाभदायी ठरणारी 'पाणी संजीवनी' योजना राज्य सरकारच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान सुध्दा सुरु करण्यात आलेले आहे. या बरोबरच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत 3 वर्षामध्ये सुमारे 1 लाख विहिरींचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे. या बाबी करीत असतानाच मागेल त्याला शेततळे ही योजना सुध्दा घोषित करण्यात आली आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर जिल्ह्यांमध्ये मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचे काम सुरु सुरु करण्यात आले आहे. सामूहिक शेततळी बांधणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील 14 जिल्ह्यांमध्ये 68 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 अन्वये लाभ देणे, या अंतर्गत प्रतिमाह 86 कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद करणे, इत्यादी अनेक बाबी दुष्काळावर मात करण्यासाठी राज्य सरकारने घोषित केलेल्या आहेत.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार....

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत 550 शाळा प्रगत करण्यात आल्या आहेत. तसेच 9826 शाळा संगणकीकृत करुन 788 शाळांना आयएसओ-9000 मानांकर प्राप्त झालेले आहे. सरल संगणक प्रणालीद्वारे 150 प्रकारची माहिती मागविण्याची अट काढण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या व त्यांची शैक्षणिक प्रगती यांची परिगणना करणे सोपे झाले आहे. पुणे व नागपूर येथे भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था स्थापन करण्यात आली आहे. चंद्रपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात आले आहे. तसेच गोंदिया व वाशिम येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रस्तावित आहे. नागपूर येथे एम्स्च्या स्थापनेसाठी 150 एकर जागार उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या शिवाय जनतेचे रक्षण आणि गुन्हेगारीचा बिमोड करण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत. या सर्व दृष्टीने विचार केला तर घोषित केलेले कार्यक्रम/धोरण राबविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून ज्या घोषणा झालेल्या आहेत त्या बाबतीत काही उणेपणा असेल तर त्या बाबतची सूचना या सभागृहात करणे आवश्यक आहे. परंतु झालेल्या घोषणा योग्यप्रकारे राबविण्यात आल्या, प्रशासकीय यंत्रणेला या योजना राबविण्यासाठी आपण बाध्य करु शकलो तर दिलेला शब्द पाळण्याचे समाधान आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाचे समर्थन करतो आणि येथेच थांबतो.

धन्यवाद.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडण्यात आलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद केले आहे. 2019 पर्यंत या स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा शासनाचा मनोदय आहे, असे नमूद केले आहे. तसेच असेही नमूद केले आहे की, स्मारकासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नुकतीच नियुक्ती केली आहे. सभापती महोदय, जर आताच सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असेल तर 2019 पर्यंत स्मारकाचे काम खरोखरच पूर्ण होईल काय, अशी शंका माझ्या मनात येते. तसेच जे सल्लागार नेमलेले आहेत त्यांच्या पात्रतेची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरातून आली तर निश्चितपणे माझ्यासारख्या नवीन आमदाराला प्रबोधन होईल.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नमूद केले आहे की, समतावादी विचार निर्माण करण्यासंबंधीचे योगदान पुढील पिढ्यांना माहीत व्हावे यासाठी केंद्र शासनाकडून 5 ठिकाणांचा पंचतीर्थ म्हणून विकास केला जाणार आहे. महोदय, समतावादी विचारांची ताकद किती आहे हे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून दिसून येते. परंतु हे नमूद करीत असताना इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक कधीपर्यंत पूर्णपणे विकसित होईल या संदर्भातील माहिती माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरात मिळेल असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये मागील 4 वर्षांपासून दुष्काळाची परिस्थिती आहे. चालू खरीप हंगामात 15750 गावे दुष्काळामुळे बाधित झालेली आहेत. केंद्र सरकारने दुष्काळाच्या निवारणासाठी राज्य सरकारला 3049 कोटी रुपये मदत दिलेली आहे. त्यातील 2536 कोटी रुपये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसहाय्य म्हणून वितरित करण्यात आल्याचे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद केलेले आहे. परंतु राज्यात असे अनेक शेतकरी आहेत की त्यांच्या खात्यावर प्रत्यक्षात 100-200 रुपयांपेक्षा अधिक काहीही जमा झालेले नाही, अशी परिस्थिती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सी....

ॲड. निरंजन डावखरे ....

त्यामुळे शेतकऱ्यांना मदत देण्याचा जो मुख्य उद्देश आहे तो कुठेतरी मारला जात आहे. गरजू, बाधित शेतकऱ्यांना प्रत्यक्षात मदत मिळत नाही. त्यामुळे हे बघणे अतिशय गरजेचे आहे. दुष्काळी क्षेत्रात शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी चालू वीज देयकात 33 टक्के इतकी रक्कम माफ करण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सांगितले गेले आहे. आपण स्वतः त्या भागातून आहात. आपल्याला कल्पना आहे की, 33 टक्के वीज माफ करून या शेतकऱ्यांना आपण दिलासा देण्याचा प्रयत्न जरी केला असेल तरी तो पुरेसा नाही. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, या संदर्भातील शेतकऱ्यांची हवालदिल झालेली परिस्थिती लक्षात घेता, विजेचे बिल पूर्णपणे माफ करण्याची आज गरज आहे. त्यामुळे या संदर्भातील विद्युत देयक पूर्णपणे माफ करणे हे शासनाकडून अपेक्षित आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरातून निश्चितपणे या संदर्भातील उल्लेख अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मनरेगाच्या माध्यमातून 3 वर्षांमध्ये सुमारे 1 लाख विहिरींचे बांधकाम करण्याचा शासनाचा उद्देशाबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. लातूर, बीड, उस्मानाबाद, परभणी या भागांतून मोठ्या प्रमाणात शेतकरी व शेत मजूर स्थलांतरित होत आहेत. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भातील भावना वारंवार व्यक्त केल्या आहेत. तेथून लोक स्थलांतरित होत असतील तर आपण कोणत्या पध्दतीमध्ये 1 लाख विहिरी बांधणार आहात ? तेथे शेत मजूर उपलब्ध नसतील, तेथून स्थलांतरित होऊन शहरांकडे पुणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण या भागांत येणार असतील, तिकडे मनरेगाच्या कामांवर काम करणारे शेत मजूर कमी होत असतील तर आपला उद्देश कसा पूर्ण होईल अशी माझ्या मनात साशंकता निर्माण होत आहे, प्रश्न निर्माण होत आहे.

सभापती महोदय, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर या जिल्ह्यांमध्ये तलावांची दुरूस्ती करण्यात आली आहे. आगामी वित्तीय वर्षात राज्य शासन आणखी तलावांची दुरूस्त करणार आहे असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. ठाणे हे तलावांचे शहर आहे. मोठ्या प्रमाणात येथे तलाव आहेत. ठाण्यासारख्या अतिशय सुंदर शहरात तलावांची दुरूस्ती होणे गरजेचे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. निरंजन डावखरे ....

आहे. येथील तलावांमधील गाळ साचला आहे, त्या संदर्भात विचार होणे अतिशय गरजेचे आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरात ठाण्याचा कुठेतरी उल्लेख व्हावा. ठाण्यातील तलावांची दखल शासनाने घेणे गरजेचे आहे. हा तलावांचा जिल्हा असल्यामुळे त्याचा विसर पडता कामा नये.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सागरी किनाऱ्यावरील जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय चक्रीवादळ धोका सौम्यकरण प्रकल्पाचा टप्पा 2 ची अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविले आहे. या प्रकल्पाचा खर्च 398 कोटी रूपये इतका असल्याचे शासनाने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. हे धोरण नेमके काय राहणार आहे ? हे करणे गरजेचे आहे. कारण आपण बघितले आहे की, सागरी किनाऱ्यावरून होणारे हल्ले आहेत, त्या दृष्टीने इकडे सुरक्षेची व्यवस्था गरजेची आहे. भविष्य काळात नंतर येणाऱ्या, पुढच्या नैसर्गिक आपत्त्यांच्या संदर्भातील नेमकी उपाययोजना काय असणार आहे याची स्पष्टता माननीय मुख्यमंत्र्याच्या भाषणात अपेक्षित आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषी विकास योजना आहे. शासनाने सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून नवीन योजना सन 2015-2016 पासून आगामी 3 वर्षांच्या कालावधीत राबविण्याचे ठरविले आहे. निश्चितपणे हे स्वागतार्ह आहे. जैविक परंपरागत कृषी विकास योजनेच्या माध्यमातून जैविक सेंद्रीय शेती करण्याचे शासनाने ठरविले आहे. परंतु तसे ठरविले जरी असले तरी ते अतिशय खर्चिक आहे. त्यामुळे बायो टेक्नॉलॉजीवर थोडीशी डिपेंडन्सी ठेवणे गरजेचे आहे. शेतीमध्ये रिसर्च केल्याशिवाय आऊटपूट येणार नाही. फक्त नैसर्गिक शेतीवर अवलंबून राहिले तर शेतीमधून, जमिनीतून पाहिजे ते आऊटपूट, उत्पन्न येत नाही, ते वाढवायचे असेल तर फक्त नैसर्गिक शेतीवर पूर्णपणे अवलंबून ठेवणे हे काळानुसार पुढे जाऊन धोक्याचे ठरू शकेल.

सभापती महोदय, कृषी विकास उपक्रमासाठी सार्वजनिक खाजगी भागिदारी अंतर्गत 21 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. पण मुख्य उद्देश काय आहे हे पाहणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची सध्याची परिस्थिती पाहता, शेतीचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. निरंजन डावखरे ....

कणा मोडू नये आणि आपण पीपीपी मॉडेलवर जात असताना शेतीचे इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट करीत असू तरी शेतकरी हा पूर्णपणे संपू नये यासाठी शेतकऱ्यांना प्रोटेक्ट करण्यासाठी आपण नेमके काय धोरण घेणार आहात ? मोठे बलाढ्य उद्योजक त्या माध्यमातून आत शिरणार असतील, शेतकऱ्यांवर जर त्यांचे साम्राज्य उभे करणार असतील तर या संदर्भातील शासनाची भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तरात सांगावी.

सभापती महोदय, 2 ते 4 तज्ज्ञांचे नामनिर्देशन करून कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज व्यवसायाभिमुख करण्याचे शासनाने ठरविले आहे असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. पण हे 2 ते 4 तज्ज्ञ आपण नेमणार आहात त्यांचा अनुभव काय राहील, त्यांच्या ज्ञानाचा अनुषंगाने त्यांची पात्रता काय आहे याची माहिती शासनाकडून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, शासनाने विदर्भ व मराठवाडा येथील 14 जिल्ह्यांमध्ये विविध निवारण उपाययोजना हाती घेतल्याचे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. विवंचना भासणाऱ्या या जिल्ह्यांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना ऑटो रिक्षा परवाने देऊन त्यांच्या उपजीविकेस हातभार लावण्यासाठी माननीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने निराधार स्वावलंबन योजना सुरू केली जाणार आहे असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या विधवांसाठी ही योजना आहे. निश्चितपणे याचा उद्देश अतिशय चांगला असला तरी शेतकऱ्यांच्या विधवांना, ज्या ग्रामीण भागातील विधवा आहेत त्यांचा विचार करता, त्यांना ऑटोरिक्षा चालविता येईल का हा प्रश्न माझ्यासारख्या नवीन आमदारांच्या मनात येतो. सभापती महोदय, त्यासाठी त्यांच्याकडे भागभांडवल पाहिजे. घरातील कर्त्या पुरूषाने आत्महत्या करण्याचा मुख्य उद्देशच हा होता की, त्याच्याकडे पैसे नव्हते. ऑटो रिक्षा घ्यायच्या असतील तर भागभांडवल पाहिजे. आपण परवाने देत आहात. पण ते देताना ऑटो रिक्षा घेण्यासाठी भागभांडवल उपलब्ध करून देणार आहात का याची स्पष्टता सभागृहामध्ये होणे गरजेचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. निरंजन डावखरे ....

सभापती महोदय, शासन मुंबई, ठाणे, औरंगाबाद, सोलापूर येथे सीसीटीव्ही प्रकल्प पूर्ण करून पोलीस दलाला जास्तीत जास्त सक्षम करण्याचा प्रयत्न करीत आहे. पण हे करताना आज पोलीस दल कमी पडत आहे. प्रत्येक ठिकाणी लोकसंख्या वाढत आहे, त्या लोकसंख्या वाढीच्या अनुषंगाने पोलीस दल तेवढ्या ताकदीने वाढत आहे का ? ठाण्याचेच उदाहरण द्यायचे म्हटले तर 1 कॉन्स्टेबल हा 1200 नागरिकांना जर मॅनेज करीत असेल तर कॉन्स्टेबलवर पर्यायाने पोलीस दलावर फार मोठ्या प्रमाणात दाब, प्रेशर येत आहे. आपण त्यासाठी पोलीस दल वाढविणार आहात का, त्यासाठी काय करणार आहात हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महिला व बालकांची सुरक्षा हा महत्वाचा मुद्दा असून त्यासाठी मुंबईमध्ये 90 हून अधिक महिला पोलीस गस्त पथक आपण कार्यरत करणार आहात. पण या महिला पोलीस ऑनफिल्ड राहणार असताना, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिलांसाठी व्यवस्थित खोल्या आहेत का, या महिला पोलिसांना कपडे बदलायचे असतील तर तशी योजना आहे, बसण्याची व्यवस्था आहे का, या सर्व गोष्टींचं नियोजन केले आहे का ? सभापती महोदय, याबाबतीतील नियोजन कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये नाही, त्यामुळे तेही होणे अतिशय गरजेचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरात या संदर्भातील स्पष्टता येईल असे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, पोलिसांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, म्हाडा व हुडको हे संयुक्तपणे काम करीत आहेत असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटले आहे. यावर्षी जवळपास 11,500 इतकी निवासस्थाने संपादन व बांधकाम करण्याचे काम हाती घेतले आहे असेही म्हटले आहे. नेमके हे हाऊसिंग कोणत्या भागात चालले आहे हे समजणे फार गरजेचे आहे. कारण आपण मुंबई, ठाणे या शहरी भागात मोठ्या प्रमाणात हाऊसिंग उपलब्ध करून देतो.

....D

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे.........

मोठ्या अधिकाऱ्यांना त्याचा फायदा होतो. ग्रामीण आणि विशेषत: दुष्काळी भागातील पोलिसांसाठी पोलीस हाऊसिंग हा अतिशय महत्वाचा विषय आहे. आज मराठवाड्यातील पोलीस वसाहतींमध्ये पिण्याच्या पाण्याची देखील उपलब्धता नाही. त्यामुळे 800 ते 100 रुपये देऊन त्यांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. मुंबई आणि उपनगरातील पोलीस वसाहतींसाठी जादा एफएसआय दिला जातो. त्याच धर्तीवर ग्रामीण भागात पोलीस वसाहती उभ्या करीत असताना त्यांना अधिकचा एफएसआय दिला जावा, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे. ग्रामीण भागातील कनिष्ठ दर्जाचे पोलीस कर्मचारी आपल्या कुटुंबासह त्या ठिकाणी रहात असतात, दिवसरात्र सेवा बजावित असतात. त्यामुळे त्यांच्या बाबतीत शासनाने संवेदनशीलपणे निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, "औद्योगिकीकरणात महाराष्ट्राचे अग्रस्थान अबाधित रहावे याकरिता राज्याने महत्वाकांक्षी "मेक इन महाराष्ट्र" अभियान सुरु केले आहे," असा उल्लेख अभिभाषणात आहे. आतापर्यंत या माध्यमातून प्रत्यक्षात किती उद्योग उभे राहिले आणि किती रकमेची गुंतवणूक राज्यात झाली आहे, या संदर्भातील स्पष्टता येणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, "राज्यात फॅब प्रकल्पांचा चालना देण्यासाठी नवीन इलेक्ट्रॉनिक धोरण आखले आहे, नवीन रिटेल धोरण आखणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे, ई कॉमर्सची वाढती लोकप्रियता विचारात घेऊन व लॉजिस्टीक हब्ज स्थापन करण्यास उत्तेजन देण्याकरिता काही प्रमाणात करसवलती देण्याचे प्रस्तावित आहे," असा उल्लेख अभिभाषणात करण्यात आला आहे. आज अशी परिस्थिती आहे की, मोठ्या उद्योजकांमुळे पारंपारिक व्यवसाय करणारा राज्यातील रिटेलर संपून चालला आहे. आपण ई-कॉमर्स उद्योगांना प्रोत्साहन देत आहोत. परंतु, या उद्योगांकडून राज्याला कोणताही टॅक्स मिळत नाही, त्यांच्यावर टॅक्सचे बंधन नाही. ज्या पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या रिटेलर व्यावसायिकांनी आपल्याला निवडणुकीत मदत केली आहे ते आज मरणासन्न अवस्थेत आले आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण नाही. त्यांना संपूर्ण मदत करणे, ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे या रिटेलर

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे.........

व्यावसायिकांना शासन कशा प्रकारे वाचविणार आहे, त्यांना कशा प्रकारे प्रोत्साहन देणार आहे, या संदर्भातील धोरण शासनाने स्पष्ट करावे, अशा प्रकारची विनंती मी या माध्यमातून करणार आहे.

सभापती महोदय, "मुंबई येथे भारत सरकारने नुकत्याच आयोजित केलेल्या "मेक इन इंडिया" सप्ताहाच्या यजमानपदाचा मान महाराष्ट्र राज्याला मिळाला आहे," असा उल्लेख अभिभाषणात करण्यात आला आहे. 'मेक इन इंडिया', 'मेक इन महाराष्ट्र', 'स्टार्ट अप इंडिया', या संदर्भातील माहितीही अभिभाषणात देण्यात आली आहे. मला या माध्यमातून शासनाला असे विचारावयाचे आहे की, कृषी क्षेत्रासाठी स्टार्टअप इंडिया योजना आपण कशा प्रकारे राबविणार आहात, या क्षेत्रासाठी स्टार्टअप इंडिया योजनेच्या माध्यमातून शासन किती भर देणार आहे, या संदर्भातील खुलासा मुख्यमंत्री महोदय आपल्या उत्तराच्या भाषणातून करतील, असा विश्वास मला वाटतो.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील अनेक मुद्यांबाबत विचार मांडता येऊ शकतील. परंतु, मी काही महत्वाच्या मुद्यांवरच या ठिकाणी बोलणार आहे.

सभापती महोदय, "शासकीय रुग्णालयातील पहिली मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ही फेब्रुवारी, 2016 मध्ये नागपूर येथील अतिविशेषता रुग्णालयामध्ये यशस्वीपणे पार पाडण्यात आली," असा उल्लेख अभिभाषणात आहे. परंतु, यामधील महत्वाची अडचण ही आहे की, काका, मामा, चुलता अशा जवळच्या नातेवाईकांना किडनी किंवा अन्य ऑर्गन डोनेट करता येत नाही. राज्याने हा अधिकार केंद्र शासनाला दिलेला आहे. (अडथळा.....) आता आपण यामध्ये बदल केलेला आहे, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदय सांगत आहेत. तसे केले असेल तर त्या संदर्भातील स्पष्टता उत्तराच्या भाषणातून आम्हाला मिळावी, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, "संघ लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेसाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या पात्र उमेदवारांकरिता दिल्ली येथील नामवंत प्रशिक्षण संस्थेमध्ये खास शिक्षण घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे," असा उल्लेख अभिभाषणात आहे. मला या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

निमित्ताने शासनाच्या असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मुंबईतील कलिना येथे फार मोठी

...3....



ॲड.निरंजन डावखरे.........

जमीन उपलब्ध आहे. या ठिकाणी एखादे प्रशिक्षण केंद्र उभे करण्याची आवश्यकता आहे. त्या माध्यमातून आपल्या राज्यातील मुलांना जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळू शकेल. याबाबतही शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती मी या माध्यमातून करणार आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी आपण मला संधी दिली, त्याबद्दल मी मनापासून आपले आभार मानतो. धन्यवाद.

-----------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामराव वडकुते) :** सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, अनेक सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे. तालिका सभापती म्हणून मी नुकताच पदभार घेतला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या भाषणादरम्यान घंटी वाजवून व्यत्यय आणणे मला संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी स्वतःच याबाबतची काळजी घेतली तर बरे होईल.

आता सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानतो आणि जी सूचना आपण केली आहे त्याची दक्षताही मी निश्‍ितचपणे घेणार आहे. तथापि, विनम्रपणे एक बाब मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, चर्चेला सुरुवात झाल्यानंतर या बाजूची आणि त्या बाजूची नेते मंडळी आपल्या भाषणासाठी फार वेळ घेतात व त्यामुळे नंतरच्या वक्त्यांना बोलण्यासाठी कमी वेळ मिळतो, अशी सर्वसाधारणपणे अनेक सन्माननीय सदस्यांची तक्रार असते. त्यामुळे या संदर्भातील नियोजन आपण केले तर बरे होईल.

सभापती महोदय, राज्याचे सन्माननीय राज्यपाल श्री.चे.विद्यासागर राव यांनी सरकारची भविष्यातील धोरणे आणि वाटचाल कशी असेल, या बद्दलचे भाषण आपल्या सर्वांसमोर केले आहे. त्या माध्यमातून सरकारच्या भविष्यातील वाटचालीबाबतचे प्रतिबिंब असलेली ब्युप्रिंट आपल्या सर्वांसमोर ठेवली आहे. या अभिभाषणात अनेक बाबींचा समावेश करावयास हवा होता. परंतु, माझा कन्सर्न फक्त सामाजिक योजनांसदर्भात असून तेवढ्यापुरतेच मी बोलणार आहे. अन्य विषयासंबंधी माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी मुद्दे मांडलेले आहेतच.

सभापती महोदय, सामाजिक विकासाच्या संदर्भात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून कोणतेही चित्र स्पष्ट होत नाही, याबद्दल मला खेद आणि दुःख वाटते. 'मेक इन इंडिया', 'मेक इन महाराष्ट्र' या योजना चांगल्या आहेत. त्या माध्यमातून राज्यात उद्योग येतील, लाखो लोकांना नोकऱ्या मिळतील. परंतु, जोपर्यंत देशात आणि राज्यात स्थैर्य, सद्‌भाव आणि शांतता निर्माण होत नाही तोपर्यंत आपण प्रगतीकडे वाटचाल करु शकणार नाही, हे देखील या निमित्ताने मला

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. एकीकडे आपण 'मेक इन इंडिया', 'मेक इन महाराष्ट्र' असे म्हणत असलो तरी दुसरीकडे 'हेट इन इंडिया', 'हेट इन महाराष्ट्र', असाही प्रकार देशात सुरु आहे आणि त्यावर लगाम कसा घालता येईल, या संदर्भात राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणातून काही मार्गदर्शन केले असते, काही भावना व्यक्त केल्या असत्या तर राज्यातील जनतेला, देशातील जनतेला दिलासा मिळू शकला असता.

सभापती महोदय, उकळत्या पाण्यामध्ये कधीही प्रतिबिंब दिसत नाही तर शांत आणि स्थिर पाण्यामध्ये प्रतिबिंब दिसत असते. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आपल्या भाषणातूत मांडलेला मुद्दा अतिशय महत्वाचा होता. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून समोर आलेल्या शासनाच्या धोरणांना कोठेही मानवी चेहरा नाही, ह्युमन फेस नाही, असे ते म्हणाले आणि ते बरोबर आहे. मानवी चेहऱ्याऐवजी पहिल्या परिच्छेदापासून शेवटच्या परिच्छेदापर्यंत आरएसएसचा चेहरा दिसत आहे. बेमालुमपणे सांप्रदायिकतेला खतपाणी कसे घालता येईल, हा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला आहे.

सभापती महोदय, आपण सर्वांनी राज्यपाल महोदयांचे अभिभाषण ऐकले आणि त्याची लेखी प्रतही आपल्या सर्वांसमोर आहे. To read between the lines नुसार या अभिभाषणाचा अर्थ लावला तर अभिभाषणातील अथपासून इतिपर्यंत आरएसएसचा अजेंडा राबविण्याचा निर्णय या शासनाने घेतला आहे की काय, अशी शंका निर्माण होते. राज्यघटनेचा चेहरा या अभिभाषणामधून दिसला पाहिजे. परंतु, तो तसा दिसत नाही, ही खेदजनक बाब आहे. (अडथळा........)

सभापती महोदय, या अभिभाषणाला मी काही लेखी सुधारणा देखील सुचविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गिरीश व्यास आणि श्री.नागो गाणार हे माझे चांगले मित्र आहेत. आमच्यामध्ये वैचारिक मतभेद आहेत. परंतु, ज्यावेळी एखादे सामाजिक काम असते त्यावेळी आम्ही एकत्र येत असतो. आपणही सर्वजण या ठिकाणी एकत्रच आहोत.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

कारण, सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष मिळूनच सरकार तयार होत असते. शासनाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवाच्या प्रित्यर्थ सन 2015-16 हे वर्ष "समता व सामाजिक न्याय वर्ष" म्हणून घोषित केले आहे. केंद्र शासनानेही आणि राज्य शासनानेही घोषित केले आहे. केंद्र आणि राज्य शासन या प्रसंगी विविध उपक्रम राबवित आहे आणि राबविणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्याशी निगडित 5 ठिकाणांचा विकास केला जाणार आहे. मघाशी सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी पंचतीर्थ असा त्याचा उल्लेख केलेला आहे. परंतु, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वर्ण, वर्ग, जातीविरहित, शोषणमुक्त, समताधिष्ठित एकसंघ भारतीय समाज निर्माण करण्यासंबंधीचा जो विचार आहे तो भावी पिढीमध्ये रुजविण्याची आवश्यकता आहे. आज जे काही सुरु आहे, मग जय बोला किंवा बोलू नका, ही जी नाटके सुरु आहेत त्या पार्श्वभूमिवर वर्ण, वर्ग, जातीविरहित, शोषणमुक्त, समताधिष्ठित एकसंघ भारतीय समाजाच्या निर्मितीचे स्वप्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्य घटनेचे आहे. माननीय डॉ.रणजित पाटील साहेब, सध्याच्या पिढीमध्ये, भावी पिढीमध्ये हा विचार रुजविण्याची आवश्यकता आहे. आमचा देश तरुणांचा देश आहे. आपल्या देशात 50-60 टक्के तरुणांची संख्या आहे. देशाचे, राज्याचे भविष्य ज्यांच्या खांद्यावर आहे त्यांच्यामध्ये हा विचार पेरण्याचे काम करावयाचे असेल तर त्यासाठी समिती आहे. परंतु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती समितीचे काम अनेक वर्षापासून रखडलेले आहे. या समितीचे काम बंद झालेले आहे किंवा कसे, हे देखील सरकार सांगत नाही. ज्योतिबा फुले, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य प्रकाशन जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ज्या प्रकाशन समित्या निर्माण केलेल्या आहेत त्या बंद आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याच्या खंडांचे पुनर्मुद्रण करुन ते जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आमचे शासन काय करणार आहे याचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख नाही ही अत्यंत खेदजनक बाब आहे.

सभापती महोदय, खरे पाहिले तर राज्यात दलितांवर, बौद्धांवर सातत्याने अन्याय, अत्याचार केले जातात. माननीय गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील साहेब सभागृहात उपस्थित

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

आहेत. त्यांना याची चांगली कल्पना आहे. राज्यातील एकही जिल्हा असा नाही की, त्या जिल्ह्यात दलितांवर, बौद्धांवर अत्याचार केले जात नाहीत. भाई बरोबर आहे का नाही ? एकदा भाई आणि मी तळ कोकणात गेलो होतो. तेथे काय परिस्थिती आहे ? आजही तेथे मोठ्या प्रमाणावर अस्पृश्यता पाळली जाते. सार्वजनिक ठिकाणी दलितांना चहा पिण्यासाठी कप किंवा ग्लास वेगळे ठेवले जातात. आमच्या महाराष्ट्रामध्ये आज ही परिस्थिती आहे. ही अत्यंत भयानक अवस्था आहे. दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबविण्यासाठी, अन्यायाला प्रतिबंध करण्यासाठी ॲट्रॉसिटी कायदा आहे. केंद्र शासनाने सन 1989 मध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा केला. आपण तो कायदा ॲडॉप्ट केलेला आहे. आपण राज्यात तो कायदा लागू केलेला आहे. परंतु, त्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात नाही. उलट अत्याचार पीडित दलित जनता, बौद्ध जनता ज्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी जाते त्यावेळी पोलीस स्टेशनकडूनच त्यांच्यावर अत्याचार केला जातो. पोलीस स्टेशनमध्ये ॲट्रॉसिटी कायद्याच्या अंतर्गत कोणी तक्रार नोंदविण्यासाठी गेले तर पोलीस तक्रार नोंदवून घेण्यास मागेपुढे पाहतात आणि एकदा का तक्रार नोंदविली की दलितांवरच क्रॉस केस केली जाते. दलितांवर दरोड्याचा गुन्हा दाखल केला जातो. अशा पद्धतीने महाराष्ट्रातील आमचा दलित समाज दुहेरी अत्याचार, अन्यायाचा बळी पडतो, ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र ब्राम्हण महासंघाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. माननीय डॉ.रणजित पाटील साहेबांना याची माहिती आहे किंवा नाही, याची मला कल्पना नाही. कदाचित, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना याची माहिती असेल. राज्यातील दलितांवर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लोकांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी ॲट्रॉसिटी कायदा आहे. परंतु, हा कायदाच रद्द केला पाहिजे, अशा प्रकारची मागणी महाराष्ट्र ब्राम्हण महासंघाने केलेली आहे. नागपूर येथे या महासंघाचे मुख्यालय आहे आणि त्यांनी अशा प्रकारचे पत्रक काढलेले आहे. माझ्याकडे त्या पत्रकाची प्रत आहे. त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून हे पत्रक काढलेले आहे. महाराष्ट्र ब्राम्हण महासंघाच्या वतीने ॲट्रॉसिटी कायदा रद्द

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

करावा, आरक्षण रद्द करावे, अशा प्रकारची मागणी पत्राद्वारे मुख्यमंत्री महोदयांना करण्यात आलेली आहे. आमचे मुख्यमंत्री महोदय याची दखल घेणार आहेत की नाही ? एकतर जातीयवाद थांबवायचा नाही, अन्याय, अत्याचार थांबवायचा नाही आणि अन्याय अत्याचार थांबविण्यासाठी जर ॲट्रॉसिटी कायद्याच्या वापर केला जात असेल तर मात्र तो कायदाच रद्द करावा, अशी मागणी केली जाते. जो कोणी ॲट्रॉसिटी कायद्याचा दूरुपयोग करीत असेल त्याच्यावर आपण कठोर कारवाई करावी. परंतु, खरोखर अन्याय, अत्याचार होत असेल तर अन्याय, अत्याचार करणाऱ्या जातीय सांप्रदायिक प्रवृत्तीला कोणत्याही प्रकारचा थारा देण्याचे काम करु नये. त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. मग ते खैरलांजी, जवखेडा किंवा सोनई येथील प्रकरण असेल, कोणतेही प्रकरण असले तरी अत्याचाराविरुद्ध कठोर कारवाई झाली पाहिजे. परंतु, महाराष्ट्र ब्राम्हण महासंघ मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहून अशा प्रकारची मागणी करणार असेल तर जे काही सुरु आहे ते थांबले पाहिजे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गाचा शासकीय सेवेमध्ये मोठा अनुशेष आहे. आपण मेक इन महाराष्ट्र, मेक इन इंडिया असे म्हणतो. त्या माध्यमातून 25-30 लाख तरुणांना नोकरी मिळणार आहे. परंतु, शासकीय सेवेत अनेक वर्षापासून नोकर भरती बंद आहे. शासकीय सेवेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गाची जी भरती प्रक्रिया सुरु असावयास पाहिजे ती बंद झालेली आहे. अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या, ओबीसी समाजाच्या तरुणांना ते कॉम्पिटन्ट असून देखील सेवेत घेतले जात नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासकीय सेवेत मागासवर्गीयांचा जवळपास 3 लाख पदांचा अनुशेष आहे. मंत्री महोदय, मी जे सांगितले, ते आपण तपासून घ्यावे. ही आकडेवारी थोडी फार कमी जास्त होईल. परंतु, माझ्या माहिती प्रमाणे शासकीय सेवेमध्ये मागासवर्गीयांचा 3 लाख पदांचा अनुशेष आहे. नोकर भरती बंद का केली ? पदे रिक्त आहेत, परंतु भरती केली जात नाही, अशी परिस्थिती आहे. मग तुम्ही काय करणार आहात ? आम्ही कोणावर विश्वास ठेवायचा ? स्व.विलासराव देशमुख, माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी अनुसूचित

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी प्रवर्गाचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलली होती. त्यांनी अनुशेषाच्या 3 लाख पदांपैकी जवळपास 1 लाख पदे भरली होती. त्यानंतर ती भरती प्रक्रिया बंद झाली. स्व.विलासराव देशमुख, माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना मागासवर्गीयांच्या भरती प्रक्रियेजी जी प्रोसेस सुरु झाली होती ती ते पदावरुन गेल्यानंतर बंद करण्यात आली. माननीय राज्यपालांनी याची दखल घ्यावयास पाहिजे होती. म्हणजे माननीय राज्यपाल आणि शासन दुर्बल घटकांना आधार देणार नसेल तर मग त्यांनी कोणाच्या तोंडाकडे बघायचे ? कुंपनानेच शेत खाल्ले तर तक्रार कोणाकडे करायची ? पावसाने मारले आणि राज्याने झोडपले तर तक्रार कोणाकडे करायची, अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी प्रवर्गाचा शासकीय सेवेत मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे. तो अनुशेष भरुन काढण्यासाठी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात विशेष उल्लेख असावयास पाहिजे होता. परंतु, तो उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे.

सभापती महोदय, दलित, आदिवासी, ओबीसी प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाने विविध महामंडळांची स्थापना केलेली आहे. मग ते महात्मा ज्योतिबा फुले महामंडळ असेल किंवा अन्य महामंडळे असतील. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळात काय झाले, याची भाई आपल्या कल्पना आहे. सध्या ते जेलमध्ये आहेत. (...अडथळा...) जे कोणी जेलमध्ये असतील ते, जे या सभागृहात नाहीत त्यांचा उल्लेख करावयाचा नाही, अशी सभागृहाची प्रथा आहे. मागासवर्गीय मग ते अनुसूचित जातीचे असतील, ओबीसी समाजाचे असतील, चर्मकार समाजाचे असतील, आर्थिक दृष्ट्या मागासलेले असतील यांच्याकरिता महामंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. परंतु, भीक नको पण कुत्रे आवर अशा प्रकारची अवस्था आहे.

...F-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

गरीब लोक अर्ज करतात परंतु त्यांना कोणत्याही प्रकारचे कर्ज मिळत नाही. बँकेकडे त्यांची शिफारस करण्यात येते परंतु बँकचे अधिकारी त्यांना ताकास तूर लागू देत नाहीत, अशा प्रकारची व्यवस्था आहे. दलित व आदिवासी प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध महामंडळे आहेत, या महामंडळांकडून सहजरित्या आर्थिक कर्ज उपलब्ध व्हावे याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी दखल घ्यावी, याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.

सभापती महोदय, दुष्काळ व टंचाईची चर्चा आपण सुरुवातीपासून करीत आहोत, राज्यातील शेतकरी अत्यंत हवालदिल झालेला आहे. शेतकरी निराश झाल्यामुळे मृत्युला मिठी मारल्याशिवाय त्याला दुसरा कोणताही मार्ग सूचत नाही. अशी विदारक अवस्था राज्यात निर्माण झालेली आहे. ही अवस्था या किंवा मागील सरकारमुळे झाली असे माझे म्हणणे नाही. निसर्गाचा प्रकोप, निसर्गाचा असहकार व अवकृपा आहे. मागील सरकारने काही केले नाही अशातला भाग नाही, मागील सरकारने कामे केली असती तर आज दुष्काळ पडला नसता असा प्रकार आहे काय ? तुमचे सरकार आले म्हणून दुष्काळ पडला अशातला देखील भाग नाही. दुष्काळी व टंचाई परिस्थितीमुळे शेतकरी त्रस्त असल्यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी विविध उपाययोजनांची घोषणा करण्यात आली. आत्महतेसाठी प्रवृत्त होणाऱ्या शेतकऱ्यांना आत्महत्तेपासून परावृत्त करण्यासाठी या सरकारने 7/12 कोरा करण्याची घोषणा केली होती. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी कर्जमुक्तीबाबत 7/12 कोरा करण्यासाठी मोर्चे काढले होते. 7/12 कोरा करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यात येईल. अशा प्रकारचा कोणताही उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही. यासाठी अनेक योजना आहेत, दुष्काळ निवारण्यासाठी जे उपाय सूचविण्यात आले आहेत त्यांचे ऑडिट झाले पाहिजे. ऑडीट केल्यानंतर दुष्काळाने पिडीत व टंचाईग्रस्त, गारपीटग्रस्त, अवकाळी पावसाने ग्रस्त अशा डबघाईस आलेल्या व निराशेच्या गर्तेत गुंतलेल्या व निराशेच्या भावनेतून आत्महत्तेकडे वळणाऱ्या आमच्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील असे मला वाटते.

सभापती महोदय, काल परवा सभागृहात सांगण्यात आले की, कर्जमुक्ती केल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील काय ? जानेवारी, 2015 ते डिसेंबर, 2015 या कालावधीत राज्यात 3228 आत्महत्या झाल्या आहेत. त्यापैकी फक्त 1841 लोक अनुदानास पात्र झाले आहेत. इतर लोकांचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही. याची कारणे काय आहे याबाबत माहिती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

नाही. ही माहिती महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सभागृहात सांगितली आहे. 1 ऑक्टोबर, 2014 ते जानेवारी 2015 पर्यंत विभागनिहाय आत्महत्या कशा झाल्या आहेत त्याची आकडेवारी मी सांगतो. नाशिक विभागात एकूण आत्महत्या 661 झाल्या त्यामध्ये महिला शेतकऱ्यांची संख्या 12 आहे. अमरावती विभागात एकूण आत्महत्या 1536 झाल्या आहेत, त्यामध्ये महिला शेतकऱ्यांची संख्या 124 आहे. पुणे विभागात शेतकऱ्यांच्या पाच आत्महत्या झाल्या आहेत, कोकण विभागात शेतकऱ्यांच्या 3 आत्महत्या झाल्या आहेत, औरंगाबाद विभागात एकूण शेतकऱ्यांच्या आत्महत्या 1454 असून त्यामध्ये महिला शेतकऱ्यांची संख्या 67 इतकी आहे. ही आकडेवारी दिवसेंदिवस वाढत आहे ही मोठी चिंतेची बाब आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबत नाहीत, सरकार शेतकऱ्यांचे कर्ज का माफ करु शकत नाही. कोट्यवधी रुपयांचा व्यापाऱ्यांचा एलबीटी टॅक्स शासनाने माफ केला आहे. व्यापाऱ्यांसाठी सवलती देता त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. कारण राज्याचा विकास झाला पाहिजे. कोट्यवधी रुपयांची टोलमुक्ती सरकारने दिली आहे. व्यापाऱ्यांना दिलासा दिला त्यामुळे शेतकऱ्यांना केंव्हा दिलासा देणार आहात ? आज सत्ताधारी बाकावर बसलेली आमची मित्रमंडळी मागणी करीत होती की, शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करा. 7/12 कोरा झाल्यावर कमीत कमी 90 टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. कर्जमुक्तीसाठी 7/12 कोरा केला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील किंवा नाही हा नंतरचा भाग असला तरी कर्जमुक्तीमुळे 70 ते 80 टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपण वाचवू शकतो. हा एकच उपाय आहे असे मी म्हणत नाही. यासाठी अनेक उपाय आहेत, प्राथमिक उपाय हा कर्जमुक्तीचा आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे होणार नुकसान थांबू शकेल असे मला वाटते. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्यासंदर्भात राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख नाही, त्याबाबत मला अत्यंत दुःख वाटत आहे.

सभापती महोदय, राज्यातील मुस्लिम समाज, अल्पसंख्याक समाज, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्तरावर मागासलेला आहे. अनेक प्रकारच्या अभ्यासाअंती तयार करण्यात आलेल्या अहवालावरुन तसेच सच्चर समितीच्या अहवालानुसार मुस्लिम समाजाला शिक्षणाबरोबर नोकऱ्यांमध्ये 5 टक्के आरक्षण देण्यात यावे. अल्पसंख्याक समाजाला राज्याच्या व देशाच्या मुख्य प्रवाहात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सामावून घेतले नाही तर देशात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. वेळेवर शिवले तर जास्त फाटत नाही, जास्त फाटण्याची वाट न पाहता मुस्लीम व अल्पसंख्याक समाजाला शैक्षणिक आणि नोकरीमध्ये 5 टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. या आश्वासनाची अंमलबजावणी करण्याचा कोणताही उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही, ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

सभापती महोदय, राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह इतर मागासवर्गीय, भटक्या जमाती, विमुक्त जाती आणि विशेष मागास प्रवर्गातील शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती तसेच मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मिळण्याच्या संदर्भात प्रचंड दिरंगाई केली जात आहे. सदर विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती देण्याबाबत तसेच मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीला कात्री लावण्याच्या संदर्भात 1 जुलै 2015 रोजी वित्त विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेला कार्यगट रद्द करण्याचा कोणताही उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही. त्यामुळे या प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे.

सभापती महोदय, राज्यातील सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण अपूर्ण असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी अनेक प्रकारच्या अडचणी येत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर आर्थिक सर्वेक्षण करण्यासंदर्भात राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, राज्याचे थोर नेते माननीय बाळासाहेब ठाकरे, यांच्याबाबत प्रचंड अभिमान आहे, कै.गोपीनाथ मुंडे, कै.बाळासाहेब ठाकरे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, या थोर पुरुषांच्या नावाने शासनाने बऱ्याच योजना सुरु करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सरकारने एक योजना सुरु केलेली आहे. ती योजना अशी आहे की, शेतीविषयक विवंचना भासणाऱ्या जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना ऑटो रिक्षा परवाने देऊन त्यांच्या उपजीविकेस हातभार लावण्यासाठी "हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना " राज्य शासनाने सुरु केली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

सदर योजनेअंतर्गत आपण आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा आणि त्यांच्या परिवारातील लोकांना ऑटो रिक्षाचे परवाने देणार असल्यामुळे मला अतिशय बरे वाटले. परंतु ऑटो रिक्षा देण्यासाठी आर्थिक तरतूद कशी करणार आहात याचाही विचार झाला पाहिजे. मी सरकारच्या निदर्शनास आणून देतो की, याबाबत शासनाने विचार केला पाहिजे. आत्महत्याग्रस्त शेतकरी फक्त हिंदु समाजाचे आहेत असे नाही तर अनेक समाजाचे आहेत. यामुळे बाळासाहेब ठाकरे यांना मर्यादित का करता, त्यांना राष्ट्र सम्राट म्हणा, देश हृदय सम्राट म्हणा. परंतु त्यांना हिंदु हृदय सम्राट म्हटल्यास इतर समाजाच्या लोक, जे हिंदु नाहीत त्यांना या योजनेचा लाभ मिळेल की नाही अशी संभ्रमावस्था आहे. आर.एस.एस.चा चेहरा नजिक करण्याचा प्रयत्न केला जातो. सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करतो व वेळेअभावी माझे भाषण याच ठिकाणी थांबवतो. धन्यवाद.

-----------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण सरकारच्या योजनांचे प्रतिबिंब असते. यामुळे त्यावर खेद व्यक्त करण्यासाठी मी येथे उभी आहे. वस्तुस्थिती लक्षात घेऊन किंवा जनतेच्या अपेक्षा पूर्ण होतील याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काही दिसत नाही. या अभिभाषणात विविध घोषणांची भर पडली असून सदर योजनांची पूर्ती करण्यासाठी सरकारकडून पैसा कुठून येणार, महसूल कुठून जमा होणार, यासंबंधीचे धोरण राज्यपालांच्या अभिभाषणात दिसत नाही. यामुळे सर्वसामान्य जनतेचा भ्रमनिरास करणारे राज्यपालांचे अभिभाषण आहे. राज्यपालांच्या अभिभाषणातील अनुक्रमांक 11 वर असा उल्लेख करण्यात आला आहे की, केंद्राने महाराष्ट्राला दुष्काळासाठी 3049 कोटी रुपये दिले. मी सरकारच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, यावर्षीचा भीषण दुष्काळ व शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता ही रक्कम अतिशय तुटपुंजी आहे. म्हणून मी सरकारकडे मागणी करते की, शासनाने त्वरित संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय जाहीर करावा व उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान म्हणून मिळवावी.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणातील अनुक्रमांक 22 वर मनरेगा योजनेसंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. शासनाने आगामी 3 वर्षांमध्ये सुमारे एक लाख विहिरींचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. त्यात पुढे असेही उल्लेख करण्यात आला आहे की, आतापर्यंत 31 हजार विहिरी बांधून पूर्ण झालेल्या आहेत. ही योजना तत्कालीन युपीए सरकारने सुरु केली आणि संपूर्ण देशात अत्यंत चांगल्या पध्दतीने राबविली होती. युपीए सरकारच्या इतर योजना बंद करण्याचा सपाटा या सरकारने लावलेला असताना ही योजना मात्र सुरु ठेवली याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते. महाराष्ट्राच्या जास्तीत जास्त ग्रामीण जनतेला या योजनेचा उपयोग व्हावा अशी मला सरकारकडून अपेक्षा आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आला आहे की, मुंबई, पुणे, नागपूर या ठिकाणी वर्किंग वुमन होस्टेल बांधण्यात येणार आहे. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु मला शासनाच्या निदर्शनास एक बाब आणून द्यावयाची आहे की, वर्किंग वुमेन होस्टेलकरिता पुणे महानगरपालिकेने तत्कालीन राज्य सरकारकडून 3 कोटी 80 लक्ष रुपये इतकी

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी .....

रक्कम मंजूर करुन घेतली होती, त्यापैकी 80 टक्के रक्कम म्हणजे 2 कोटी 68 लक्ष रुपयांची रक्कम पुणे महानगरपालिकेला प्राप्त झाली. बाणर येथे सदर काम जलद गतीने सुरु आहे. राज्य शासनाने या संदर्भात उर्वरित 20 टक्के रक्कम पुणे महानगरपालिकेकडे तातडीने वर्ग करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. तसेच पुणे महानगरपालिका आयुक्तांनी नगरविकास विभागाच्या सचिवांकडे साडेआठ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक पाठवून उर्वरित रकमेची मागणी केली आहे. पुण्यात अगोदर सुरु असलेले वर्किंग वुमेन होस्टेल सुरु आहे, जे या शासनाचे ध्येय आहे. यासंबंधी उर्वरित रक्कम त्वरित महानगरपालिकेकडे वर्ग केली जावी, ज्यायोगे शासनाचा हेतू साध्य होईल.

सभापती महोदय, शासन महाराष्ट्र-कर्नाटक सीमेबाबत गंभीर आहे असा अभिभाषणात उल्लेख केला आहे. मी या निमित्ताने शासनाचे लक्ष वेधू इच्छिते की, तेलंगणाचे मुख्यमंत्री श्री.चंद्रशेखर राव आणि आपले मुख्यमंत्री यांच्यामध्ये तेलंगणा व महाराष्ट्राकरिता सिंचन करार करण्यात आला. माझ्या माहितीप्रमाणे या करारामुळे गडचिरोली जिल्ह्यातील 20 गावे बाधित होणार आहेत. या बाधित गावांच्या बाबतीत सरकार कोणता तोडगा काढणार ? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या कराराचा जास्तीत जास्त फायदा तेलंगणा राज्याला होणार आहे. अशा परिस्थितीत बाधित गावांच्या बाबतीत योग्य तोडगा न निघाल्यास हा करार रद्द करावा अशी मागणी मी निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महाराष्ट्रात गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता सीसीटीव्ही कॅमेरांचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु प्रत्यक्षात दरवर्षी गुन्ह्यांच्या संख्येत वाढ होत आहे. विशेषत: महिलांवर होणारे अत्याचार, पत्रकारांना होणारी मारहाण तसेच सामाजिक सुरक्षिततेचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. घरफोडी, बलात्कार यांचे प्रमाण चिंताजनक आहे. यामुळे आपल्याला शरमेने मान खाली घालावी लागत आहे. अशा सर्व गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारांना कडक शासन करण्यासाठी तसेच पोलिसांची गुन्हेगारांवर जरब बसण्यासाठी राज्य शासनाने कडक कायदे करुन त्यांची कायद्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी विशेष लक्ष दिले पाहिजे. राज्य सरकार सर्व क्षेत्रात अपयशी ठरले

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिप्ती चवधरी .....

आहे. यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. यापुढे सरकार सर्वसामान्य लोकांची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पावले उचलतील अशी मी अपेक्षा व्यक्त करते. अन्यथा विरोधी पक्ष या नात्याने आम्हाला रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय राहणार नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपवते. धन्यवाद.

**उप सभापती** : मी सदनाला सांगू इच्छितो की, मी पक्षनिहाय सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देत आहे. मला समतोल साधायचा आहे. मला हेत्वारोप नको आहे.

----------

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मी या संदर्भात बोलणार नव्हतो. परंतु सन्माननीय सदस्या ॲड.हुस्नबानू खलिफे यांनी मला सांगितले की, तुम्ही या संदर्भात बोलावे. आमचे ज्येष्ठ मित्र व ज्येष्ठ सहकारी नेते प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी त्यांच्या भाषणात माझ्या नावाचा 2-3 वेळा उल्लेख केला. त्यांनी बिटविन दि लाईन असे आहे, तसे आहे, बाकी आहे असे सांगितले. ते आपल्या भाषणात बिटविन दि लाईनमध्ये काय सांगणार आहेत, हे मी बघत होतो. परंतु त्यांनी बिटविन दि लाईन काही न सांगता सर्व जुन्या गोष्टींचा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, या शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त अनेक योजना जाहीर केल्या, त्यात पंचतीर्थाचे निर्माण केले. सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची लंडन, महू आणि दिल्ली येथे 3 पंचतीर्थ आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म आंबवडे येथे झाला होता. शासनाने महू येथे पंचतीर्थाची घोषणा केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडन येथे घर होते, तेथे राहून ते 21 ते 22 वर्षे शिकले होते. आजपर्यंत आपल्या ज्या लाईन आहेत, त्या लाईनने ते घर खरेदी केले नव्हते. परंतु याच लाईनमधील विचारांच्या लोकांनी 40 कोटी रुपये देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्या घरात शिकले होते ते घर विकत घेतले. तेथे भव्य स्मारक होत आहे. तिसरे पंचतीर्थ महु आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगाव रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे गाव आहे. ते अद्याप दुलर्क्षित होते. शासनाने आंबवडे गाव पूर्ण विकसित करण्याचे ठरवले आहे. तसेच आम्ही इंदू मिलबाबत 15 वर्षे संघर्ष करीत होतो. 15 वर्षांच्या काळात अगोदरच्या शासनाने काही केले नाही. परंतु या शासनाने केवळ स्मारक नव्हे तर माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे भूमिपुजन करण्यात आले.

यानंतर H-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई गिरकर जे सांगत आहेत ते खरे असले तरी या योजना पूर्वीच्या आघाडी सरकारच्या काळामध्ये सुरु झालेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी आताचे सरकार करीत आहे. हे सरकार नवीन काही करीत आहे असे दिसत नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मागील 15 वर्षात जे झाले नाही ते आमच्या सरकारने केले आहे. इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी प्रयत्न सुरु होते. मागील 15 वर्षात तुम्हाला पर्यावरणाची परवानगी मिळविता आली नाही, एनटीसीकडून जागेचे हस्तांतरण करुन घेता आले नाही. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर दोन महिन्यातच आम्ही हे काम पूर्ण केले. त्या ठिकाणी भूमिपूजन समारंभाला देखील आपली उपस्थिती होती. मी माननीय मुख्यमंत्र्यांना याबद्दल धन्यवाद देतो.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर, 1956 रोजी दीक्षा घेतली, त्या घटनेला 60 वर्षे झाली आहेत. मागील 60 वर्षाच्या काळात अद्याप त्या दीक्षाभूमीला तुम्ही अ दर्जा देऊ शकला नाहीत. आमच्या सरकारने प्रत्यक्षात दीक्षाभूमीला अ दर्जा दिला त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री व माननीय राज्यपाल यांना धन्यवाद देतो. पंचतीर्थ, नवी दिल्ली येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले ते 26, अलीपूर येथील घर मागील 60 वर्षात तुमच्या सरकारने खरेदी केले नव्हते. आमच्या सरकारने हे 26,अलीपूर येथील घर खरेदी करुन त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्याचे काम हाती घेतले आहे.

सभापती महोदय, 125 व्या जयंतीच्या निमित्ताने केवळ अस्मितेच्या गोष्टी नव्हे तर मागासवर्गीयांच्या उन्नती आणि प्रगतीच्या योजना कार्यान्वित करण्याचे काम या शासनाने केले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचा उल्लेख आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मागासवर्गीय मुलींसाठी 50 वसतिगृहे, नोकरदार मागासवर्गीय मुलींसाठी मुंबई, नागपूर या ठिकाणी वसतिगृहे बांधली जाणार आहेत. शासन फक्त घोषणा करुन थांबलेले नाही तर प्रत्यक्षात 8 मार्च, 2016 रोजी मुंबईमध्ये नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय मुलींसाठी बोरिवली येथे वसतिगृह बांधून पूर्ण केले आणि त्याचे उद्‌घाटन सामाजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले आहे. गेली अनेक वर्षे शैक्षणिक संस्थांना अनुदान दिले जात नव्हते, मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढला जात नव्हता,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

त्या संदर्भात माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात त्याचा उल्लेख केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. एअर इंडिया केबिन क्रू आणि वैमानिक रिक्रूटमेंटसाठी बार्टी या संस्थेकडून अनुसूचित जातीच्या उमेवारांसाठी प्रशिक्षणाचा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी 2500 रुपयांवरुन 25,000 इतकी भरीव वाढ करण्यात आली आहे. मागासवर्गीयांच्या सर्वांगीण विकासासाठी या शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीच्या निमित्ताने अनेक योजना राबविल्या. शासनाने अनुसूचित जातीकरिता घरकुलासाठी रमाई व शबरी ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविली आहे. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांसाठी यापूर्वी घरे मंजूर केली जायची, परंतु स्वतःच्या नावावर जागा नसल्यामुळे घर बांधणे शक्य होत नव्हते. आमच्या सरकारकडून पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल योजनेंतर्गत जागा विकत घेण्यासाठी मागासवर्गीयांना अर्थसहाय्य देऊन रमाई व शबरी ग्रामीण गृहनिर्माण योजना यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. केवळ बिटवीन द लाईनचा उल्लेख करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जातो.

सभापती महोदय, 1990 हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण 1956 साली झाल्यानंतर 1990 पर्यंतच्या 24 वर्षाच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार दिला गेला नव्हता, नवबौध्दांना सवलती दिल्या गेल्या नव्हत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला संविधान दिले. त्यांचे तैलचित्र अद्याप संसदेमध्ये लावण्यात आले नव्हते. केंद्रात भारतीय जनता पक्षाच्या 86 खासदारांनी पाठिंबा दिलेले व्ही.पी.सिंग यांचे सरकार होते. या तीनही गोष्टी त्या सरकारच्या काळात कार्यान्वित करण्यात आल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार दिला गेला, त्यांचे तैलचित्र संसदेमध्ये लावण्यात आले. नवबौध्दांना सवलती मंजूर केल्या गेल्या. केंद्रात 1991 ला व्ही.पी.सिंग यांचे सरकार पायउतार होऊन पी.व्ही.नरसिंह राव यांचे सरकार सत्तारुढ झाले. मात्र पूर्वीच्या सरकारने नवबौध्दांना लागू केलेल्या सवलतींबाबतचा जीआर काढण्यात आला नाही. ज्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सवलती नवबौध्दांना 34 वर्षात मिळाल्या नव्हत्या. पुन्हा 25 वर्षात नवबौध्दांना या सवलतीपासून वंचित ठेवले गेले. व्ही.पी.सिंग यांच्या सरकारने या सवलती मंजूर केल्या होत्या, परंतु नव्याने

...3...



श्री.भाई गिरकर...

सत्तेवर आलेल्या सरकारने त्या मान्य न केल्यामुळे त्या नवबौध्दांवर अन्याय होत होता. 125 व्या जयंतीच्या निमित्ताने नवबौध्दांना या सवलती मिळण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. त्यासाठी आम्हाला तुमचेही सहकार्य लागणार आहे. केवळ बिटवीन द लाईन सांगण्यापेक्षा पूर्वी काय केले आणि आता काय केले पाहिजे याचा विचार केला पाहिजे. मागील इतिहास विसरता कामा नये. पुन्हा एकदा मी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आणि मागासवर्गीयांना त्यांनी दिलेल्या सवलतींबद्दल त्यांचे आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची एक प्रत आली आहे. या भाषणाची दुसरी प्रत आणावयास हवी होती. पहिली प्रत भारतीय जनता पक्षासाठी असावी, दुसरी प्रत शिवसेना पक्षासाठी पाठवावयास हवी होती. तसे झाले असते तर त्यावर बोलता आले असते. अभिभाषणामधील चौथ्या क्रमांकाच्या मुद्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या सांस्कृतिक वारसा मांडण्यात आलेल्या रायगड महोत्सवाचा उल्लेख केला आहे आणि अरबी समुद्रातील स्मारकाचा उल्लेख तिसऱ्या क्रमांकाच्या मुद्यामध्ये आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे चांगले स्मारक झाले पाहिजे. परंतु ते करण्यासाठी निधी कुठून आणणार आहात? सर्वसामान्य जनतेकडून कर रुपाने जमा होणारा पैसा तेथे खर्च होणार आहे. या स्मारकासाठी तुमच्यात एकमत आहे का? शासनातील दोन्ही राजकीय पक्षात एकवाक्यता नाही. शासनाने 19 फेब्रुवारी या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जाहीर केली आहे. शिवसेना पक्ष हा दिवस शिवजयंती साजरी करतो का? तुमच्यामध्ये तारखेबाबत एकवाक्यता नसेल तर स्मारकाबाबत कशी असणार आहे? जनतेचा पैसा स्मारक उभारण्यासाठी वापरला जाणार आहे, तो वाया जाणार आहे. स्मारकासाठी तुमचे एकमत असले तरी शिवजयंतीच्या तारखेबाबत एकमत नाही. जनतेचा पैसा आपण स्मारकासाठी खर्च करणार आहात. माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आता सभागृहात हजर नाहीत, अन्यथा मी त्यांच्याकडे विचारणा केली असती. स्मारक जरूर करा. परंतु जयंतीच्या दृष्टीने एक तारीख निश्चित करावी. सरकारमध्ये सहभागी असलेला एक पक्ष शासनाने जाहीर केलेली जयंतीची तारीख मानणार नसेल तर इतर गोष्टी काय मानणार आहे?

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.प्रकाश महेता यांना मी हात जोडून विनंती करतो की, 300 कोटी रुपये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी खर्च करणार आहात. रायगड महोत्सवासाठी 40 कोटी रुपयांची तरतूद केली, प्रत्यक्षात 4 कोटी रुपये खर्च झाले. आज मुंबई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा उल्लेख 'छत्रपती शिवाजी टर्मिनस' असा केला जातो. छत्रपतींच्या 'महाराज' या उपाधीचा त्यामध्ये जरूर उल्लेख झाला पाहिजे. त्यासाठी तुम्हाला पैसा खर्च करावा लागणार नाही. अन्यथा छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी नावाने उल्लेख

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.....

केल्यासारखे होईल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असाच उल्लेख झाला पाहिजे. पुढील वर्षाच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या संदर्भात उल्लेख झाला तर आम्ही तुमचे अभिनंदन करु

नंतर आय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

दुसरे असे की, छत्रपती शिवाजी टर्मिनल असे नाव विमानतळाला दिलेले आहे. येथे देखील महाराज असा उल्लेख नाही. तेव्हा आपण महाराज असा लिखित स्वरूपात उल्लेख केला पाहिजे. तरच त्या स्मारकाला आणखी भव्यता येईल. प्रत्येकाच्या तोंडापर्यंत महाराज हे नाव जाईल. छत्रपतींना महाराज ही उपाधी असून ती आपण काढून घेत आहात. त्यामुळे ही उपाधी आपण जोडावी. त्यासाठी पैशाची गरज लागणार नाही. आपला जो मित्र पक्ष आहे त्यांना आपण सांगावे महाराष्ट्रात शिवजयंती शासनाने ठरविलेल्या तारखेला घ्यावी. तेवढी तारीख तरी आपण मानावी आणि एकाच दिवशी शिवजयंती साजरी करावी. जेणे करून आपण शिवाजी महाराजांच्या प्रती आदर व्यक्त केला आहे असे होईल.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सीमा प्रश्नाचा उल्लेख हा नेहमी शेवटी असायचा. पण आता हा उल्लेख आपण अगोदर केलेला आहे. हे फार सुंदर केले आहे. सदर मुद्दा हा दहाव्या क्रमांकावर आहे. कर्नाटक-सीमा प्रश्नासंबंधी जनतेला आपण न्याय देणार आहात. एकीकडे कर्नाटकचा प्रश्न सोडण्यासाठी सीमा रेषेला आपण न्याय देणार आहात आणि दुसरीकडे विदर्भातील जनता स्वतंत्र विदर्भाची मागणी करीत असल्यामुळे दुसरी सीमा रेषा ओढणार आहात. आपण एक सीमा रेषा मिटवायला जात आहात, तर दुसरीकडे सीमा रेषा ओढत आहात. हे कसे काय शक्य आहे ? एकीकडे आपण सीमा प्रश्नवाल्यांना न्याय देणार आहात असे सांगत आहात तर दुसरीकडे स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारे देखील लोक आहेत. म्हणजे असलेल्या प्रदेशाला रेषा मारून तुकडे पाडण्यात येणार आहेत. यात आपला मित्र पक्ष सहभागी आहे काय ? स्वतंत्र विदर्भाची मागणी करण्यामध्ये शिवसेना आपल्या बरोबर आहे काय ? मग सरकार कसे होऊ शकते ? मग राज्यपाल माझे सरकार असे कसे काही लिहू शकतात ? स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारे आपण एक आहात. त्यावर दुसरे काही बोलत नाही. माननीय पंतप्रधान त्या दिवशी पाकिस्तानला संबंध चांगले ठेवण्यासाठी गेले.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती :** आपण एक बोलत आहात आणि माननीय मंत्री खाली बसून एक बोलत आहेत....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

**उप सभापती :** माझे एकच म्हणणे आहे की, महाराष्ट्रातील विधिमंडळाच्या सदनामध्ये आपण बसलो आहोत.....

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलावे. त्यांनी सरकार पक्षातील दोन पार्टीची चिंता करू नये. आपण देखील 15 वर्ष एकमत नसताना सरकार नीटपणे चालविले आहे ना. त्यामुळे आपण आमची काळजी करू नये. आपण वारंवार आमची काळजी का करीत आहात ?

**उप सभापती :** आपण जरी म्हणाला असला तरी मला या दोघांची काळजी घ्यावी लागते. आता मूळ विषयाला धरून बोलावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी चिंता व्यक्त करीत नाही. मी राज्यातील 12 कोटी जनतेच्यावतीने प्रश्न विचारीत आहे. या राज्यातील जनता टॅक्स देते म्हणून आपण शासन चालवित आहात. असे असताना आपल्या सरकारमध्ये दोन भाग असतील....

**उप सभापती :** आपल्या सभागृहामध्ये अनेक व्यक्तीमत्वे बसली आहेत. त्यात एकच हसरे, खेळकर आणि सदा आनंदी दिसणारे व्यक्तीमत्व म्हणजे आपले माननीय मंत्री श्री.पोटे आहेत. त्यांच्याकडे बघितल्यानंतर ते जितेंद्र सारखे दिसतात. श्री.जितेंद्र आव्हाड नाहीत, तर नट जितेंद्र सारखे दिसतात.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आज आम्हीच खेद व्यक्त करीत आहोत असे नाही तर सन्माननीय मंत्री श्री.पोटे देखील काळे कपडे परिधान करून आलेले आहेत. ते पण येथे खेद व्यक्त करण्यासाठी आलेले आहेत. आज त्यांनी काळे कपडे त्यासाठी घातलेले आहेत. ते देखील स्वतंत्र विदर्भाचे मागणी करणारे एक व्यक्तीमत्व आहे. मी हे मुद्दे आपल्या समोरे यासाठी

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

आणीत आहे की, राज्यपालांचे अभिभाषण हे संपूर्ण राज्यासाठी असते. राज्यपाल पद हे सांविधानिक आहे. पण त्यांच्या तोंडून या सरकारने काय नको नको ते वदवून घेतले आहे. पण एकीकडे आपले विचार एक नाहीत. दोन पक्ष एक नाहीत. तरी पण आपण शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 300 कोटी रूपये खर्च करणार आहात. पण आपण त्यांची तारीखच मानत नाही. आपण महाराज ही उपाधी देखील मानीत नाही. आपण खूप काम करीत आहात असे भासवत आहात. आपण फक्त योजनांच्या नावांची नामावली बदलली आहे. आमच्या कोकणात त्याला बारसे असे म्हणतो. आपण फक्त नाव बदलण्याचे काम केलेले आहे. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, अटल सौर कृषि पंप योजना, प्रमोद महाजन कौशल्य उद्योजकता विकास अभियान, अटल पुनरूज्जीवन नागरी व रूपांतरण (अमृत) अभियान, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाक योजना, लोकनेते गोपीनाथ मुंडे महाराष्ट्र ऊस-तोड व वाहतूक आणि इतर असंरक्षित श्रमजीवी कामगार महामंडळ, अशी नावे पूर्वीच्या योजनांना देण्यात आली आहेत. यातील कामे ही पूर्वीची आहेत. मी येथे दोन गोष्टी सांगणार आहे. कोकणातील रस्त्यांसाठी 20 हजार कोटी रूपये देण्यात आले आहेत. मुंबई गोवा महामार्ग चौपदरी करणाच्या कामाचे भूमिपूजन श्री.नितीन गडकरी यांच्याहस्ते निवळी, रत्नागिरी येथे झाले. पात्रादेवी ते झाराप पर्यंतच्या मार्गाचे चौपदरीकरण झालेले आहे. हे काम मागच्या शासनाच्या काळात झालेले आहे. इंदापूर पर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्वीच सुरू झालेले आहे. त्याच बरोबर कोकण किनारपट्टीला लागून असलेल्या सागरी महामार्गाचे काय झाले आहे ? अगोदरच्या सरकारने हे काम प्रस्तावित केले होते. कोकणाच्या किनारपट्टीवरील सागरी महामहार्गाचा राष्ट्रीय महामार्गात समावेश करण्याची घोषणा श्री.नितीन गडकरी यांनी केली. आपण काय केले या बास्केटमधील माल त्या बास्केटमध्ये आणला. आपल्या घोषणा मोठ्या आहेत.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, मला येथे उद्योगासंबंधातील एक बाब आपल्या निदर्शनास आणावयाची आहे. आपण उद्योगासाठी फार खर्च केला आहे. मी आपल्याकडे दोन ॲग्रीमेंट पाठवून देतो. जनतेची कशी दिशाभूल केली जाते याचा पुरावा मी दाखविणार आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीसोबत 5 लाख लोकांना घर देण्यासाठी सन 2010 मध्ये ॲग्रीमेंट करण्यात आले आहे. दुसरे ॲग्रीमेंट याच इंडस्ट्री बरोबर पुन्हा दिनांक 17 फेब्रुवारी 2016 रोजी करण्यात आले. यात आपण 5 लाख 69 हजार घरे देणार आहात. यात आपण फक्त 69 हजार घरे वाढविली आहेत. उद्योग मंत्र्यांनी टीव्ही समोर सांगितले की, यानंतर साडे सात लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. मागच्या सरकारने सन 2010 मध्ये केलेले ॲग्रीमेंट हे आहे, तर आताच्या सरकारने केलेले ॲग्रीमेंट हे आहे. आपण कोणाला फसवित आहात. काही नेते म्हणाले की, निवडणूक जवळ आली के असे बोलावे लागते. आता निवडणूका झाल्या. आपण खुर्चीवर येऊन बसला. तरी देखील आपण लोकांना असे बनवत आहात. आता पण हे शासन मागच्या योजना दाखवत आहे. माझ्याकडे असलेली दोन्ही ॲग्रीमेंट मी आपल्याकडे पाठवून देतो. ही दिशाभूल नाही तर काय आहे ? हे माझ्या शासनाने केले आहे असे अभिभाषणामध्ये दिशाभूल करण्यासाठी दाखविण्यात आलेले आहे. हे आपल्या शासनाने नाही तर अगोदरच्या शासनाने केले असून त्याच्या ॲग्रीमेंटच्या कॉपीज माझ्याकडे आहेत. त्या मी आपल्याकडे पाठवित आहे. यावर विचार होणे गरजेचे आहे. असे करून आपण जनतेची दिशाभूल करीत आहात. यासाठी आपण राज्यपालांचा वापर करीत आहात. असा वापर कृपा करून आपण करू नये. निदान त्यांना तरी सोडावे. हे अगोदरचे होते हे आपण सांगायला पाहिजे होते.

सभापती महोदय, मेट्रो कारसाठी आरेमध्ये जागा दिली जाणार आहे असे सरकारने घोषित केले. त्यासंबंधीचा कार्यक्रम देखील झाला. उद्योग मंत्री स्टेजच्या खाली उतरले आणि ताबडतोब सांगितले की, यावर आम्हाला ताबडतोब विचार करण्याची गरज आहे. स्टेजवरून खाली उतरल्यानंतर उद्योग मंत्री ताबडतोब म्हणतात की, आरेमध्ये असली कुठलीही कार शेड बनणार

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

नाही. हा उद्योग असा कसा काय चालू शकेल. जैतापूर प्रकल्पासाठी माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांचे आभार मानावे लागतील. जैतापूर प्रकल्प हा तत्कालीन सरकारने आणला. आपल्या बरोबर असलेले म्हणतात की, आम्ही जैतापूरला प्रकल्प यायलाच देणार नाही. जैतापूरला प्रकल्प येऊ देणार नाही. आलेला प्रकल्प आपण सांभाळू शकत नाही तर दुसऱ्या प्रकल्पांसाठी आपण कोणते अभियान राबविणार आहात ?

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.....

सभापती महोदय, आम्हीउद्योगधंदे आणले अशाप्रकारचा गाजावाजा करण्यात आला. जैतापूर प्रकल्पामध्ये शिवसेना पक्ष आपल्यासोबत नाही. मुंबईतील आरे येथे मेट्रो प्रकल्पासाठी कारशेड बनविण्याच्या प्रकल्पाबाबत शिवसेना पक्ष आपल्यासोबत नाही. मग आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्याचा चेहरा म्हणून कसे काय दाखवू शकता ? आपण एकत्र नसाल, एकत्रितपणे प्रकल्प राबविणार नसाल तर आपण लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी माननीय राज्यपालांचा बिलकूल उपयोग करु नये.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी डान्सबारसंबंधी दोन्ही सभागृहात घोषणा केली की, त्यासाठी आलेला कोणताही फंड मी घेतलेला नाही. जे लोक कोर्टामध्ये गेले होते त्याचा प्रुफ मी आपल्याकडे पाठवितो. इंडियन हॉटेल ॲण्ड रेस्टॉरन्ट असोसिएशनने 2014, 793/2014 मध्ये स्टेट ऑफ महाराष्ट्र विरुद्ध केस टाकलेली आहे. ही केस सर्वोच्च न्यायालयात असताना त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना चेक दिला त्याचा फोटो मी आपल्याकडे पाठवितो.

**उप सभापती** : यावर माझे असे सजेशन आहे की, आपण डान्सबार बंदीवर खूप भाषणे करतो. या विषयावर हातवर करुन सार्वमत घेतले तर ते ॲप्रोप्रिएट ठरेल. आपल्या नेमक्या भावना काय आहेत ते कळेल, आपणास हे मान्य आहे काय ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, जे आपल्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले त्यांनी आपणास 20 लाख रुपयांचा चेक दिलेला आहे. त्याचे पेपर मी आपल्याकडे पाठवितो. सर्वोच्च न्यायालयात ही केस लढण्यासाठी ॲड.हरिष साळवे यांना नेमले असेल तर ते न्यायालयात कितीवेळा उपस्थित राहिले ? आपण चिक्की प्रकरणामध्ये ॲड.श्रीहरी अणे यांची नियुक्ती केली तर डान्सबार प्रकरणी ऑर्डीनरी वकील नेमण्यात आला. ॲड.हरिष साळवे यांची नंतर नियुक्ती केलेली आहे आणि ते किती वेळा कोर्टात गेले याची माहिती सदनासमोर येणे आवश्यक आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्रे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्याकडे दिलेली आहेत. परंतु

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.....

सभागृहात वेगळी उत्तरे दिली जातात, बाहेर वेगळे सांगितले जात आहे आणि त्यासाठी माननीय राज्यपालांचा वापर केला जात आहे म्हणून मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो आणि या सरकारचा निषेध व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

**उप सभापती** : आपण माझ्या प्रश्नाचे शेवटपर्यंत उत्तर दिले नाही. या प्रश्नावर मतदान घ्यायचे म्हटले तर आपली काय भूमिका आहे ?

-------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मुझफ्फर हुसेन)**

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( कोल्हापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे राज्याची दिशा ठरविणारे असते, परंतु दुर्दैवाने या अभिभाषणामध्ये कोणतीही दिशा दिसत नाही. शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा सांगणारे हे सरकार असे म्हटले जाते, परंतु या अभिभाषणामध्ये कुठेही छत्रपती शाहू महाराजांचा उल्लेख नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील शाहू मिल संपादित केली त्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याबाबतचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

सभापती महोदय, राज्यकर्ते आणि शेतकऱ्यांचा काही संबंध आहे की नाही असा प्रश्न विचारला जात आहे आणि ती वस्तुस्थिती खरी आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये परिच्छेद क्रमांक 13 मध्ये असे म्हटले आहे की, ज्यांच्या पिकांची नैसर्गिक आपत्तीमुळे हानी झाली आहे अशा शेतकऱ्यांच्या पीक कर्जावरील तीन महिन्यांचे व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. आपण कोणते व्याज माफ करतो ? एक लाख रुपयांवरील पीककर्ज बिनव्याजी देण्याचे सरकारचे धोरण आहे. एक लाख रुपयांवरील कर्ज दोन टक्के दराने देण्याचे धोरण आहे. मग आपण व्याज माफ केल्याची असत्य माहिती देत आहात काय ? तेव्हा या संदर्भातील नेमकी वस्तुस्थिती सभागृहासमोर आली पाहिजे. पुढे असे म्हटलेले आहे की, साडेतीन हजार कोटी रुपयांच्या पीक कर्जाची मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्रचना केलेली आहे. मागील सरकारने पीक कर्जाला शून्य टक्के दराने कर्ज देण्याचा निर्णय घेतला होता. आज साडेतीन हजार कोटी रुपये मध्यम मुदतीच्या कर्जात रुपांतर करणार असाल तर शेतकऱ्यांना बारा टक्के व्याज द्यावे लागणार आहे. जो शेतकरी नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेला आहे त्याला आणखी अडचणीत आणण्याचे काम सरकार करीत आहे. मुळात आपण पीक कर्ज बिनव्याजी देत आहोत. त्यानंतर ते मध्यम मुदतीत रुपांतरीत करीत आहात याचा अर्थ शेतकऱ्यांना बारा टक्क्याने कर्ज फेडावे लागणार आहे. आपण 405 कोटी रुपये



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ......

पीक कर्ज उपलब्ध करुन देत आहात असे म्हणत आहात. म्हणजे उद्या 405 कोटी रुपयांचे व्याज भरावे लागणार आहे. तेव्हा ही दिशाभूल करणारी माहिती आहे, त्याबाबत उत्तरामध्ये खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 82 वर उल्लेख आहे की, माझ्या शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अन्वये नगारिकांसाठीच्या 315 लोकसेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्यापैकी 156 सेवा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उर्वरित अधिसूचित सेवा 2 ऑक्टोबर, 2016 पर्यंत ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल." तर परिच्छेद क्रमांक 83 मध्ये असे म्हटलेले आहे की, "ऑनलाईन पोर्टल सुरु केले आहे. या पोर्टलवर आतापर्यंत सुमारे 9 लाखांपेक्षा अधिक अर्ज, विहित वेळेत समाधानकारकरित्या निकाली काढण्यात आले आहेत." याचा अर्थ काय होतो ? आपण 2 ऑक्टोबरपासून विचार केला तर ऑक्टोबर ते फेब्रुवारी इतके महिने मिळतात. दिनांक 9 मार्च रोजी माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले. ऑक्टोबर ते 9 मार्च पर्यंत 159 दिवस होतात. आपण दिवसाला 10 तास काम केले असे समजले तर 1590 तास होतात. 1590 तास भागिले 9 लाख तक्रारी म्हणजे तासाला 566 तक्रारींचे निवारण होते. तासाला 566 तक्रारींचे निवारण होत असेल तर आपल्या राज्याचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉमध्ये यायला पाहिजे. नक्की तेवढ्या तक्रारींचे निसरन करण्यात आलेले आहे की, फक्त आकडेवारी दिलेली आहे ? जर नऊ लाख तक्ररींचे निरसन झाले का, जर झाले असेल तर मी शासनाचे निश्चितपणे अभिनंदन करीन. जर एका तासामध्ये 566 तक्रारींचे निसरन होत असेल तर मंत्रालयात कोणत्याही अधिकाऱ्याकडे काम राहणार नाही. ऑनलाईनच्या माध्यमातून इतक्या मोठ्या प्रमाणात जनतेचे प्रश्न सुटत असतील तर येथे प्रश्न मांडण्याची आवश्यकता आहे,असे मला वाटत नाही. मला वाटते हे सर्व दिशाहीन आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने रिटेलसंबंधी धोरण आणले. परंतु या धोरणातून सामान्य व्यापाऱ्याला दिलासा मिळणार आहे काय ? या रिटेलच्या माध्यमातून मोठ्या व्यापाऱ्यांना फायदा होणार आहे असे माझे वैयक्तिक मत आहे. सरकारने "मेक इन इंडिया"ची संकल्पना मांडली. आपण चांगला कार्यक्रम घेतला. या माध्यमातून देशामध्ये 14 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ......

असे केंद्र सरकारने सांगितले. यातून 30 लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत अशी माहिती केंद्र सरकारच्या वेबसाईटवर आहे. हे सरकार माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये तेच सांगत आहे की, 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली त्यातून 30 लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये जुने करार आहेत. फॉस्कॉनचा करार जुना आहे. पंचशीलचा करार जुना आहे. रेमंडचा करार जुना आहे. आपण जुन्या कराराचा देखील मेक इन इंडियामध्ये समावेश केलेला आहे. एकूण 2 हजार 594 सामंजस्य करार करण्यात आले असे सांगण्यात आले. माझे राज्य शासनाला जाहीर आव्हान आहे की, आपण हे सर्व करार वेबसाईटवर टाकावेत. जे करार झाले ते कोणत्या प्रदेशामध्ये आहेत आणि त्याचे कोणत्या पद्धतीने नियोजन होणार आहे याची माहिती होईल. फक्त घोषणा करुन सरकार चालत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सर्व चुकीच्या घोषणा याव्यात यासारखे दुर्दैव नाही. शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार सांगणारे हे सरकार नाही. कोल्हापूरच्या शाहू मिलचा येथे साधा उल्लेख नाही. कोल्हापूरच्या सर्कीट बेंचचा उल्लेख नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे राज्य सरकारच्या संपूर्ण वर्षभराची रुपरेषा, संपूर्ण वर्षात शासन काय करणार आहे, शासनाची धोरणे काय राहणार आहेत या बाबतचे नियोजन असते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी एक महत्त्वाची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात युवकांच्या बाबतीत कसल्याही प्रकारची ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत किंवा धोरण निश्चित करण्यात आलेले नाही

सभापती महोदय, गाजावाजा करीत शेतकऱ्यांच्या बाबतीत वेगवेगळ्या योजना राज्य सरकारच्या माध्यमातून घोषित केल्या जात आहेत. परंतु माननीय राज्यपालांच्या संपूर्ण अभिभाषणामध्ये डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या बाबतीत कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, निवडणुकीपूर्वी या शासनाने कर्जमाफीच्या बाबतीत ज्या घोषणा केल्या होत्या त्या बाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कुठेही उल्लेख नाही. निवडणुकीपूर्वी शेती मालाला योग्य भाव देण्याची सुध्दा घोषणा करण्यात आली होती. परंतु त्या घोषणेबाबत सुध्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कसल्याही प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, सर्वात महत्त्वाचा प्रश्न असलेल्या पाण्याच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. वास्तविक पाहता पाण्याच्या नियोजनासाठी फारसा खर्च येत नाही. तरी सुध्दा राज्य सरकारने पाण्याचे नियोजन केलेले नाही. त्यामुळे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात पाण्याच्या नियोजनाबाबत काहीही उल्लेख नाही. रेन वॉटर हार्वेस्टींग बाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कसल्याही प्रकारचा उल्लेख नाही.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्र.2 मध्ये नमूद केले आहे की, "सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये जनतेच्या कल्याणार्थ अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत." मी निदर्शनास आणून देतो की, काल-परवाच माननीय राज्यपालांना बिरसा मुंडा, गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती दिनाचा शासनाच्या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग....

दैनंदिनीमध्ये उल्लेख करण्याबाबतचे निवेदन देण्यात आले. एकीकडे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बाबतीत लोकाभिमुख निर्णय घेण्याचे सांगून सुध्दा त्या दृष्टीने कार्यवाही होत नाही.

सभापती महोदय, वैद्यकीय महाविद्यालयामध्ये बीपीएमटी हा अभ्यासक्रम आहे. नागपूर, नाशिक व यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात बीपीएमटी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ओबीसी/एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी ते कोणत्या प्रवर्गातील आहे हे नमूद केल्यास त्यांना शिष्यवृत्ती मिळते. परंतु या संदर्भातील संकेतस्थळ उपलब्ध नसल्यामुळे या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता येत नाहीत. त्यामुळे राज्य सरकारच्या माध्यमातून अशा घोषणा करणे हे एकप्रकारे थोतांड आहे, असे निदर्शनास येते.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक-13 मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "बँकांनी अंदाजे 3,500 कोटी रुपयांच्या पीक कर्जाची मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्रचना केली आहे, ज्याचा फायदा जवळपास 5.5 लाख शेतकऱ्यांना झाला आहे. शिल्लक पीक कर्जाची......"

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनावरील प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. आपण सभागृहाची बैठक कंटीन्यू सुरु ठेवावी, मला सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणायचा नाही. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेवर लक्षवेधी सूचना, विधेयके, पुरवणी मागण्या आणि प्रस्ताव इत्यादी अनेक बाबी नमूद केलेल्या आहेत. सभागृहाला पुरवणी मागण्या आजच मान्य करावयाच्या आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खूप चर्चा झाली आहे. अन्य सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर बोलण्यास माझा विरोध नाही. परंतु आपण वेळेचे नियोजन करुन दुपारी 12.00 वाजेपर्यंत ही चर्चा संपवावी. त्यानंतर दुपारी माननीय मुख्यमंत्री या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतील. त्यमुळे आपण या दृष्टिकोनातून वेळेचे नियोजन करावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी थोडक्यात आपले मुद्दे मांडावेत.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, मुद्दा क्र.13 मध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, "शिल्लक पीक कर्जांची पुनर्रचना केल्यामुळे, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना, ज्य शेतकऱ्यांची कर्जे पुनर्रचित केलेली होती, त्या सुमारे 1,16,000 शेतकऱ्यांना अंदाजे 405 कोटी रुपयांची नवीन पीक कर्जे देणे शक्य झाले." सभापती महोदय, काल-परवाच यवतमाळ जिल्ह्याच्या नेर तालुक्यातील सातेफळ गावात गावकऱ्यांनी सभा घेऊन निर्णय घेतला की, या वर्षी गावातील कोणताही शेतकरी पेरणीसाठी जाणार नाही. सभापती महोदय, जर एखाद्या गावामध्ये अशा प्रकारचा निर्णय होत असेल तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जो उल्लेख झालेला आहे तो चुकीचा असल्याचे सिध्द होते. अशा पध्दतीने सरकार काम करणार असेल तर भविष्यात काय होणार आहे ?

सभापती महोदय, जलयुक्त शिवार अभियानाबद्दल शासनाने खूप गाजावाजा केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांना पत्राद्वारे कळविले होते की, मागच्या वर्षी 24 टीएमसी पाणी जमा झाले होते. तसेच राज्याची सिंचन क्षमता वाढल्याचे सुध्दा कळविण्यात आले होते. मुळात 24 टीएमसी पाण्याचा आकडा हा जिल्हा स्तरावरुन माननीय मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत आला होता. परंतु जिल्हा स्तरावरुन जी आकडेवारी आली ती योग्य आहे काय, या बाबत साशंकता निर्माण झालेली आहे. या विषयी मला जी अधिकृत माहिती मिळाली आहे त्यावरुन असे दिसून येते की, जिल्हा स्तरावरुन मंत्रालयापर्यंत चुकीची माहिती गेली आहे. त्यामुळे या बाबतीत आपण क्रिटीकल पाथ मेथड लावणार नसू तर या बाबी शक्य होणार नाहीत. माझे एवढेच म्हणणे आहे की, या प्रकरणी टाईम बाऊंड शेड्यूल्ड प्रोग्राम आणि क्रिटीकल पाथ मेथड लावू शकणार नसू तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्य अभिभाषणातील मुद्दा क्र.41 मध्ये नमूद केले आहे की, "नक्षलविरोधी मोहिमा अधिक प्रभावी करण्यात येऊन त्या बाधित क्षेत्रात सुव्यवस्था राखण्यास अग्रक्रम देण्यात येत आहे." मुळात पोलिसांना वेतनस्तर पदोन्नती अद्यापपर्यंत लागू करण्यात आलेली नाही.

महोदय, वेळेची मर्यादा लक्षात घेऊन मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामयुक्त) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी अभिभाषणातून राज्य शासनाची भूमिका मांडलेली आहे. वास्तविक पाहता या राज्य सरकारने राज्यातील सर्व विभागांना समान न्याय देणे गरजेचे होते. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोकणाला न्याय दिल्याचे दिसत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोकणावर कशा प्रकारे अन्याय झाला हे निदर्शनास आणून देण्यासाठीच मी उभी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोकणातील सागरी सुरक्षेसंबंधी कोणत्याही प्रकारची योजना आखलेली नाही. प्रत्येक वेळी सागरी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतो. परंतु त्या अनुषंगाने शासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही.

सभापती महोदय, कोकणातील मत्स्य व्यावसायिकांचा प्रश्न फार जटील बनलेला आहे. पर्सोसीन नेटने मासेमारी करणारे मच्छीमार आणि पारंपरिक पध्दतीने मासेमारी करणारे मच्छीमार यांच्यातील वाद आता शिगेला पोहचला आहे. परंतु हा वाद मिटविण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने कोणतीही योजना केल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, कोकणातील गौण खनिज आणि वाळू व्यावसायिकांचा प्रश्न प्रचंड प्रमाणावर चिघळलेला आहे. परंतु हा प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काहीही नमूद करण्यात आलेले नाही.

एल....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. हुस्नबानू खलिफे ....

मागील शासनाने आंबा, काजू बोर्ड निर्माण केले होते. परंतु आता ते या ठिकाणी कार्यरत नाही. त्यामुळे त्यासंबंधी काय निर्णय घेण्यात येत आहे ते सुध्दा या अभिभाषणात कुठेही सांगितलेले नाही किंवा कुठेही दिसून येत नाही. रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या 3 जिल्ह्यांतील मच्छी व्यावसायिक, शेतकरी, फळबागायतदार, गौण खनिज व्यावसायिक या सर्वांच्या बाबतीत फार चुकीचे निर्णय घेतले गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे कोकणातील शेतकरी आत्महत्या करीत नाही असे म्हणतात. पण मागील 1 वर्षात 2 आत्महत्या झाल्या आहेत. त्यामुळे विदर्भ व मराठवाडा येथील लोन आता कोकणात पसरत चालले आहे. त्यामुळे कोकणातील गरीब शेतकरी, फळ व्यावसायिक, मच्छिमार, गौण खनिजवाले या सर्वांना ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी काही तरी प्रयत्न होणे आवश्यक होते. मात्र तसे या ठिकाणी काहीही दिसून येत नाहीत. माझा दुसरा मुद्दा पर्यटनाचा आहे. पर्यटनाच्या दृष्टीने जे जिल्हे आहेत, त्यामध्ये रत्नागिरी जिल्हा अग्रेसर होता आणि आहे. मात्र अभिभाषणामध्ये पर्यटनाच्या बाबतीत काय करणार आहेत याबाबतीत काहीही उल्लेख नाही.

सभापती महोदय, अल्पसंख्याकांच्या बाबतीत मुस्लिमांच्या आरक्षणाचा कुठेही उल्लेख झालेला नाही. हज कमिटी सातत्याने ऑफिसकरिता जागा मागते. परंतु हज कमिटीचे कार्यालय आज मुसाफिरखान्यात बसत आहे, त्यांना कार्यालय देण्यासाठी, इमारत उभारण्यासाठीचा कोणताही उल्लेख नाही. शासनाकडून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठीच्या स्कॉलरशिपचे पैसे तसेच इन्फ्रास्ट्रक्चरचे पैसे यावर्षी देण्यात आलेले नाहीत, ते पुढच्या वर्षी देण्यात येतील किंवा कसे याबद्दलही त्यात उल्लेख नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोकणचे विचार, प्रश्न येणे गरजचे होते. कोकणाची दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, जवळजवळ 4 माननीय कॅबिनेट मंत्री आणि 2 माननीय राज्यमंत्री कोकणातील आहेत. परंतु त्यांचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात, शासनाने घेतलेल्या निर्णयात काहीही प्रभाव दिसून येत नाही. त्यामुळे मी खेद व्यक्त करून मी माझे भाषण संपविते.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामराव वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी मला वेळ दिल्याबद्दल मी आपले धन्यवाद मानतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्याकरिता, त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मराठवाड्यात दुष्काळ पडला आहे, तेथे भयानक दुष्काळ असताना त्याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात काही गोष्टी येणे गरजेचे होते. मात्र त्या सातत्याने आलेल्या नाहीत, त्याबद्दल मला खेद व्यक्त करावयाचा आहे. सातत्याने गेल्या 4 वर्षांपासून मराठवाड्यामध्ये निसर्ग कोपलेला आहे, सातत्याने पाण्याचा भीषण दुष्काळ मराठवाड्यात पडत आहे. आपल्याला माहीत आहे की, माझ्या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी आत्महत्यांचे आकडे वाचून दाखविले. सर्वात जास्त आकडे मराठवाड्याचे आहेत. शेतकऱ्यांवर एवढी वाईट परिस्थिती आलेली असताना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात शेतकऱ्यांच्या कर्जाच्या बाबतीत कुठेही काहीही लिहिलेले नाही. आमची मागणी सातत्याने आहे. आम्ही गेला 6 महिन्यांपासून वेगवेगळ्या प्रकारे शासनाकडे सातत्याने मागणी करीत आहोत. आम्ही, मराठवाड्याची जनता दुष्काळात सातत्याने होरपळून चाललो आहात. शिक्षण घेण्यासाठी प्रवास करताना बस पासेससाठी पैसे नसल्यामुळे मुलीने आत्महत्या केली आहे. पुस्तके मिळत नाहीत म्हणून आत्महत्या केली आहे. कर्जामुळे मुलीचे लग्न करून शकत नाही अशी परिस्थिती शेतकऱ्यावर आली आहे. देशावर, राज्यावर संकट आले असताना आपण एकीकडे मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र करीत करतो. आमचे त्याबद्दल दुमत नाही, ते केले पाहिजे. मात्र या भागातील शेतकरी जो आपल्यासाठी पिकवितो, आपल्याला खाऊ घालतो त्याचा सरकार विचार करणार आहे की नाही याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसत नाही याबद्दल मला खेद वाटतो. सातत्याने, वेळोवेळी मागणी करून सुध्दा काहीही होत नाही. आज परिस्थिती पाहिली तर असे दिसेल की, या वर्षात शेतकऱ्यांची पेरणी सुध्दा झालेली नाही. मराठवाड्यात सोयाबीन, कापूस यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आहे. सोयाबीनचे पीक घेतले. मात्र त्याचा खर्च सुध्दा निघाला नाही अशी स्थिती आहे. कापसाच्या बाबतीतही तीच परिस्थिती आहे. आपण पॅकेज जाहीर केले. मात्र त्यामधून सोयाबीन, कापूस काढून टाकला. मराठवाड्यासाठी 7 हजार कोटी रूपये कर्ज माफ करण्यासाठी लागतात, त्याचा सुध्दा विचार येथे केलेला दिसत नाही. एकीकडे

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामराव वडकुते ....

तुम्ही मोठमोठ्या गोष्टींसाठी सबसिडी देता, दुसरीकडे एलबीटीही माफ केली आहे. आमचे त्या संदर्भात काही म्हणणे नाही. शेतकऱ्यांनाही दिले पाहिजे. आपण शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले असते तर बरे झाले असते. आमचा काही व्यापाऱ्यांविरूध्द धोरण नाही. मात्र आपण जे बोललात ते केले पाहिजे. पण आपण ते केले नाही.

सभापती महोदय, मला सामाजिक दृष्टीकोनातून मुद्दा मांडला पाहिजे. आमच्या समाजाने आपल्याकडे आशेने बघितले, आपल्याला आमच्या 99 टक्के समाजाने मतदान केले आहे. आपण निवडणुकीच्या पूर्वी घोषणा केली होती की, धनगर समाजाच्या संदर्भात पहिल्या कॅबिनेटमध्ये निर्णय घेऊ आणि त्यांना आदिवासीच्या सवलती ज्या घटनेने दिलेल्या आहेत त्या सवलती देऊ. आम्ही वेगळे काही मागत नाही. डॉ. बाबासाहेबांची घटना आहे, त्यामध्ये आदिवासीची सूची आहे, त्या सूचीवर 36 नंबरवर धनगड व धनगर एक आहेत. 4 राज्यांमध्ये ती दुरूस्ती झाली आहे. आपल्याला फक्त एका गोष्टीची शिफारस करावयाची आहे. आपण विरोधी पक्षात या बाकावर असताना पूर्वीच्या सरकारला म्हटले आहे की, ऑलरेडी धनगर समाज हा आदिवासीमध्ये आहे. आपण फक्त केंद्र सरकारकडे शिफारस करायची आहे आणि केंद्र सरकार आरजेआयकडे पाठवून त्याचा निर्णय घ्यायचा आहे. ही छोटीशी गोष्ट आहे. आपण एकीकडे सामाजिक दृष्टीकोनातून सर्वांना न्याय मिळाला पाहिजे असे बोलता आणि दुसरीकडे आपण दिलेला शब्दसुध्दा पाळत नाही. आपण बारामतीमध्ये निवडणुकीपूर्वी येऊन दिलेला हा शब्द होता. आपण ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेऊन 15 दिवसांत निर्णय घेतो असे म्हटले होता. माझ्या माहितीप्रमाणे ॲडव्होकेट जनरलचा सल्ला आला आहे. त्यांनी स्पष्ट सल्ला दिला आहे की, 4 राज्यांमध्ये ज्याप्रमाणे धनगड आणि धनगर करण्यात आले, तशाप्रकारचे फक्त साधी गोष्ट आहे. माजी माननीय मुख्यमंत्री कै. विलासरावांच्या काळात, आपल्याला माहीत असेल की, 'गौंड,राजगुंड' मधील मधला कॉमा काढण्यासाठी त्री सदस्यीय समितीने शिफारस केली होती. तशाच प्रकारची शिफारस करायची आहे. धनगर व धनगड एकच आहेत. त्यामुळे हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** : आपल्याला दुपारी 12.00 वाजता चर्चा संपचावयाची आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, दिलेले शब्द माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कुठेही आलेले नाहीत. त्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष झांबड (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या पुस्तिकेचे सहज अवलोकन केले असता असे दिसून येते की, या पुस्तिकेमध्ये परामर्श घेतलेल्या काही मुद्यांमध्ये आघाडी सरकारच्या जुन्या योजना युती शासनातील काही मान्यवरांच्या नावाने सुरू केल्या आहेत आणि त्यावरुन या योजना युती शासनाने आपआपसात वाटून घेतल्याचे उदाहरण समोर आले आहे. आतापर्यंत घोषणांची भाऊगर्दी सरकारच्या माध्यमातून केली गेली आहे. मागचा इतिहास पाहिला तर असे दिसेल की, समोरच्या सत्ताधारी पक्षाकडून म्हटले जाते की, तुमच्या काळात काय झाले, 15 वर्षांत काय झाले, जुन्या गोष्टी काढून उदाहरणे देऊ नका असे म्हण्ण्यात येते. मी निदर्शनास आणू इच्छितो की, सन 2014 मध्ये देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब यांनी मेक इन इंडियाची घोषणा केली होती. दरम्यानच्या काळात त्यांनी या घोषणांचे संपूर्ण देशभर फिरुन मोठ्या प्रमाणात मार्केटिंग केले होते. मेक इन इंडिया कार्यक्रमाचे यजमान पद महाराष्ट्राला दिले या मागचे खरे दडलेले कारण म्हणजे महाराष्ट्राचा देशाच्या आर्थिक विकासात असलेला हातभार हे आहे आणि ते त्यांनी अप्रत्यक्षपणे मान्य केले आहे. सरकार म्हणत आहे की, 15 वर्षात काय केले आहे ? सभापती महोदय, यावरुन सिध्द होत आहे की, आम्ही 15 वर्षांत केले म्हणून मेक इन इंडियामध्ये महाराष्ट्राला वरचे स्थान दिले. मेक इन इंडियाच्या घोषणेनंतर "गेट अप अँण्ड स्टार्ट अप" या गोंडस घोषणेने देशातील 15 ते 35 या वयोगटातील तरुणांना आकर्षिक करुन, या घोषणेकडे वळविण्याचा प्रयत्न करुन, लहान उद्योगांनाही प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 10 मिनिटांसाठी वाढविण्यात येत आहे. सभागृहाची वेळ आता दुपारी 12.10 अशी राहील.

....M

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, असे असले तरी आज महाराष्ट्रात लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांची काय अवस्था आहे, याची जेवढी कल्पना राज्याचे माननीय उद्योग मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांना आहे तेवढीच ती माननीय पंतप्रधानांना असतानाही आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमधील निम्म्यापेक्षा जास्त लघुउद्योगांना टाळे लागलेले आहे. त्यामुळे लाखो कामगार बेरोजगार झाले आहेत. युती शासनाने आयोजित केलेल्या 'मेक इन इंडिया' आणि 'मेक इन महाराष्ट्र' या कार्यक्रमामध्ये शेती तंत्रज्ञान, आरोग्य, वाहतूक, मोठ्या शहरांसाठी स्मार्टसिटी अशा सारख्या घोषणा करुन काही वेळ लोकांची करमणूक करण्याचा आणि लोकांचे लक्ष दुसरीकडे डायव्हर्ट करण्याचा प्रयत्न युती शासनाने केलेला आहे.

सभापती महोदय, आज आपल्या राज्यातील 16 हजार गावे दुष्काळात होरपळत आहेत, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आहे, जनावरांच्या चाऱ्याचा, त्यांच्या छावण्यांचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, या सारखे कळीचे प्रश्न समोर असताना कोट्यावधी रुपये खर्चाचे 'मेक इन इंडिया' आणि 'मेक इन महाराष्ट्र' या सारख्या खर्चिक कार्यक्रमांचे आयोजन करुन कोट्यवधी रुपये खर्च करणे म्हणजे या राज्यातील जनतेची एक प्रकारे लुट करण्याचा प्रकार आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

**तालिका सभापती :** कृपया सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, आम्हाला चर्चेच्या शेवटी संधी मिळते आणि फक्त एक ते दोन मिनिटे बोलण्यासाठी मिळतात. यापूर्वीच्या वक्त्यांनी एक-एक तास भाषण केले आहे. आमच्या सारख्या नवीन सदस्यांना आपण केवळ दोन-पाच मिनिटे देणार असाल तर मी खाली बसतो आणि खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 33 अन्वये कृषी प्रक्रिया उद्योग केंद्र उभारण्यासाठी प्रत्येक महसुली विभागात 5 कोटी रुपयांचा एक प्रकल्प हाती घेण्यात येईल व पुढील 5 वर्षाच्या कालावधीत 35 प्रकल्प पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन या अभिभाषणात देण्यात आले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2....

**तालिका सभापती :** कृपया सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे अवलोकन केले तर या 21 पानांच्या अभिभाषणात कशा पध्दतीने शब्दांची जुळवाजुळव केली आहे, हे बघावयास मिळते.

"शब्दांनी शिकवलेय पडता पडता रडायला
शब्दांनी शिकवलेय पडता पडता सावरायला
शब्दांनी शिकवलेय रडता रडता हसायला
शब्दांमुळेच होतो एखाद्याचा घात आणि शब्दांमुळेच मिळते एखाद्याची साथ"
ज्याप्रमाणे आम्ही आपल्याला बाहेरुन साथ दिली आहे
"शब्दांमुळे जुळतात मनामनातील तारे आणि शब्दांमुळेच चढतो एखाद्याचा पारा
म्हणूनच जो जीभ जिंकतो तो मन जिंकेल
आणि जो मन जिंकेल तो जग जिंकेल"

असे एका कवीवर्याने म्हटले आहे. अशाच प्रकारे शब्दच्छल करुन, शब्द रंगवून या देशामध्ये आणि राज्यामध्ये सत्तेवर बसण्याचे काम यांनी केले आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांचे भाषण वाचल्यानंतर लक्षात येईल की, मागील काळातील योजनांची नावे बदलण्याचे काम या सरकारने केलेले आहे. स्वत:च्या पक्षातील मोठमोठ्या नेत्यांची नावे या योजनांना देण्याचे काम या सरकारने केले असून 21 पानांच्या या राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 19 नेत्यांची नावे जुन्याच योजनांना देण्यात आली आहेत. या नवीन योजना नसून जुन्याच आहेत. फक्त त्यांची नावे बदलण्याचे काम सरकारने केलेले आहे. या राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती असताना, जनता दुष्काळात होरपळत असताना त्या संदर्भातील कोणताही उल्लेख, कोणताही खेद, कोणतीही चिंता या अभिभाषणात केलेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब मी या ठिकाणी नमूद करीत आहे.

सभापती महोदय, ज्या मराठवाड्याचे मी प्रतिनिधीत्व करीत आहे त्या मराठवाड्यात आज लोकांना पिण्यासाठी पाणी नाही, जनावरांना चारा नाही. परंतु, चारा छावण्यांची संख्या

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे......
वाढविण्याऐवजी या सरकारने चारा छावण्या बंद करण्याचा तुघलकी निर्णय घेतला आहे, याचा खेद व्यक्त करावा तेवढा कमी आहे.

सभापती महोदय, लिखित अभिभाषणातील 21 पानांवर 19 नेत्यांची नावे आलेली आहेत. परंतु, महात्मा गांधी तंटामुक्त अभियान, संत गाडगेबाब ग्राम स्वच्छता अभियान, डान्सबार बंदी, यासारख्या चांगल्या योजना आणि निर्णय ज्या कै.आर.आर.पाटील यांनी राज्याला दिल्या त्यांच्या नावाचा विसर या सरकारला पडला आणि त्यांचे नाव एखाद्या योजनेला द्यावे, असे सरकारला वाटले नाही. केवळ राजकारण करण्याचा कुटील डाव या सरकारने खेळला आहे.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांना सारा देश महाराष्ट्राचा शिल्पकार म्हणून ओळखतो. त्यांची जयंती आपण साजरी करीत आहोत. त्यांचे स्मारक या राज्यात व्हावे, अशा प्रकारची इच्छा मी व्यक्त करतो आणि पुढील अभिभाषणामध्ये स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या भव्य स्मारकाचा उल्लेख येईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि थांबतो.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी. त्यांना मी विनंती करतो की, त्यांनी आपले भाषण दोन मिनिटात आटोपते घ्यावे. जेणकरुन शेवटच्या दोन सन्माननीय सदस्यांनाही बोलण्याची संधी देता येईल.

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. तथापि, दोन मिनिटात अभिभाषणावर बोलणे अशक्य आहे. आपण सभागृहाची वेळ 10 मिनिटांसाठी वाढवून द्यावी.

सभापती महोदय, आपण मला वेळ दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर मी असहमती व्यक्त करतो आणि माझे सर्व मुद्दे एका वाक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो. कारण, मुद्यांचा विस्तार करणे वेळेअभावी अशक्य आहे.

सभापती महोदय, सुरुवातीलाच मी सरकारला एका गोष्टीची आठवण करुन देऊ इच्छितो. आपण निवडणुकीपूर्वी सर्व्हे करीत असतो. लोकांचा कल काय आहे, हवा कशी आहे, हे बघत असतो. मी सरकारला आवाहन करीन की, तुम्ही जनतेमध्ये जाऊन बघावे. शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब जनता आपल्याबद्दल काय म्हणत आहे ? ते असे म्हणतात की, आता त्यांना येऊ द्या आम्ही दाखवितो.

**तालिका सभापती :** आता सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माझे एक वाक्य सुध्दा अद्याप पूर्ण झालेले नाही. आपण चर्चेची वेळ वाढवून द्यावी. अशा प्रकारे आमचा आवाज दाबून चालणार नाही.

**तालिका सभापती :** दुपारी 12.15 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मी निषेध करतो. अशा प्रकारे आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत असाल तर लक्षात ठेवा. महाराष्ट्रामध्ये तुम्ही कोणाला न्याय देणार आहात, हे सरकार कोणासाठी आहे, हे सभागृह कोणासाठी आहे ? या सरकारचे वाभाडे काढावयास लागलो तर आमचे तोंड दाबत आहात. अशा पध्दतीने सभागृह चालत असेल तर तो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान आहे, संविधानाचा अपमान आहे. मी गोरगरीबांचा प्रतिनिधी

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.......

आहे. भटक्या, विमुक्त, बारा बलुतेदार, अत्यंत मागास लोकांचे प्रश्न घेऊन देशामध्ये रात्रंदिवस गेले 20 वर्षे फिरत आहे. या ठिकाणी आवाज दाबला जात आहे. त्यामुळे मी निषेध व्यक्त करतो आणि सभागृहातून बाहेर जातो.

(सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड सभागृहातून बर्हिगमन करतात.)

----------

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शेवटच्या टप्प्यामध्ये बोलणाऱ्या सदस्यांच्या भावना आपण लक्षात घ्याव्यात. मुख्यमंत्री महोदय सभागृहात येईपर्यंत माझे भाषण सुरु ठेवण्यास हरकत नाही.

**तालिका सभापती :** दुपारी 12.15 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करीत असताना सुरुवातीला या सरकारचे मी कौतुक करीत आहे. हे कौतुक करीत असताना माझ्या भावना संमिश्र आहेत. कौतुक या गोष्टीचे आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पंचतीर्थ आपण निर्माण केली. अलीकडे त्यापैकीच एका तीर्थाला म्हणजे लंडन येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या निवासस्थानाला भेट देऊन व तेथे नतमस्तक होऊन मी आलो आहे. अशा प्रकारे आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक निर्माण करीत आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल आदर व्यक्त करीत असताना एक प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाला आहे.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 15 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 10 मिनिटांनी दुपारी 12 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

-------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**तारांकित प्रश्न क्र.14725 बाबत.**

**सभापती :** मी आज सकाळी तारांकित प्रश्नोत्तराची यादी वाचली. त्यावेळी माझ्या असे लक्षात आले की, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अ.क्र.1 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 14725 "राज्यात मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत" या विषयावरील आहे. या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी तारांकित प्रश्नात सामाजिक न्याय मंत्री महोदयांचे नाव छापण्यात आले आहे. परंतु, मुस्लिम समाज, मराठा समाज आणि धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत लेखी प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. हा आरक्षणाचा प्रश्न तीन विभागांशी संबंधित असल्यामुळे उद्या सकाळी मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: या तारांकित प्रश्नाला उत्तर द्यावे. कारण, एका विभागाच्या मंत्री महोदयांनी उत्तर देऊन या प्रश्नाला न्याय मिळेल, असे मला वाटत नाही. आता आपण तारांकित प्रश्न क्र.14594 चर्चेला घेऊ.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत मान्यता प्राप्त वसतिगृहातील अधिक्षकांना मानधन ऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(2) * १४५९४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १३४७३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या अनुदानित मान्यता प्राप्त वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, सदरहु कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(3) असल्यास, या निर्णयाचे अनुषंगाने शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे काय,

(4) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे, श्री.राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) ते (५) सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सदरचा विषय दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजी सभागृहात चर्चेला आला होता. शासनाच्या वतीने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, सदरची बाब बरोबर आहे किंवा जी मागणी आहे ती योग्य आहे. या संदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्या अनुषंगाने आजही लेखी प्रश्नाला तेच उत्तर देण्यात आले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज किमान 10 तारांकित प्रश्नावर चर्चा व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, तारांकित प्रश्नातील पाचही लेखी प्रश्नांना एका वाक्यात उत्तर दिलेले आहे की, सदरचा विषय आजही शासनाच्या विचाराधीन आहे. शासन मान्य अनुदानित वसतिगृहातील अधीक्षकांच्या वेतनश्रेणी बाबतचा हा प्रश्न आहे. सभापती महोदय, या संदर्भात अनेक बैठका झाल्या. या संदर्भात आपल्या दालनातही बैठका झालेल्या आहेत. माननीय वित्तमंत्री महोदयांबरोबर देखील बैठक झालेली आहे आणि त्यांनी ते तत्वतः मान्य केलेले आहे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14594.......

श्री.रामनाथ मोते.......

परंतु, अद्यापही शासनाकडून हेच उत्तर मिळते की, सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासन प्रत्येक वेळी असेच उत्तर देणार आहे का खरोखर कधी तरी सकारात्मक विचार करणार आहे ? या विषयाच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी आपल्याला जो काही निर्णय घ्यायचा असेल तो घेऊन, जी आमची मागणी आहे, वसतिगृह अधीक्षकांची मागणी आहे, ती आपण पूर्ण करणार आहात काय आणि सकारात्मक निर्णय घेणार आहात काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, अनुदानित मान्यता प्राप्त वसतिगृहातील अधीक्षकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याच्या बाबतीत दिनांक 20.10.2015 रोजी माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांच्याकडे एक बैठक झालेली आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14594....

श्री.दिलीप कांबळे...

त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार यासंदर्भातील निर्णय प्रलंबित आहे. परंतु लवकरात लवकर यासंदर्भात माननीय अध्यक्ष विधानसभा यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षक आमदार म्हणून निवडून आल्यापासून सातत्याने या विषयाचा मी पाठपुरावा करीत आहे.(..अडथळा)..आम्ही सर्व शिक्षक व पदवीधर आमदार या प्रश्नांचा पाठपुरावा करीत आहोत. राज्यमंत्री महोदयांनी यापूर्वी देखील अनेक वेळा सभागृहात लवकरात लवकर निर्णय घेऊ असे सांगितले आहे. मंत्री महोदय, उपस्थित आहेत त्यांना मी एकच प्रश्न विचारतो की, अधिवेशन संपण्यापूर्वी राज्यातील व्हीजेएनटीच्या आश्रमशाळा, वसतिगृहांच्या अधीक्षकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेऊन त्या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला जाईल काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, माननीय अध्यक्ष विधानसभा यांनी दिनांक 20/10/2015 रोजी वेतनश्रेणी देण्याच्या संदर्भात बैठक बोलविली होती. त्यामध्ये जो निर्णय झाला होता त्या निर्णयाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे ही बाब अवलोकनार्थ ठेवण्यात आली होती. त्यांनी असे सांगितले आहे की, बैठक घेऊन यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल. ही वेतनश्रेणी दिल्यास 44 कोटी रुपयांचा भार सहन करण्यासंदर्भात काय करता येईल याबाबत बैठक घेऊन हा निर्णय घेण्यात येईल.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पाथरी (जि.परभणी) येथे प्रभारी उपअभियंता यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(3) * १५०७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पाथरी (जि.परभणी) येथे प्रभारी उपअभियंता असलेल्या श्री.तरकसे यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१५ मध्ये वा त्या दरम्यान अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी केवळ कागदोपत्रीच करण्यात आलेल्या या गैरकामाची चौकशी पुर्ण केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशी दरम्यान काय निष्पन्न झाले व दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री. चंद्रकांत पाटील, यांच्याकरिता :** (१) होय.

(2) व (३) सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्‌भावत नाही.

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15079...

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे,लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. याबाबत मी 6 जून 2015 रोजी तक्रार केली होती. या तक्रारीबाबत मला असे उत्तर देण्यात आले आहे की, क्वॉलिटी कंट्रोल यांच्या मार्फत चौकशी करण्याचे आदेश अधीक्षक अभियंता यांना देण्यात आले आहेत. मी माझ्या तक्रारीत असे नमूद केले होते की, जो पर्यंत या प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यंत यांचे पेमेंट अदा करण्यात येऊ नये. माझ्या तक्रारीची दखल घेण्यात आलेली नाही. सहा महिन्यापूर्वी तक्रार देऊन असा कारभार चालत आहे. ज्युनिअर इंजिनिअर व डेप्युटी इंजिनिअर एकच व्यक्ती आहे. पाथरी सबडिव्हीजन बाबत मी तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेण्यात येत नाही. 31 मार्च रोजी हे इंजिनिअर सेवानिवृत्त होत आहेत. 31 मार्चच्या पूर्वी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. ज्युनिअर इंजिनिअर यांनी संगनमत करुन लाखो रुपये उचलले आहेत. चौकशीमध्ये जे अधिकरी दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करुन त्यांनी जे पेमेंट अदा केले आहे ते वसूल करण्यात येईल काय ? श्री.तरकसे नावाच्या इंजिनिअरवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येईल ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पाथरी जिल्हा परभणी येथील प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी दिनांक 6.5.2015 रोजी पत्र दिलेले आहे. त्याचप्रमाणे श्री.विठ्ठलराव साळवे यांनी दिनांक 01.01.2015 व दिनांक 07.04.2015 रोजी पत्र दिलेले आहे. या कामांची चौकशी चालू आहे, 4 कोटी 26 लाखांची 90 कामे व 1 कोटी 55 लाख रुपयांची 50 कामे आहेत. या कामांची सखोल चौकशी सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, संबंधित इंजिनिअर सेवानिवृत्त होणार आहेत. ते सेवानिवृत्त होणारच आहेत, त्यात काही शंका नाही, त्या कामांची पूर्ण रक्कम आजपर्यंत देण्यात आलेली नाही. सदर इंजिनिअर सेवानिवृत्त होण्या अगोदर संपूर्ण चौकशी करण्यात येईल. त्यांना ज्या देय रकमा आहेत त्या देखील थांबविण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे, कोणत्या प्रकारे अपहार झाला आहे, यामध्ये कोणते दोष आढळून आले आहेत ?

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15079...

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, श्री.डी.जी.तरकसे ही व्यक्ती तेथे इंजिनिअर आहे, त्या ठिकाणी जी कामे करण्यात आली आहेत त्या कामांची गुणवत्ता, क्वॉलिटी व दर्जा तपासणे महत्वाचे आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दुर्राणी यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नात स्पष्टपणे नमूद केले आहे की, 9 महिने होऊन देखील या प्रकरणांची अद्याप चौकशी झालेली नाही. 9 महिन्यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी पत्र दिले होते की, प्रभारी उप अभियंता यांनी गैरव्यवहार केलेला आहे. 9 महिन्यात या चौकशीचा अहवाल आपणाकडे आला आहे काय ? सदर अहवाल आला असेल तर त्याबाबत काय कारवाई करण्यात आली. अहवाल आला नसेल तर 9 महिन्यात अहवाल का आला नाही. ज्या अधिकाऱ्यांनी अहवाल द्यावयाचा होता, त्यांनी दिरंगाई केल्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले आहे की, 90 आणि 50 अशा प्रकारची जवळपास 140 कामे आहेत, या कामाचे प्रत्यक्षात रॅन्डमली सॅम्पल घेतले जात आहेत. प्रत्येक कामावर जाऊन पाहणी करण्यात येत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, या बाबतची कामे झालेली नाही व गैरव्यवहार झालेला आहे. पुन्हा 90 कामांची चौकशी केली जात आहे असे उत्तरात सांगण्यात येत आहे. श्री.तरकसे यांनी जो गैरव्यवहार केलेला आहे, त्यांच्या संदर्भातील अहवाल आला नाही तरी त्यांना अहवालाच्या अधिन राहून त्यांना निलंबित करण्यात येईल काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, कामे झालेली नाही. मी सदस्यांना विनंती करतो की, एखादे स्पेसिफाय काम झाले नसेल तशी तक्रार असेल तर त्याबाबत नक्की चौकशी केली जाईल. संबंधित इंजिनिअर सेवानिवृत्त होण्याच्या अगोदर उद्या त्या अधिकाऱ्यावर कारवाई करतो.(..अडथळा...) सभापती महोदय, आजच कारवाई करतो. सेवानिवृत्त होण्याआधी संपूर्ण चौकशी करुन त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15079...

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव मुझिक आहे, 25 वर्षापासून बदली करुन घेऊन ही व्यक्ती त्याच जागेवर काम करीत आहे. आपल्या विभागांच्या सचिवांपासून सर्व अधिकाऱ्यांना या व्यक्तीने त्रास दिलेला आहे. त्यामुळे या मुझिक नावाच्या अधिकाऱ्याची मंत्री महोदयांनी अगोदर चौकशी केली पाहिजे. श्री.मुझिक यांना अगोदर सस्पेंड करुन नंतर श्री.तरकसे यांना सस्पेंड करण्यात येईल काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो स्वतंत्र प्रश्न असू शकतो. श्री.तरकसे यांचा विषय आहे, यामध्ये दिनांक 6.5.2015 रोजी सन्माननीय सदस्य श्री.दुर्राणी यांनी लेखी तक्रार केली होती. त्यानंतर लगेच दिनांक 16.5.2015 रोजी या कामासाठी समिती घोषित करण्यात आली. ज्या डिव्हीजनला ही चौकशी दिली होती तो नांदेड डिव्हीजन नंतर देगलूरमध्ये समाविष्ट झाल्यामुळे ती चौकशी थांबली होती. आता दिनांक 11/03/2016 रोजी ही चौकशी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी व सहाय्यक अधिक्षक अभियंता परभणी यांना दिलेली आहे. कामांची इस्टिमेट घरी बसून केली, बिले घरी बसून लिहीली, पेमेंट काढले अशा प्रकारच्या तक्रारी आहेत, 90 आणि 50 अशा प्रकारे 140 कामे आहेत, त्यामुळे तपासणी करण्यासाठी वेळ लागत आहे. 31 मार्च रोजी सदर इंजिनिअर सेवानिवृत्त होणार आहेत. आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यानुसार चौकशीच्या अधिन राहून त्यांना आजच सस्पेंड करण्यात येत आहे.

या नंतर श्री.सांगळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15079.....

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी : मला मंत्री महोदयांचे आभार मानतो. माननीय राज्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात स्पेसिफिक काम सांगावे असे सांगितले होते. लोकांनी माहितीच्या अधिकारात माहिती घेतली. पाथरी, लिंबा-विटा येथे सदर गृहस्थाने 59 लक्ष रुपये खड्डे बुजविण्यासाठी उचचले होते. परंतु तेथे एकही खड्डा बुजविण्यात आला नाही. या कामांच्या संदर्भात सोनवड तालुक्याचे लोक 4 महिन्यांपासून उपोषणाला बसले होते. आता त्यांचे उपोषण सुटले आहे. अशा पध्दतीने कामे होणार असल्यास तर राज्याचे काय होणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

--------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बीड जिल्ह्यातील पोलीस वसाहतींच्या दुरवस्थेबाबत**

***(४)*** * **१५८९१ *श्री.अमरसिंह* पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** बीड जिल्ह्यातील पोलीस वसाहती मधील शासकीय निवासस्थांनाची अत्यंत दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी रहिवाशांना मुलभूत सुविधा पासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, शासकीय वसाहतीत राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी त्यांना आवश्यक नागरी सुविधा आणि निवास्थानाच्या दुरुस्तीची मागणी वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, मोडकळीस आलेल्या कालबाह्य इमारतीच्या जागेवर नविन इमारतीचे बांधकाम करुन पोलीस कर्मचाऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे नविन निवासस्थाने उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,
***(४)*** शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहार व निवासस्थानाची दुरुस्ती याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) अंशतः खरे आहे.
***(२)***२ होय.
***(३)*** व (४) शासकीय निवासस्थानांच्या केलेल्या दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही, तथापि नवीन निवासस्थानांचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.
***(५)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : अंदाज समितीने बीड जिल्ह्यातील पोलीस वसाहतीची पाहणी करण्यासाठी भेट दिली होती. सदर भेटीच्या वेळी पोलीस अधीक्षक सुध्दा उपस्थित होते. आम्ही त्यांच्या समवेत तेथे राहत असलेल्या पोलिसांची दुरवस्था पाहिली. तेथे अतिशय दुर्गंधी पसरली होती. तेथे कोणत्याही साधन सुविधा उपलब्ध नव्हत्या. अशा परिस्थितीत पोलीस कर्मचारी तेथे कसे राहतात, याचे आश्चर्य व्यक्त केले जात होते. अशा प्रतिकुल परिस्थितीत ते राहत असताना तेथे पिण्याचे पाणी व लाईट नव्हती. जिल्ह्यात 5 हजार पेक्षा जास्त पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. परंतु त्यांच्या तुलनेत निम्मी सुध्दा निवासस्थाने उपलब्ध नाहीत. माझा मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, 60 वर्षांपूर्वी बांधलेल्या व आता मोडकळीस आलेल्या 500 पेक्षा जास्त निवासस्थानांचे पुनर्निर्माण करण्यासाठी तुम्ही एखादी उपाययोजना आखणार आहे का ?

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15891.....

श्री.अमरसिंह पंडित...

लेखी उत्तरात शासकीय निवासस्थांनाच्या दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही असे नमूद करण्यात आले. परंतु अंदाज समितीला तेथे कामांची बिले काढल्याची व कामे झाली नसल्याचे दाखविण्यात आले. एखाद्या ठिकाणी "सी" विंग आहे. तेथे काही तरी रंगरंगोटी व दरवाजांची कामे केली आहेत. अंदाजपत्रकात कामांचा समावेश असताना कामे न करता सदर कामांची बिले काढली आहेत. या संदर्भात पोलीस अधीक्षक आणि अंदाज समितीसमोर चर्चा झाली होती. या प्रकरणी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करणार आहात का ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सदर जिल्ह्यात 3 डिव्हिजन आणि 11 तालुके आहे. तेथे दुरवस्था आहे याबद्दल आमच्या मनात कोणतीही शंका नाही. मध्यंतरीच्या काळात 2011 मध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांनी नवीन निवासस्थाने बांधण्याकरिता डी.आय.डी. यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. पी.डब्ल्यु.डी. विभाग एजन्सी म्हणून काम करीत आहे. सदर विभागाने पैसे दिल्यानंतर पी.डब्ल्यु.डी. विभागाकडून टाईल्स बदलणे, दुरुस्ती करणे इत्यादी प्राथमिक स्वरुपाची कामे केली जातात. या प्रकरणी असे सांगण्यात आले की, यासंबंधी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला, घोळ झाला, गैरप्रकार झाला. परंतु माझ्याकडे यासंबंधी पुरावे आहेत. सुरुवातीला काम कशा अवस्थेत होते व त्यानंतर कोणती दुरुस्ती करण्यात आली, याबाबत माझ्याकडे फोटो आहेत. या संदर्भात कोणत्याही प्रकारामध्ये गैरव्यवहार झाला असे म्हणता येणार नाही. सध्या तेथे पोलीस विभागातील अनेक लोक राहतात आणि तेथे निवासस्थानांची संख्या कमी आहे यात कोणतीही शंका नाही.

श्री.अमरसिंह पंडित : या संदर्भात गैरव्यवहार झाल्यासंबंधी रितसर लेखी तक्रारी दिलेल्या आहेत. कामे झालेली नसताना बिले काढण्यात आल्याचे आरोप अंदाज समितीसमोर करण्यात आले आहेत. परंतु माननीय मंत्री उत्तरात असे सांगत आहेत की, यात तथ्य नाही, तक्रार करण्यात आलेली नाही आणि गैरव्यवहार झालेले नाहीत. सभापती महोदय, ते कोणाची पाठराखण करीत आहेत, कोणाला पाठीशी घालत आहेत ? या संदर्भात लेखी तक्रारी करण्यात आल्या होत्या. यामुळे या संदर्भात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून चौकशी करणार आहात का ?

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15891.....

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला "होय" असे स्पेसिफिक उत्तर देता येऊ शकते. परंतु मी तसे उत्तर देणार नाही. या संदर्भात कोणत्याही सदस्यांनी आमच्याकडे स्पेसिफिक तक्रार केलेली नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात अंदाज समितीचा संदर्भ दिला आहे.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार आम्ही या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करु. त्यात काही आढळून आल्यास नक्की कारवाई करु.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित वारंवार सांगत आहेत की, तेथे अंदाज समितीने भेट दिली होती. विधिमंडळाच्या अंदाज समितीने पोलीस अधीक्षकांसमवेत तेथे भेट दिली होती. तेथील कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे विधिमंडळाची अंदाज समिती सांगत आहे. परंतु माननीय राज्यमंत्री उत्तर देत असताना असे सांगत आहेत की, यात कोणताही गैरव्यवहार नाही. यामुळे आपला अंदाज समितीवर अविश्वास आहे का ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. दोन्ही सभागृहाची अंदाज समिती दौऱ्यावर जाऊन तेथील पाहणी करते, समितीमध्ये सर्वपक्षीय सदस्य आहेत. त्यांनी सभागृहाच्या सार्वभौर्म असलेल्या अंदाज समितीवर अविश्वास दाखविला आहे. यामुळे माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर मागे घेतले पाहिजे.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माझा अंदाज समितीवर कोणताही अविश्वास नाही. अंदाज समिती तेथे गेल्यानंतर आम्हाला स्पेशली काही सांगण्यात आले असते तर आमची कोणतीही हरकत नव्हती. परंतु याक्षणी आमच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करु. त्यात काही आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करु.

**सभापती** : ठीक आहे.

----------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**भालेर (ता.जि.नंदुरबार) याठिकाणी एमआयडीसीकरिता पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत**

***(५)*** * **१६११९ *श्री.चंद्रकांत* रघुवंशी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
***(१)*** भालेर (ता.जि.नंदुरबार) याठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) घोषित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, सदर ठिकाणी एमआयडीसीसाठी कोणतीही पायाभूत सुविधा पुरविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, उक्त एमआयडीसीसाठी पायाभूत सुविधा करुन किती कालावधीत एमआयडीसी सुरु करण्यात येणार आहे,
***(४)*** असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. सुभाष देसाई यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.
***(२), (३)*** व (४) मौजे भालेर (ता.जि.नंदुरबार) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी २८५.५८ हे.आर सहकारी व ३५४.८३ हे.आर खाजगी असे एकूण ६४७.४१ हे.आर इतके क्षेत्र अधिसूचित करण्यात आले आहे. त्यापैकी, २८५.५८ हे.आर इतके सरकारी क्षेत्र महामंडाळाच्या ताब्यात आले असून उर्वरित खाजगी क्षेत्र ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ताब्यात आलेल्या सरकारी क्षेत्राची मोजणीची कार्यवाही पूर्ण झालेली असून सर्व्हेक्षणाचे व सिमांकनाचे काम सुरु आहे व तापी नदीवरील प्रकाशा बंधाऱ्याच्या जलाशयातून ४.५० द.ल.घ.मी. पाण्याच्या आरक्षणाकरिता प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे पाठविण्यात आला असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर औद्योगिक क्षेत्रासाठी रस्ता, जलवितरीका व कायम स्वरुपी पाणीपुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या खर्चाच्या प्रशासकीय प्रस्तावास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.
***(५)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आदिवासी जिल्ह्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे. नंदुरबार जिल्ह्यात भालेर एमआयडीसी जाहीर होवून 2 वर्षे झाली आहेत. परंतु आजपर्यंत शासनाने फक्त 285.58 हेक्टर शासकीय जमीन एमआयडीसीच्या ताब्यात दिली. या संदर्भात एमआयडीसीने सर्व प्रक्रिया पूर्ण केली. परंतु पायाभूत सुविधांना अद्याप सुरुवात झाली नाही. दरवर्षी नंदुरबार जिल्ह्यातून मजुरांचे मोठ्या प्रमाणावर गुजरातमध्ये स्थलांतर होत असते. ते थांबविण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यात एमआयडीसीशिवाय दुसरा नाही. शासनाने नंदुरबार टेक्सटाईल झोन जाहीर केला आहे. परंतु एमआयडीसी सुरु नसल्यामुळे फक्त झोन जाहीर करुन उपयोग होणार नाही. भालेर एमआयडीसीला तत्काळ पायाभूत सुविधा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली ? 354.83 हेक्टर खाजगी जमिनीच्या अधिग्रहणाला अद्याप सुरुवात झाली नाही. नवीन कायद्यानुसार शेतकऱ्यांना चारपट पैसे दिले जातील. यामुळे शेतकरी जमिनी देण्यासाठी स्वत:हून पुढे येतील. शासकीय जमिनींवर ताबडतोब पायाभूत सुविधा सुरु करणार आहात का ?

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16119.....

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, एमआयडीसीकरिता एकूण 647.41 हेक्टर जमीन घेणार होतो. त्यापैकी फक्त 285.58 हेक्टर सरकारी जमीन ताब्यात मिळाली. या गावामध्ये सर्व्हे केल्यानंतर खाजगी जमीन उपलब्ध झाली नाही. दिनांक 9/12/2013 रोजी 285.58 हेक्टर सरकारी जमीन ताब्यात मिळाली. तसेच दिनांक 16/2/2016 रोजी पाणी पुरवठा, रस्ते व इतर मूलभूत सुविधा देण्याकरिता प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानुसार निविदा व कामाची दिशा आखण्यास सुरुवात करण्यात आली. सर्व कामे करण्यासाठी कमीत कमी दीड वर्षांचा कालावधी लागणार आहे. सदर एमआयडीसी महत्त्वाची आहे. सन्माननीय टेक्सटाईल्सचा उल्लेख केला, तो अतिशय महत्त्वाचा आहे.

यानंतर Q-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16119.....

श्री.प्रवीण पोटे-पाटील....

मी माननीय सदस्यांना विनंती करु इच्छितो की, त्या ठिकाणी मोठी एमआयडीसी करणे गरजेचे असल्यामुळे त्यांनी सहकार्य केले आणि खाजगी जमीन उपलब्ध झाली तर चांगली एमआयडीसी आपण डेव्हलप करु शकतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी योग्य प्रश्न विचारला आहे. राज्यमंत्र्यांनी उत्तर देत असताना 2 वर्षापूर्वी शासकीय जमीन महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळाकडे हस्तांतरित झाल्याचे सांगितले. गेल्या 2 वर्षाच्या काळात खाजगी जमीन संपादित करण्यासाठी कोणती पावले उचलली गेली आणि नवीन भूसंपादन कायद्यान्वये शेतकऱ्यांना मोबदला मिळणार आहे का, पायाभूत सुविधा तयार करण्यात आलेल्या आहेत त्या सुविधांचे अंदाजपत्रक काय आहे? मेक इन इंडिया कार्यक्रमातून 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली, त्यामधून कोणत्या उद्योजकांना या भागात उद्योग काढण्यासाठी पाठविणार आहात?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, दिनांक 16.2.2016 रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. रस्त्यासाठी 79.84 कोटी रुपये आणि पाणी पुरवठयासाठी 43.63 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तापी नदीमधून बंधाऱ्याद्वारे पाणी उचलायचे आहे. त्या संदर्भात प्रक्रिया करीत असताना मोठया प्रमाणात अडचणी येतात. सगळयात महत्वाचे म्हणजे खाजगी जमीन संपादित करताना लोकांकडून मोठया प्रमाणात विरोध दर्शविला होता. ती कार्यवाही सुरुच आहे.

श्री.सुनील तटकरे : त्यांना नेमका दर काय देणार आहात?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे त्यांना दर देण्यास तयार आहोत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी विशेषतः नंदूरबार सारख्या आदिवासी भागामध्ये उद्योग उभारणे हा प्राधान्याने करण्याचा विषय आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, या प्रक्रियेला साधारणपणे दीड वर्षाचा कालावधी लागतो. एमआयडीसीच्या 285.58 हेक्टर जमीन ताब्यात आली असून त्या ठिकाणी ज्या सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे त्या सुविधा पुरविण्यासाठी महामंडळाचा इतक्या वर्षाचा अनुभव लक्षात घेता कमी करु शकत नाही का? दीड वर्षापेक्षा कमी वेळेत हे काम करता येणे सहज शक्य आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.2

SGB/ KTG/ AKN/ 12:40

ता.प्र.क्र.16119.....

श्री.हेमंत टकले......

त्यासाठी अधिकाऱ्यांची मानसिकता नसल्यामुळे वेळ काढण्याचे धोरण राबविले जात आहे. त्यामुळे प्रगतीचा वेग मंदावणार आहे. नंदूरबारमधून होणारे स्थलांतर थांबवायचे असेल तर दीड वर्षाचा कालावधी सहा महिन्यापर्यंत कमी करुन प्राथमिक सुविधा उपलब्ध होतील यासाठी कारवाई करण्यात येईल काय?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, अधिकाऱ्यांच्या मानसिकतेबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. मागील दीड वर्षापासून या विभागाचे काम सांभाळत असताना या कामामध्ये गती वाढली आहे. दीड वर्षाचा कालावधी नमूद केला असला तरी जितक्या लवकर करता येईल तेवढा प्रयत्न करु मी यापूर्वीच सांगितले की, छोटी एमआयडीसी करण्यापेक्षा मोठी करण्याला अधिक प्राधान्य आहे. माननीय सदस्यांनी जमीन संपादित करण्यासाठी मदत केली तर शासनाच्या धोरणाप्रमाणे मोबदला देण्यास तयार आहोत.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, 2013 मध्ये मान्यता दिली असून आता वर्ष 2016 सुरु आहे. अद्याप कोणतीही प्रक्रिया झालेली नाही. ज्या लोकांच्या जमिनी संपादित होणार नव्हत्या त्या लोकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने दिली आणि विरोध असल्याचे सांगितले. आम्ही त्यांना स्पष्ट केले की, ज्यांची जमीन संपादित होत नाही त्यांच्या विरोधाला किंमत देऊ नये. शासकीय जमिनीवर प्रथम पायाभूत सोयी निर्माण झाल्या तर लोक आपोआप तयार होतील. तेथे काहीच सुविधा नाही. लोकांना प्यायला पाणी नाही. लोक स्थलांतर करतात. 300 हेक्टर जमीन महामंडळाकडे आहे, तेथे पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. 10 कि.मी.अंतरावर मुबलक पाणी आहे. तेथे एमआयडीसी सक्षमपणे चालू शकते. फक्त ती उभी करणे हे शासनाला क्रमप्राप्त आहे. शासकीय जमिनीवर पायाभूत सुविधा तातडीने उभ्या करणार आहात का? भविष्यात ज्या खाजगी लोकांच्या जमिनी संपादित केल्या जातील त्यांना नवीन धोरणाप्रमाणे दर देणार आहात का? तसे झाले तर आपोआप लोक जमीन देण्यासाठी पुढे येतील. एमआयडीसीच्या कामाला तातडीने सुरुवात केली जाईल का?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : होय.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.3

SGB/ KTG/ AKN/ 12:40

ता.प्र.क्र.16119.....

**सभापती** : मंत्री महोदय, माझ्या स्वतःच्या जिल्हयात बरेच औद्योगिकरण झाले आहे. उद्योगमंत्री श्री.सुभाष देसाई त्या ठिकाणी येऊन गेले आहेत. एमआयडीसीच्या नियमात मला एक अडचण दिसते. किमान 100 हेक्टर एवढी जमीन स्वेच्छेने संपादित करण्यास जमीनधारकाने परवानगी दिली तर महामंडळाकडून भूसंपादन केले जाते. माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांचा प्रश्न वेगळा आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामध्ये सरकारी जमीन संपादित झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. माझा अनुभव असा आहे की, आपण 100 हेक्टरचा हार्ड अँड फास्ट रूल ठेवू नये. समाधानकारक मोबदला देऊ शकलात आणि 50 हेक्टरपेक्षा कमी जी जमीन मिळेल ती संपादित केली तर इतर भूधारक लगेच जमीन द्यायला तयार होतील हा आमचा खंडाळा तालुक्यातील अनुभव आहे.

दुसरा एक गैरप्रकार एमआयडीसीच्या धोरणातून दिसू लागला आहे. मी महामंडळाला जमीन दिली. माझी 1 एकर जमीन असेल तर 15 टक्के विकसित भूखंड महामंडळाकडून परत दिला जातो. एमआयडीसीकडून देण्यात आलेली जमीन वर्ग 2 ची असते. वर्ग 2 च्या जमिनीचे कन्व्हर्जन करण्याबाबत माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी लिबरल धोरण घेतले आहे. ज्यांना 15 टक्के विकसित जमीन मिळणार त्याची विक्री आधीच व्हायला लागली, हे कसे थांबवायचे हा क्लिष्ट प्रश्न निर्माण झालेला आहे. या दोन सूचना लक्षात घ्याव्यात.

श्री.सुभाष देसाई : नोंद घेतली आहे.

-------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**रत्नागिरी जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागास**
**शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(6) * १५४७७ प्रा.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रत्नागिरी जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये २११६ आणि २९१५९ अशा दोन शिर्षकाखाली (हेडखाली) शासनाकडून निधी येतो या निधीतून शासकीय इमारतींची दुरुस्ती तर दुसऱ्या शिर्षकामधून (हेडमधून) निवासी इमारतींची दुरुस्ती करण्यात येते, परंतू येथे दोन वर्षात अपुरा निधी आल्याने ज्या ठेकेदारांनी कामे केली आहेत ते आता आर्थिकदृष्टया अडचणीत आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरील विकास कामासाठी निधी देण्याबाबत व कंत्राटदारांची बिले अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(2) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये आतापर्यंत रत्नागिरी जिल्हयाकरिता लेखाशीर्ष २०५९ कार्यालयीन इमारती करीता रु.६२५.०७ लक्ष व २२१६ निवासी इमारती करीता रु.१६३.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील मागासवर्गीय (नॉनक्रिमिलेअर) विद्यार्थ्यांना**
**शिष्यवृत्तीसाठी शिक्षण शुल्क सवलत देण्याबाबत**

***(७)*** * **१४८२४ *श्री.नरेंद्र* पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संदीप बाजोरिया, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** सन २०१४ मध्ये तत्कालीन मा. सामाजिक न्याय मंत्र्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शिक्षण शुल्क ***(फी)*** सवलत मिळावी म्हणून रु.२,६०७ कोटीची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, नॉन क्रिमिलेअर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी (स्कॉलरशिपसाठी) सदर सवलत दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शिक्षण शुल्क (स्कॉलरशिपसाठी फी) सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
***(४)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***श्री.दिलीप कांबळे,* श्री. राजकुमार बडोले *यांच्याकरिता* :** (१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी रुपये २६०७.०० कोटी इतकी मूळ तरतूद व पुरवणी मागणीद्वारे रुपये ४८५.०० कोटी अशी एकूण ३०९२.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती.
***(२)*** हे खरे नाही.
***(३)*** अनुसूचित जाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.०० लाख पर्यन्त आहे. त्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व ज्यांचे उत्पन्न रुपये २.०० लाखापेक्षा जास्त आहे. त्यांना मॅट्रिकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू आहे.

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये १.०० लाख पर्यंत आहे त्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व ज्यांचे उत्पन्न रुपये १.०० लाख ते रुपये ४.५० लाखापर्यंत आहे. त्यांना मॅट्रिकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू आहे.
***(४)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, भारतीय राज्य घटनेतील तरतुदीनुसार अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि शिक्षण शुल्कामध्ये सवलत देत असताना नॉन क्रिमिलेअरची अट ठेवण्याचे प्रयोजन काय आहे? ऑनलाईन शिष्यवृत्ती वाटपामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत आतापर्यंत कोणती कारवाई केली व संबंधित विद्यार्थ्यांना केव्हापर्यंत शिष्यवृत्ती मिळणार आहे?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी अगोदर देतो. ज्या विद्यार्थ्यांचे फॉर्म ऑनलाईन भरले गेले नाहीत त्या सर्व विद्यार्थ्यांचे फॉर्म पुन्हा मुदतवाढ देऊन स्वीकारण्याची कार्यवाही सुरु आहे. एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीचा फॉर्म स्वीकारण्यापासून वंचित राहणार नाही. नॉन क्रिमिलेअरच्या संदर्भात जे धोरण आहे त्यानुसार उत्तर दिले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.6

SGB/ KTG/ AKN/ 12:40

ता.प्र.क्र.14824....

श्री.दिलीप कांबळे.....

साधारणतः अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 2 लाख रूपयांपर्यंत आहे त्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व ज्यांच्या पालकांचे उत्पन्न 2 लाख रूपयांपेक्षा जास्त आहे त्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती दिली जाते. क्रिमिलेअरच्या संदर्भात स्पष्टपणे म्हटले आहे की, ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रूपयांपर्यंत आहे त्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती दिली जाते. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न 1 ते 4.5 लाख रूपयांपर्यंत आहे त्या विद्यार्थ्यांना फक्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक शुल्क दिले जाते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारने भटक्या, विमुक्त आणि इतर मागासवर्गासाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 6 लाख रूपये निश्चित केली आहे.

नंतर आर.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14824...

श्री.कपिल पाटील...

तसे महाराष्ट्रात लागू करण्यासंबंधात अनेकदा आश्वासन देऊनही त्यासंबंधीचा शासन निर्णय अद्यापि काढण्यात आलेला नाही. तो ताबडतोबीने कधी काढण्यात येणार आहे काय असा माझा पहिला प्रश्न आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती संदर्भात 2 लाख रूपया पर्यंतची मर्यादा आहे. भटके विमुक्त व अतिशय मागासलेले वर्ग आहेत त्यांच्यासाठी एक लाख रूपयांची मर्यादा आहे. ती मर्यादा दोन लाखा पर्यंत करण्यात येणार आहे काय असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, रूपये 6.00 लाखा पर्यंतची मर्यादा करण्यासंबंधातील प्रश्न लवकरात लवकर निकाली काढला जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, गेले चार अधिवेशन हेच उत्तर आम्ही शासनाकडून ऐकत आहोत.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात देखील लवकरात लवकर केले जाईल.

**सभापती :** हे दीर्घ मुदतीचे अधिवेशन आहे. या अधिवेशनात निर्णय होतो आहे किंवा कसे हे आपण पहावे.

श्री.दिलीप कांबळे : यासंबंधी शासन नक्की प्रयत्न करेल.

**सभापती :** ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.जानकर साहेब यांनी प्रश्न विचारावा. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपली बाजू घेतली आहे. त्यांनी मला मार्गदर्शन केले आहे. मला ते अमान्य करता येत नाही.

श्री.महोदवराव जानकर : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांचे अभिनंदन करतो. एस.सी., एस.टी.ला क्रीमिलेअरची अट नाही. तशी अट ओबीसीला देखील नसावी अशी घटनेमध्ये तरतूद असताना ओबीसीवरच हा जाणूनबुजून अन्याय का करण्यात येत आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14824...

**सभापती :** हा प्रश्न संवेदनशील असा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.महोदवराव जानकर यांनी नेहमीच्या स्टाईलने जोरात प्रश्न विचारावा.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी गंभीर नाही. त्यांनी प्रश्न ऐकून न ऐकल्यासारखे केले आहे.

**सभापती :** याचे उत्तर मी आधीच दिलेले आहे. आमच्या जिल्ह्यातील काळजी बीड जिल्ह्यातील सन्माननीय सदस्यांनी करू नये.

श्री.महोदवराव जानकर : सभापती महोदय, 9 तारखेला जंतरमंतर नवी दिल्ली येथे ओबीसींचे आंदोलन झाले. त्यावेळी 110 ओबीसीच्या खासदारांचे शिष्टमंडळ एकत्र आले होते. या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जी वेगवगळी सेक्रेटरीएट निर्माण करण्यात आलेली आहेत त्यातील 9 विभागांमध्ये शून्य भागिदारी असल्याचे पहायला मिळाले आहे. मलाही इंग्रजी चांगले समजते. मी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा अभ्यास केला आहे. त्यात ओबीसींना क्रीमिलेअर लावता कामा नये असे म्हटलेले आहे. हा मुद्दा डॉ.बाबासाहेबांनी राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये मांडला होता. परंतु, दुर्दैव असे की, मागील सर्व सरकारनी ओबीसींना क्रीमिलेअर लागू केले. माझी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे की, जसे एस.सी., एस.टी.ला क्रीमिलेअर नाही, तसे आपण ओबीसीसाठी स्पेशल काही करू शकता काय ?

श्री.दिलीप कांबळे : माननीय सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो धोरणात्मक आहे. या अधिवेशनातच आपल्या समवेत बैठक घेण्यात येईल आणि त्यावर निर्णय घेण्यात येईल.

**सभापती :** ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी प्रश्न विचारावा.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14824...

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, गेली चार अधिवेशन या सरकारची झाली. चारही अधिवेशनात हा प्रश्न होता. आम्ही लवकरात लवकर निर्णय घेऊ असे माननीय मंत्र्यांकडून उत्तर दिले जात आहे. हे शासन काय पाच वर्षे विचारच करीत राहणार आहे काय ? यासंबंधी शासन निर्णय घेणार आहे की नाही ? आताच आपण सूचित केले की, हे अधिवेशन जास्त कालावधीचे आहे. अधिवेशन संपण्याच्या आधी साडेचार लाखा रूपयावरून सहा लाख रूपयापर्यंतची क्रीमिलेअरची मर्यादा वाढूवन तसा शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे काय ?

**सभापती :** माझ्या सोबत बैठक घेण्यात येईल असे माननीय मंत्री महोदय म्हणाले आहेत.

श्री.राजकुमार बडोले : माननीय सभापती महोदय, क्रीमिलेअरची मर्यादा साडेचार लाखावरून सहा लाख रूपयांपर्यंत करण्याच्या संदर्भात येथे मागणी करण्यात आली आहे. असे केल्यास साधारणतः 82 कोटी रूपये इतका आर्थिक भार राज्यावर पडणार आहे. यासंबंधीचा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळापुढे पाठविलेला आहे. साधारणतः तीन महिन्यांच्या आत यासंबंधीचा निर्णय होणे अपेक्षित आहे.

**सभापती :** ठीक आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अंधत्व, अपंगत्व, कर्णबधिरता आणि स्वमग्नता हे आजार काही मुलांना जन्मापासून असतात. अशा दबलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळांची सुविधा देण्यात येते. आपल्या राज्यामध्ये या विशेष शाळांची आजची अवस्था अत्यंत गंभीर आहे हे सन्माननीय मंत्री महोदयांना अवगत आहे. अनेक शाळांमध्ये सुविधा नसल्यामुळे त्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मी मंत्री महोदयांना असे विचारू इच्छितो की, स्वमग्नता हा विषय आजपर्यंत त्यांच्या खात्याने समर्थपणे हाताळलेलाच नाही. राज्यामध्ये स्वमग्नता असलेल्या शाळांना अजूनही शासनाकडून मान्यता मिळत नाही, अनुदानही मिळत नाही. तेव्हा अशी जी वंचित मुले आहेत त्यांच्यासाठी लकरात लवकर एक विशेष योजना करून त्यांचे सगळे प्रश्न शासन मार्गी लावणार आहे काय ?

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14824...

श्री.दिलीप कांबळे: माननीय सभापती महोदय, या संदर्भातील तारांकित प्रश्न प्रश्न पुढे आहे.

**सभापती :** ठीक आहे. त्या प्रश्नाच्या वेळी आपण यास उत्तर द्यावे. आता सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी प्रश्न उपस्थित करावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात देखील हा प्रश्न आला होता. शासनाने नॉन क्रीमिलेअरची मर्यादा सहा लाख केली आहे. परंतु, त्यात त्यांनी दोन भाग केले आहेत. त्यांनी प्रतिपूर्तीाठी साडेचारी लाख रूपये, आणि प्रवेशासाठी सहा लाख रूपये अशी मर्यादा ठेवलेली आहे. आमची मागणी आहे की, प्रवेशासाठी सुद्धा सहा लाख व प्रतिपूर्तीसाठी देखील सहा लाख असे समसमान वाटप केंद्राप्रमाणे असावे. मागच्या अधिवेशनात सन्माननीय मंत्र्यांनी मला उत्तर दिले होते की, मोते सर हा विषय पुढच्या अधिवेशनात आपणाला उपस्थित करावा लागणार नाही. हे सर्व सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. म्हणून माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा प्रश्न असल्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी तातडीने निर्णय घेऊन तो सभागृहाला सांगण्यात येणार आहे काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी तीन महिन्यांची मुदत यापूर्वीच झालेली केलेली आहे. त्यामुळे येत्या तीन महिन्यांमध्ये हा प्रश्न निकालात काढण्यात येईल.

......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील आदिवासी मुलांना दिल्या जाणाऱ्या स्वेटर वाटपामध्ये दिरंगाई होत असल्याबाबत**

* **१४७०१ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.संजय दत्त, ॲड.अनिल परब, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राजेंद्र जैन, श्री.रामराव वडकुते, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.महादेव जानकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कडाक्याच्या थंडीपासून स्वतःचा बचाव करता यावा यासाठी आदिवासी विकास विभागात विद्यार्थ्यांना स्वेटर पुरविण्याबाबतची निविदा माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, जानेवारी, २०१६ महिना संपत आला तरी आश्रमशाळेतील लाखो आदिवासी विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, राज्यातील आदिवासी मुलांना मिळणारे स्वेटर राज्य शासन आणि ठेकेदारांमधील अंतर्गत वादामुळे रखडले असल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
*(४)* असल्यास, दप्तर दिरंगाईमुळे थंडीच्या काळात स्वेटर न मिळाल्याने विद्यार्थी स्वेटर पासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
*(५)* असल्यास, दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना वेळेवर स्वेटर शासनाने कोणत्या उपाययोजना करणार आहे,
*(६)* असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांवरर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
*(७)* नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
*(२)* होय, हे खरे आहे.
*(३), (४)* व (५) सन २०१५-२०१६ मध्ये स्वेटर खरेदी प्रकरणात दराबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तथापि शासन व ठेकेदारामध्ये अंतर्गत वाद उद्‌भवलेला नाही.
शासन निर्णय दिनांक ४/३/२०१४ नुसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर तीन वर्षातून एकदा वूलन स्वेटर देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ मध्ये स्वेटर पुरविण्यात आलेले आहेत.
सन २०१५-२०१६ या शैक्षणिक सत्रात ई-निविदेद्वारे वुलन स्वेटर खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदेतील दराबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे व तोपर्यंत हिवाळा संपला असल्याने खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.
सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वुलन स्वेटर वेळेवर पुरविणेबाबत नियोजन करण्यात येत आहे.
*(६)* व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14701....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, शासन निर्णय दिनांक 4.3.2014 नुसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर तीन वर्षातून एकदा वूलन स्वेटर देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन 2012-13 मध्ये स्वेटर पुरविण्यात आलेले आहेत. आता आपण सन 2016 मध्ये आहोत. विद्यमान वर्षात हिवाळयापूर्वी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटर देण्यात येणार आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभ्‍ापती महोदय, चालू शैक्षणिक वर्षामध्ये माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी सांगितल्याप्रमाणे स्वेटर देण्याची व्यवस्था सुरू केलेली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्या बरोबरच त्यांना स्वेटर देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये स्वेटर खरेदीची निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे असे नमूद करण्यात आले आहे. ही पक्रिया कोणाच्या तक्रारीवरून रद्द करण्यात आली आहे व त्या तक्रारीचे स्वरूप काय आहे ? उत्तरामध्ये दराबाबत तक्रारी असल्याचे नमूद केलेले आहे. असे असेल तर निविदा प्रक्रिया रद्द करणे योग्य नाही. तीन वर्षापासून स्वेटर देण्यात आलेले नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी उपस्थित केलेला आहे. तीन वर्ष आदिवासी मुलांना स्वेटर देण्यात आलेले नाही. दरासंबंधी तक्रार होती तर त्यासंबंधी निगोसिएशन का करण्यात आले नाही, तशी प्रक्रिया का पूर्ण करण्यात आली नाही असे दोन प्रश्न आहेत.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, पूर्वीची पद्धत आणि आताच्या सरकारची पद्धत यामध्ये थोडा फरक आहे. पूर्वी आपण दर करारानुसार स्वेटर खरेदी करीत होतो. हे सरकार आल्यानंतर आपण ई-निविदेमार्फत स्वेटर खरेदी करीत आहोत. त्यामुळे मागच्या आणि आजच्या दरामध्ये खूप मोठी तफावत दिसत होती ही गोष्टी खरी आहे. मागच्या आणि आताच्या स्वेटरमध्ये फरक होता. आता आपण प्युअर वूलनचे स्वेटर देणार आहोत. त्यामुळे रेट वाढलेले होते.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 14701.....

श्री.विष्णू सवरा...

आपण वुलनचे स्वेटर देणार असल्यामुळे त्याचे रेट वाढले ही गोष्ट खरी आहे. स्वेटरच्या दरासंबंधी जास्त तक्रारी आल्या. त्या तक्रारी मी पटलावर ठेऊ शकतो. हिवाळा सीझन संपत आला होता आणि हिवाळ्यात द्यावयाचे स्वेटर उन्हाळ्यामध्ये दिले म्हणून आमच्यावर टीका झाली असती म्हणून आम्ही ती निविदा रद्द केली.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आपण विद्यार्थ्यांना त्या वर्षी स्वेटर दिले नाही. विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप होताना हिवाळा हंगाम संपत आलेला असतो. तेव्हा पावसाळ्यामध्ये स्वेटरची खरेदी करुन हिवाळा महिना सुरु होण्याच्या अगोदर विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप करण्यात येईल काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आम्ही ती निविदा रद्द केलेली आहे. या शैक्षणिक वर्षात हिवाळा सुरु होण्याच्या आत विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटपाची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.सुनील दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दिनांक 11 जानेवारी 2016 रोजी एक स्टेटमेंट केले होते ते मी वाचून दाखवितो. "आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना हिवाळ्यात स्वेटर देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. परंतु काही ठेकेदारांनी आक्षेप घेतल्यामुळे ही प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. मात्र ती प्रक्रिया पुन्हा पूर्ण करुन विद्यार्थ्यांना स्वेटर दिले जातील." माझा प्रश्न आहे की, माननीय मंत्र्यांना यामध्ये कोणती अडचण आहे याची माहिती होती. आपणास विद्यार्थ्यांना स्वेटर द्यायचे आहेत आणि तो नियोजनाचा भाग आहे, त्यामध्ये विलंब होण्याची कारणे काय आहेत, त्यांनी योग्यवेळी पाऊल का उचलले नाही ? विद्यार्थ्यांना विलंबाने स्वेटर देण्याबाबत जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आपण विद्यार्थ्यांना दर तीन वर्षांनी स्वेटर देतो. यावर्षी विद्यार्थ्यांना वेळेवर आणि हंगामामध्ये स्वेटर देऊ शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. परंतु त्यामध्ये वेळ गेला ही गोष्ट खरी आहे. या वर्षी विद्यार्थ्यांना वेळेवर स्वेटर मिळतील. सन 2012-2013 मध्ये विद्यार्थ्यांना स्वेटर दिलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2..

ता.प्र.क्र. 14701.....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री उत्तर देताना सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना दर तीन वर्षानी स्वेटर पुरविण्यात येतात. सन 2012-2013 मध्ये स्वेटर पुरविण्यात आले. आता सन 2015-2016 च्या आर्थिक वर्षातील ऑक्टोबर महिन्यात स्वेटर द्यावे लागणार हे निश्चित होते. कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आपण ई-निविदा काढली. आपण सांगितले की, पूर्वी दरकरार प्रमाणे खरेदी करण्यात येत होती. सुरुवातीच्या काळात आपल्याकडून देखील दर करारानुसार खरेदी झाली. आपण दर करारानुसार चिक्कीची खरेदी केली. त्याबाबत खूप तक्रारी आल्यानंतर दरकराराच्या बाबतीत वेगळे निर्णय घेण्यात आले. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना वुलनचे स्वेटर देण्यात येणार आहेत. वुलनची क्वॉलिटी काय आणि त्याचा दर काय या संदर्भातील अटी व शर्ती ई-निविदेमध्ये येणे अपेक्षित आहे. मी या ठिकाणी पुन्हा एकदा वक्तव्य करतो की, माननीय मंत्र्यांनी येथे दिशाभूल केलेली आहे. दर कमी आले अशी तक्रार दुसऱ्या ठेकेदाराने केली म्हणून आपण ती प्रक्रिया रद्द करीत आहात. हा निर्णय जाणीवपूर्वक ठेकेदाराच्या हिताचे रक्षण करणारा आहे. माझे प्रश्न आहेत की, निविदा कोणत्या तारखेला काढण्यात आली, त्या निविदेमध्ये अटी आणि शर्ती कोणत्या होत्या, निविदा रद्द करण्याचा निर्णय कोणत्या महिन्यात घेण्यात आला ? आयबीएन लोकमत, अेबीपी माझा या चॅनेल्सवर बातमती दाखविण्यात आली होती की, नाशिकमध्ये आश्रमशाळेतील विद्यार्थी थंडीत कुडकडत असताना माननीय मंत्री म्हणत होते की, थ्ंडीच पडली नाही. त्या वर्षी चार ते पाच डिग्रीपर्यंत तापमान गेले होते. मी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याची उत्तरे मंत्री महोदय देतील काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना मी सांगू इच्छितो की, मी आश्रमशाळेतून शिक्षण घेतलेले आहे त्यामुळे मी असे काही बोलेन हे मला शोभणारे आहे काय ? कोणी काही तरी सांगितले असेल, त्याला माझी हरकत नाही. विद्यार्थ्यांना थंडीच्या दिवसात स्वेटर मिळाले पाहिजेत. आम्ही निविदा प्रोसेस पूर्ण केलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे स्पेसिफीक ॲलिगेशन आहे की, ज्या कुणाला हे टेंडर मिळाले नाही त्याांनी तक्रार केल्यामुळे ते टेंडर रद्द झाले किंवा प्रलंबित राहिले याची आपण वस्तुस्थिती सांगितली तर सदनाचे समाधान होईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 14701.....

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, अशी वस्तुस्थिती नाही. कोणत्या तरी कंपनीचे हितसंबंध जपावे असे काही नाही. आपली पारदर्शक पद्धती आहे आणि त्याप्रमाणे काम झाले पाहिजे. ही प्रक्रिया पूर्ण होण्यास उशीर झाला. दिनांक 16.12015 रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, तीन वर्षानी विद्यार्थ्यांना स्वेटर द्यावे लागणार आहे हे यंत्रणेला माहीत होते. 2016 च्या हिवाळयापूर्वी विद्यार्थ्यांना स्वेटर देणे आवश्यक होते. माझा स्पेसिफीक प्रश्न होता की, निविदा केव्हा काढण्यात आली ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, दिनांक 16.10.2015 रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये का उशीर झाला त्याचे देखील कारण सांगतो. दिनांक 24.6.2015 रोजी आयुक्तांनी विद्यार्थ्यांना पावसाळ्यात रेनकोट पुरविण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला. आपण रेनकोट देईपर्यंत पावसाळा संपत आहे हे लक्षात आले..

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

म्हणून रेनकोट ऐवजी स्वेटर खरेदी करण्यास मंजुरी दिली. दिनांक 14.9.2015 रोजी आयुक्तांनी स्वेटर खरेदीची परवानगी मागितली. त्यास दिनांक 21.9.2015 रोजी शासनाने परवानगी दिली. दिनांक 8.10.2015 रोजी समितीची बैठक झाली. त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी 100 टक्के वुलनचे स्वेटर खरेदी करण्याचे ठरविण्यात आले.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांना तारखा पाहिजेत ती माहिती पटलावर ठेवण्यात यावी.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, ठीक आहे.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, विधिमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांचा दौरा करीत असताना एक बाब लक्षात आली की, जी प्रस्थापित मंडळी आहेत त्यांनाच कामाचा ठेका दिला जातो. त्यांचे आणि अधिकाऱ्यांचे लागेबांधे असतात, ते त्यांच्या सोयीनुसार पुरवठा करतात. मग तो धान्याचा पुरवठा असेल किंवा स्वेटरचा पुरवठा असेल. या ठिकाणी विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला आहे, त्यांना हिवाळ्यामध्ये थंडीत कुडकुडत रहावे लागले आहे. तेव्हा याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14701....

श्री.विष्णु सवरा : सभापती महोदय, पूर्वी काय होत होते हे आपल्याला माहीत आहे. पूर्वी दर करारानुसार खरेदी होत होती. आमचे सरकार आल्यानंतर या खरेदी प्रक्रियेच्या बाबतीत नवीन आणि पारदर्शक पध्दत आणलेली आहे. विद्यार्थ्यांना हे साहित्य वेळेवर मिळण्यासाठी ही खरेदी केली पाहिजे. परंतु यामध्ये अनेक अडचणी येतात. त्यामुळे या अडचणींवर मात करुन खरेदी करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. जेणेकरुन आदिवासी विद्यार्थ्यांना सर्व साहित्य मिळाले पाहिजे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना आपल्या विभागाच्या सावळागोंधळाबाबत सांगितले. त्यांनी सांगितले की, सुरुवातीला रेनकोट खरेदीचा प्रस्ताव आला. परंतु त्या खरेदी प्रक्रियेस उशीर झाल्यामुळे तो रद्द करण्यात आला. त्यानंतर श्वेटर खरेदीचा प्रस्ताव आला आणि त्या प्रस्तावाला ऑक्टोबर महिन्यात मंजुरी दिली. महोदय, आपल्याकडे 14 जानेवारी म्हणजेच मकर संक्रांतीनंतर उन्हाळा पडण्यास सुरुवात होते. असे असताना आदिवासी विकास विभागाकडून 4 जानेवारी रोजी श्वेटर खरेदीची ऑर्डर दिली गेली. माननीय मंत्री वारंवार सांगत आहेत की, आमच्या सरकारने धोरण बदलले आहे. मी सांगू इच्छितो की, तुम्ही स्वत:हून नव्हे तर आम्ही बोंब मारल्यामुळे धोरण बदलले. सभापती महोदय, मला एवढेच विचारावयाचे आहे की, ज्या पुरवठादाराला श्वेटरची ऑर्डर मिळाली त्याचे दर कमी होते की जास्त होते आणि कोणत्या कारणांमुळे त्याचे टेंडर रद्द करण्यात आले ? महोदय, आदिवासी विकास विभागाने वह्या खरेदी, रेनकोट खरेदी किंवा श्वेटर खरेदीचे टेंडर काढले की ते कोणत्या ना कोणत्या कारणामुळे रद्द होते. आदिवासी विकास विभागाचे प्रत्येक टेंडर रद्द होत असेल तर कशासाठी टेंडर काढले जाते ? आदिवासी विकास विभागाने काढलेली प्रत्येक निविदा रद्द होत असेल आणि आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना थंडीत कुडकुडत बसावे लागत असेल तर आपण ही संपूर्ण प्रक्रिया कशासाठी करता, या सर्व प्रकाराला कोण जबाबदार आहे, आदिवासी विकास विभागात नेमके काय सुरु आहे ? सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या पुरवठादाराला श्वेटरचा पुरवठा करण्याची ऑर्डर मिळाली त्यांचे दर काय होते, त्यांचे दर इतरांच्या तुलनेत कमी असतील तर त्यांची ऑर्डर रद्द का करण्यात आली ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14701....

**सभापती** : मंत्री महोदय, आपल्याकडे ही माहिती आता उपलब्ध आहे काय ?

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विष्णु सवरा : सभापती महोदय, माझ्याकडे माहिती उपलब्ध आहे. श्वेटर खरेदीप्रकरणी ज्या निविदा मागविण्यात आल्या होत्या त्या निविदाकाराच्या दरांची माहिती सुध्दा माझ्याकडे आहे. या प्रकरणी प्रेस्टीज गारमेन्ट, श्री जगदंबा रेडीमेड ड्रेसेस आणि महालक्ष्मी ड्रेसेस अँड टेलरींग फर्म अशा एकूण तीन लोकांच्या निविदा मंजूर केल्या होत्या. यापैकी प्रेस्टीज गारमेन्ट या निविदाकाराचे दर सर्वात कमी होते. ही सर्व प्रक्रिया अंतिम करण्यापूर्वी ज्या तक्रारी आल्या होत्या त्यांची दखल घेतली होती. हे खरे आहे की, पूर्वी खरेदी केलेल्या श्वेटरचे दर कमी होते. परंतु जे श्वेटर्स खरेदी करणार होतो ते प्युअर वुलनचे असल्यामुळे त्यांचे दर जास्त होते. हे दर पूर्वीच्या दराच्या दुप्पट असल्यामुळे सर्व बाबींची दखल घेऊन पुरवठादाराला दिलेली ऑर्डर रद्द केली.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, इयत्ता पहिली ते बारावीतील विद्यार्थ्यांना श्वेटरचा पुरवठा करण्यासाठी प्रेस्टीज गारमेन्ट या निविदाकाराने सर्वात कमी म्हणजे 1125/- रुपये इतका दर नमूद केला होता. तसेच श्री जगदंबा रेडीमेड ड्रेसेस या निविदाकारने 1152/- रुपये आणि महालक्ष्मी ड्रेसेस अँड टेलरींग फर्म या निविदाकाराने 1252/- रुपये इतका दर नमूद केला होता. या तीन निविदाकारांपैकी प्रेस्टीज गारमेन्ट यांचा दर सर्वात न्यूनतम असल्यामळे त्यांना श्वेटर पुरविण्याचा आदेश देण्यात आला. त्यांना आदेश दिल्यानंतर काही तक्रारी आल्यामुळे त्यांना दिलेला आदेश रद्द करण्यात आल्याचे सांगितले जाते. परंतु नेमक्या कोणत्या तक्रारी आल्या या बाबत मात्र कसल्याही प्रकारे सांगितले जात नाही. पुरवठादाराची ऑर्डर का रद्द झाली याच्याशी आमचे देणेघेणे नाही. परंतु सरकारच्या सावळागोंधळामुळे आदिवासी विद्यार्थी थंडीमध्ये कुडकुडत होते हे स्पष्ट झाले. माननीय मंत्री, आपण आदिवासी विकास विभागाचा कारभार सांभाळत असताना सुध्दा आदिवासी विद्यार्थी तुमच्या कार्यकाळात सुखी नाहीत हे स्पष्ट होते. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, आपण नवीन निविदा कधी काढणार आहात आणि नवीन निविदा काढल्यानंतर आदिवासी विद्यार्थ्यांना श्वेटर प्रत्यक्षात कधीपर्यंत मिळणार आहेत ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14701....

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 1-2 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.विष्णु सवरा : सभापती महोदय, श्वेटरचे दर मागच्या खरेदीच्या तुलनेत फारच जास्त आले होते. शिवाय या संदर्भात तक्रारी सुध्दा आल्या होत्या. त्यामध्ये कागदपत्रे दिलेली असताना तांत्रिक तपासणीत अपात्र ठरविणे, श्वेटरच्या स्पेसिफिकेशनमध्ये आयएसआय कोड दिलेला नसणे, श्वेटर ट्रेडमार्क रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ऑनलाईन टाकलेले नसणे, राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली नसणे, न्यूनतम पुरवठादाराबरोबर वाटाघाटी न करणे, अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सन 2012-13 मध्ये जे श्वेटर पुरविले होते त्या तुलनेत हे दर फारच जास्त आहेत, अशा प्रकारच्या तक्रारी आल्या होत्या.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या प्रकरणी तक्रारी आल्या होत्या असे माननीय मंत्री सांगत असले तरी दिनांक 4 जानेवारी, 2016 रोजी प्रेस्टीज गारमेन्ट कंपनीला श्वेटरची ऑर्डर देण्यात आली. प्रेस्टीज गारमेन्ट या निविदाकाराने नमूद केलेला दर न्यूनतम होता. त्यानुसार प्रेस्टीज गारमेन्ट यांना देण्यात आलेल्या ऑर्डरमध्ये त्यांनी जानेवारी-2016 अखेरपर्यंत श्वेटरचा पुरवठा करावा आणि या बाबतीत आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी विहित गुणवत्तेच्या श्वेटरचा पुरवठा होण्यासाठी पाठपुरावा करावा, असे नमूद करण्यात आले होते. याचा अर्थ श्वेटरचा पुरवठा करण्यासाठी ऑर्डर देण्यात आलेली आहे. परंतु माननीय मंत्री केवळ श्वेटरच्या दर्जाबाबत सांगत आहेत. तक्रारी कधी आल्या, टेंडर कधी काढले, टेंडर कोणी काढले, तक्रारी कोणी केल्या आणि पुरवठा आदेश रद्द कोणी केले हे सांगितले जात नाही. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय ? कारण जोपर्यंत एखाद्यावर कारवाई करीत नाही तोपर्यंत असे करण्याची दुसऱ्याची हिंमत होणार नाही.

श्री.विष्णु सवरा : सभापती महोदय, या संदर्भात पूर्णपणे तपासणी केली जाईल.

**सभापती** : मंत्री महोदय, मला वाटते आपला जो काही अहवाल असेल तो आपण पटलावर ठेवावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14701....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हिवाळा संपला असल्यामुळे श्वेटर खरेदीची प्रक्रिया रद्द करण्यात आली. तसेच पावसाळा सुरु होण्यापूर्वी रेनकोट खरेदी रद्द करण्यात आली. प्रशासनातील अधिकारी आणि पुरवठादार यांचे साटेलोटे असते. त्यांना ठरलेले कमीशन मिळाले नाही तर अशा गोष्टी घडतात. वास्तविक पाहता पावसाळ्यात सुध्दा थंडी पडत असते. त्यामुळे मी विचारु इच्छिते की, श्वेटर खरेदीची निविदा लगेच काढणार काय आणि प्रशासन व पुरवठादारांच्या कमीशन आणि टक्केवारीवर शासन नियंत्रण आणणार काय ?

**सभापती** : मंत्री महोदय, या विषयी आपण कार्यवाही करावी.

श्री.विष्णु सवरा : महोदय, या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प.नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज गुरुवार दिनांक 17 मार्च, 2016 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण यांनी सकाळी 9.56 वाजता "बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस नाईक श्री.संतोष चाटे यांनी वरिष्ठ पोलिसांच्या दबावतंत्राला बळी पडून आत्महत्या करणे, आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत वरिष्ठ पोलीस अधिकारी आपल्यावर दबाव टाकत असल्याचे नमूद करणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. परंतु उक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

-----

यु....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये सामान्य प्रशासन विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत तसेच योजनेत्तर (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2015-2016" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2015-2016" सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 2011 च्या नियम 7 अन्वये वार्षिक योजना 2016-2017 मधील प्रदेशनिहाय नियत वाटपाबाबतचे मा. राज्यपाल यांचे दिनांक 11 मार्च, 2016 रोजीचे निदेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : मा. राज्यपाल यांचे दिनांक 11 मार्च, 2016 रोजीचे निदेश सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये नियोजन विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचा योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षांचा योजनांतर्गत (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. प्रवीण पोटे-पाटील (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्री) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : आता मला आजच्या दिवसाचा कार्यक्रम जाहीर करायचा आहे. आज आपल्याला कोणत्याही परिस्थितीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर घ्यावे लागणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडून मला अनौपचारिकरित्या कळविण्यात आले आहे की, दुपारी दोन ते अडीच वाजता ते उत्तरासाठी सभागृहात उपस्थित राहणार आहेत. विधानसभेत उत्तर सुरू झाले असावे. आज आपण फक्त नियम 93 अन्वयेच्या सूचना वाचणार आहोत. निवेदने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेखाच्या सूचना पुढे ढकलणार आहोत. पुरवणी मागण्या घेणार आहोत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरविले आहे की, या आठवड्यात एक तरी विधेयक झाले पाहिजे. आज 2 विधेयक संमत करावीत अशी माझी विनंती आहे. माझी अशीही विनंती आहे की, पुरवणी मागण्यांच्या पूर्वीच विधेयके घ्यावीत, जेणेकरून नंतर सलग काम करता येईल.

**सभापती** : मला वेळ ॲडस्ट करण्यास इलॅस्टिसिटी ठेवावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, विधेयक घ्यावे आणि नंतर पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करू.

**सभापती** : ठीक आहे. तसे करण्यात येईल.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सरकारची विधेयक काढू, आम्ही त्यास नाही असे म्हणत नाही. पण नियम 260 अन्वयेचा विरोधी पक्षाचा प्रस्ताव आहे. किमान 1 सन्माननीय सदस्य तरी चर्चेच्या वेळी ऑन लेग राहिले पाहिजेत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आपण त्या अगोदर जे कायदेशीर आहे ते पाहू. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा घेऊ. वेळ मिळाला तर आपल्या म्हणण्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी ऑन लेग ठेवू. आता वेगळी चर्चा नको.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वयेच्या सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 17 मार्च, 2016 रोजी नियम 93 अन्वयेच्या ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत, त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : दिनांक 17 मार्च, 2016 च्या सूचना

सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "मौजे पिंपळनेर, ता.जि.बीड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामासाठी रू103 लक्षचा निधी मंजूर करूनही विहित मुदतीत कंत्राटदाराने काम पूर्ण न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी "मुंबई महापालिकेच्या केईएम, नायर व सायन रूग्णालयातील डॉक्टरांवर रूग्णांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नातेवाईकांकडून वारंवार हल्ले होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी "परेल (मुंबई) येथील केईएम रूग्णालयात दिनांक 16.03.2016 रोजी शौचालयात गेलेल्या एका रूग्णाच्या नातेवाईकाचा सदर रूग्णालयातील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. धनंजय मुंडे, सतीश चव्हाण यांनी "अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांचा 200 क्विंटल तांदूळ वाहतूकदार कंत्राटदाराने काळ्या बाजारात विकल्याचे सिध्द होऊनही वाहतूक कंत्राटदाराच्या अपिलाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी मार्च, 2016 मध्ये स्थगिती देणे याप्रमाणे काळा बाजार करणाऱ्यांना सरकार पाठीशी घालत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांनी "राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा आढावा घेण्यासाठी दिनांक 04 जुलै, 2015 रोजी केलेल्या सर्व्हेमध्ये शाळाबाह्य असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 55 हजार असल्याचे निदर्शनास येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

**सभापती** : मला वाटते की, आता सदनाने सूचित केल्याप्रमाणे अगोदर शासकीय विधेयके घेऊ.

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. VI OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

डॉ. रणजित पाटील (विधि आणि न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 12 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव यांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचे प्रस्ताव मतास टाकले जातील व ते असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरुवात करावी.

....V

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केलेले सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 6-महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने आणलेल्या या विधेयकाचे आम्ही समर्थन करीत आहोत, विरोध करणार नाही. परंतु, सार्वजनिक विश्वस्त संस्थांमध्ये काय गडबडी चालल्या आहेत, याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. राज्यातील शहरांमध्ये आणि आजुबाजुच्या परिसरात ट्रस्टच्या मोठ्या प्रमाणावर जागा असून शासनाचे त्यावर नियंत्रण नाही. ज्या विश्वस्त संस्था कार्यरत नाहीत, त्यांचे काय करावयाचे आणि ज्या विश्वस्त संस्था म्हणून नोंदणीकृत आहेत त्यांना कसे कार्यरत करावयाचे, असा साधारण विषय या विधेयकाच्या प्रस्तावामध्ये आहे. या निमित्ताने मी शासनाला सांगू इच्छितो की, विश्वस्त संस्थांच्या जागा, त्यांचा निधी या संदर्भात सुध्दा एक विधेयक या सभागृहात शासनाने आणावे. माझ्या मते त्यावर शासनाचे वर्चस्व असले पाहिजे. अन्यथा, आपण धर्मादाय आयुक्त ही संस्था न्यायिक पध्दतीने सार्वजनिक विश्वस्त संस्थांसाठी निर्माण केली आहे. परंतु, या संस्थेमध्ये अनेक प्रकारच्या घटना घडत आहेत. तालुका, जिल्हा कार्यालयांमध्ये या घटना घडत आहेत आणि राज्य पातळीवर तर मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मी मांडला आहे. तथापि, आमच्या सूचनांचा जरूर विचार केला जाईल, असे आश्वासन माननीय विधी व न्याय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील व माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीश बापट यांनी दिलेले आहे. त्यामुळे सदर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मी मागे घेत आहे.

सभापती महोदय, विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय ?

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ला श्री.शरद रणपिसे, वि.प.स.यांनी सुधारणा सुचविली आहे, त्यांनी ती मांडावी.

(सुधारणा मांडण्यात आली नाही.)

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 6 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 6 संमत झाले आहे.

-----------

..3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.III OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील ( सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केलेले सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 3-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.चंद्रकांत पाटील ( सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केलेले सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 3-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचा आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केलेले सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 3-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 12 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, शरद रणपिसे यांचा आहे, त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

...4....

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केलेले सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 3-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल. तो असंमत झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केलेले सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 3-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सदरचे विधेयक मी पूर्णपणे वाचले आहे आणि सदर विधेयक विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्तावही दिलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 12 सदस्यांच्या प्रवर समितीकडे सदरचे विधेयक विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव दिलेला आहे. या प्रवर समितीमध्ये 12 सदस्य असले तरी माझी काही हरकत नाही.

सभापती महोदय, मला या निमित्ताने एवढेच अवगत करावयाचे आहे की, आपण ज्यावेळी देशाचा विचार करतो त्यावेळी महाराष्ट्र राज्य सहकाराच्या बाबतीत अग्रेसर राज्य आहे, असे चित्र देशामध्ये आहे. या सहकाराचा पाया कै.धनंजयराव गाडगीळ यांनी महाराष्ट्रामध्ये रोवला. स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील यासारखे अनेक मान्यवर सहकारातून समृध्दीकडे या भावनेतूनच पुढे गेले आहेत. कदाचित या क्षेत्रामध्ये काही अपप्रवृत्ती असू शकतात. पण म्हणून आज आपण जे ध्येय घेऊन पुढे जात आहोत ते ध्येयच चुकीचे आहे, असा गैरसमज करुन घेणे बरोबर ठरणार नाही. काही चुकत असेल तर निश्चितपणे ते दुरूस्त केले पाहिजे. याच सहकाराने महाराष्ट्राची प्रगती केलेली आहे, हेही आपल्याला नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, पूर्वी सर्वच साखर कारखाने हे खाजगी व्यक्तींचे होते. खाजगी समुह या क्षेत्रात होते. सहकारी साखर कारखान्यांची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रात अनेक सुधारणा झाल्या आणि या सहकार क्षेत्रात काम करणारा एक चांगला वर्ग प्रत्येक गावात, तालुक्यात निर्माण झाला. या राज्यात नंतरच्या कालावधीत सहकारी सुत गिरण्या काढल्या गेल्या. ठीक आहे. काही कारणांमुळे आपल्याला काही लोकांना सामावून घेता आले नाही. पण सहकारी सुत गिरण्यांविषयी आणि एकूणच सहकाराविषयी कै.यशवंतराव मोहिते यांचे भाषण आपण ऐकले असेल तर आपल्याला कळेल की, हे भाषण म्हणजे सहकाराचा एक उत्तम नमुना आहे. सुत गिरण्या काढण्यामागे त्यांची काय कल्पना होती ?

यानंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे........

मी माननीय श्री.चंद्रकांत पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, पूर्वी शेतकरी कापूस पिकवित होते. त्यांच्या शेतातील कापूस खरेदी करणारी एक कंपनी, त्याच्या गाठी बांधणारी दुसरी कंपनी, गाठीचे सूत तयार करणारी तिसरी कंपनी आणि सुताचा धागा तयार करणारी चौथी कंपनी होती. या कंपन्या कोणाच्या असायच्या ? मफतलाल किंवा ठाकरसी यांच्या या कंपन्या होत्या. म्हणजे कापसाचे पीक आले नाही तरी ते लोक शेतातील कापूस खरेदी करीत होते. मग संपूर्ण मक्तेदारी त्यांची व्हायची. मिल देखील त्यांच्याच होत्या. घाऊक व्यापारी आणि किरकोळ व्यापारी देखील त्यांचेच होते. म्हणून कै.यशवंतराव मोहिते साहेबांनी मुद्दा मांडला की, शेतामध्ये कापसाचे पीक लावल्यापासून त्याचे कापड तयार करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेत शेतकरी भागीदार असला पाहिजे. हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेऊन कै.यशवंतराव मोहिते साहेबांनी सहकारामध्ये, सूत गिरण्यांमध्ये खूप महत्वाचे योगदान दिलेले आहे. मी जास्त वेळ बोलणार नाही. दादा तुम्ही पश्चिम महाराष्ट्रातील आहात. तुम्ही कै.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जिल्ह्याच्या शेजारचे आहात. कै.यशवंतराव मोहिते साहेबांचा इतिहास तुम्हाला माहीत आहे. दादांचा इतिहास तुम्हाला माहीत आहे. मी सभगहाला सांगू इच्छितो की, एकेकाळी स्व.वसंतदादा पाटील 20 सहकारी साखर कारखान्यांचे चेअरमन होते. महाराष्ट्रातील जनतेचा त्यांच्यावर विश्वास होता. दादा सहकाराचे महागुरु आहेत. आपण कोणत्याही जिल्ह्यात, तालुक्यात गेलो तरी दादा आमच्या कारखान्याचे चेअरमन झाले पाहिजेत, अशी लोकांची भूमिका होती. ही भूमिका का होती, तर ही माणसे कोणत्याही प्रकारचा अयोग्य कारभार करणार नाहीत आणि यांच्यामुळे आमचा जिल्हा, तालुका सुधारेल, अशी लोकांची भूमिका होती. म्हणून दादा 20 साखर कारखान्यांचे चेअरमन झाले. त्यावेळी विरोधी पक्षाने मागणी केली की, सहकारामध्ये असे असता कामा नये. दादांनी एका मिनिटात राजीनामा दिला. त्यावेळी टिळक भवनात प्रदेश काँग्रेसची बैठक झाली. मला माहिती आहे की, माननीय सभापती त्यावेळी होते. त्यावेळी ठराव पारीत झाला आणि एकापेक्षा अधिक कारखान्याचे चेअरमन राहता येणार नाही, अशा प्रकारची सुधारणा करण्यात आली. म्हणजे त्यांचे एवढे योगदान आहे. म्हणून सहकाराचा विचार करताना ही सहकारी चळवळ मोडीत काढू नका.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे........

सहकाराचा उद्देश अतिशय चांगला आहे. तो शेतकऱ्यांच्या, ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या हिताचा आहे. दादा दुधाचे काय झाले ? पूर्वी सहकार क्षेत्रातून आरेचे दूर वितरित होत होते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी काल सांगितल्याप्रमाणे आरेचे दूध घेण्यासाठी लोकांच्या रांगा लागत होत्या. त्यावेळी सहकार क्षेत्र एवढे मृतावस्थेत होते. मी अधिक बोलणार नाही. माझा हेत्वारोप नाही. तुम्ही काही वाईट कराल असे मला वाटत नाही. तुम्ही चांगलेच कराल, हिताचे कराल, अशी मला अपेक्षा आहे. माननीय विरोधी पक्षनेते आणि मी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव मांडलेला आहे. आपण हे विधेयक प्रवर समितीकडे पाठवावे, अशी माझी विनंती आहे. आपण प्रवर समितीमध्ये या विधेयकावर चांगल्या प्रकारे चर्चा करु आणि त्यानंतर हे विधेयक पारीत करु.

माननीय विरोधी पक्षनेते आणि मी जी सूचना दिलेली आहे ती आपण स्वीकारावी आणि त्या समितीमध्ये 12 सदस्यांचा समावेश असावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्र.3-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सदर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत मी प्रस्ताव दिलेला आहे. मंत्री महोदयांनी जे विधेयक मांडलेले आहे ते संपूर्ण सहकार संपविण्याचे विधेयक आहे. मी सहकारातील एक छोटा कार्यकर्ता आहे. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब आणि मी सन 1984 मध्ये एका फर्ममध्ये एकत्रित आलो. त्यांची देखील इच्छा होती. परंतु, माझ्या पक्षाचे जास्त (...अडथळा...) आम्ही राजकीय दृष्ट्या वेगळे असलो तरी आता सध्या एकत्र आहोत. कलम 11 खाली असलेली संस्था, जी संस्था लिक्विडेशनमध्ये काढण्याची ऑर्डर होती ती रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक, त्या बँकेत फक्त 30 कोटी रुपयांचे डिपॉझीट होते आणि 90 टक्के एनपीए होता. मी 6-7 वर्षामध्ये ती बँक 3 हजार कोटी पर्यंत नेलेली आहे. मी ती बँक देशात पहिल्या क्रमांकावर आणलेली आहे. मी सांगू इच्छितो की, जे विधेयक आणलेले आहे ते एमएससी बँकेसाठी आणलेले आहे. मी सन 1986 पासून एमएससी बँकेत काम करीत आहे. एमएससी बँक ही कोणती बँक आहे ? जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ठेवी ठेऊन शेती उत्पादन करणाऱ्या संस्थांना, प्रक्रिया करणाऱ्या संस्थांना मोठ्या प्रमाणावर फायनान्स देणारी राज्यातील ती मोठी संस्था आहे. ती बँक सन 2002 पर्यंत व्यवस्थित रीत्या सुरु होती आणि आज देखील आहे. या बँकेची 90 टक्के वसुली होत होती. केंद्र शासनाने नवीन 40 कारखाने निर्माण करण्याचे धोरण घेतले आणि 40 कारखान्यांना बिज फायनान्स म्हणून एमएससी बँकेने पहिल्यांदा 10 टक्के फायनान्स केला. त्यावेळी मी एमएससी बँकेत नवीन होतो. त्यावेळी मला काहीही कळत नव्हते. (...अडथळा...) ते माझ्या बरोबर होते. पुढे काय केले ते मी सांगतो. त्यांना त्याची माहिती आहे. त्या 40 कारखान्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या वित्तीय संस्थांनी फायनान्स मंजूर केला. दादा आपण चौकशी करीत आहात त्या अधिकाऱ्याकडे मी गेलो नाही. आम्ही चोर आहोत काय ? एमएसएफसी, सिकॉम या संस्थांनी फायनान्स मंजूर केला. आता सिकॉम ही संस्था संपलेली आहे. सिकॉम आणि केंद्र शासनाची वित्तीय संस्था जवळपास 90 टक्के फायनान्स करीत होती. मागील वर्षी त्या उद्योगाला प्रॉब्लेम आला. त्यामुळे तो फायनान्स त्यांनी नाकारला. त्यावर बिज फायनान्स म्हणून

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

एमएससी बँकेने फायनान्स केला होता. मागील 50 वर्षाची ती प्रथाच होती. त्यावेळी केंद्रात माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. केंद्र शासनाने 40 कारखान्यांची स्क्रुटीनी केली आणि 27 कारखान्यांना फायनान्स करण्याचा आदेश दिला. आम्ही त्यावेळी अडविले. आम्ही सांगितले की, त्यांना फायनान्स द्यायचा नाही. त्यावेळी भाऊसाहेब देखील होते. मध्यंतरी भाऊसाहेबांना गॅप मिळाली. परंतु, त्यावेळी माझ्या बरोबर भाऊसाहेब देखील होते. त्यावेळी आम्ही फायनान्स करु नका असे सांगितले. त्यावेळी राज्याच्या सहकार विभागाने आम्हाला पत्र पाठविले की, त्यांना फायनान्स केला नाही तर अमूक कलमान्वये तुमच्यावर कारवाई करण्यात येईल. मग आम्ही सांगितले की, यासाठी शासनाने गॅरन्टी दिली पाहिजे. दादा शासनाने गॅरन्टी दिली म्हणजे काय झाले ? शासनाने त्याला मान्यता दिली. शासनाने त्या प्रोजेक्टला मान्यता दिली. आम्ही शासनाची मान्यता घेतली आणि शासनाने मान्यता दिल्यानंतर आपण फायनान्स केला. म्हणजे तो शासनाचा प्रोजेक्ट झाला. त्याची संपूर्ण वित्तीय जबाबदारी शासनावर आली.

...X-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

या संदर्भातील कागदपत्रे माझ्याकडे आहेत ते मी पटलावर ठेवतो. यासंदर्भात पुन्हा मला बोलण्यास संधी मिळाली तर संपूर्ण कागदपत्रे मी निश्चित पटलावर ठेवीन. 27 कारखान्यांना बोर्डाची संमती नसताना सरकारच्या दडपणाखाली फायनान्स करण्यात आलेला आहे. हे सर्व रेकॉर्डवर आहे, या संदर्भातील पेपर आम्ही मागत असतो.

सभापती महोदय, या विषयात आपण माझ्यापेक्षा तज्ज्ञ आहात, आपण स्वत: साखर पट्टयात व पश्चिम महाराष्ट्रात काम करीत आहात. त्यानंतर मागील तीन ते चार वर्षापासून या कारखान्यांना वेळोवळी पैसे देण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. आम्ही नागपूर येथे अधिवेशनासाठी गेलो तेव्हा पैसे वाटप होतील, याचा आम्हाला अंदाज होता, त्यावेळी 25 कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. प्रत्येक जण कधी तरी येत होता. त्यावेळी तुमची चिमणी पेटलीच नाही. दर खेपेला पैसे वाटणे सुरु होते. त्यावेळी आम्ही त्याला विरोध केला होता. त्यावेळी मंत्री महोदय, आमच्याकडून चूक झाली. आमचा विरोध आम्ही तेथे नोंदविला आहे. राज्य पातळीवर ज्या संस्था आहेत, त्यांचे प्रोसिडिंग पाहण्यात यावे. मार्केटिंग फेडरेशन पहा. कॉटन फेडरेशन पहा. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक पहा किंवा तुमची गृहनिर्माण सहकारी संस्था पहा. वसंतदादा यांच्यापासून जे गैरहजर राहिले त्यांची रजा ते मंजूर करीत होते. त्या ठिकाणी ते प्रोसिडिंगमध्ये नमूद करीत नव्हते. एक प्रश्न असा आहे की, याबाबत मी डिटेल काही बोलत नाही. मंत्री महोदय, श्री.चंद्रकात पाटील मी आपल्याबरोबर अनेक वेळा चर्चा केलेली आहे. ज्यावेळी कर्ज थकित झाले त्यावेळी आम्ही सरकारकडे गॅरंटी मागण्यासाठी गेलो होतो.

सभापती महोदय, बोर्डामध्ये सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व माझ्याशिवाय विरोधी पक्षाचा माणूस कोणीही नव्हता. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित होते व चौथे सदस्य कर्मचारी प्रतिनिधी म्हणून श्री.आनंदराव अडसूळ होते. शेवटच्या टर्ममध्ये ते रिटायर्ड झाल्यानंतर ते केंद्रात वित्तीय राज्यमंत्री होते. असे आम्ही चौघे लोक विरोधी पक्षाचे बोर्डामध्ये होतो. श्री.आनंदराव अडसूळ संचालक झाले तरी ते कर्मचाऱ्यांचे प्रश्न बोर्डात मांडत होते. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित उपस्थित आहेत, बोर्डाच्या बैठकीत फक्त मीच विरोध करीत होतो. त्यावेळी मी सांगितले होते की, सरकार गॅरंटी देत नाही तर आपण कोर्टात जाऊ या. त्यावेळी आम्ही कोर्टात गेलो. कोर्टाने असे सांगितले की, त्यांच्याकडे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

प्रॉपर्टी आहे ती विका. मंत्री महोदयांना अधिकारी हे रेकॉर्ड दाखवित नाहीत. कोर्टाने सांगितले की, ही प्रॉपर्टी विकण्यात यावी, त्यानंतर गरज भासली तर सरकार मदत करीन. सुप्रीम कोर्टात सांगितले की, हायकोर्टात सांगितले हे मला आठवत नाही यासंदर्भातील सर्व पेपर माझ्याकडे आहेत, ते सर्व पेपर मी पटलावर ठेवतो. कोर्टाने असा आदेश दिला की, अगोदर प्रॉपर्टी विका. त्यावेळी आम्ही सांगितले की, ही जबाबदारी आम्हाला नको. त्यावेळी राज्य शासनाची हायपॉवर समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीमध्ये मुख्य सचिव, वित्त सचिव,सहकार विभागाचे सचिव व पणन विभागाचे सचिव होते, याबाबत श्री.गोयल सर्व बाबींचे मॉनिटरिंग करीत होते. त्यांच्या देखरेखी खाली या सर्व प्रॉपर्टी विकण्यात आल्या आहेत. त्यांनी किंमती ठरवून टेंडर काढण्यात आली, त्यामध्ये आमचा काय दोष आहे. आम्ही 40 ते 45 वर्षे सहकार चळवळीत काम केले. रोज टी.व्ही.वर आमचे नाव येते. जसे की आम्हीच 2000 कोटी रुपये खाल्ले आहेत. आम्हाला फोन येतात की, भाई तुमचापण फोटो आहे. आम्ही कधी त्यांची गाडी वापरली नाही, तेथे कधीही आम्ही जेवण केले नाही, दहा रुपयात आम्हाला जेवण मिळत होते, तेव्हा माझे तेथे घर नव्हते. तेथे आम्ही पिठले आणि भाकरी खायला जात होतो. 10 रुपयांच्या जेवणासाठी आम्ही 500 रुपये देत होतो. मंत्री महोदय श्री.चंद्रकांत पाटील माझ्या सारख्या सहकार चळवळीत काम करणाऱ्या माणसाला खूप वेदना होतात. ज्यावेळी या प्रॉपर्ट्या विकल्या त्यावेळी सर्व प्रोसेसिंग करण्यात आलेले आहे. त्यामध्ये नाबार्डचा अधिकारी होता. सेक्शन 11 लावण्यात आले होते. नाबार्डचा अधिकारी होता, सहकार खात्याचे जॉईंट रजिस्टार होते, आरबीआचा अधिकारी होता. ते लोक आरोपी नाहीत काय ? ते लोक दोषी नाहीत काय ?

सभापती महोदय, आपण देखील संस्था चालवित आहात, अधिकाऱ्यांनी सर्व नोटींग केले की, रिपेमेंट बरोबर होईल, याचा ब्रेकइव्हन बरोबर बसलेला आहे. त्यांना ताबडतोब कर्ज दिले तरी वसुली होईल. मग यामध्ये आमची काय चूक आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, हे सर्व रेकॉर्ड आपण घ्या, आपण यावर बसून चर्चा करु या. तुम्हाला मुश्रीफ यांना काय करायचे असेल ते आपण करा, त्यांच्याबरोबर आम्हाला घेऊ नका. यामध्ये कोणत्याही बोर्डाची चूक नाही. ज्या अधिकाऱ्यांनी हे केले त्यांची का चौकशी करण्यात येत नाही. ज्यांनी पॉपर्ट्या घेतल्या आहेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

त्यांच्यावर कारवाई करा. ज्यांनी गैरवापर केला त्यांच्यावर कारवाई करा. यामध्ये आमचा काय दोष आहे. उद्या रुपी बँक बुडाली तर सर्व कोऑपरेटिव्ह बँका खराब आहेत काय ? जनता सहकारी बँक, सारस्वत बँक चांगली आहे, त्यामुळे सर्व सहकारी बँका वाईट आहेत काय ? अशा प्रकारची चुकीची प्रथा पाडू नका. त्यामुळे असे काही होणार नाही. कायदा हा पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नाही. आज कायदा केल्यानंतर त्या कायद्याची अंमलबजावणी करणार आहात. रोज टीव्हीवर बातम्या येतात, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर म्हणतात की, पैसे कोठून भरु मी त्यांना म्हटले की, मी तुमचे पैसे भरीन. यासंदर्भातील नोटीसा आम्हाला आल्या आहेत, त्या नोटीसा पाठविणे हे देखील चुकीचे आहे. तो अधिकारी आता तेथे बसला आम्ही तेथे आयुष्य घालविले आहे. आम्ही खेडोपाडी, पायी चालत बिना चपलेने फिरलो व अनेक संस्था उभ्या केल्या आहेत. तेथे तो अधिकारी आता बसणार व अशा पध्दतीने बोलणार हे योग्य नाही. आज आम्ही जात्यात आहोत, तुम्ही सुपात आहात, उद्या तुम्ही देखील जात्यात येणार.

सभापती महोदय माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यात यावे. सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांची बैठक मंत्री महोदयांनी घ्यावी. ज्यांना कायद्याचे ज्ञान आहे असे सदस्य प्रवर समितीवर घेण्यात यावेत. ज्यांनी चुका केल्या असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. अशा पध्दतीचे काम या ठिकाणी झाले पाहिजे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे व श्री.जयंत पाटील यांनी या विधेयकासंबंधी काही मुद्दे मांडले आहेत. हे विधेयक यासाठी आणले जात आहे की, ज्यांनी बँकामध्ये भ्रष्टाचार केला यामध्ये कलम 83 व 84....

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी देखील प्रस्ताव दिलेला आहे, त्यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी देऊ त्यानंतर आपण बोलावे.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 3 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 12 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

या विधेयकात फक्त संचालक पदाच्या बाबतीत प्रमुख सुधारणा केली आहे, अधिकाऱ्यांच्या बाबतीत केली आहे. महाराष्ट्र अधिनियम 1961 च्या कलम 24 अंतर्गत 63 (क) (अ) मध्ये अशी सुधारणा सुचवली आहे की, 10 वर्षे मागील सदस्य, पुन्हा त्यांना कोणत्याही सहकारी संस्थेत संचालक म्हणून राहता येणार नाही. सभापती महोदय, मी या सदनात 6 वर्षांपासून काम करीत आहे. या काळात सदनात अनेक विधेयके मंजूर होण्यासाठी आली होती. त्या विधेयकांवर सविस्तर चर्चा सुध्दा झाली. परंतु आज मी एक विधेयक असे बघत आहे की, त्यात मागील 10 वर्षांपासून कायदा लागू होत आहे. कायदा आज झाल्यानंतर पुढील 10 वर्षे, 25 वर्षांसाठी लागू व्हावा, ही बाब आम्ही समजू शकतो. परंतु मागील 10 वर्षांपासून कायदा लागू होतो. याचा अर्थ हे विधेयक आणताना तुमच्या मनात कुठे तरी पाप आहे. ते पाप का असावे ? राज्यात परिवर्तन झाले, कधी कोणाला वाटले नाही, ते सत्तेत आले. सत्तेत आल्यानंतर आपण एखाद्या क्षेत्रात कोणत्याही पध्दतीने घुसखोरी करु शकत नाही, यामुळे काय करायचे, त्यासाठी विधेयक आणायचे. मागील 10 वर्षांपासून जे कोणी सहकारी संस्थेत संचालक असतील, हा कायदा झाल्यानंतर, संबंध सहकारी संस्थांमुळे महाराष्ट्राची ओळख आहे. असे कोणतेही क्षेत्र नाही, त्यात 10 टक्के चुकीच्या माणसांमुळे ते क्षेत्र बदनाम झाले आहे. त्यात सहकार क्षेत्र, कायदेमंडळ, औद्योगिक क्षेत्र किंवा व्यवसाय क्षेत्र आहेत. आपण कोणत्याही क्षेत्राचा विचार केल्यास 10 टक्के माणसांमुळे ते क्षेत्र बदनाम झाल्याचे आपल्याला दिसून येईल. जुनी म्हण आहे की, "आजार म्हशीला झाला आणि गायीला इंजेक्शन देऊन कसे चालणार आहे." सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मी या विधेयकासंबंधी नंतर सविस्तर चर्चा करीन. सदर विधेयक प्रवर समितीकडे पाठवावे आणि त्याचबरोबर माझी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे की, या संदर्भात 12 सदस्यांची नावे निश्चित होवून ही समिती गठीत व्हावी.

------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सर्वश्री शरद रणपिसे, जयंत प्र.पाटील आणि माननीय विरोधी पक्षनेता श्री.धनंजय मुंडे यांनी मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात मी एक बाब स्पष्ट करु इच्छितो की, सरकारच्या मनात कोणतेही पाप नाही. सरकारने स्वत:हून हे विधेयक आणलेले नाही. 2007 पासून रिझर्व्ह बँकेकडून यासंसबंधी पाठपुरावा केला जात होता. त्या पाठपुराव्यामुळे रुपी बँक बरखास्त झाली. त्यावेळी रिझर्व्ह बँकेने असा आग्रह धरला की, रुपी बँकेतील बरखास्त झालेले संचालक मंडळ निवडणुकीला उभे राहणार असल्यास आम्ही निवडणुकीला परवानगी देणार नाही. सदर निवडणुकीला परवानगी देऊ नका असे सहकार विभागाने सुचविले होते. बरखास्त झालेल्या बोर्डच्या डायरेक्टरांनी लिहून दिले की, आम्ही निवडणूक लढवणार नाही. यामुळे निवडणुकाला परवानगी मिळाली. निवडणुकीला परवानगी मिळाल्यानंतर बरखास्त झालेल्या बोर्डातील संचालक निवडणुकीला उभे राहिले आणि ते निवडून आले. 2007 पासून रिझर्व्ह बँकेचा फक्त आग्रह नाही तर त्यांनी रुपी बँकेच्या संदर्भात अतिशय कठोरपणे म्हटले होते की, बरखास्त झालेल्या बोर्डातील संचालक निवडणुकीला उभे राहणार असतील तर निवडणुकीला परवानगी देऊ नये. रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन पाळाव्या जातात. एखाद्या बँकेत भ्रष्टाचार झाल्यानंतर नाबार्डकडून ऑडिट केले जाते. नाबार्डने बँकेत भ्रष्टाचार झाल्याचा रिपोर्ट दिला आहे. नाबार्डच्या ऑडिटनंतर रिझर्व्ह बँकेने ते बोर्ड बरखास्त केले. हा सरसकट विषय नाही. महाराष्ट्रातील 43 बँका अशा आहेत की, रिझर्व्ह बँकेने त्यांचे बोर्ड बरखास्त केले आहेत. विशेषत: नागपूर, वर्धा आणि बुलढाणा अशा 3 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला होता, त्या बरखास्त झाल्या. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका बरखास्त झाल्यामुळे त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कर्ज घेण्यासाठी कुचंबना होऊ लागली. यामुळे शासनाने सदर बँका सुरु करण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर रिझर्व्ह बँकेने लेखी पत्र दिले की, आपण सदर कायदा केल्यानंतरच आम्ही उक्त 3 जिल्हा मध्यवर्ती बँका सुरु करण्यास परवानगी देऊ. यामुळे सरकारच्या मनात कोणतेही पाप नाही, सरकारला कोणावर राग काढायचा नाही. सदर विधेयकात मागील 10 वर्षे नाही तर बरखास्त झालेल्या दिवसांपासून 10 वर्षे असे नमूद केले आहे. काल नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे लायसन्स मिळाले. रुपी बँकेचे संचालक खोटे पडले.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

त्यांनी असे सांगितले होते की, आम्ही निवडणूक लढवणार नाही. परंतु निवडणुकीला परवानगी मिळाल्यानंतर त्यांनी निवडणूक लढविली. आपण नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे लायसन्स मिळताना लेखी दिले आहे की, आम्ही हा कायदा करु. आता आपल्याला नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे लायसन्स मिळवल्यानंतर सदर कायदा करण्यासंबंधी रिझर्व्ह बँकेला दिलेली रिटन कमिटमेंट तोडू. आपल्या सर्वांच्या दृष्टीने हा विषय गैरसोयीचा आहे. सदर विधेयक खालच्या सभागृहात मंजूर झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी उपस्थित केलेला विषय वेगळा आहे. ती 88 अन्वये चौकशी आहे. राज्यतील अनेक मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँकेत 88 अन्वये चौकशी सुरु आहेत. नाबार्डच्या रिपोर्टनुसार ज्या बोर्डांना बरखास्त केले, त्या बोर्डातील लोकांना निवडणूक लढविता येणार नाही, हा मूळ विषय आहे. माझी सदनाला विनंती आहे की, सदनाने सदर विधेयक मंजूर करावे.

**सभापती** : आता मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी मांडलेला प्रस्ताव प्रथम मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

**सभापती** : या संदर्भात पॉईंट ऑफ प्रोसिजरचा प्रश्न निर्माण होत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. 3 दिवसांपूर्वी कार्यक्रमपत्रिकेवर नियम 97 अन्वये प्रस्ताव दाखविण्यात आला होता. आता मराठवाड्याच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेला येत आहे. मराठवाड्यातील अतिशय महत्त्वाचा विषय आहे.

**सभापती** : मला या विषयासंबंधी सभापती म्हणून बोलायचे नव्हते. परंतु दुष्काळाची चर्चा झाल्यानंतर केवळ आपण सूचित केल्याप्रमाणे मराठवाड्याची चर्चा झाली असताना, नियम 97 अन्वये चर्चा करण्यासाठी दिल्यानंतर मघाशी माननीय गटनेत्यांनी विनंती केली होती की, नियम 260 अन्वये प्रस्तावावर चर्चा घेऊन 10 मिनिटांवर सन्माननीय सदस्यांना ऑन लेग ठेवावे. आता नियम 260 अन्वये चर्चा घेत आहोत. मी चौकशी केली असता माननीय मुख्यमंत्री आणखी अडीच ते पावणेतीन तास विधानसभेत उपस्थित राहणार आहेत. यामुळे आपण चर्चेला सुरुवात करु.

श्री.सुनील तटकरे : माननीय मुख्यमंत्री दुपारी 4.00 वाजता येणार आहेत का ?

**सभापती** : मी यासंबंधी चौकशी केली आहे. माननीय मुख्यमंत्री दुपारी 3.00 पर्यंत येतील. तो पर्यंत आपण चर्चेला सुरुवात करु.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सीबीएससी बोर्डच्या गणित विषयाच्या पेपरसंबंधी**

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, दिनांक 14 मार्च रोजी सीबीएससी बोर्डचा गणित विषयाचा पेपर अतिशय कठीण होता. हा बोर्ड केंद्राचा असला तरी राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी सदर परीक्षा दिली आहे.

यानंतर Z-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त......

सभापती महोदय, विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ मला भेटले. विशेषतः त्यांच्या 3-4 तक्रारी आहेत. सिलॅबसच्या बाहेरचे प्रश्न विचारले, प्रश्नपत्रिका लेंग्थी होती आणि कॅल्क्युलेशन वेळखाऊ होते. गणित विषयाचा पेपर स्कोअरिंग असतो. शालेय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून मी विनंती करतो की, हा विषय केंद्र सरकारशी संबंधित असला तरी राज्यातील विद्यार्थ्यांची भावना लक्षात घेता राज्य सरकारने केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे याबाबत प्रयत्न करुन लिनियन चेकिंग व्हावे, रिएक्झॅमिनेशन व्हावे किंवा ग्रेस मार्क दिले जावेत यासाठी प्रयत्न करावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अगोदर स्पष्ट करतो की, हा विषय एसएससी बोर्डाचा नाही. मी या विषयामध्ये लक्ष घालतो असे उत्तर दिले की, वृत्तपत्रात छापून येईल. एसएससी बोर्डाचा असाच विषय सुरु आहे. त्याबाबत लक्षात आले की, आऊट ऑफ सिलॅबस नाही. आता मी जे बोलणार आहे ते एसएससी बोर्डाला लागू नाही. सीबीएससी बोर्डाच्या पेपरबाबत तक्रार आल्यानंतर काही शिक्षकांशी, काही विद्यार्थ्यांशी आणि काही पालकांशी या संदर्भात चर्चा झाल्यानंतर काही प्रमाणात तथ्य वाटत असल्यामुळे मी स्वतः अन्य कामानिमित्त शनिवारी दिल्ली येथे जात आहे, त्यावेळी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्रीमती स्मृती ईराणी यांच्यापर्यंत आपल्या भावना पोहोचविल्या जातील.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय व मंत्री महोदय, धन्यवाद.

-----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यातील विभागीय मुख्यालयांची शहरे व महापालिकांमध्ये घनकचरा व्यवस्थापन, ध्वनी व वायू प्रदूषण, रस्त्यांची दुर्दशा, अपघातांचे वाढते प्रमाण याबाबत करावयाची उपाययोजना

**मु.शी.:** राज्यातील विभागीय मुख्यालयांची शहरे व महापालिकांमध्ये घनकचरा व्यवस्थापन, ध्वनी व वायू प्रदूषण, रस्त्यांची दुर्दशा, अपघातांचे वाढते प्रमाण याबाबत करावयाची उपाययोजना या विषयावर सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जनार्दन चांदूरकर, अमरसिंह पंडित, अनंतराव गाडगीळ, अनिल भोसले,मुझफ्फर हुसेन, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अनिल तटकरे, प्रकाश गजभिये, विक्रम काळे, संदीप बाजोरिया, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, ख्वाजा बेग, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, सुभाष झांबड, ॲड. हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, हरिसिंह राठोड, ॲड.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यातील विभागीय मुख्यालये असलेली शहरे-मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक तसेच राज्यातील इतर महानगरपालिका क्षेत्रात असलेली शहरे यांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात वाढत असलेले घन कचऱ्याचे ढिग, घन कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांची यंत्रणा अपुरी व कालबाह्य झालेली असणे, शहरातील घन कचऱ्यांचे व्यवस्थापन करण्यात महापालिकांना येत असलेले अपयश, घनकचऱ्यांमुळे पसरणारी दुर्गंधी तसेच नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, तसेच शहरातील मलनिःस्सारणाची यंत्रणा कार्यक्षम नसल्यामुळे नद्यांमध्ये होणारे प्रदुषण, सातत्याने वाहनांच्या संख्येत होणारी वाढ, त्यामुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषण रस्त्यांची होणारी दुरवस्था, अपघाताचे वाढते प्रमाण, मोठ्या

...3....

श्री.मुझफ्फर हुसेन......

प्रमाणात भेडसावत असलेली पार्किंग समस्या, राज्यातील मेट्रो प्रकल्पांचा समतोल राखून मेट्रो प्रकल्प त्वरीत सुरू करण्याची आवश्यकता तसेच केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत मिळणारा अत्यंत अपुरा निधी, याकामी शहरातील नागरिकांवर वाढणारा अतिरिक्त सेवा करांचा बोजा, त्यामुळे शहरातील घनकचरा, वाहतूक समस्या, प्रदुषण, मेट्रो प्रकल्प याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असतांनाही शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाविरुध्द पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, देशात मागील 15-20 वर्षाच्या काळात महाराष्ट्रात नागरीकरणाने उच्चांक गाठला आहे. मागील 20 वर्षाच्या काळात महाराष्ट्र राज्यात नागरीकरणाचा वेग 15 ते 20 टक्क्यांनी वाढला आहे. छोटी शहरे, छोटी गावे शहरामध्ये रुपांतरित झाली आहेत. छोटी शहरे मोठया शहरामध्ये आणि मोठी शहरे महानगरामध्ये रुपांतरित झाली आहेत. मागील 20 वर्षाचा आढावा घेतला तर महाराष्ट्रामध्ये 10 ते 12 नवीन महानगरपालिका अस्तित्वात आलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर 70 ते 80 ब वर्गातील नगरपरिषदा अ वर्गामध्ये अपग्रेड झालेल्या आहेत.

**सभापती** : आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येत आहे. नियम 260 च्या प्रस्तावावर माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन ऑन लेग राहतील. उद्या शक्य झाल्यास हा प्रस्ताव पुढे चर्चेला घेण्यात येईल. सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित होत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.16 ते 2.46 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** सभागृहात कोणीही मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.48 वाजता 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेतील कामकाजासंबंधी गट नेत्यांशी चर्चा झाल्याप्रमाणे आपण आता पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करावी. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री दहा मिनिटांमध्ये येतील. तोपर्यंत आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात करावी, जेणेकरुन वेळ वाया जाणार नाही अशी विनंती आहे. आज आपणास माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आणि पुरवणी मागण्यावरील चर्चा पूर्ण करायची आहे.

**<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत पॉईन्ट ऑफ प्रोसिजर</u>**

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर नियम 260 अन्वये विरोधी पक्षाचा आणि सत्ताधारी पक्षाचा असे दोन प्रस्ताव दाखविण्यात आले आहेत. नियमाप्रमाणे मंगळवारी सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव असतो आणि गुरुवारी विरोधी पक्षाचा प्रस्ताव असतो. मंगळवारी सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही म्हणून तो दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आला. त्या दिवशीही त्यावर चर्चा होऊ शकली नाही. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये विरोधी पक्षाचा प्रस्ताव प्रथम दाखविण्यात आला आहे आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. तेव्हा याबाबतीत आम्हाला मार्गदर्शन व्हावे कारण विधानसभेमध्ये सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव अगोदर दाखविण्यात आलेला आहे आणि विरोधी पक्षाचा प्रस्ताव नंतर दाखविण्यात आलेला आहे. दोन्ही सभागृहाच्या प्रोसिजरमध्ये काही चूक असेल किंवा कोणत्या पक्षाचा प्रस्ताव अगोदर दाखविला पाहिजे किंवा प्रथा, परंपरा यामध्ये हे कुठे बसते त्याबाबत मार्गदर्शन व्हावे. विरोधी पक्षाचा प्रस्ताव असेल तर त्यांना संधी मिळाली पाहिजे या मताचा मी आहे. तेव्हा आपण याबाबतीत आम्हाला मार्गदर्शन करावे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे. ही बाब माझ्या लक्षात आल्यानंतर मी त्या संदर्भात माहिती घेतलेली आहे. कामकाजपत्रिकेवर म.वि.प. नियम 260 चे प्रस्ताव मंगळवारी सत्ताधारी पक्षाचा आणि गुरुवारी विरोधी पक्षाचा प्रस्ताव नेहमीच दर्शविण्यात येतात. सदर अधिवेशनात या प्रस्तावांवर चर्चा झाली नाही तर ते प्रस्ताव पुढेही कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्याची प्रथा आहे. मंगळवार, दिनांक 15 मार्च, 2016 रोजी सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आला होता. त्यावर चर्चा झाली नाही. त्यानंतर गुरुवार हा विरोधी पक्षाचा दिवस असल्याने आजच्या कामकाजपत्रिकेवर विरोधी पक्षाचा प्रस्ताव अगोदर दाखविण्यात आलेला आहे आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. हीच प्रथा आपण कित्येक अधिवेशनामध्ये अवलंबिलेली आहे. मंगळवार किंवा गुरुवारचे मागील प्रस्ताव प्रलंबित असले तरी त्या दिवशी ज्या प्रस्तावाला प्राधान्य आहे तो प्रस्ताव अग्रक्रमाने दाखविण्यात येतो ही विधानपरिषदेची परंपरा आहे. सन्माननीय सदस्यांनी सूचित केलेले आहे की, ते विधानसभेत वेगळ्या पद्धतीने दाखविले जाते. त्या संदर्भात माननीय अध्यक्षांशी चर्चा करून या दोन्ही प्रोसिजरमध्ये काही फरक असेल तर तो सुधारण्यात येईल.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सन 2015-2016 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**सभापती** : आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. बुधवार, दिनांक 16 मार्च, 2016 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात 7 मंत्र्यांचे विभाग दर्शविण्यात आले होते. तथापि, उक्त दिवशी चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे त्याच्या समावेश आजच्या कामकाजाच्या क्रमात करण्यात आला आहे. पुरवणी मागणी आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगावा. चर्चा संबधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे आपणास विदित आहेच. तसेच कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक 23 फेब्रुवारी, 2016 रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पुरवणी मागण्यांवरील चर्चेस प्रथेप्रमाणे त्या त्या विभागाच्या संबंधित माननीय मंत्री / माननीय राज्यमंत्री यांनी उत्तर द्यावयाचे आहे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शीर्षक** : विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील:-

(1) मुख्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ए-4,ए-6,बी-1,बी-10,एफ-5, जे-1, जे-2, जे-4, झेडए-3

(2) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-5, सी-6,सी-9, डी-3, डी-4, झेडई-1

(3) वित्त आणि नियोजन, वने मंत्र्याच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-7

(4) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्र्याच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-2, डब्ल्यू-2, डब्ल्यू-4

(5) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याच्या विभागांच्या मागण्या क्रमांक -एच-5, एच-7,एच-8, व्ही-3, व्ही-5

(6) ग्रामविकास आणि जलसंधारण रोजगार हमी योजना, महिला व बालविकास मंत्र्याच्या विभागांच्या मागण्या क्रमांक- एल-1, एल-2,एल-5,एक्स-1

(7) आदिवासी विकास मंत्र्याच्या विभागाची मागणी क्रमांक - टी-5

(8) जलसंपदा, खार जमीन मंत्र्याच्या विभागाच्या मागण्या क्रमांक आय-1, आय-5

(9) परिवहन मंत्र्याच्या विभागाची मागणी क्रमांक बी-10

(10) उद्योग मंत्र्याच्या विभागाची मागणी क्रमांक - के-7

(11) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्र्याच्या विभागाची मागणी क्रमांक के-6

(12) पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्र्याच्या विभागाची मागणी क्रमांक वाय-2

(13) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्याच्या विभागाची मागणी क्रमांक - आर-1

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी पुरवणी मागण्यांवरील भाषणास सुरुवात करावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात म.वि.प. नियम 230 (4) प्रमाणे लेखी नोटीस सुद्धा दिलेली आहे.

पृष्ठ क्रमांक 25 बाब क्रमांक 17 - शालेय शिक्षण विभाग - दिनांक 5 फेब्रुवारी रोजी उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेजसाठी 340 पदांची मान्यता देण्यात आलेली आहे. सन 2008 पासूनची ही पदे आहेत. त्यावेळी माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले होते की, या संबंधातील तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात येईल. परंतु केवळ दोन पूर्णकालिक शिक्षकांच्या पदांसाठी 9 लाख 38 हजार इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात 340 पदांची आवश्यकता आहे. सन 2008 पासूनची जी थकबाकी आहे त्याचीही पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. तेव्हा या दोन्ही बाबींची पूर्तता माननीय शालेय शिक्षण मंत्री कशी करणार आहेत हे त्यांनी सांगावे.

सभापती महोदय, आदिवासी आणि बिगर आदिवासी क्षेत्रातील ज्युनिअर कॉलेजेस किंवा अनुदानित ज्युनिअर कॉलेजमधील ज्या वाढीव तुकड्या आहेत त्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करणे अपेक्षित होते. परंतु ती तरतूद करण्यात आलेली नाही. माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी अनेकदा सांगितले की, पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात येईल, परंतु तसे झालेले नाही.

पृष्ठ क्रमांक 87, बाब क्रमांक 56, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - मी मागील अधिवेशनात मुंबई आणि कोकणातील महाविद्यालयांचा प्रश्न उपस्थित केला होता. विशेषतः मुंबईतील कॉलेजमधील प्राध्यापकांचा सहाव्या वेतन आयोगातील थकबाकीचा मुद्दा आहे. 20 टक्क्यांची कॅशकम्पोनन्ट रक्कम राज्यातील इतर कॉलेजमधील प्राध्यापकांना देण्यात आली परंतु ती थकबाकी केवळ मुंबईतील कॉलेजमधील प्राध्यापकांना देण्यात आलेली नाही. आपण प्रलंबित मानधन आणि प्रलंबित भत्त्यांसाठी 28 कोटी 23 लाख रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. परंतु त्यामध्ये प्राध्यापकांच्या थकबाकीचा देण्याचा उल्लेख त्यामध्ये नसल्यामुळे आपण ही थकबाकी कशी देणार हा महत्वाचा प्रश्न आहे. यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, मुंबई आणि कोकण या दोन्ही विभागातील मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना प्रशासकीय गोंधळामुळे उशिराने ॲप्रूव्हल मिळाले होते. यामध्ये संस्थांचा किंवा प्राध्यापकांचा दोष नव्हता. महाविद्यालयांना उशिरा ॲप्रूव्हल दिल्यामुळे त्या महाविद्यालयातील स्टाफचे पगार दीड-दोन वर्षे आलेच नाहीत. त्या महाविद्यालयातील गेल्या दीड-दोन वर्षांचे पगार थकलेले आहेत. माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी मागे सभागृहात सांगितले होते की, या कालावधीतील पगार देण्यासाठी 70 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यामुळे या बाबतीत पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात येईल असे त्यांनी सांगितले होते. परंतु ज्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये या महाविद्यालयातील लोकांच्या पगारासाठी कसल्याही प्रकारची मागणी करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने मी जे दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांकडून उत्तर अपेक्षित आहे, एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे भाषण संपवितो.

-------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपल्याला धन्यवाद देतो. सन 2015-16 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांच्या सदंर्भात ज्या बाबींवर बोलायचे आहे त्या बाबत मी अगोदरच लेखी स्वरुपात सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची बाब क्र.17, पृष्ठ क्र.25 वर मी बोलतो. महोदय, पुरवणी मागण्याच्या अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथामध्ये पूर्णकालिक शिक्षकांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी सहायक अनुदानाची तरतूद करणे, यासाठी मागणी करण्यात आली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, अपंग समावेशित 29 शिक्षकांना 2013 पासून थकीत वेतन देण्याची तरतूद करण्यासंदर्भात मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी भेटून विनंती केली होती. तसेच माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांना सुध्दा विनंती केली होती. मला त्यावेळी आश्वस्त करण्यात आले होते. महोदय, 1990 च्या पूर्वीपासून ज्या शिक्षकांवर अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे त्यांना 2013 पासून आजपर्यंत कोणत्याही प्रकारचे वेतन मिळालेले नाही. आपल्याकडे एक दिवस जरी वेतन उशिरा मिळाले तर सगळीकडे बोंबाबोंब होते. परंतु दिव्यांग विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी, त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळावी म्हणून राज्य सरकारने ज्या स्तुत्य हेतूने ही योजना सुरु केली होती त्या योजनेतील शिक्षकांना 2013 पासून पगारापासून वंचित राहावे लागत आहे. मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना या बाबत व्यक्तिशः भेटून विनंती केली होती. तशा प्रकारचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी माननीय अर्थमंत्र्यांकडे पाठविला होता. मला त्यावेळी आश्वस्त करण्यात आले होते की, या शिक्षकांसाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात येईल. परंतु या वर्षीच्या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली नसल्यामुळे मला अत्यंत धक्का बसला आहे. महोदय, या अपंग समावेशित 29 शिक्षकांच्या पगाराची अप्राप्त रक्कम केवळ 3 कोटी 6 लाख रुपये एवढीच आहे. माननीय शालेय शिक्षण मंत्री खाली बसून सांगत आहेत की, या कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनाबाबत अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल. महोदय, त्यांच्या नियमित वेतनाची रक्कम 2 कोटी 10 लाख रुपये आहे. या बाबतीत आपण गंभीरपणे विचार करावा. या निमित्ताने मी माननीय शालेय शिक्षण



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

मंत्री आणि माननीय अर्थमंत्र्यांकडून एवढीच माफक अपेक्षा व्यक्त करतो की, त्यांनी दिलेल्या शब्दाचे पालन करावे.

सभापती महोदय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्र.16, पृष्ठ क्र.22 वर मी बोलतो. महोदय, या मागणी अंतर्गत अतिशय चांगल्या प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. वनक्षेत्र नसलेल्या नापिक जमिनी/गायरान जमिनी/गवती कुरणक्षेत्र व पडीक जमिनी क्षेत्रातून वैरण उत्पादन करण्यासाठीचा खर्च भागविण्यासाठी 2 हजार रुपयांची लाक्षणिक तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, गेली अनेक वर्षे आपल्या राज्यात आणि विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात जे भूमिहीन शेतमजूर आहेत ते सरकारी जमीन, गायरान जमीन, नापिक जमिनीवर अतिक्रमण करुन शेती करीत आहेत. मुळात या बाबत सरकारचा कायदा आहे. त्यानुसार सरकारने 1990 पर्यंतचे अतिक्रमण कायम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. महोदय, आमचे म्हणणे होते की, राहील त्याचे घर, कसेल त्याची जमीन. परंतु ज्यांच्याकडे जमीन आणि घर नाही त्यांचे काय ? महोदय, हा प्रश्न पश्चिम महाराष्ट्राचा किंवा उत्तर महाराष्ट्राचा नाही. हा प्रश्न प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भातील जनतेचा आहे. मी सांगितल्यानुसार त्या त्या जमिनीवर हे लोक अतिक्रमण करुन शेती करीत आहेत. आपण जनावरांच्या चाऱ्यासाठी निधी देण्याचे सांगितले आहे. मला वाटते आपण सुध्दा चाऱ्याचे उत्पादन करण्यासाठी प्रयत्न करावेत. या माध्यमातून जनावरांना चारा मिळेल अशा प्रकारची व्यवस्था केली तर बरे होईल. त्यामुळे यासाठी तरतूद करावी एवढीच या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2015-16 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्र.2, पृष्ठ क्र.3 वर मी बोलतो. या बाबी अंतर्गत शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीसाठी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. महोदय, आम्ही सभागृहात वेळोवेळी पत्रकारांचे प्रश्न मांडत असताना सुध्दा त्या अनुषंगाने कार्यवाही होत नाही. पत्रकारांना पेन्शन योजना लागू करावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदा करावा यासाठी आम्ही वेळोवेळी आवाज उठवित असतो. शासनाने उपरोक्त मागणी अंतर्गत भरीव तरतूद केलेली आहे. या गोष्टीचे अभिनंदन करीत असताना ही तरतूद अजून वाढविण्याची गरज आहे, असे मला वाटते. किमान पुढील पुरवणी मागण्यांमध्ये यासाठी भरीव तरतूद करण्यात येईल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, आता मी महसूल व वन विभागाच्या बाब क्र.6, 7 व 9, पृष्ठ क्र.12 व 13 वर बोलू इच्छितो. महोदय, या बाबी अंतर्गत शेतकऱ्यांच्या आत्महत्या, नैसर्गिक आपत्ती, शेततळी, विहिरी या संदर्भातील मागणीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, या राज्यात शासनाने कितीही प्रयत्न केले तरी आत्महत्या थांबत नाहीत. वर्तमानपत्र उघडल्यानंतर रोज एका तरी शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची बातमी वाचायला मिळते. महोदय, प्रगत महाराष्ट्राकडे जाणाऱ्या मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र, स्मार्ट सिटी, स्मार्ट गाव अशा विविध वल्गना करणाऱ्या सरकारला राज्यात शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या भूषणावह नाहीत. या आत्महत्या रोखण्यासाठी ठोस स्वरूपाच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी जी तरतूद करावयास पाहिजे ती केलेली नाही याचा आम्हाला खेद वाटतो.

2डी.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे ....

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला तातडीने मदत दिली पाहिजे, ती सुध्दा वेळेवर मिळत नाही, त्यांच्या कुटुंबीयांना सरकारी कार्यालयात अनेक वेळा खेटे, चकरा माराव्या लागतात. एकप्रकारे त्यांची हेळसांड होत आहे. सरकारने निर्णय घेऊन, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या बाबतीत, त्याने आमहत्या कशी केली, का केली या कोणत्याही कारणमीमांसेत न जाता, कागदपत्रांची शहानिशा न करता, तो महाराष्ट्रातील शेतकरी आहे हे बघून त्याच्या कुटुंबीयांना कार्यालयात येण्याऐवजी, आपले अधिकारी मग ते तहसीलदार, तलाठी असतील यांच्यामार्फत मदतीचा धनादेश त्याच्या घरी पोहचविण्याचे काम केले पाहिजे आणि ते करावे अशी मागणी मी या निमित्ताने करतो. माननीय मंत्र्यांनी त्याची निश्चितपणे नोंद घ्यावी. सभापती महोदय, घोषणा झाली. माननीय महसूल मंत्र्यांनी छाती ठणकावून सांगितले की, आम्ही मागेल त्याला शेततळे देणार आहोत. मागेल त्याला शेततळे. मग पुन्हा सांगितले की, आता आम्ही 50 हजारांचे टार्गेट ठेवले आहे. आपण मागेल त्याला शेततळे देणार असाल तर 50 हजाराचे टार्गेट कशाला ? अशा प्रकारची फसवी घोषणा करून एकप्रकारे आमच्या शेतकऱ्यांची चेष्टा करण्याचे काम सरकार करीत आहे. आमचा जो शेतकरी बांधव शेततळे मागेल त्याला शेततळे द्यायचे असेल तर कोणत्याही प्रकारचा आकडा, संख्या निश्चित करून चालणार नाही. मागेल त्याला शेततळे देण्याचा धडक कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. आमच्या काळात आमच्या सरकारने निर्णय घेऊन शेततळ्याला जवळपास 85 ते 90 हजार रूपयांचे अनुदान दिले होते. आपणाला सुध्दा ज्ञात आहे. परंतु या सरकारने हे अनुदान कमी करून 50 हजारांवर आणण्याचे काम केले आहे, म्हणजे कशाप्रकारे आमच्या शेतकऱ्यांची चेष्टा सरकार करीत आहे हे दिसून येते. त्यामुळे मी या संदर्भात खेद व्यक्त करतो. सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यांवर बोलत आहे. जसे दिवस पुढे जातात तशी महागाई वाढत चालली आहे. त्यावेळी आम्ही शेततळ्यांच्या संदर्भात केलेला 80-90 हजार रूपयांचा दर कदाचित आज सव्वा लाख रूपयांपर्यंत वाढविण्याची गरज होती. अनुदानात तशी वाढ सुध्दा केली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2

श्री. विक्रम काळे ....

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून केवळ एकच मागणी येथे ठेवण्यात आली आहे. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सातत्याने त्यांचा हे दाखविण्याचा प्रयत्न चाललेला असतो की, मी शिक्षण क्षेत्रात काही तरी नवीन करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु केवळ 2 शिक्षकांसाठी आहे. ज्युनिअर कॉलेजची मागणी वेतनासाठी ठेवण्यात आली आहे. परंतु राज्यामध्ये सन 2011-12 पासून आता सन 2014 पर्यंत जी काही कनिष्ठ महाविद्यालयाची वाढीव पदे होती, त्यांना अजुनही शासनाने मान्यता दिलेली नाही. आम्ही वारंवार या संदर्भात पाठपुरावा करीत आहोत. आम्ही वारंवार संचालकांकडे, शिक्षण आयुक्तांकडे पाठपुरावा करीत आहोत. मंत्रालयात सुध्दा या विषयावर पाठपुरावा करीत आहोत. आम्ही माननीय मंत्र्यांना सुध्दा भेटलो आहोत. वारंवार माननीय मंत्र्यांनी आदेश देऊन सुध्दा या विषयाची माहिती संबंधित खात्याकडून मिळत नाही. सन 2011 पासून आतापर्यंतची पद मान्यता न झाल्यामुळे या पदांवर काम करणाऱ्या शिक्षकांना विनावेतन काम करावे लागत आहे, ही अत्यंत खेदाची बाब मला येथे नमूद करावीशी वाटते. त्यामुळे सभापती महोदय, या निमित्ताने आपल्या माध्यमातून माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे. दरवर्षी कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षकांचा कार्यभार वाढत आहे. विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे जादा काम करावे लागत आहे. वाढलेल्या कार्यभारामुळे जोपर्यंत त्या पदांना शासन मान्यता देत नाही तोपर्यंत त्यांचे वेतन सुरू होत नाही. त्यामुळे यामधील क्लिष्ट पध्दत सोपी करण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले पाहिजेत. पद मान्यता करायची असेल तर उप संचालकांकडून संचालकांकडे, संचालकांकडून शिक्षण आयुक्तांकडे, शिक्षण आयुक्तांकडून मंत्रालयात आणि तेथे आल्यानंतर विभागाकडून पुन्हा एक संयुक्त समिती, त्यानंतर उच्चस्तरिय समिती आणि मग त्याला मान्यता असा जो काही एकदम लांबचा प्रवास होतो तो कुठेतरी कमी झाला पाहिजे. त्यामुळे ही मान्यता देण्याचे काम सुलभपणे करण्यासाठी हा अधिकार शिक्षण खात्याकडे जर दिला तर मला वाटते की, ही पद मान्यता लवकर होण्याचे काम होईल आणि आमच्या शिक्षकांना न्याय मिळण्याचे काम होईल. त्यामुळे मी माननीय शिक्षण मंत्र्यांकडे मागणी करतो की, जरी पुरवणी मागण्यांमध्ये दाखविले नसेल तरी किमान उद्याच्या अर्थसंकल्पात तरी आम्हाला ही तरतूद दिसावी आणि सन 2010-11 पासून आता सन 2014-15 पर्यंतच्या शैक्षणिक वर्षापर्यंत जी काही कनिष्ठ

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे ....

महाविद्यालयांची वाढीव पदे आहेत त्यांना मान्यता देऊन त्यांच्या वेतनासाठी सुध्दा आर्थिक तरतूद आम्ही केली आहे हे ठणकावून सांगावे. मी या संदर्भात त्यांना विनंती करतो. आम्ही दोन्ही बाजुंचे सर्व शिक्षक आमदार सर्वजण डोळे लावून बसलो होतो. आमचे सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते सर सुध्दा होते, ते आमचे मित्र आहेत. कधी पुरवणी मागणीचे पुस्तक हातामध्ये पडते असे वाटत होते. माननीय मंत्री डॉ. रणजित पाटील साहेबही आतूर होते की, कधी माझ्या भागातील शिक्षकांच्या वेतनासाठी तरतूद होते. सभापती महोदय, सन 2014 पासून अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा असतील. अनुदानास पात्र ठरलेल्या प्राथमिक शाळांपासून उच्च माध्यमिक शाळा, कॉलेजस असतील किंवा वर्ग तुकड्या असतील त्या सगळ्यांना अनुदानासाठी पात्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. काहींना घोषित होण्यासाठी असलेल्या याद्या अजून शिक्षण आयुक्त कार्यालयामध्ये प्रलंबित आहेत. आम्ही त्याही ठिकाणी सातत्याने पाठपुरावा करीत आहोत की, त्या मंत्रालयात पाठविल्या पाहजेत. परंतु तिकडून पाठवितो म्हणतात, इकडून पाठविले नाही असे म्हणतात, या घोळामध्ये याद्या अडकल्या आहेत. त्यामुळे मूल्यांकनाचा दुसरा टप्पा होता, त्या अंतर्गत राज्यातील काही प्राथमिक, माध्यमिक श्ाळा, वर्ग तुकड्या किंवा कनिष्ठ महाविद्यालयांचे मूल्यांकन झालेले आहे, हे मूल्यांकन करण्यासाठी सुध्दा जिल्हा स्तरावर एक समिती आहे, त्यानंतर विभागीय उप संचालकांच्या अध्यक्षतेखाली सुध्दा दुसरी समिती आहे. आपल्याला हे माहीत आहे. दोन समित्यांनी एकदा तपासणी केल्यानंतर पुन्हा त्याचे पुनर्मूल्यांकन करावे अशी जाचक प्रक्रिया शिक्षण विभागाने सुरू केली आहे. आमच्या शिक्षक कर्मचाऱ्यांवर ती अत्यंत अन्यायकारक बाब आहे. आपल्या अधिकाऱ्यांवर विश्वास असला पाहिजे. एखादा अधिकारी चूक करीत असेल तर जरूरपणे त्यावर कारवाई झाली पाहिजे. परंतु एखादा अधिक्ारी चुकत आहे म्हणून प्रक्रियाच बदलायची हे काही बरोबर होणार नाही. जिल्हा समितीने आणि विभागीय समितीने शिफारस केली असेल तर त्या शाळांना, वर्ग तुकड्यांना सुध्दा अनुदान मिळाले पाहिजे ही मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, राज्यात गेल्या 15 वर्षांपासून विनावेतनावर काम करणारा आमचा कायम शब्द काढलेल्या शाळांमधील शिक्षक आहे, जो प्राथमिक शाळांत, माध्यमिक शाळांत, कनिष्ठ महाविद्यालयांत, जो अनुदानित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे ....

शाळांतील वर्ग तुकड्यांवर काम करणारा शिक्षक आहे, त्याला एकप्रकारे दिलासा देण्याचे काम शिक्षण खात्याने केले पाहिजे. सभापती महोदय, 4 अधिवेशने झाली आहेत, आपण सातत्याने निर्देश दिले आहेत. परंतु शासन ते ऐकून घेण्याच्या पलीकडे काहीही करीत नाही. त्यामुळे आमची या माध्यमातून आपल्याला विनंती आहे. अधिवेशन सुरू होण्याच्या पूर्वी माननीय मंत्र्यांनी सांगितले की, काळजी करू नका. येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करणार आणि या शाळांना अनुदान देण्याचे काम करणार आहोत. आमची विनंती राहणार आहे. आघाडी शासनाने सकारात्मक निर्णय घेतला की, राज्यातील कायम शब्द काढलेल्या शाळांमधील शिक्षकांना पहिल्या वर्षी 20 टक्के, दुसऱ्या वर्षी 40 टक्के, तिसऱ्या वर्षी 60 टक्के, चौथ्या वर्षी 80 टक्के आणि पाचव्या वर्षी 100 टक्के असे अनुदान देण्यात येईल. आघाडी शासनाने हे धोरण स्वीकारले असेल तर आपण बाणेदारपणा दाखविला पाहिजे होता. आपण लक्ष घालून आमचे सूत्र बदलायचे असेल तर जरूर बदलायला पाहिजे होते आणि 20, 40, 60 टक्के असे न करता डायरेक्ट 100 टक्के अनुदान मी देत आहे, अशाप्रकारचा बाणेदारपणा दाखविला असता तर निश्चितपणे आम्हाला सुध्दा शिक्षकांना सांगण्यास अभिमान वाटला असता की, आमच्या माननीय मंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेतला आहे. परंतु हे बाजूला ठेवून 10, 20 टक्क्यांनी अनुदान देऊ अशी घोषणा होत आहे. मला यामध्ये अत्यंत खेदजनक वाटत आहे, मनाला दुःख होत आहे. आमच्या मनाला वेदना होत आहेत. आम्ही शिक्षकांसाठी प्रयत्न करीत आहोत. माझा शिक्षक तिकडे शिकविण्याचे काम करीत आहे, ज्ञानदानाचे काम करीत आहे, उद्याची पिढी घडविण्याचे काम करीत आहे, त्याला 15 वर्षांनंतर आता न्याय मिळण्याची वेळ आली असेल तर बरे आहे. आघाडी सरकारने 20, 40, 60 टक्क्यांचे सूत्र स्वीकारले आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे........

जर ती शाळा 80 टक्के अनुदानाला पात्र असेल तर त्याच टक्क्यानुसार अनुदान दिले गेले पाहजे, ही भूमिका मंत्री महोदय स्वीकारणार आहेत का ? राजकारणाचा विषय बाजूला ठेवला पाहिजे. शेवटी शिक्षण हा सर्व विकासाचा पाया आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, "शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे, जो पिणार, तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही." शिक्षण हा सर्व विकासाचा पाया असल्यामुळे अधिकाधिक तरतूद शिक्षणावर करण्याचे काम शासनाने केले पाहिजे. गेल्या 9 तारखेपासून महाराष्ट्रातील हजारो शिक्षक आझाद मैदानावर आंदोलन करीत आहेत. नागपूरच्या अधिवेशनामध्ये सेवाग्रामपासून नागपूरपर्यंत त्यांनी पायी दिंडी काढली होती.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या बाबीवर बोलत आहेत ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी बाब क्रमांक 17 वर बोलत आहे. मी यापूर्वी बाब क्रमांक सांगितली आहे. मंत्री महोदय लिहून घेत नाहीत, त्यांचे लक्ष नाही, त्याला मी काय करु ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य भाषण करीत आहेत. मी त्यांचे भाषण लक्षपूर्वक ऐकतो आहे. बाब क्रमांक 17 ही कनिष्ट महाविद्यालयाशी संबंधित आहे. परंतु, सन्माननीय सदस्य या ठिकाणी जनरल भाषण करीत आहेत. ही चर्चा जनरल भाषण करण्यासाठी आहे का ? सन्माननीय सदस्य शिक्षक आहेत, समजुतदार आहेत, काही तरी समजून बोलतील, अशी आमची अपेक्षा होती. परंतु, अशा प्रकारे जनरल भाषण पुरवणी मागण्यांवर चालेल का ? बाब क्रमांक 17 फक्त कनिष्ट महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनासाठीची आहे. त्यामुळे अन्य विषयावर बोलून कसे चालेल ? सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत हे सर्व मुद्दे मांडता येतील. त्यावेळी त्याचे कौतुक केले जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. मराठवाड्यामध्ये तीव्र दुष्काळ आहे. या ठिकाणी अर्थमंत्री महोदय उपस्थित आहेत. या सभागृहात पगारवाढीची चर्चा होऊ नये. जोपर्यंत महाराष्ट्रात दुष्काळ आहे तोपर्यंत ही चर्चा होऊ नये. मी अतिशय गंभीरपणे हे सांगतो आहे. अर्थमंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आपण विनाकारण घाबरता. संघटित लोकांना न्याय देणार, त्यांना बोलण्याची संधी देणार आणि दुष्काळग्रस्त शेतकरी आज त्या ठिकाणी पाण्यासाठी तडफडत आहेत,

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

त्यांच्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत, असे सरकार सांगत आहे. मग पगारवाढ कशासाठी ? या अधिवेशनात दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना कशा प्रकारे जास्तीत जास्त दिलासा मिळेल, पाणी मिळेल आणि त्यासाठी तरतूद कशी होईल, हे अर्थमंत्री महोदयांनी बघावे, अशी माझी तमाम दुष्काळग्रस्त लोकांच्या वतीने विनंती आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब माझ्या लक्षात आली आहे. मी निर्णय घेतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दुष्काळ हा संपूर्ण महाराष्ट्रात आहे. त्याचबरोबर त्याचा समन्वय साधण्यासाठी, महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी अन्य क्षेत्रेही महत्वाची आहेत. सन्माननीय सदस्यांनी अर्थमंत्री महोदयांचा उल्लेख केला आहे. बिझनेस सेक्टरमधून टॅक्सच्या स्पाने 1 टक्का रक्कम देण्याचे आवाहन अक्षयकुमारने केले होते. त्याबाबत टी.व्ही.वर अर्थमंत्री महोदयांनी त्याचे अभिनंदन केले. सरकारची काय भूमिका आहे ते मला कळत नाही. एकीकडे आपण अक्षयकुमारचे अभिनंदन करता आणि दुसरीकडे त्याच कॅटेगरीच्या अभिनेत्री असलेलया एका भाजपा खासदारांना स्वस्त दराने मोठा प्लॉट देऊन टाकता. तो पैसाही दुष्काळग्रस्तांसाठी उपयोगात आणता आला असता आणि त्याबाबत आपण अभिनंदन केले असते तर फार चांगले झाले असते.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मला असा प्रश्न विचारण्यात आला की, "श्रीमंतांनी आपल्या उत्पन्नातील 1 टक्का शेतकऱ्यांसाठी खर्च करावा, असे अक्षयकुमारचे वक्तव्य आहे, त्याबाबत आपले मत काय आहे ?" त्यावेळी मी असे सांगितले की, "ही आनंदाची बाब आहे." हा त्यागी लोकांचा देश आहे. सन 1962 च्या चीन-भारत युध्दात पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सुवर्णदान करा, असे देशवासियांना आवाहन केले होते. त्यावेळी हाच महाराष्ट्र होता की, ज्या राज्याने सर्वात जास्त सुवर्णदान केले. विनोबा भावेंनी भूदान करावे, असे आवाहन केल्यानंतर याच महाराष्ट्राने सर्वाधिक भूदान केले. अनेक भूकंपामध्ये राज्यातील लोकांनी आर्थिक मदत केली. तेव्हा या राज्यातील एखाद्या व्यक्तीने असे म्हटले की, श्रीमंतांनी एक टक्का पैसे शेतकऱ्यांसाठी

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार........

खर्च केले पाहिजेत. तेव्हा मी त्याचे स्वागत केले. एखाद्या आमदाराने असे म्हटले की, माझा पूर्ण पगार मी शेतकऱ्यांना देतो तर मी त्यांचेही स्वागत करीन. केवळ स्वागत करणार नाही तर त्यांना अभिनंदनपर पत्रही देईन, त्यांना हार घालीन. यामध्ये काय वाईट आहे ? माझा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी कशासाठी केला आहे, योग्य पध्दतीने केला आहे की, वेगळ्या पध्दतीने केला आहे ?

**सभापती :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांना मूळ बाबीवरच बोलता येईल. जनरल भाषण करता येणार नाही. त्यामुळे त्यांना जे काही बोलावयाचे आहे ते त्यांनी बाबीवर बोलावे आणि थोडक्यात बोलावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही सुध्दा शिक्षक म्हणून सेवा करुनच येथे आलो आहोत. आमच्या अनुभवातून लोकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे. शिक्षकांच्या वेतनावरील बाब येथे आहे व त्यावरच मी बोलतो आहे. आम्ही यावर बोलू नये, असे वाटत असेल तर अर्थमंत्री महोदयांनी त्यासाठी संपूर्ण तरतूद करावी. हे दोघे विरोधी बाकावर होते त्यावेळी ते असे सांगत होते की, आमचे सरकार येऊ द्यावे, दुसऱ्या दिवशी आम्ही करू. आता त्यांना संधी मिळालेली आहे. आम्ही सुध्दा शेतकऱ्यांची लेकरे आहोत. या ठिकाणी अर्थमंत्री महोदय उपस्थित आहेत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी किमान महाराष्ट्रातील जनतेचे जनरल नॉलेज बिघडवू नये. सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, अर्थमंत्री या सभागृहात असे सांगत होते. मी कधीही विधानपरिषद सदस्य नव्हतो. मी काय छातीवर हात ठेऊन बोलणार आहे ? त्यामुळे त्यांनी राज्यातील 11 कोटी 97 लाख लोकांचे जनरल नॉलेज बिघडवू नये.

सभापती महोदय, ही चिंतेची बाब आहे की, आर्थिक पहाणी अहवालात 938 शाळा आणि 9000 शिक्षक वाढले. पण विद्यार्थी कमी होत चालले आहेत.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** सन्माननीय शिक्षण मंत्री उत्तर देण्यास सक्षम आहेत. सन्माननीय अर्थमंत्री महोदयांनी त्यांना मदत करण्याची आवश्यकता नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही सुध्दा शेतकऱ्यांची लेकरे आहोत. मी त्याच बाबीवर बोलत आहे. या तुकड्यांसाठी तरतूद झाली नाही, याबद्दल मी या ठिकाणी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक 52, पृष्ठ क्रमांक 79 अन्वये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी तरतूद करण्यात आली आहे. या राज्यात आदिवासी भागातील मुले शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपाययोजना आघाडी सरकारच्या काळात झालेल्या आहेत. त्यांच्यासाठी वसतीगृह सुरु करण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना ज्या सुविधा पुरवावयास पाहिजे त्या पुरविण्यात हे सरकार अपयशी ठरले आहे. जून महिन्यात शैक्षणिक वर्ष सुरु होते. जून महिना सुरु झाल्यापासून शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत या विद्यार्थ्यांना बुट दिले गेले नाहीत. स्वेटर दिले गेले नाही. वह्यांचे वाटप झाले नाही. यासाठी जी टेंडर काढण्यात आली आहेत ती रद्द करावी लागली आहेत. सकाळी आपण याबाबत निदेश दिले आहेत. परंतु, या आदिवासी विद्यार्थ्यांना अद्याप न्याय देण्याचे काम झालेले नाही. या माध्यमातून येणाऱ्या पुढील शैक्षणिक वर्ष सन 2016-2017 मध्ये या राज्यातील आदिवासी क्षेत्रातील वसतीगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, स्वेटर, बुट पुरविण्याचे काम सरकारने करावे, अशी मागणी मी या माध्यमातून करीत आहे.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे..........

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. परंतु, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्या बघितल्यानंतर त्यामध्ये कोठेही सामान्य लोकांचे प्रतिबिंब दिसत नाही. सामान्य जनतेच्या हितासाठी, शेतकऱ्यांच्या हितासाठी, शेत मजुरांच्या हितासाठी किंवा आमच्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या हितासाठी शासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. म्हणून मी खेद व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फक्त दोन-तीन मुद्यांवर बोलणार आहे. बाब क्र.17 मध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सन 2008-09, 2009-10 आणि 2010-11 या तीन वर्षाच्या उच्च माध्यमिकच्या जवळपास 936 पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी बऱ्याच शिक्षकांच्या काही तांत्रिक अडचणीमुळे शिक्षण उप संचालक कार्यालयाकडून मान्यता होऊ शकलेल्या नाहीत. आता त्या त्रुटींची पूर्तता होऊन तो मान्यतेचा विषय मार्गी लागेल, हा भाग वेगळा आहे. परंतु, नियमानुसार केलेल्या मान्यता, रोस्टरनुसार केलेल्या मान्यता, जाहिरातीच्या माध्यमातून केलेल्या नियुक्त्या अशी जवळपास 334 पदे आहेत. ही पदे सन 2003 पासून सन 2010-11 पर्यंतची आहेत. शासनाने डिसेंबर महिन्यात झालेल्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून या 334 पदांसाठी 13 कोटी 92 लाख 20 हजार रुपये मंजूर केले होते आणि ते फक्त एका वर्षासाठी होते. ते सन 2015-16 या वर्षासाठी होते. वास्तविक पाहता यापूर्वीही शासनाने निर्णय घेतलेले आहेत की, साधारणत: जेव्हा शासन अशा प्रकारचा मान्यता आदेश निर्गमित करते, तो आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून, आमची तर मागणी आहे की, जेव्हा पासून त्यांच्या नियुक्त्या झाल्या आणि जेव्हा पासून शिक्षण उप संचालकांकडून त्यांना मान्यता मिळाली तेव्हा पासून त्यांना पगार मिळाला पाहिजे. आपण त्याचा नंतर विचार करु शकतो. परंतु, किमान शासनाने ज्या दिवशी शासन निर्णय निर्गमित केला तेव्हा पासून तरी या शिक्षकांना वेतन मिळाले पाहिजे. आपण मागील पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून त्यासाठी एका वर्षाची तरतूद केली. 334 मान्यता प्राप्त पदांसाठी किमान त्यांच्या थकबाकीसाठी या अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद होऊ शकेल अशी, आमची अपेक्षा होती. परंतु, ती तरतूद झालेली नाही.

सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांना सुद्धा विद्यापीठाकडून मान्यता मिळते. त्यामध्ये काही शिक्षक कनिष्ठ महाविद्यालयातील आहेत तर काही शिक्षक वरिष्ठ महाविद्यालयातील आहेत. त्यांना मान्यता देण्याचे काम विद्यापीठाकडून, त्यांच्या संबंधित यंत्रणेकडून होत असते. शिक्षकांची नियुक्ती केल्यानंतर किती दिवसात मान्यता द्यायची, किती दिवसात निर्णय घ्यायचा हा विद्यापीठाचा किंवा शिक्षण विभागाचा प्रश्न आहे. परंतु, त्यांनी मान्यता दिल्या नंतर ज्या

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते.......

तारखेपासून त्यांच्या नियुक्तीला रीतसर मान्यता मिळालेली आहे तेव्हा पासून त्यांना पगार मिळायला हवा. त्यांना दोन-तीन वर्षे उशिरा मान्यता मिळाली हा त्यांचा दोष नाही. राज्यात असे अनेक शिक्षक, प्राध्यापक आहेत. परंतु, विशेषत: कोकण विभागातील अनेक शिक्षकांना त्यांचे वेतन मिळालेले नाही, याची शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे या वेतनाचा विचार करीत असताना ज्या मागण्या मान्य झालेल्या आहेत, ज्या शिक्षकांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत, ज्यांना शासन नियमितपणे वेतन देत आहे त्यांच्या बाबतीत शासनाने दोन गट पाडलेले आहेत. प्लॅनमधील शाळा, प्लॅनमधील शिक्षक किंवा नॉन प्लॅनमधील शिक्षक असे गट पाडलेले आहेत. शेवटी काही रक्कम उजव्या खिशातून द्यायची आहे तर काही रक्कम डाव्या खिशातून द्यावयाची आहे. शासन त्यांना पगार देतच आहे. परंतु, शाळांच्या बाबतीत, शिक्षकांच्या बाबतीत, ज्या शाळांना मान्यता आहे, ज्या शिक्षकांच्या रीतसर नियुक्त्या झालेल्य आहेत त्या प्लॅनमधील शिक्षकांना कधीही वेळेवर वेतन मिळत नाही. त्यांना तीन-चार महिने वेतन मिळत नाही. मला काल नंदुरबार येथील एका शिक्षकाचा फोन आला. त्यांनी मला सांगितले की, आम्हाला तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. मी त्यांना सांगितले की, आता शासनाकडे पैसे शिल्लक आहेत आणि शासनाने आदेश काढलेला आहे की, ज्या शिक्षणाधिकाऱ्यांकडून एक तारखेला वेतन मिळणार नाही, शिक्षणाधिकारी एक तारखेला शिक्षकांना वेतन देण्यामध्ये अपयशी ठरले तर आम्ही त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई करु, त्यांची विभागीय चौकशी सुरु करु. म्हणजे एका बाजूला आपण एक तारखेला वेतन न देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतो आणि दुसऱ्या बाजूला शासनाकडे निधी असूनही संबंधित शिक्षणांना तीन-चार महिने वेतन मिळत नसेल आणि तेही एकाच कारणासाठी की, त्या प्लॅनमधील शाळा आहेत. ज्यांना रेग्युलर वेतन मिळते त्या नॉन प्लॅनमधील शाळा आहेत. म्हणून प्लॅन आणि नॉन प्लॅनमधील जी गडबड आहे किंवा हे जे विभाजन आहे ते केव्हा तरी धोरणात्मक निर्णय घेऊन किमान ज्या शिक्षकांना मान्यता आहे त्यांच्या वेतनाचा विषय मार्गी लागण्याची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आपण वेतनासाठी आणि वेतनेतर अनुदानासाठी पैसे देतो. शासनाची शाळांना मदत करण्याची अपेक्षा आहे. आपण शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करतो. राज्य

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते........

शासनाकडून त्यासाठी वेगवेगळे उपक्रम किंवा योजनांची अंमलबजावणी केली जाते. आपल्याला प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडवायचा आहे. त्यासाठी शासनाकडून वेगवेगळे उपक्रम राबविले जातात, वेगवेगळ्या प्रकारे निधी दिला जातो. तो वेतनाच्या स्वरुपात असतो, वेतनेतर अनुदानाच्या स्वरुपात असतो. विशेषतः आपण प्राथमिक शाळांसाठी वेतनेतर अनुदान देतो. परंतु, संबंधित अधिकारी शासनाने दिलेले अनुदान संबंधित शाळांपर्यंत पोहोचवीत नसतील आणि त्या शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी जर ते अधिकारी हलगर्जीपणा करीत असतील, दुर्लक्ष करीत असतील तर त्याची देखील गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. सन 2014-15 या शैक्षणिक वर्षात ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्याला सादील खर्चाचे 12 लाख रुपये अनुदान प्राप्त झाले होते. शाळांना तो निधी उपक्रम राबविण्यासाठी उपयोगात आणता आला असता. परंतु, भिवंडीच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांनी प्राप्त झालेले 12 लाख रुपये अनुदान खर्चच केले नाही. शेवटी 31 मार्च रोजी तो निधी शासनाकडे समर्पित करावा लागला. म्हणजे, एका बाजूला शाळांच्या विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या उपक्रमांसाठी शासन अनुदान देते आणि संबंधित अधिकारी तो निधी योग्य प्रकारे खर्च करीत नसतील, विद्यार्थ्यांसाठी तो निधी खर्च करीत नसतील तर याची सुद्धा गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्या शाळांना वेतन अनुदानासाठी पात्र ठरविले आहे त्यांचाही भविष्यात वेतनासाठी विचार व्हावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु........

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल जो आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री शरद रणपिसे, जयंत प्र.पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.अनिल सोले, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.नागो पुंडलिक गाणार, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, किरण पावसकर, सतेज उर्फ बंटी पाटील, ख्वाजा बेग, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री रामराव वडकुते, सुभाष झांबड, विक्रम काळे, हरिसिंग राठोड आणि ॲड.जयदेव गायकवाड यांनी आपले मत व्यक्त केले आहे. सन्माननीय सदस्यांनी काही चांगल्या सूचना केल्या आणि थोडी टिकाही झाली. राज्य पुढे गेले पाहिजे या संदर्भात जरी कोणत्या मार्गाने पुढे जावे याबद्दल मतमतांतरे असली तरी सर्वसाधारणपणे सर्वांचा कल असा होता की, राज्यासमोर असलेले शेतीचे संकट असेल किंवा इतर संकटे असतील यातून अधिक चांगल्या प्रकारे काम झाले पाहिजे. आजच आर्थिक सर्वेक्षणाचा अहवाल सभागृहाला सादर झालेला आहे.

...G-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

अतिशय विपरित परिस्थितीत देखील आपले राज्य चांगल्या प्रकारे वाटचाल करीत आहे, हे या अहवालातून आज स्पष्ट झाले आहे. विशेषतः शेतीच्या क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात दुष्काळ आणि तूट आली असताना राज्याचा जीएसडीपी सन 2014-15 च्या तुलनेत मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. 5.8 टक्क्यांवरुन राज्याचा जीएसडीपी 8 टक्क्यांपर्यंत गेलेला आहे. तो देशाच्या जीएसडीपी किंवा जीडीपी पेक्षा जास्त आहे. पहिल्या दोन तीन राज्यात आपल्या जीडीपीची ग्रोथ आलेली आहे. विशेषतः संपूर्ण जगात औद्योगिक मंदी असताना औद्योगिक क्षेत्रातील वृध्दी सातत्याने कमी होत असताना यावर्षी 4.6 टक्क्यांवरुन औद्योगिक क्षेत्रातील विकास दर 6.2 टक्क्यांपर्यंत गेलेला आहे. ही बाब देखील अत्यंत महत्वाची आहे. हे होत असताना कृषीचे संकट अत्यंत भीषण आहे. कृषीचा ग्रोथ रेट मागील वर्षी निगेटीव्ह 16 टक्के होता, यावर्षी देखील तो निगेटीव्ह असून 2.7 टक्क्यांपर्यंत आलेला आहे. कृषी क्षेत्रात सातत्याने चार ते पाच वर्षापासून निगेटीव्ह ग्रोथरेट मुळे या क्षेत्रावरील संकट वाढत आहे. त्याची चिंता आपण सर्व लोक या ठिकाणी सातत्याने करीत आहोत. राज्य सरकारने शेतीच्या क्षेत्रात अनेक महत्वपूर्ण योजना आणल्या आहेत. या क्षेत्राला अधिक शाश्वत कसे बनविता येईल. गेले अनेक वर्षे आपण कृषी संकटातून जात आहोत, त्यावर आपणाला मात कशी करता येईल याचा प्रयत्न सुरु करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, कृषी समृध्दी योजनेबाबत उस्मानाबाद व यवतमाळ येथे पायलट प्रोजेक्ट घेण्यात आलेला आहे. माननीय उच्च न्यायालयाने पायलट प्रोजेक्टच्या संदर्भातील प्रेझेंटेशन घेतले आहे. त्यामध्ये त्यांनी काही सूचना जरुर केल्या आहेत. दोन्ही ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या निमित्ताने वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन सुरु केले होते. आत्महत्या ग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे त्यांच्याकरिता व्यवस्था उभ्या केल्या पाहिजेत. म्हणून आपण हे मिशन तयार केले. दुर्दैवाने सन 2007 पासून यावर पूर्णवेळ मिशन डायरेक्टर नव्हता. आपले सरकार आल्यानंतर त्यावर पूर्णवेळ मिशन डायरेक्टर म्हणून किशोर तिवारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये नवीन इन्सेटीव्ह घेतले आहे. गेल्या अनेक अहवालानुसार अन्न सुरक्षा योजना शेतकऱ्यांना लागू केली पाहिजे ती लागू करण्यात आली आहे. 68 लाख शेतकऱ्यांना तीन रुपये किलो दराने तांदूळ व दोन रुपये किलो दराने गहू देण्यास

....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

सुरुवात करण्यात आलेली आहे. आरोग्य सेवेला अधिक ॲक्सेस मिळावा यासाठी जीवनदायी आरोग्य योजनेचा विस्तार करण्यात आला. शेतकऱ्यांकरिता विनाअट ती लागू करण्यात आली आहे. त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कामे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जाची पुनर्रचना तीन वर्षासाठी करण्यात येत होती ती पाच वर्षासाठी करण्यात आलेली आहे. पहिल्या वर्षातील कर्जाचे पूर्ण व्याज राज्य सरकार भरणार आहे. पुढील चार वर्षाचे अर्धे व्याज राज्य सरकार भरणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम राज्य शासन करीत आहे. व्याजाचा बोजा विचारात घेतला तर 700 कोटी रुपये आणि पुनर्गठनाकरिता असे दोन्ही मिळून 1500 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे अशी मागणी सातत्याने समोरच्या सन्माननीय सदस्यांकडून करण्यात येते. हे सरकार कर्जमाफीच्या विरोधात नाही. कर्जमाफी कशी केली पाहिजे, कधी केली पाहिजे, यासंदर्भात तुमच्या आणि आमच्या मनात अंतर आहे, ते अंतर का आहे तर सन 2008 मध्ये आघाडी शासनाने कर्जमाफी केली होती. 2008 मध्ये एकूण सर्व बँकाचे जे कर्जमाफ केले ती रक्कम 6910 कोटी रुपये होती. 4972 कोटी रुपये म्हणजे जवळपास 5000 कोटी रुपये हे जिल्हा बँकांचे होते. 6910 कोटी रुपयांपैकी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यासाठी किती कर्ज माफ झाले.. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब मी आपणाला सांगतो की, 6910 कोटी रुपयांपैकी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांना फक्त 944 कोटी रुपये मिळाले. 6000 कोटी रुपये आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांच्या बाहेर गेले आहेत. आघाडी सरकारने ही कर्जमाफी केल्यानंतर याचा परिणाम काय झाला त्याचे मी आपणाला उदाहरण देतो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे या ठिकाणी उपस्थित नाहीत. पिंपरी बुटी गावाला मी गेलो होतो, त्या ठिकाणी काही योजना केल्या होत्या. दरम्यानच्या काळात एक बातमी आली होती की, पिंपरी बुटीच्या अमुक अमुक शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध झाले नाही. तो शेतकरी मुख्यमंत्र्यांना भेटला होता, तरी त्याचा काही फायदा झाला नाही. लगेच मी म्हटले की, असे कसे झाले, त्यावेळी मी या शेतकऱ्याची माहिती घेतली. 2009 मध्ये त्याला कर्जमाफी मिळाली व लगेच 2010 मध्ये तो कर्जबाजारी झाला. 2010 मध्ये कर्जबाजारी झाल्यानंतर तीन वर्षात कर्ज परत करा व पहिल्याच वर्षाचे व्याज लावा. यामुळे त्याचे

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

कर्ज वाढून 1 लाख 40 हजार रुपये झाले होते. आता मला सांगा की, कर्जमाफी हा जर रामबाण उपाय असता तर आघाडी शासनाने कर्जमाफी केल्यानंतर तत्काळ पुढच्याच वर्षी हा शेतकरी कर्जबाजारी कसा झाला. इतकेच नव्हे तर कर्जमाफीचा आपण आत्महत्यांशी संबंध लावतो. मी असे म्हणत नाही की, कर्जमाफी केल्याने आत्महत्या बंदच होत नाहीत. काही ना काही प्रमाणात आत्महत्या बंद होतील, होणार नाही असे मी म्हणत नाही. कारण अनेक उपायामधील तो एक उपाय आहे. मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देतो की, संसदेमध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना कृषी मंत्री माननीय श्री.राधे मोहनसिंहजी यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र सरकारने आम्हाला दिलेल्या माहितीनुसार सर्वात जास्त आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. आपल्या लोकांनी त्यावर बराच आक्षेप घेतला होता. मी या विषयाच्या तपशीलात गेलो, त्यावेळी माझ्या असे लक्षात आले की, आपण जी माहिती पाठविली होती ती ज्या फॉरमॅटमध्ये गेली त्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी तसे उत्तर दिले होते. मी केवळ माझा मुद्दा मांडण्यासाठी काही आकडेवारी देत आहे. आत्महत्यांच्या आकड्यांच्या संदर्भात स्पर्धा होऊ शकत नाही. आमच्या काळात जास्त झाल्या की, तुमच्या काळात जास्त झाल्या अशी स्पर्धा होऊ शकत नाही. एक जरी आत्महत्या झाली तरी आपणा सर्वांसाठी ती शरमेची बाब आहे. सन 2004 मध्ये 4147 आत्महत्या झाल्या होत्या. सन 2006 मध्ये 4453 आत्महत्या झाल्या होत्या. सन 2007 मध्ये 4238 आत्महत्या झाल्या होत्या. आघाडी सरकारने कर्जमाफी केल्यानंतर सन 2010 मध्ये 3141 आत्महत्या झाल्या होत्या. हे माझे आकडे नाहीत, या देशात कोणत्याही प्रकारच्या आत्महत्यांकरिता प्रमाण हे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो आहे. यामध्यै पृथ:क्करण केले जाते, एकूण आत्महत्या किती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या किती, कोणत्या राज्यात किती आत्महत्या झाल्या. तोच रेकॉर्ड अंतिम समजला जातो.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

त्या रेकॉर्डनुसार 2010 साली 3141, 2011 साली 3337, 2012 साली 3786 आत्महत्या झाल्या आहेत. याचा अर्थ आपण तुलना केल्यास कर्जमाफीनंतर 2012 साली सर्वात जास्त आत्महत्या झाल्या आहेत. 2013 साली 3146 आणि 2015 साली 3228 आत्महत्या झाल्या आहेत. आपण कर्जमाफी हा एकमेव रामबाण उपाय म्हटला तरी कर्जमाफी झाल्यानंतर वर्षभरात ते कर्जबाजारी झाल्याचे दिसतात. कर्जमाफी झाल्यानंतर देखील आत्महत्यांचा आकडा कमी अधिक प्रमाणात सारखा दिसतो, कधी वाढलेला दिसतो. यामागील कारण काय आहे ? मी एक गोष्ट अतिशय स्पष्टपणे सांगतो की, आपण कितीही वेळा कर्जमाफी केली तरी, जोपर्यंत शेतकऱ्यांमध्ये कर्ज परत करण्याची क्षमता तयार करीत नाही तोपर्यंत शेतकरी कर्जबाजारीच राहील. कर्जमाफी आणि कर्जमुक्ती यात एवढाच फरक आहे की, शेतकरी कर्जमुक्त होऊ शकेल अशी त्याला कर्जमाफी दिली पाहिजे. म्हणजे त्याची क्षमता इतकी वाढवली पाहिजे की, त्याच्यामध्ये कर्ज परत करण्याची क्षमता तयार झाली पाहिजे. अन्यथा 2008 साली कर्जमाफी दिल्यानंतर तो 2009 साली कर्जबाजारी, 2009 साली कर्जमाफी दिल्यानंतर तो 2010 साली कर्जबाजारी राहील. वातावरणातील बदलामुळे ज्या ठिकाणी शेतीवर संकट आहे, शाश्वत सिंचन नाही तेथे आत्महत्या होत आहेत. जेथे शाश्वत सिंचन आहे तेथील शेतकरी एक नाही तर दुसरे, दुसरे नाही तर तिसरे पीक घेत आहे. यामुळे एखाद्या वर्षी निसर्गाची अवकृपा झाली तरी तो जीवंत राहतो, टिकतो व काही प्रमाणात कर्जही परत करतो. म्हणून याचे मूळ कर्जमाफीत नाही. याचे मूळ असे आहे की, शेतकऱ्यांना सक्षम करणे, त्यांना सिंचनाची व्यवस्था उपलब्ध करुन देणे, वीज देणे. तसेच संरक्षित पध्दतीची व्यवस्था उभी करुन देणे. अशा परिस्थितीत तुम्ही त्याला कर्जमाफी दिल्यास तो कर्जमुक्त होईल. त्यानंतर त्याच्यावर पुन्हा कर्जबाजारी होण्याची वेळ येणार नाही. माननीय श्री.पवार साहेब यवतमाळचा दौरा करुन आल्यांनंतर त्यांनी काही महत्त्वाच्या ऑबझर्व्हेशन्स दिल्या. माननीय विरोधी पक्षनेता त्या ऑबझर्व्हेशन्स तुमच्याकरिता आणि आमच्याकरिता मार्गदर्शक आहेत. ते असे म्हणाले होते की, मी केंद्र व राज्य सरकारवर टिका करणार नाही. शेतीसारख्या क्षेत्रात बदल घडवून आणण्याकरिता इतका कमी कालावधी फार छोटा असतो. त्यानंतर ते असे म्हणाले की, शेतकऱ्यांना आम्ही एका झटक्यात 70 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. परंतु त्यातूनही आत्महत्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2

श्री.देवेंद्र फडणवीस....

थांबल्या नाहीत. सर्वांसाठी कर्जमाफीची मागणी करणे हे सर्वथा गैर आहे, त्यावर दुसरे उपाय शोधल्याशिवाय तो सक्षम होऊ शकणार नाही. मी देखील हाच मुद्दा सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. सध्या आत्महत्याग्रस्त क्षेत्रातील फायनान्शिएल इन्स्टिटच्यूट नेटवर्क उद्ध्वस्त झाले आहे. मी आपल्याला एक उदाहरण सांगतो. मी बुलढाणा जिल्ह्यात गेलो होतो. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बुडाली. त्यानंतर बुलढाणा जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकाचे पेनीट्रेशन **ना**ही. आपण फक्त कागदोपत्री जोडतो की, या तालुक्याने या शाखेत जायचे. परंतु ही गोष्ट शेतकऱ्यांसाठी सोपे असते का ? शेतकरी त्या तालुक्यात गेल्यावर त्याला कर्ज मिळणे सोपे असते का ? परंतु तेथील फायनान्शिएल इन्स्टिटच्यूट नेटवर्क उद्ध्वस्त झाले आहे. त्याला कोणताही सपोर्ट नाही. राज्य सरकारने जवळपास 524 कोटी रुपये देवून नागपूर बँक, वर्धा बँक आणि बुलढाणा बँक पुनरुज्जीवित करण्यासाठी घेतल्या आहेत. काल आपल्याला नागपूर बँकेचे लायसन्स मिळाले. तसेच उर्वरित दोन बँकांचे लायसन्स मिळणार आहे. आपण जोपर्यंत इन्स्टिटच्युशनल फ्रेमवर्क उभे करणार नाही, कर्जाची व्यवस्था नीट करुन देणार नाही, तोपर्यंत ज्यांच्यावर कर्ज आहेत आणि ते कर्जबाजारी झाले आहेत असे 30 टक्के लोक आहेत. 40 ते 60 टक्के लोक कर्जाच्या बाहेर आहेत, त्यांना कधीही कर्ज मिळाले नाही, असे खातेदार आहेत. आपल्याला त्यांचा देखील विचार करावा लागणार आहे. मागील वर्षी अतिशय वाईट अवस्थेत जे कर्जदार खातेदार आहेत, त्यांच्या तुलनेत 2014 मध्ये जवळपास साडेसहा लाख जास्त शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन दिले 5.33 लाख शेतकऱ्यांकरिता 3504 कोटी रुपयांचे रिशेड्यूलमेंट करुन दिले. 2012-13 आणि 2013-14 मध्ये जे शेतकरी डिफॉल्टर झाले होते. त्यानंतर ते क्रेडिट सिस्टिमच्या बाहेर फेकले गेले. अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा झाला नाही. शासनाने त्यांना पुन्हा क्रेडिट सिस्टिममध्ये आणून त्यांच्याकरिता 2439 कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिले. अशा पध्दतीने 2012-13 मध्ये 4 लाख 42 हजार खातेदार क्रेडिट सिस्टिमच्या बाहेर गेले होते, त्यांना क्रेडिट सिस्टिममध्ये आणण्याचे काम करण्यात आले. शासनाने वेगवेगळ्या प्रकारची सिंचन क्षमता तयार करण्याचे काम हाती घेतले. शासनाने जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत 6 लक्ष 10 हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन क्षमता तयार केली. त्यापैकी विदर्भ आणि मराठवाड्यात 3.42 लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचन क्षमता

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

तयार करण्यात आली. अशा प्रकारे कृषी संकटाच्या एरियात सिंचन क्षमता तयार केली आहे. त्याकरिता जवळपास 2 हजार कोटी रुपये खर्च केले आणि पुन्हा ॲडिशनल पैसे दिले आहेत. तसेच शासनाने मागेल त्याला शेततळे ही योजना आणली. मी लातूर जिल्ह्याच्या दौ-यावर गेलो असता सन्माननीय सदस्य श्री.संभाजी निलंगेकर-पाटील यांनी मला एका गावात नेले. त्या गावात दुष्काळामुळे सर्व शेतकऱ्यांची शेती जळाली होती, त्यांना कोणतेही उत्पन्न नव्हते. परंतु त्या परिस्थितीत 3-4 शेतकऱ्यांची शेती हिरवी दिसून आली. यावर त्यांना विचारणा केली असता त्यांनी आम्हाला शेततळे दाखविले आणि सांगितले की, 4 दिवसाचा पाऊस आल्यामुळे शेततळ्यात पाणी आले. यामुळे आम्ही संरक्षित सिंचन देऊ शकलो व आमची शेती वाचली. यानंतर शासनाने अनेक समित्यांचा अहवाल बघितला, विविध तज्ज्ञांसमवेत चर्चा केली आणि त्यातून मागेल त्याला शेततळी देण्याची योजना शासनाने आणली. मला सदनाला सांगितले पाहिजे, फक्त 6 दिवसांमध्ये 50,204 शेतकऱ्यांनी शेततळ्यांसाठी अर्ज केला. हा अर्ज ऑन लाईन पध्दतीने करायचा होता. मला एका गोष्टीचे समाधान आहे की, मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात सदर अर्ज प्राप्त झाले आहेत. त्या तुलनेत विदर्भातून कमी अर्ज प्राप्त झाले, त्यांच्याकडून आणखी अर्ज आले पाहिजेत. मराठवाड्यात संभाजी नगर जिल्ह्यातून 4 ते 5 हजार, बीड जिल्ह्यातून तीन ते साडेतीन हजार, लातूर जिल्ह्यातून तीन ते साडेतीन हजार अर्ज आले आहेत. अशा प्रकारे सदर योजनेला मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. काही लोकांनी असा आक्षेप घेतला की, तुम्ही 50 हजार रुपये देणार, यात शेततळे कसे होणार ? या संदर्भात दोन योजना आहेत. नरेगा अंतर्गत असलेली योजना जशीच्या तशी सुरु आहे. त्या योजनेत कोणताही बदल केलेला नाही. ही योजना पूर्णपणे मशीनरीच्या मदतीने करायची आहे. यापूर्वी या संदर्भात वेगवेगळ्या स्ट्रॅटामध्ये प्रयोग करण्यात आले, त्याकरिता किती पैसे लागतात, किती वेळ लागतो, किती मजूर लागतात, किती मशीन्स लागतात, अशा प्रकारचा प्रयोग करुन त्या अंती 50 हजार रुपयांचा आकडा ठरविला आहे. पहिली 4 प्रकारची शेततळी आहेत. आपल्या पैकी कोणीही मला सांगितल्यास आपल्या शेतात आणून तेथे शेततळी तयार करुन दाखविता येईल. आम्ही ती तयार करुन घेतली आहे. मी त्या पलीकडे सांगू इच्छितो की, हा आमच्याकडील प्रेस्ट्रीजचा इश्यु नाही.

यानंतर II-1 .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

जर याबाबत कोणाच्या काही सूचना असतील आणि आवश्यकता वाटली तर त्यात बदल करता येऊ शकतो. मुळात उद्देश हा आहे की, शेतकऱ्यांना शेततळे मिळाले तर संरक्षित सिंचन मिळेल, संरक्षित सिंचन मिळाले तर शेतकरी दुष्काळाच्या परिस्थितीत देखील उत्पादन घेऊ शकेल. कदाचित दोन पिके घेऊ शकेल आणि त्यातून माझा शेतकरी कर्जफेड करण्याच्या परिस्थितीत येईल. या संदर्भात देखील कार्यवाही केली आहे.

सभापती महोदय, अनुशेषाच्या क्षेत्राबद्दल बोलले जाते. यामध्ये पाच पट भूसंपादनाची किंमत दिल्यामुळे जवळजवळ 2148 हेक्टर जमीन ताब्यात घेता आली. मागील कोणत्याही वर्षाचा हिशोब लावला तर त्या वर्षाच्या अडीच पट जमीन भूसंपादन करु शकलो. सिंचनावर करोडो रुपये खर्च केला जातो. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे राज्याचे सिंचन मंत्री होते. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, त्यांच्या सरकारने विदर्भामध्ये 2012-13 मध्ये सिंचनावर एकूण 867 कोटी रुपये खर्च केला. 2013-14 मध्ये 881 कोटी रुपये खर्च केला. आम्ही सत्तेवर आल्यानंतर सरकारने 2015-16 मध्ये विदर्भामध्ये सिंचनावर 2023 कोटी म्हणजे 881 कोटी रुपयांच्या तुलनेत अडीच पट खर्च केला. मला याची कल्पना आहे की, यामुळे ही परिस्थिती बदलणार नाही. पण सरकार गंभीरतेने ज्या भागामध्ये अनुशेष आहे त्या भागामध्ये निधीची पळवापळवी बंद करुन निधी खर्च खर्च करु लागले आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, जून, 2014 पर्यंत एका-एका वर्षाचा हिशोब लावला तर केवळ 3564 हेक्टर एवढी जमीन सिंचनाखाली आणू शकलो. यावर्षी 9043 हेक्टर म्हणजे अडीच पट जमीन सिंचनाखाली आणू शकलो.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान महाराष्ट्रात आले होते तेव्हा घोषित केलेल्या धडक विहिरी, सिंचन विहिरी आपण पूर्ण करु शकलो नाही. मागच्या वेळी मी या सभागृहात उत्तर देताना सांगितले होते की, 3 वर्षात 1 लाख विहिरी पूर्ण करु त्यावेळी अनेकांना वाटले की, केवळ सांगण्याकरिता ही आकडेवारी आहे. मला सांगितले पाहिजे की, पूर्वी वर्षाला 12 ते 16 हजार विहिरी पूर्ण केल्या जायच्या. 2015-16 मध्ये आतापर्यंत 33 हजार विहिरी पूर्ण केल्या आहेत. वर्ष संपता संपता ही आकडेवारी 40 हजारपर्यंत जाईल. म्हणजे 3 वर्षात 1 लाख विहिरी करायच्या आहेत. पहिल्याच वर्षी 40 हजार विहिरी पूर्ण करीत आहोत. यातील विहिरी मोठया प्रमाणात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

2006 साली माननीय पंतप्रधान आले त्यावेळी घोषित केलेल्या आहेत. तरीही 14 हजार पूर्ण झालेल्या नाहीत. यासह शेतकऱ्यांना केवळ पाणी देऊन चालणार नाही. वीज देखील उपलब्ध करुन द्यावी लागेल.

सभापती महोदय, कृषी पंपाच्या संदर्भात विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अनुशेष आहे. मागील 4 वर्षापासून कनेक्शन मिळालेले नाही. आम्ही घोषणा केली होती. मराठवाड्यातील 2015 पर्यंतचे पेड पेंडिंग मार्च, 2016 पर्यंत पूर्ण करु. हे पेड पेंडिंग पूर्ण करताना केवळ लाईन पोहोचली तेथे नव्हे तर लाईन गेली नाही तेथे पायाभूत सुविधा देण्याचा प्रयत्न केला. 899 कोटी रुपये पहिल्यांदा दिले, नंतर 220 कोटी रुपये दिले. आतापर्यंत मराठवाड्याकरिता 581 कोटी रुपये फक्त पायाभूत सुविधांकरिता दिले. याचा परिणाम असा झाला की, आपण दरवर्षी पंपांचे उर्जितीकरण करीत होता त्यापेक्षा जास्त एका वर्षात आम्ही करु शकलो. एकूण 1.79 लाख कृषी पंपांचे उर्जितीकरण एका वर्षात केले. पेड पेंडिंगच्या संदर्भात विदर्भ आणि मराठवाड्याचा विचार केला तर 99 हजार म्हणजे चार पट कृषी पंपांचे उर्जितीकरण केले. 4-4 वर्षापासून पेड पेडिंग होते. अजूनही मार्च, 2015 चे 4 हजार पेड पेंडिंग बाकी आहेत. आमचा हा प्रयत्न आहे की, हे 4 हजार पेंडिंग मार्चपर्यंत पूर्ण करायचे. काही ठिकाणी काम होऊ शकले नाही. कारण काही ठिकाणी कंत्राटदाराची अडचण आहे तर काही ठिकाणी साईटची अडचण आहे.

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाडयातून आम्हाला सिंचन द्या, आम्हाला वीज द्या अशी सातत्याने मागणी केली जात होती. चार-चार वर्षात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या पत्रात त्यांनी हेच लिहिले होते की, तीन वर्षापासून कृषी पंपाचे पैसे भरले परंतु पंप मिळाला नाही. 1 वर्षात आम्ही 1 लाख पंप देऊ असा आम्हाला विश्वास आहे. जूनपर्यंत आमचा प्रयत्न आहे, उर्वरित 2015 पर्यंतचे पेड पेंडिंग पूर्ण केले पाहिजेत. आजच मी माननीय अर्थमंत्र्यांशी चर्चा केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, लोकांना विश्वास वाटू लागला आहे. लोकांनी अर्ज करणे बंद केले होते. सहा महिन्यात किती अर्ज यावेत? 70 हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. म्हणजे लोकांना आता पैसे भरल्यानंतर आपल्याला कनेक्शन मिळते असा विश्वास वाटू

श्री.देवेंद्र फडणवीस.....

लागला आहे. त्या 70 हजार अर्जांकरिता आपण व्यवस्था उभी केली आहे. अर्थमंत्री बजेटच्या भाषणामध्ये याबद्दल उहापोह करतील. पण मागील बजेटमध्ये त्यांनी 900 कोटी रुपये देताना आश्वासन दिले होते त्याची पूर्तता निश्चितपणे करुन दाखविली आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात यापूर्वी चर्चा झाली, पुन्हा या ठिकाणी चर्चा ठेवण्यात आली आहे. एक मुद्दा सातत्याने दोन्ही सभागृहात मांडला गेला. विदर्भातील काही जिल्हयांमध्ये आणेवारी 50 टक्क्यापेक्षा कमी येऊनही त्या ठिकाणी दुष्काळ जाहीर झाला नाही. त्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले की, दुष्काळ जाहीर करण्याकरिता चार निकष आहेत. केवळ हैड्रोग्राफीक किंवा ॲग्रोग्राफीक डाऊटवर दुष्काळ जाहीर करता येत नाही. टेक्नीकल ग्राऊंडवर दुष्काळ जाहीर होऊ शकला नाही. माननीय सदस्यांची मागणी होती की, आमच्या भागातील शेतकरी अडचणीत आहे. तांत्रिक कारण बाजूला ठेवून आम्ही निर्णय घेतला. जरी तांत्रिकदृष्टया दुष्काळ घोषित करता येत नसला तरी शेतकरी अडचणीत आहे हे पाहून 1 हजार कोटी रुपयांचे वेगळे पॅकेज कापूस, धान आणि सोयाबीन पिकाकरिता दिले. त्या शिवाय कर्जाचे पुनर्गठन असेल किंवा इतर आवश्यक गोष्टी आहेत त्या विशेष बाब म्हणून देण्याचा निर्णय राज्य सरकार घेत आहे. त्यामुळे शेतकरी ज्यावेळी अडचणीत येतो त्यावेळी तांत्रिक कारणे न सांगता त्याच्या मागे उभे राहिले पाहिजे अशा प्रकारची कार्यवाही सरकारच्या माध्यमातून झालेली आहे.

सभापती महोदय, अनेक माननीय सदस्यांनी मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्र संदर्भात मुद्दा मांडला आहे. हे मेक इन इंडिया किंवा मेक इन महाराष्ट्र कशाकरिता आहे? एखादा नारा सुचला आणि बोललो याकरिता नाही. आज आपल्या महाराष्ट्रामध्ये 50 टक्के लोकसंख्या 25 वर्षाच्या आतील आहे. 5 कोटीपेक्षा अधिक लोक 25 वर्षाच्या आतील आहेत. ही तरुणांची लोकसंख्या शिकत आहे, टेक्नीकल नॉलेज घेत आहे. तांत्रिकदृष्टया संपन्न असलेले हे एवढे मोठे मनुष्यबळ आपले शेती क्षेत्र सामावून घेऊ शकत नाही. उद्या जर या लोकांच्या हाताला काम देऊ शकलो नाही तर एवढी मोठी तरुणाईची लोकसंख्या, ज्याला आपण डेमोग्राफीक डिव्हीडंड म्हणतो ती डेमोग्राफीक डिझास्टरमध्ये परिवर्तित होईल. सुदैवाने जागतिक अर्थव्यवस्थेने आपल्याला काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. जगातील विकसित राष्ट्रामधील वयाची स्थिती वार्धक्याकडे चालली आहे. जेवढ्या डेव्हलप इकॉनॉमी आहेत त्यांना मनुष्यबळाचा तुटवडा जाणवत आहे.

नंतर 2जे.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

त्यांची अर्थव्यवस्था स्टॅगनंट होत आहे. जपानचे सरासरी वय 48 कडे गेलेले आहे. वेस्टर्न युरोपचे सरासरी वय 41 कडे गेलेले आहे. इस्टर्न युरोपचे वय 44 कडे गेलेले आहे. चीनचे वय 37 वर्षाकडे आणि अमेरिकेचे वय 39 वर्षाकडे गेलेले आहे. त्याच वेळी आपल्या देशात सरासरी वय 25 ते 26 वर्षाचे आहे. जगाला मानव संसाधनाची आवश्यकता आहे, उत्पादनाची आवश्यकता आहे. गेली 20 वर्ष चीनने जगाची फॅक्टरी म्हणून काम केले. 20 वर्ष जगातील उत्पादन हे चीन मधून व्हायचे. पण आता डेमोग्राफी आणि अर्थव्यवस्थेने चीनची ही संधी काढून घेतलेली आहे. आज चीनमध्ये डेमोग्राफीचा क्रम उलटा चालला आहे. आज तेथील राहणीमानात बदल होत चालला आहे. आज त्यांना मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे तेथे रिसेशन आलेले आहे. म्हणून जग एक नवीन डेस्टीनेशन शोधत आहे. जगाला एक नवीन फॅक्टरी तयार करावयाची आहे. ती आज तयार करण्याची क्षमता भारतामध्ये आहे. कारण भारतातील 50 टक्के लोकसंख्या तरुण आहे. टेक्नॉलॉजी समजणारी आहे. ही संधी आपण प्राप्त करुन घेतली नाही तर आपण करंटे ठरु. याचे कारण अशा प्रकारची लोकसंख्येची रचना ही 150, 200 वर्षात कधी तरी प्राप्त होते. जगाचा इतिहास आहे की, डेमोग्राफीक डिव्हडंड स्टेजमध्ये विकसनील राज्यांचा विकास झालेला आहे. मेक इन इंडिया किंवा मेक इन महाराष्ट्र याच्या पाठीमागचे कारणच हेच आहे की आपण आपली ताकद जगाला दाखविली नाही, आपली क्षमता दाखविली नाही, आपली संधी दाखविली नाही तर जग आपल्याकडे येणार नाही. मेक इन महाराष्ट्राच्या माध्यमातून हेच करण्याचा प्रयत्न आपण केला आहे. पण अनेक लोक विचारतात की, आमच्या शेतकऱ्याला मेक इन महाराष्ट्रामध्ये जागा आहे का ? त्यांचा हा प्रश्न योग्य असा आहे. शेतकऱ्याशिवाय मेक इन महाराष्ट्र कसा काय होऊ शकेल. आपण माननीय पंतप्रधानांच्या समोर तीन करार केले. पहिला करार कोकाकोला-जैन इरिगेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने संत्रा प्रक्रिया प्रकल्पासंबंधात झाला आहे. यामध्ये संत्रे विकत घेऊन परिणामकारक ज्युसिंग करुन, ब्रांडींग करुन त्याचे मार्केटिंग करण्यात येणार आहे. दुसरा करार आपण रेमंड सोबत केला. आपण इंटिग्रेटेड

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

टेक्सटाईल पार्क केले आहे. कापसापासून कापडापर्यंत सर्व येथे होणार आहे. या इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क मध्ये अक्षरशः कापासापासून कापडापर्यंत सगळे उद्योग आलेत. पण यात अँकर उद्योग हा रेमंडचा आला आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्याला न्याय द्यावयाचा असेल तर कापसावर व्हॅल्यू ॲडिशन केले पाहिजे. कापसापासून ते कापडापर्यंत व कापडापासून फॅशन पर्यंत सगळ्या गोष्टी या एका ठिकाणीच झाल्या पाहिजेत असा विचार आम्ही केला आहे. कोणी तरी विचारले की, मेक इन इंडियामध्ये आमच्या आदिवासीला जागा आहे काय ? तो कुठे आहे ? याच मेक इन महाराष्ट्र, मेक इन इंडियामध्ये पालघर जिल्ह्यामध्ये पहिले वारली क्लस्टर तयार केले आहे. वारली आर्टचे जेवढे आर्टिस्ट आहेत त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून 80 कोटी रूपये केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून देऊन हे क्लटर आपण विकसित करीत आहेत. या माध्यमातून आमचा जो गरीब आदिवासी आहे त्यालाही मार्केटशी लिंकेज मिळेल. त्याला आम्ही वारली हाट असे नाव दिले आहे. जशी दिल्ली हाट आहे तशी वारली हाट तयार केली आहे. आपण जे पॅव्हेलियन तयार केले होते त्यात वारली क्लस्टरचा एक भाग ठेवला होता. ते काम विदेशी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर पाहिले व त्याची प्रशंसा केली. त्यामुळे याकडे केवळ टीकेने पाहू नये असे मला वाटते. ही काळाची गरज आहे. आज गुंतवणूक आपल्याकडे आणल्यामुळे रोजगाराची निर्मिती होणार आहे. मेक इन महाराष्ट्रामुळे आयटी पॉलिसी केली, प्रोक्युअरमेंट पॉलिसी केली, रिटेल पॉलिसी केली, इलेक्ट्रॉनिक आणि फॅब पॉलिसी केली. एस.सी., एस.टी.उद्योजकता प्रोत्साहन धोरण केले. आपण पहिल्यांदा एस.सी., एस.टी.उद्योजकांसाठी थेट खरेदी करण्याचे धोरण आपल्या राज्यात आणले आहे. सिंगल विंडो सिस्टीम आपण राज्यात आणली. या माध्यमातून आपल्या राज्यात जास्तीत जास्त उद्योग आले पाहिजेत असा प्रयत्न आम्ही केला आहे.

इलेक्ट्रॉनिक आणि फॅब पॉलिसी आणल्यामुळे आज आपण 60 हजार कोटी रूपयांचा एमओयु ट्विन्स्टारशी केला आहे. देशातील पहिला प्रकल्प हा इलेक्ट्रॉनिक आणि फॅब क्षेत्रातील

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

असेल. हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. इलेक्ट्रॉनिक्समधील सेमी कंडक्टर, टीव्ही स्क्रीन्स आपल्या देशात बनवत नाही. ते आपण पूर्णपणे इम्पोर्ट करतो. एस्टीमेशन असे आहे की, 2031 साला पर्यंत आपला इलेक्ट्रॉनिकचा इम्पोर्ट हा तेलाच्या इम्पोर्ट पेक्षा जास्त असेल. इतक्या मोठ्या प्रमाणावर आपले परकीय चलन त्यावर खर्च केले जाईल. तेच जर आपण येथे करू शकलो तर आपला पैसा वाचू शकतो. तैवान, चीन, कोरिया यांची प्रगती, समृद्धी कुठून आली ? ती इलेक्ट्रॉनिक आणि फॅबमधून आलेली आहे. ते जर आपण आपल्या देशात करू शकलो तर केवळ परकीय चलनच वाचणार नाही तर मोठ्या प्रमाणावर रोजगार देखील उपलब्ध होईल. म्हणून आपण ही पॉलिसी तयार केली आहे. राज्य व केंद्र सरकारने कॅपिटल सबसिडीची पॉलिसी तयार केली. ती करीत असताना आपण सांगितले की, जर सबसिडी पाहिजे असेल तर आपणाला विदर्भ मराठवाडामध्ये या मागास भागात यावे लागेल. आपण 60 हजार कोटीचा करार केला असून त्यात स्पष्टपणे नमूद आहे की, विदर्भ किंवा मराठवाड्यामध्येच इलेक्ट्रॉनिक आणि फॅब ची इंडस्ट्री लावावी लागेल. ही पॉलिसी आपण विदर्भ आणि मराठवाड्यासाठीच तयार केलेली आहे. मर्सिडिज, फियाटसह अनेक उद्योग येथे येत आहे. मी सर्व उद्योगांचा हिशोब देत बसणार नाही. मी विधान सभेत जे देखील सांगितले तेच येथे सांगणार आहे. अनेक लोक असे म्हणतात की, खरेच असे करार झाले आहेत काय ? खरेच त्यात रोजगाराचे काही आहे काय ? त्यामुळे मी निर्णय घेतला आहे की, साधारणपणे कुठलेही राज्य झालेले एमओयु डिस्क्लोज करीत नाही. त्यामध्ये दोन कारणे असतात. काही नॉन डिस्क्लोजर असतात. त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे आज राज्याराज्यांमध्ये स्पर्धा आहे. ज्यावेळी फॉक्सकॉन कंपनी येथे आली पाहिजे यासाठी मी प्रयत्न करीत होतो, त्यांच्याशी चर्चा सुरू होती त्यावेळी तीन राज्यांचे मुख्यमंत्री हे त्या कंपनीच्या संपर्कात होते आणि त्यांना आपल्या राज्यात बोलवत होते. एवढेच नाही तर ट्विन्स्टारशी एमओयु करायला आम्ही पंतप्रधानांच्या दारा समोर होतो त्यावेळी स्टरलाईटचे श्री.अनिल अग्रवाल यांना उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचा फोन आला की, महाराष्ट्र देत असेल त्या पेक्षा जास्त चांगली सवलत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

देण्यास मी तयार आहे. एवढी स्पर्धा आज राज्याराज्यांमध्ये आहे. त्यामुळे कुठलेही राज्य स्वत:कडील माहिती उघड करीत नाही. मला महाराष्ट्राच्या क्षमतेवर विश्वास असल्यामुळे मी टॅब्युलर फॉर्ममध्ये कुठली गुंतवणूक कुठल्या भागात होणार आहे आणि त्यामुळे किती रोजगार प्राप्त होणार आहे यासंबंधातील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे. आपण केवळ एमओयु करून थांबलेलो नाही. एक एमओयु ट्रान्सलेट करायला मेहनत करावी लागते. आपण आणि आम्ही अनेक वेळा बोललो आहोत की, एक एमओयु करून काय होते. ते खरे आहे. जमिनीवर पुष्कळ अडचणी असतात. त्याचे हँड होल्डींग करावे लागते. आज चीन मधील उद्योजक देशात येऊ इच्छितात. पण भाषेची अडचण आहे. त्यांचा आपल्याशी व्यवहार झालेला नाही म्हणून त्यांना आपल्याला कोणी लुबाडणार नाही ना अशी भीती वाटते आहे. त्यासाठी हँड होल्डींगची व्यवस्था उभी करावी लागत आहे. तेव्हाच गुंतवणूकदार येऊ शकतो. त्यामुळे आम्ही मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक टास्क फोर्स तयार केला असून त्याच्या दोन बैठका देखील झालेल्या आहेत. प्रत्येक विभागाकरिता एक व्हर्टिकल तयार केला आहे. त्या माध्यमातून जे एमओयु झाले आहेत त्यासंबंधी पाठपुरावा करून त्याचे हँड होल्डींग करून त्यांना येणाऱ्या अडचणी सोडवून त्या इन्व्हेस्टमेंटमध्ये कसे काय ट्रान्सलेट करू शकू हे पाहणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, यामध्ये आपले देखील सहकार्य मला अपेक्षित आहे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

कारण मेक इन महाराष्ट्र किंवा मेक इन इंडिया हा कार्यक्रम एका पक्षाचा नाही किंवा एका सरकारचा नाही, तर तो देशाकरिता अत्यंत महत्वाचा कार्यक्रम आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी राज्यातील कुपोषणचा मुद्दा मांडण्यात आला. काही सन्माननीय सदस्यांनी राज्यात कुपोषण वाढत आहे असे सांगितले. मी केवळ पासिंग रेफरन्स म्हणून सांगतो कुपोषणचे प्रमाण 8.43 टक्क्यापर्यंत खाली आले आहे. यापूर्वी राज्यात बालमृत्युचे प्रमाण 405 होते त्यामध्ये घट होऊन तो 309 वर म्हणजे खाली आली आहे. ही आकडेवारी पाठ थोपटून घेण्यासारखी नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आमचे जे काही प्रयत्न चालू आहे त्यामुळे हे प्रमाण कमी होत आहे. आमची गती कदाचित कमी आहे. परंतु आम्ही कुपोषण कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, आमचे सरकार आल्यानंतर आम्ही महत्वाच्या प्रकल्पांना चालना देण्याचा प्रयत्न केला. मुंबई सागरी मार्ग- कोस्टल रोडच्या संदर्भातील पहिला प्रस्ताव 2002 साली आला. ज्यावेळी श्री.पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी तो प्रस्ताव पुन्हा रिव्हाईव्ह केला. कोस्टल रोडसाठी परवानगी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री श्रीमती जयंती नटराजन यांच्यासोबत बैठका झाल्या. केंद्रीय मंत्री श्री.जयराम रमेश यांच्यासोबत बैठका झाल्या. परंतु या कामासाठी परवानगी मिळाली नाही. मागील अकरा महिन्यामध्ये आम्ही कोस्टल रोडच्या संदर्भातील सर्व परवानग्या आणल्या. मला सांगितले पाहिजे की, दिनांक 30 एप्रिल रोजी या कामाची निविदा निघत आहे. ऑक्टोबर, 2016 मध्ये या कामाची वर्कऑर्डर दिली जाईल. दिनांक 15.7.2019 पर्यंत याचा पहिला टप्पा पूर्ण होईल.

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात पहिल्यांदा निवडून आलो तेव्हाच्या पहिल्या बजेटच्या आर्थिक पाहणी अहवालात मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, त्याची किंमत वाचली होती. त्यावेळी मी फार इम्प्रेस झालो होतो. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक हा 22 कि.मी.चा मार्ग आहे. यामुळे मुंबई आणि नवी मुंबई जवळ येणार आहे. त्यानंतर दरवर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये उल्लेख होता परंतु त्या कामासाठी परवानगी मिळत नव्हती. आम्ही एक वर्षात या कामासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या आणल्या. यामध्ये अनेक अडचणी आल्या. लोक कोर्टात केले. परंतु आता सर्व परवानग्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

आपल्याजवळ आहेत. जपानच्या जायका कंपनीसोबत करार झाला. मागच्या महिन्यात ओईसीडीचे नोटीफिकेशन निघाले. 18 हजार कोटी रुपयांचा प्रोजेक्ट आहे त्यातील 15 हजार कोटी रुपये जायका कंपनी देत आहे. आपणास 40 वर्षाचे लोन देत आहे. ती कंपनी आपणास एक टक्क्यापेक्षा कमी व्याजदर आकारात आहे. दहा वर्षाचा मोरोटोरिएम आहे. एक प्रकारे ते फ्री आहे. या संदर्भात दिनांक 23 मार्च रोजी आरएफपी काढत आहोत. त्यानंतर दोन महिन्यांनी आरएफक्यू काढणार आहोत. या कामाची वर्कऑर्डर याच वर्षीच्या ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात काढणार आहोत. याचा अंतिम टप्पा पूर्ण करण्याकरिता साडेचार वर्षे लागतील. पहिला टप्पा अगोदर पूर्ण होईल. हा रस्ता अगोदर सहा लेनचा होता. जायका कंपनीने सांगितले की, यामध्ये दोन ॲडीशनल लेन कराव्यात ज्या इमर्जन्सीच्या वेळी कामी येतील म्हणून आपण आठ लेनचा रस्ता केलेला आहे.

सभापती महोदय, मागील सरकारच्या काळामध्ये म्हणजे दहा वर्षापूर्वी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा बोर्ड लागला होता. तो बोर्ड अजूनही तसाच आहे. पुढे काही झाले नाही. आमचे सरकार आल्यानंतर पहिल्या महिन्यात शेअरटीलचा निर्णय आणला. आठ महत्वाच्या एनओसी मिळावयाच्या बाकी होत्या. आपणास आश्चर्य वाटेल माननीय पंतप्रधान दर पंधरा दिवसांनी एक व्हिडीओ कॉन्फरन्सींग घेतात. त्या व्हीडिओ कॉन्फरन्सींगला सर्व राज्याचे मुख्य सचिव बसतात. त्यांना एक आठवडा आधी आपले विषय लिस्ट करावे लागतात. आपण त्यामध्ये नवी मुंबईच्या विमानतळाचा विषय लिस्ट केला. माननीय पंतप्रधानाचे व्हीडिओ कॉन्फरन्सींग सुरु होण्याच्या दिवशी सकाळपर्यंत मुख्य सचिवांच्या हातामध्ये सात परवानग्या आल्या. व्हीडिओ कॉन्फरन्सींगमध्ये माननीय पंतप्रधानांनी विचारले की, एक परवानगी का मिळाली नाही. त्यावर केद्रांच्या सचिवांनी सांगितले की, त्याबाबत प्रोसेस झालेली आहे आम्ही सात दिवसांत परवानगी देतो आणि सातव्या दिवशी तीही परवानगी मिळाली. या सर्व परवानग्या तत्कालीन सरकार दहा वर्षे मागत होते, परंतु आपणास या परवानग्या मिळाल्या नाहीत.आपणास एका व्हीडिओ कॉन्फरन्सींगद्वारे त्या मिळाल्या. आता त्या कामाची स्थिती सांगतो. प्रीडेव्हलमपेंटच्या कामाची निविदा दोन महिन्यात काढणार आहोत. आपणास दोन प्रकारचे काम करायचे आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

प्रीडेव्हलपमेंटचे काम सिडको करीत आहे. एअरपोर्टचे काम कन्सेशनर करीत आहे. त्याचे दोन महिन्यात टेंडर देण्यात येईल. पंधरा दिवसांत ते ओपन होईल पण वर्कऑर्डर द्यायला एक महिना लागेल. 260 एकर जमिनींचे ॲवार्डस झालेले आहेत. आपला आरएफक्यू झाला त्यामध्ये चार बीडर्स शॉर्टलिस्ट झाले. हे सर्व केल्यानंतर केंद्र सरकारचे सेक्युरिटी क्लिअरन्स, निती आयोगाचा क्लिअरन्स घ्यावा लागतो. या सर्व बाबी पूर्ण करुन पुढच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव येईल. आरएफपीला मान्यता दिल्यानंतर त्याची फायनान्शिअल बीडला जो काही स्टॅटयुटरी वेळ दिल्यानंतर याच वर्षी याची फायनल वर्कऑर्डर होऊन काम सुरु होईल. सन 2017 पर्यंत प्रीडेव्हलपमेंटचे काम सुरु राहणार आहे. त्यानंतर हे काम सुरु करायचे आहे. याच्या ज्या टाईम लाईन्स आहेत त्याप्रमाणे डिसेंबर, 2019 मध्ये पहिले विमान उडेल. एक कोटी प्रवाशांना हॅन्डल करण्याची कॅपॅसिटी नवी मुंबई एअरपोर्टची आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

तसेच त्यांना दुसरी सोय अशी दिली आहे की, ते हे काम फेजेसमध्ये सुध्दा करु शकतात. पहिल्याच दिवशी 1 कोटी प्रवाशांची आवश्यकता नाही. ते सुरुवातीला 40 लाख प्रवाशांची व्यवस्था करुन एयरपोर्ट सुरु करु शकतात आणि 2019 पर्यंत उर्वरित व्यवस्था उभ्या करु शकतात.

सभापती महोदय, मेट्रो लाईन-7 प्रकल्पासंदर्भातील गतिशीलता कळावी म्हणून सांगतो की, मे-2015 मध्ये आम्ही निर्णय केला. त्याचा डीपीआर करण्याकरिता जून-2015 मध्ये दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशनची नेमणूक केली. ऑगस्ट-2015 मध्ये डीपीआर सादर झाला. दि.26 ऑगस्ट, 2015 रोजी त्यास प्राधिकरणाची मान्यता मिळाली. दिनांक 6 ऑक्टोबर, 2015 रोजी त्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली. दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी निविदा मागविण्यात आल्या. दिनांक 29 फेब्रुवारी, 2016 रोजी निविदा सादर झाल्या आणि प्रत्यक्ष कामास दिनांक 30 एप्रिल, 2016 रोजी सुरुवात होत आहे. यावरुन आपल्या लक्षात येईल की, आम्ही सर्व प्रक्रिया एका वर्षाच्या आत केल्या आहेत. अगोदरच्या सरकारने ज्या मेट्रो प्रकल्पाचे भूमीपूजन 2007-08 मध्ये केले, त्याचे काम सुध्दा सुरु करु शकले नाही. ते काम आमचे सरकार सुरु करीत आहे.

सभापती महोदय, मेट्रो-2ए दहिसर ते डी.एन.नगर मेट्रो प्रकल्पाच्या बाबतीत सुध्दा अशाच प्रकारची प्रक्रिया पार पाडलेली आहे. मे-2015 मध्ये त्यास पहिली मान्यता दिली. जून-2015 मध्ये डीपीआरला माान्यता दिली. दिनांक 31 मे, 2016 रोजी या प्रकल्पाचे काम सुरु होणार आहे. हा प्रकल्प पीपीपी नव्हे तर पीपीसी अंतर्गत करीत आहोत. उपरोक्त दोन्ही मेट्रो प्रकल्पाची कामे जून-2019 पर्यंत पूर्ण होतील.

सभापती महोदय, मेट्रो-3 च्या बाबतीत सांगू इच्छितो की, अगोदरच्या सरकारने 2011 मध्ये या प्रकल्पाचा आराखडा आणि अंदाजपत्रक तयार केले. तसेच या प्रकल्पाचे आरएफपी आणि आरएफक्यू करण्याचा प्रयत्न केला. परंतु ते झाले नाही. आम्ही एका वर्षात आरएफपी आणि आरएफक्यू केले. तसेच या प्रकल्पाचा जायको सोबत टाय-अप सुध्दा केला आहे. जायको या प्रकल्पासाठी सुध्दा 20 हजार कोटी रुपयांचे कर्ज 40 वर्षाच्या मुदतीसाठी 1 टक्क्यापेक्षा कमी व्याज दराने देणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, मेट्रो हे पब्लिक ट्रान्सपोर्ट असे आहे की, या ट्रान्सपोर्ट अंतर्गत अर्ध्या कि.मी. अंतरावर स्टेशन ठेवता येते. लोकल रेल्वेचे स्टेशन दोन-अडीच कि.मी. अंतरावर असते. त्यामुळे मधल्या अंतरातील लोकांना ती केटर करु शकत नाही. त्या स्टेशनच्या परिसरात ॲडीशनल पब्लिक ट्रान्सपोर्टची व्यवस्था करावी लागते. परंतु मेट्रो रेल्वेच्या बाबतीत तसे नाही. त्याच प्रमाणे मेट्रोचा टर्न अराऊंड रन हा फास्ट असतो. त्यामुळे मेट्रो हे बेसिक ट्रान्सपोर्ट करुन त्याला बस, ट्रेन असे इंटीग्रेशन करावे लागते. सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये. कारण मेट्रो ही आपल्या घरची नाही. त्यामुळे आपल्या सर्वांना मिळून हा प्रश्न सोडवायचा आहे. मी नागपूरचा आहे. मला जन्मभर मुंबईत राहायचे नाही. ज्या दिवशी मी निवृत्त होईल त्या दिवशी मी नागपूरला परत जाईन. परंतु आपल्या हातून मुंबईसाठी एवढे करता आले पाहिजे की, आपण गेल्यानंतर लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की, नागपूरचा माणूस सुध्दा मुंबई बदलवू शकतो. जे मूळ मुंबईकर आहेत आणि ज्यांना संपूर्ण आयुष्य मुंबईत घालवायचे आहे त्यांनी तर आम्हाला या प्रकल्पांसाठी जास्त गांभीर्याने मदत केली पाहिजे. हा प्रकल्प स्पेशल ॲक्ट अंतर्गत हाती घेतलेला आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी कोणत्याही प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. परंतु ज्या काही तात्कालिक गोष्टी असतात, त्यांची राज्य सरकारच्या माध्यमातून पूर्तता करण्यात येईल. मी तर म्हणेन की, आपण सर्वजण राज्याच्या हितासाठी हे काम करु या.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर, मेट्रोच्या कारशेड बाबत आपल्याला निर्णय करावयाचा आहे. कारशेडच्या बाबतीत आपल्यापुढे दोन पर्याय आहेत. आता नवीन अलाईनमेंट करुन नव्याने डिझाईन केली आहे. पूर्वी या कारशेडमध्ये 2 हजार झाडे जात होती आणि ही बाब गंभीर होती. परंतु आताच्या जागेवर कारशेड करायचे ठरविले तर 350-400 झाडे तोडावी लागतात. परंतु त्यातील कोणतेही झाड एक्झॉटिक किंवा एक्सटिंक्ट स्पिसीजचे नाहीत त्यामुळे ही झाडे रिप्लांट करता येतात. त्याच्या अगेन्स्ट 3 हजार झाडे सुध्दा लावता येतात किंबहुना, लावावीच लागणार आहेत. ती जागाही उपलब्ध आहे. परंतु हे करावयाचे नसेल तर एक-दीड कि.मी. दूर जावे लागेल. कारण कारशेडसाठी जी जागा बघितलेली आहे ती न्यायालयाकडून मान्य होईल. ती मार्शी जमीन असल्यामुळे त्या जागेच्या विकासावर दीड हजार कोटी रुपये खर्च



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

करावे लागतील. परिणामी प्रकल्पाची किंमत वाढेल. त्यामुळे एकप्रकारे तिकिटांच्या माध्यमातून मुंबईकरांवर बोजा येईल. या सर्व बाबींचा विचार करुन या संदर्भातील निर्णय आपल्याला विचारपूर्वक करावा लागेल. 350 झाडे वाचविली पाहिजे, रिप्लांट करुन अधिकची झाडे लावावयाची की दीड हजार कोटी रुपयांचा बोजा घ्यावयाचा हे आपल्याला ठरवायचे आहे. आपण सर्वांनी मिळून या बाबतचा निर्णय घेऊ या. त्यामुळे कोणीही प्रेस्टीज इश्यू न करता, हे काम केले पाहिजे. आता मेट्रो-3 प्रकल्प वर्क ऑर्डरच्या स्टेजवर आणून ठेवला आहे. बांद्रा-कुर्ला मेट्रो रेल्वेचा पहिला टप्पा 2019 पर्यंत पूर्ण होईल व उर्वरित टप्पा 2020 पर्यंत पूर्ण होईल.

महोदय, मेट्रो प्रकल्प-2 बी, डी.एन. नगर ते बांद्रा-मानखुर्द याचा डीपीआर तयार झाला आहे. त्यामुळे या संदर्भातील पुढील प्रक्रिया सुरु झाली आहे. मेट्रो प्रकल्प-4, वडाळा-ठाणे-कासार वडवली पर्यंत करणार आहोत. या संदर्भातील डीपीआर तयार करण्याचे काम हाती घेतले असून 15 एप्रिलपर्यंत डीपीआर आपल्या हातामध्ये येईल. त्या नंतरची प्रक्रिया किती गतीने होते हे मी अगोदरच सांगितले आहे. त्यामुळे आपण ठाण्यापर्यंत मेट्रो नेणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे मेट्रो कल्याणपर्यंत नेण्याची मागणी केव्हा करतात याची मी वाट पाहत होतो आणि त्यांनी ती मागणी केलीच. मी त्यांना सांगू इच्छितो की, कल्याणपर्यंत सुध्दा मेट्रो नेणार आहोत.

महोदय, दोन एयरपोर्ट जोडण्यासाठी मुंबई एयरपोर्ट आणि नवी मुंबई एयरपोर्टचा डीपीआर तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. आपण माहिती घेतली तर निदर्शनास येईल की, अनेक देशातील मोठमोठ्या शहरांमध्ये तीन-तीन एयरपोर्ट आहेत. सध्या मुंबई एयरपोर्टमध्ये कार्गोसाठी जागा उरलेली नाही. त्यामुळेच मुंबई एयरपोर्ट आणि नवी मुंबई एयरपोर्ट कनेक्ट करण्यासाठी डीपीआर तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.

सभापती महोदय, नवी मुंबई येथे सिडको अंतर्गत मेट्रो प्रकल्प-1 अंतर्गत बेलापूर ते पेंढार या 11 कि.मी. प्रकल्पाचे काम जुलै-2017 मध्ये पूर्ण होईल. मेट्रो प्रकल्प-2, 3, व 4 चा डीपीआर मे-2016 पर्यंत प्राप्त होईल. सिडको हे काम हाती घेणार आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये, नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, नागपूर मेट्रो प्रकल्पाचा डीपीआर तयार केला आहे. मंत्रिमंडळाने त्याला मान्यता देऊन निविदा मागविल्या आणि काम सुध्दा सुरु झाले आहे. ऑगस्ट-2019 पर्यंत हा टप्पा पूर्ण करणार आहोत. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी पुणे येथील मेट्रो प्रकल्पाबाबत विचारत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, पुणे मेट्रो प्रकल्पाच्या बाबतीत मी नंतर सांगतो. परंतु हे खरे आहे की, पुणे मेट्रो प्रकल्प सुध्दा होईल, त्यामुळे आपण काळजी करता कामा नये.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्ने स्मारकाचे मॉडेल तयार केले होते. परंतु त्याला परवानगी मिळाली नाही.

2 एम....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

पुन्हा जयराम रमेश साहेबांकडे बैठक झाली, जयंती नटराजन मॅडमकडे बैठक झाली. त्यांनी सांगितले की, समुद्रामध्ये छत्रपतींचे स्मारक बनविणे आमच्या सीआरझेडमध्ये, नोटिफिकेशनमध्ये बसत नाही. त्यामुळे आम्ही मान्यता देऊ शकत नाही. मान्यता नाकारली. आपले सरकार आल्यानंतर मी गेलो. एक बैठक लावली. जावडेकर साहेबांना म्हटले की, महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. महाराजांना जागा मिळणार नाही तर कोणाला मिळेल ? त्यांनी पहिल्याच बैठकीत सांगितले की, या संदर्भात सीआरझेड नोटिफिकेशन आम्ही अमेंड करणार. 2 महिन्यांत अमेंड झाले. सजेशन, ऑब्जेक्शन झाले, लोक कोर्टापर्यंत गेले. फायनल झाले आणि आपल्याला मान्यता मिळाली. आज महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात मुंबई पोर्ट ट्रस्ट, मेरिटाईम बोर्ड, नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मत्स्य व्यवसाय, आयुक्त, मुंबई यांची परवानगी मिळाली, एमओएफ सीआरझेड-2 क्लिअरन्स मिळाला, कोस्ट गार्ड क्लिअरन्स मिळाला, एमओयुएफ पर्यावरण विषयक परवानगी मिळाली, नॅशनल सिक्युरिटी गार्ड, आयुक्त, मुंबई मनपा, महासंचालक, बेस्ट यांची परवानगी मिळाली, सर्व परवानग्या मिळाल्या. (अडथळा) तेही झाले, सर्व झाले. त्या ड्राफ्टचा याच्याशी काही संबंध नाही. स्पेशल अमेंडमेंट आहे. काळजी करण्याचे कारण नाही. महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात 1 वर्षाच्या आत सगळ्या 12 परवानग्या तुम्ही मागत होत्या आणि मिळत नव्हत्या, मागत होता आणि मिळत नव्हत्या, त्या सगळ्या परवानग्या आम्हाला मिळाल्या. दिनांक 24.12.2015 ला पीएमसीची अपॉईंटमेंट झाली, याचे पूर्ण शेड्यूल तयार झाले, आता याचे टेंडर काढत आहोत आणि पीएमसीने शेड्यूल तयार केले आहे त्याप्रमाणे टेंडर दिल्यापासून 40 महिन्यांमध्ये याचे काम पूर्ण करायचे आहे, असे शेड्यूल तयार केले आहे. (अडथळा) त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करण्याकरिता सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांची समिती स्मारक झाल्याशिवाय (अडथळा) .... इंदू मिलचेही झाले, काळजी करू नका. आमचे सर्वांचे आणि कदाचित तुमचेही ज्येष्ठ नेते माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या संदर्भात देखील काही लोकांनी प्रश्न उपस्थित केला, काही झाले का, नुसती घोषणा आहे का असे विचारण्यात आले. शासनाने निर्णय घेतला, त्या निर्णयाच्या संदर्भातील पूर्ण कार्यवाही पूर्ण करून मनपाला कळविले. मॉडेल काय असेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असा प्रश्न समोर उपस्थित झाला, त्यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचेच मॉडेल आपण

..2



श्री. देवेंद्र फडणवीस ....

स्वीकारले. बाहेरचे लोक आणि सरकारमधील लोक असा ट्रस्ट आहे, त्या मॉडेलचा ट्रस्ट आपण तयार केला. फक्त तेथे माननीय पवार साहेब अध्यक्ष आहेत, तेथे माननीय उद्‌ध्वजी ठाकरे अध्यक्ष राहणार आहेत. आपण त्याचीही पूर्ण कार्यवाही केली आहे. आता ते रजिस्ट्रेशन अंतिम टप्प्यात आहे, ते झाल्याबरोबर याची पुढची कार्यवाही देखील सुरू होईल. (अडथळा) नागपूर ते मुंबई कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेस वे - 14 जिल्ह्यांचे भाग्य ज्यातून बदलू शकते. आपल्याला माहीत आहे की, मुंबईला एक लोकेशनल ॲडव्हान्टेज आहे. जेएनपीटीसारखा पोर्ट असल्यामुळे आज मुंबई देशाची आर्थिक राजधानी बनली आहे, या पोर्टचा जो फायदा आहे तो पुण्यापर्यंत, नाशिकपर्यंत काही प्रमाणात जातो, पण त्या पलीकडे जात नाही. महाराष्ट्राच्या सर्व भागांमध्ये खूप पोटेंशियल आहे. अग्री इंडस्ट्री असेल, मॅन्युफॅक्चरिंग असेल, पण याकरिता पोर्ट कनेक्टिव्हिटी महत्त्वाची असते. आपण त्यामुळे हा रस्ता एमएसआरडीसीच्या माध्यमातून हाती घेतला आहे. आज देशातील सर्वात मोठा ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे झाला आहे, तो यमुना एक्सप्रेस वे आहे, जो 190 किमी.चा आहे. देशातील सर्वात मोठा असलेला हा 800 कि.मी.चा एक्सप्रेस वे आहे आणि यातून संपूर्ण विदर्भ, नागपूरपासून तर पूर्ण पश्चिम विदर्भ मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि ठाणे असा हा सगळा भाग पूर्ण उपलब्ध राहील. आपण विचार करा की, शेवटी जर जेएनपीटीचा टर्न अराऊंड टाईम 8 तासांवर आणला तर महाराष्ट्रात कुठेही इंडस्ट्री तयार होऊ शकेल, कृषी उत्पादनाचे एक्सपोर्ट होऊ शकेल, सप्लाय चैन तयार करता येईल. त्यामुळे आपण हा महत्त्वाचा प्रोजेक्ट हाती घेतला आहे. जून, 2016 पर्यंत डीपीआर फायनल होईल, सप्टेंबर, 2016 ला फायनान्शिअल क्लोजर. एशियन डेव्हलपमेंट बँकेचे प्रेसिडंट परवा आमच्याकडे येऊन गेले, आमच्याशी चर्चा केली, त्यांनी हा प्रोजेक्ट टेक-अप करण्यामध्ये इंटरेस्ट दाखविला आहे. साधारणपणे जायकाचे जसे आहे, जायकाचे जास्त आहे. पण जवळपास रेट ऑफ इंटरेस्ट तशाच प्रकारचा एशियन डेव्हलपमेंट बँकही देते. मलेशियन गव्हर्नमेंटने आम्हाला प्रपोजल दिले आहे की, गव्हर्नमेंट टू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

गव्हर्नमेंट आम्हाला द्या, आम्ही बिल्ट आणि फायनान्स करू पण त्यांना आपण असे कळविले आहे की, हे आम्हाला करता येत नाही. डिपार्टमेंट ऑफ इकोनॉमिक अफेअर्सला करता येते. त्यांनी

..3



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

आपल्याला आता एवढी विनंती केली आहे की, आमच्याशी एमओयू करून आम्हाला केवळ प्री-फिजिबिलिटी आमच्यापुरती करू द्या. आपण ती परवानगी देणार आहोत. प्री-फिजिबिलिटीनंतर त्यांचे प्रपोजल चांगले असेल तर केंद्र सरकारशी विचारविनियम करता येईल. त्यामुळे फायनान्शिअल क्लोजर आपण करणार आहोत. आपण त्यामध्ये लॅण्ड ॲक्विझिशनचे नवीन एक मॉडेल आणत आहोत की, ज्यातून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल. साधारणपणे याची पॅकेजेस तयार करून डिसेंबर, 2016 पर्यंत आपल्याला याचे टेंडर ॲवॉर्ड करता आले पाहिजे असे नियोजन केले आहे. पूर्ण ऑल लेन्स आणि कम्प्लिट रोड हा 2020 साली डिसेंबरपर्यंत पूर्ण करावयाचा आहे. पण त्याचा फेज वन आहे तो 2019 साली आपल्याला तयार करावयाचा आहे. (अडथळा) फेज 1 .... पॅकेजेस एकत्रच चालू होणार आहे. पण पहिल्या 2 लेन, मग 4 लेन, मग 6 लेन, मोटरेबल पूर्ण होईल. पॅकेजेस सर्व एकत्रच सुरू होतील. पण 2-2-2 लेन असे होणार आहे. अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या संदर्भात 1 निर्णय घेतला आहे, त्याच्यावर काहींनी टीका केली, काहींनी चांगले म्हटले, काहींनी स्वागत केले, काहींनी पेढे वाटले. बाबा या सभागृहाचे सदस्य नाहीत, त्यामुळे त्यांचे नाव घेण्याचे कारण नाही. परंतु त्यांनी यावर टीका केली. ते म्हणाले की, तुम्ही फारच चुकीचे करीत आहात. पण येथे मला सांगितले पाहिजे की, हे जे केले ते का केले आहे ? दिनांक 12.06.2014 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब यांनी कुंटे समिती तयार केली. नव्याने अनधिकृत बांधकामे होऊ नयेत आणि जी अनधिकृत बांधकामे झाली आहेत त्याच्यात नेमके काय करायचे, रेग्यूलर कसे करायचे असे मँडेट देऊन कुंटे समितीची त्यांनी स्थापना केली. या समितीचा अहवाल आमच्या काळात आला. अहवाल त्या काळात आला होता, पण त्यावर निर्णय झाला नाही. मग आम्ही पुन्हा कुंटेंना त्याचा स्कोप वाढवून दिला की, मधल्या काळात अजून कुठे काय झाले आहे या संदर्भात पुन्हा तपासणी करा आणि त्यानंतर

अहवाल आला. हा अहवाल सादर झाल्यानंतर एप्रिल, 2015 मध्ये पहिल्यांदा अहवाल आमच्याकडे आला. दिनांक 30 मे, 2015 ला उच्च न्यायालयाने सांगितले की, आम्हाला दाखविल्याशिवाय हे

..4



श्री. देवेंद्र फडणवीस ....

धोरण तुम्हाला ठरविता येणार नाही. त्यामुळे आपण उच्च न्यायालयाकडे गेलो आणि ते धोरण त्यांना सादर केले.

....2N

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

त्यांनी सांगितले की, ॲफिडेव्हिटवर सादर करावे. त्याप्रमाणे आपण ॲफिडेव्हिटवर सादर केले. त्यानंतर त्यांनी आपल्याला काही ॲमेंडमेंड सुचविल्या व त्या आपण मान्यही केल्या आहेत. त्यानंतर ॲडिशनल ॲफिडेव्हिट सादर करण्यास सांगितले गेले. तेही आपण सादर केले आहे. त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, ज्यावेळी मंत्रिमंडळाची यास मान्यता मिळेल त्यावेळी आम्ही ऑफिशिअली कॉग्निजन्स घेऊ. त्यांचे म्हणणे होते की, "आपण सरकार म्हणून धोरण दिले आहे. पण कॅबिनेटचे ॲप्रुव्हल नाही." त्याप्रमाणे मंत्रिमंडळाने ॲप्रुव्हल दिले. आता महाधिवक्ता ते कोर्टासमोर सादर करीत आहेत. हे करीत असताना अनेकांना संभ्रम असा आहे की, बिल्डरांचे फावले आहे. खरे म्हणजे, बिल्डर पैसे कमावून निघून गेले आहेत. अडचणीत कोण आहे, घरे कोणाची पडत आहेत ? आपण दिघ्याचे उदाहरण घेऊ. त्या ठिकाणी बिल्डर पैसे कमावून निघून गेले आहेत. आता त्या इमारतींमध्ये गरीब, मध्यमवर्गीय रहात आहेत आणि त्यांच्यावर टांगती तलवार आहे. त्यांचीच घरे रोज पडत आहेत, तेच बेघर होत आहेत.

सभापती महोदय, हे करीत असताना भविष्यात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत, यासाठीही आपण काही उपाययोजना केल्या आहेत. दिनांक 31/12/2015 नंतर अनधिकृत बांधकामे होऊ नयेत... (अडथळा.....) आपल्याकडे जो कायदा आहे त्यामध्ये एखादी ॲमेंडमेंड आपल्याला करावी लागेल. उर्वरित भाग पॉलिसीचा आहे. सभापती महोदय, या पॉलिसीच्या माध्यमातून अनधिकृत बांधकाम पाडण्याकरिता नोटिशीचा कालावधी आता आपण 48 तासांवर आणला आहे. पूर्वी पाडण्यात आलेली अनधिकृत बांधकामे पुन्हा उभी केली तर 24 तासाच्या नोटीशीने ती पाडता येतील आणि फौजदारी गुन्हा दाखल करता येईल. अनधिकृत बांधकामांची जागा ताब्यात घेऊन ती सील करता येईल. आता सॅटेलाईट इमेजचा वापर करणे, हा धोरणाचा भाग झाला आहे. जुने बांधकाम नव्याने करावयाचे असले तरी सॅटेलाईट इमेजिंगमध्ये ते असले पाहिजे. म्हणजे कोणाला फायदा घेता येणार नाही आणि नवीन करावयाचे असले तरी देखील सॅटेलाईट इमेजिंगने त्यावर आपल्याला नियंत्रण ठेवावयाचे आहे. तसेच मंजूर बांधकाम नकाशाशिवाय मिळकतीच्या व्यवहारांची नोंद होऊ नये, अशा प्रकारची तरतुदही आपण त्यामध्ये करीत आहोत. जे बिल्डर बांधकाम करून

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

निघून जातात त्यांच्याविरुध्द काहीच होत नाही. त्यानंतर तेथे गरीब लोक रहात असतात. त्यामुळे आपण असाही निर्णय केला आहे की, अनधिकृत बांधकाम करुन विकणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करता येईल. (अडथळा.......) हा सर्व धोरणाचा भाग आहे. एक-दोन दुरुस्त्या आपल्याला कायद्यात कराव्या लागतील. एमआरटीपी ॲक्टमध्ये ज्या तरतुदी आहेत त्यामधील काही तरतुदी आपल्याला महापालिका कायद्यातही आणाव्या लागतील. तेवढाच कायद्यातील बदल आपल्याला करावयाचा आहे. आजही एमआरटीपी ॲक्ट इनव्होक करता येतो. पण दोन वेगवेगळ्या ॲथॉरिटीज असल्यामुळे इफिक्युअसली इनव्होक होत नाही आणि त्याची जबाबदारी महापालिकेवर येत नाही. म्हणून ती तरतूद महापालिका कायद्यात आणावयाची आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदुरकर आणि मी दोघेही वकील असल्यामुळे थोडीशी वेगळी चर्चा येथे झाली आहे.

सभापती महोदय, अनधिकृत बांधकामांमध्ये राहणाऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न शासनाने या माध्यमातून केला आहे. परंतु, हे करीत असताना यामध्ये काही कंडिशन्स आहेत. म्हणजे 1 एफएसआय मंजूर असताना 10 एफएसआय वापरला गेला आणि नंतर ते बांधकाम अधिकृत करावे, असे होणार नाही. त्याचे काही नियम आम्ही तयार केले आहेत. फंजिबलच्या संदर्भात, वाढीव एफएसआयच्या संदर्भात, झोन्सच्या संदर्भात नियम तयार केले आहेत. म्हणजे आपण काँक्रिटचे जंगल होऊ देणार नाही. पण जो गरीब माणूस आहे त्याला यामधून निश्चित फायदा मिळेल, अशा प्रकारचा प्रयत्न आपण या निमित्ताने करीत आहोत.

सभापती महोदय, मी शेवटचे एक-दोन विषय मांडतो. कारण, विषय बरेच आहेत. पण मला वेळेचेही भान आहे.

सभापती महोदय, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आपण 'सर्वांसाठी घरे' अशा प्रकारची योजना घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत 2 मार्च आणि 16 मार्चला 1,83,000 घरांना मान्यता दिलेली आहे. ज्या अंतर्गत राज्य सरकार आणि केंद्र सरकार अडीच लाखाची सबसिडी देत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...3....

श्री.देवेंद्र फडणवीस........

सभापती महोदय, अनेक वर्षांपासून धारावीचा प्रश्न प्रलंबित होता. तोही आता मार्गी लागला आहे. त्याचे देखील टेंडर झालेले आहेत. जरूर त्यामध्ये काही छोट्या, मोठ्या अडचणी आहेत. पण आपण सर्व मिळून त्या दूर करू. टेंडर काढत असताना त्या भागातील सर्व लोकप्रतिनिधींना आम्ही विश्वासात घेतले आणि बऱ्यापैकी एकमत घडविले आहे.

सभापती महोदय, बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाचा निर्णय देखील आम्ही केलेला आहे.

सभापती महोदय, आज अपेक्षा अशी आहे की, आपल्याला जर मुंबईमध्ये आणि एमएमआरमध्ये 11 लाख घरे तयार करावयाची असतील तर मुंबईच्या विकास आराखड्यामध्ये ही शक्ती आहे. कारण, मुंबईच्या विकास आराखड्यामधील पोटेंन्शिअल आपण परवडणाऱ्या घरांकरिता अनलॉक केले तर ते साध्य होऊ शकेल. शेवटी जमिनीची व्हॅल्यू आहे. ती व्हॅल्यू जर आपण मार्जिनलाईज करु शकलो तर खरी ॲफोर्डेबल घरे आपण देऊ शकू. मला मुंबईत येऊन हे समजले की, काही लोकांकरिता 60 लाख रुपयांचे घर ॲफोर्डेबल असते. तशा प्रकारचे नाही पण खरे ॲफोर्डेबल घर द्यावयाचे असेल तर या विकास आराखड्याच्या माध्यमातून आपल्याला ती स्पेस उपलब्ध करावी लागेल. मला विश्वास आहे की, निश्चितच जेव्हा विकास आराखडा महानगरपालिकेसमोर येईल तेव्हा त्या संदर्भातील कार्यवाही होईल आणि मुंबईमध्ये ॲफोर्डेबल हाऊसिंगच्यासंदर्भात एक मोठे काम आपल्याला करता येईल.

सभापती महोदय, आपले गिरणी कामगार आहेत. त्यांच्या घराच्या संदर्भातील विषय आहे. मी त्या दिवशीच सभागृहात सांगितले होते की, त्यांच्याबरोबर बैठक घेऊन आम्ही किंमत निश्चित करू. किमतीमध्ये काही जास्त फरक पडेल, असे मला वाटत नाही. जी काही मागील वेळी किंमत होती त्यामधूनच कनस्ट्रक्शन किंवा कॉस्ट आहे त्यामधूनच करण्याचा आम्ही प्रयत्न करू. म्हाडातर्फे 2660 घरांकरिता एप्रिल, 2016 मध्ये आम्ही लॉटरी काढू आणि एमएमआरडीएमार्फत 2400 घरांकरिता जून, 2016 मध्ये लॉटरी काढू. आपल्याला माहीत आहे की, त्या ठिकाणी 160 चौरस

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

फुटांचेच घर आहे. म्हणून आपण दोन घरे जॉईन करुन त्यांना देत आहोत. अन्यथा, ही 4800 घरे झाली असती. आपण असा निर्णय केला आहे की, किमान 310 फुटांचे तरी घर गिरणी कामगारांना मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, ग्रामीण भागासाठी असलेल्या इंदिरा आवास, रमाई आवास, शबरी आवास या योजनांच्या माध्यमातून 1 लाख, 31 हजार घरे आपण पूर्ण केली आहेत. आता आपण स्पेशल सेल तयार केला असून जमीन उपलब्ध करुन देण्यासाठी देखील वेगळी व्यवस्था केली आहे. यामुळे मला विश्वास आहे की, यावर्षी याहीपेक्षा जास्त घरे आपण पूर्ण करु शकू. आपण असाही निर्णय केला आहे की, किमान ग्रामीण भागात राहणारा एकही दलित बांधव, एकही आदिवासी बांधव सन 2019 नंतर बेघर राहू नये व त्याचे नियोजनही आपण केले आहे. (अडथळा....) आपण कोणतीही योजना बंद केलेली नाही. मी राज्याचा मुख्यमंत्री आहे आणि योजनेचे नाव बदलले हे मला माहीत नाही ? तुमच्या काळात बदलले का ? सर, आपल्या प्रकाशला थोडे ट्रेनिंग द्यावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये हे राजकारणात नव्हते आणि मीही राजकारणात नव्हतो तेव्हापासूनची आमची मैत्री आहे.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये वेगवेगळ्या विभागांच्या संदर्भात अनेक मुद्दे उपस्थित झाले आहेत. मराठा आरक्षणाच्या संदर्भात, धनगर आरक्षणाच्या संदर्भात, मुस्लीम आरक्षणाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित झाले आहेत. मराठा आरक्षणाच्या संदर्भात तुम्ही आम्हाला प्रश्न विचारायचा की आम्ही तुम्हाला प्रश्न विचारायचा ? 15 वर्षे तुमचे सरकार होते. आरक्षणाची मागणी होती. आपल्याला कायदा तयार करता आला असता. पण आपण तो केला नाही.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

लोकसभा निवडणुकीमध्ये प्रचंड पराभव झाल्यानंतर आपल्याला मराठा आरक्षण आठवले. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेब, आपल्याला कायदा करता आला असता. आपल्याला कायदा समजतो. परंतु, आपण कायदा केला नाही. आपण जाता जाता एक अध्यादेश काढला. त्यामुळे तुमची मराठा समाजाला आरक्षण देण्याची किती मानसिकता होती, मी कोणावर शंका घेत नाही. आम्ही सरकारमध्ये आल्यानंतर उच्च न्यायालयात केस सुरु असताना देखील त्याचे कायद्यात रुपांतर केले. मराठा आरक्षणाचा कायदा आमच्या सरकारने केला, तुमच्या सरकारने केलेला नाही. मला विश्वास आहे की, आपण कोर्टात लढत आहोत. आपण सर्व पक्षीय समिती नियुक्त केलेली केलेली आहे. ती समिती कशासाठी नियुक्त केलेली आहे ? त्याचे मॉनिटरिंग करण्यासाठी आपण ती समिती नियुक्त केलेली आहे. विधान सभेचे माननीय विरोधी पक्षनेते त्या समितीचे सदस्य आहेत. दादा त्या समितीचे सदस्य आहेत. आपण माननीय श्री.विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखाली ती समिती नियुक्त केलेली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी ही समिती वेगवेगळे पुरावे गोळा करीत आहे. कोर्टाने ज्या ग्राऊन्डवर आरक्षण नाकारले ते सर्व पुरावे ही समिती गोळा करीत आहे. मला एक गोष्ट समजत नाही की, आपली सर्वांची मानसिकता आहे. कोर्टात काय होईल ते आपण बघू आणि तुम्ही जर त्याच मानसिकतेचे आहात, आम्ही जर त्याच मानसिकतेचे आहोत तर तुम्ही सूचना द्यावी, आम्ही त्याप्रमाणे कायदा करु. त्यामध्ये काही अडचण नाही. यामध्ये राजकारण कशासाठी पाहिजे ? (...अडथळा...) माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे साहेब, मला एवढेच सांगावयाचे आहे की, हा राजकारणाचा विषय करु नये आणि केला तर हा प्रश्न प्रत्येक वेळी येईल की, आपण मागील 15 वर्षात कायदा का केला नाही ? आमची मराठा समाजाला आरक्षण देण्याची प्रामाणिक भूमिका आहे आणि आपण त्या संदर्भातील कार्यवाही करणार आहोत.

सभापती महोदय, मी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात बोलू इच्छितो. मी आपल्या अनुमतीने एवढेच सांगतो की, माझा आपल्या अधिकारावर घाला नाही. मी केवळ आपल्या लक्षात आणून देतो की, धनगर समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात काय फॅक्ट्स आहेत, काय परिस्थिती

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

आहे, हे मागील अधिवेशनात अतिशय सविस्तरपणे मांडण्यात आले होते. तरी देखील आता या अधिवेशनात पहिल्या क्रमांकावर पुन्हा तोच मुद्दा येतो. म्हणजे आपल्याला (...अडथळा...) मी कोठे म्हणतो की, तुम्ही तो फिक्सिग करुन आणला ? येथे असे होत नाही. सभागृहात फिक्सिंग होत नाही. हे सभागृह नियमानुसार चालते. येथे कम्प्युटराईज्ड बॅलेट काढले जाते. मी इतकी वर्षे विरोधी पक्षात राहिलेलो आहे. प्रश्न कसा लावून घ्यावयाचा हे मलाही माहिती आहे. परंतु, येथे फिक्सिग होत नाही, हे मी निश्चितपणे सांगतो. तत्कालीन सभापती असोत, विद्यमान सभापती असोत किंवा अध्यक्ष असोत. हे सभागृह नियमानुसारच चालते. आपण आपल्या कामाकरिता कोणाला भेटून वगैरे थोडेसे करतो. परंतु, ते नियमबाह्य करीत नाही. प्रश्न असा आहे की, खरे म्हणजे या संदर्भात आवश्यकता काय होती. आवश्यकता अशी होती की, त्या समिती समोर सर्व पुरावे नीट मांडले पाहिजेत, समिती समोर चर्चा केली पाहिजे, आपले म्हणणे रेकॉर्डवर आणले पाहिजे. परंतु, आपण असे न करता काय करतो ? आपण पुन्हा एकदा राजकारणाकरिता तीच चर्चा नव्याने उपस्थित करतो. माझी विनंती आहे की, तुमची आणि आमची प्रामाणिक इच्छा आहे. मग आपण एकत्रितपणे प्रयत्न करु. त्यासाठी काय अडचण आहे ? शेवटी जोपर्यंत संविधानिक प्रक्रिया पूर्ण होणार नाही तोपर्यंत आरक्षण मिळू शकते काय ? नाही मिळू शकत. आपल्याला ती प्रोसेस पूर्ण करावीच लागेल. सन्माननीय सदस्य श्री.चांदूरकर साहेब, एक अहवाल केंद्र शासनाच्या पटलावर देता येत नाही, असे असेल तर फक्त शिफारस पाठविल्यानंतर ती शिफारस मान्य होऊ शकेल काय ? त्याबरोबर दुसरा अहवाल तर पाठवावाच लागेल. त्यामुळे मला असे वाटते की, या विषयावर राजकारण करण्याऐवजी आपण सर्व मिळून त्या समितीकडे पुरावे देऊ, त्याचा अहवाल तयार करु आणि तो अहवाल पाठवू. (...अडथळा...) त्या संदर्भातील भूमिका मी या अगोदरच सभागृहात स्पष्ट केलेली आहे. नव्याने आणखी काही सांगण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, राज्य अत्यंत अडचणीच्या काळातून जात आहे. आम्ही अनेक प्रयत्न करीत आहोत. एका वर्षात सर्व बदलू शकते असे माझे मत नाही. परंतु, प्रामाणिकपणे प्रयत्न केला तर आपण राज्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन आणू

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

शकतो. म्हणून मी विरोधी पक्षाला देखील सांगतो की, या सर्व क्रायसेसच्या परिस्थितीमध्ये आपण देखील आम्हाला साथ द्यावी. आम्हाला आपली देखील साथ पाहिज. आपण एकत्रितपणे राज्यातील समस्या, शेवटी तुमचे आणि आमचे धेय्य वेगळे नाही. फक्त मार्ग वेगळे आहेत. आम्हाला आमचे मार्ग प्रिय आहेत, तुम्हाला तुमचे मार्ग प्रिय आहेत. आम्हाला तुमचे मार्ग पसंत नाहीत, तुम्हाला आमचे मार्ग पसंत नाहीत. परंतु, तरी देखील आपल्याला राज्याला पुढे नेण्याकरिता काम करण्याची आवश्यकता आहे. आपण या क्रायसेसच्या काळात एकत्रितपणे काम केले पाहिजे आणि त्याकरिता मी विरोधी पक्षाची देखील मदत मागतो. मी एवढेच सांगतो की, आम्ही प्रयत्न करीत आहोत. प्रयत्न करीत असताना काही चूक होईल, एखाद्या ठिकाणी पराभव होईल, एखाद्या ठिकाणी विजय होईल. परंतु, मी सांगू इच्छितो की,

ठोकरे खात हूं, पर शान से चलता हूं,
मैं खुले आसमान के नीचे सीना तान के चलता हूं,
मुश्किलें तो साज है जिंदगी का,
आने दो आने दो, उठूंगा, गिरुंगा, फिर उठूंगा
और आखिर में जितूंगा मैं ही, यह ठान के चलता हूं.

**सभापती :** आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सन 2015-16 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु.......

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभाग, बाब क्र.18, पृष्ठ क्र.29-महानगरपालिका क्षेत्रांमध्ये मूलभूत सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी आणि त्यांच्या घरांच्या प्रश्नासाठी विशेष तरतूद करणे खूप आवश्यक आहे. मुंबई शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. म्हणून सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी खास तरतूद करावी, अशी मी अपेक्षा करते.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्र.30-नागरी क्षेत्रातील रुग्णालयांच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. आज ग्रामीण भागात, नगरपालिका किंवा मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालयांमध्ये अनेक सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना फुटपाथवर रहावे लागते आणि रुग्ण सुद्धा विभागातील पॅसेजमध्ये झोपलेले असतात. तसेच, मुंबई शहरात शासनाचे किंवा मुंबई महानगरपालिकेचे टाटा रुग्णालयाच्या तोडीचे कॅन्सर हॉस्पिटल असणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला तरतूद करणे आवश्यक आहे. मुंबई शहरातील जनतेची कॅन्सर हॉस्पिटलची मागणी आहे. आपल्याकडे सेंट जॉर्ज हॉस्पिटल आहे. आपण त्या हॉस्पिटलला कन्व्हर्ट करुन ते कॅन्सर रिसर्च सेंटर म्हणून डेव्हलप केले तर त्यासाठी जो खर्च येईल त्याची या अर्थसंकल्पात तरतूद करावी, अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मी जलसंपदा विभागाच्या बाब क्र.33 वर बोलणार आहे. ग्रामीण किंवा शहरी भागात पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. पाणी ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे. त्याचे नियोजन करणे आणि लोकांना पाण्याच्या संकटातून बाहेर काढण्याची जबाबदारी घेण्यासाठी जी तरतूद करणे आवश्यक आहे ती केली पाहिजे.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामराव वडकुते )**

श्रीमती विद्या चव्हाण........

सभापती महोदय, विधी व न्याय विभाग, बाब क्र.36, पृष्ठ क्र.61 वर मी बोलणार आहे. न्याय व्यवस्थेमध्ये चांगला बदल करणे आवश्यक आहे. न्यायालयांमध्ये लाखो केसेस प्रलंबित आहेत. नवीन कोर्ट आणि न्यायाधीशांची नियुक्ती करणे यासाठी जी तरतूद लागणार आहे ती करणे खूप आवश्यक आहे.

सभापती महोदय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बाब क्र.47, पृष्ठ क्र.72- पाणी पुरवठा योजनेसाठी जमीन संपादन करण्याकरिता अतिरिक्त नुकसान भरपाई व व्याज यावरील खर्चासाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रात शिरपूर पॅटर्न राबविण्यासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, मागील 10 वर्षात शिरपूर पॅटर्नने भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याचे काम केलेले आहे.

...2P-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

त्यामुळे शेतकऱ्यांना अतिशय चांगल्या प्रकारे त्या ठिकाणी पाणी मिळत आहे. त्यामुळे तशा योजना राबविण्यासाठी शिरपूर पॅटर्नसाठी खास तरतूद महाराष्ट्र शासनाने करावी.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग यामध्ये मी मघाशी सांगितले होते की, टाटाचे एकच कॅन्सर हॉस्पीटल आहे व पेशंटची संख्या लक्षात घेता टाटाच्या तोडीचे कॅन्सर रिसर्च हॉस्पीटल सरकारने किंवा महानगरपालिकेने करायला पाहिजे.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभाग, बाब क्रमांक 58 पान क्रमांक 92 बाबत मला असे म्हणावयाचे आहे की, मानखुर्द येथे जी बालकल्याण नगरी आहे, तेथे पूर्वी अडीच ते तीन हजार अनाथ मुलांची व्यवस्था होती. आज त्याठिकाणी खूप मोठी जागा उपलब्ध असताना मुंबई सारख्या शहरात साडेतीन ते चार लाख अनाथ मुले रस्त्यावर बघायला मिळतात, त्यांच्यासाठी बाल कल्याण नगरीमध्ये चांगली व्यवस्था केली व त्यासाठी शासनाने तरतूद केली तर या स्ट्रीट चिल्ड्रेनचा प्रश्न सुटू शकेल. महिला आणि बाल कल्याण विभागाची अवस्था खूप वाईट आहे निधी अभावी महिला व बालकांच्या फायद्याच्या अनेक योजना रखडल्या आहेत, त्यासाठी अनाथाश्रम व बालकाश्रम तयार करण्याची आवश्यकता आहे. आपण नुसते म्हणतो की, बाल कामगार व बाल मजूर नको. परंतु त्या मुलांना उपजीविकेचे साधन नाही, त्यांच्या डोक्यावर छप्पर नाही, त्यांच्या संगोपनाची व्यवस्था सरकार करीत नाही. मुंबई सारख्या ठिकाणी या व्यवस्था करणे सहज शक्य आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी अशा प्रकारे बालकाश्रम आणि महिलाश्रम तयार करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी जो निधी लागेल त्याची तरतूद सरकारने केली पाहिजे.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग पान क्रमांक 97 बाब क्रमांक 64 बाबत बोलत असताना मी असे सांगू इच्छिते की,राष्ट्रीय ग्रामीण पेयजल आणि स्वच्छता गृह या दोन्हींची कमतरता मोठ्या प्रमाणात भासत आहे. पाण्याच्या अभावी मोठी भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाण्याअभावी लोक मरत आहेत, तडफडत आहेत, जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही. स्वच्छतेच्या बाबतीत सरकारने फक्त मोठ्या घोषणा केल्या आहेत, प्रत्यक्षात स्वच्छतागृहे देऊ शकलेले नाही. यासाठी खास तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभाग पान क्रमांक 101 बाब क्रमांक 65 आणि पान क्रमांक 12, बाब क्रमांक 6 यावर बोलत असताना मला असे म्हणायचे आहे की, आत्महत्या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण...

केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना शेततळी, विहीरी अशा अनेक प्रकारे मदत करता येईल. परंतु वन विभागाच्या संदर्भात सन 2000 पासून संजय गांधी नॅशनल पार्कमधील पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. चांदिवली येथे बारा ते साडेबारा हजार लोकांचे पुनर्वसन झालेले आहे. दामू नगर किंवा मालाड मधील आंबेडकर नगरात हे लोक 1995 पूर्वीपासून राहत असून त्यांनी पुनर्वसनाचे पैसे भरलेले आहेत. या लोकांच्या पुनर्वसनासाठी ते वन विभागात राहत आहेत म्हणून त्यांची घरे सन 2000 मध्ये तोडण्यात आली आहेत. अशा 33 हजार लोकांपैकी 12 हजार लोकांचे पुनर्वसन झाले असून उर्वरित लोकांचे पुनर्वसन मालाड येथे वन विभागाची जागा नाही. तरी देखील वन विभागाने आपली जागा म्हणून त्यांची घरे तोडली आहेत. या लोकांच्या पुनर्वसनाची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कृषी पशु संवर्धन दुग्ध व्यवसाय विकास पान क्रमांक 19 बाब क्रमांक 10/11/12/13/14 व 15 यावर बोलत असताना मला असे सांगायचे आहे की, शेतीसाठी आताच मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणात चांगल्या बाबी सांगितल्या आहेत. प्रत्यक्षात कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आपण यशस्वी झालो नाही. कर्जमाफी केल्यावर त्या लोकांना पुन्हा कर्ज घ्यावे लागले आहे. शेतीसाठी बी-बियाणे व खते लागतात किंवा पाणी लागते, औषध फवारणीाठी लागते, मजूर लागतात, रोजगार हमी योजनेतून शेतीसाठी मजूर देऊ शकतो, शेतीला पाणी देऊ शकतो. बी-बियाणे व फवारणीसाठी सतत तीन वर्षे शेतकऱ्यांना पैसा दिला तर त्याचा फायदा होईल. परंतु या सर्व खर्चासाठी त्याला कर्ज काढावे लागते. शेतीसाठी एक पंचसुत्री कार्यक्रम ठरवून शेतकऱ्याला जे लागते ते दिले पाहिजे. त्याचप्रमाणे शेतकऱ्याच्या मालाला हमी भाव मिळाला पाहिजे यासाठी जी व्यवस्था करणे शक्य आहे, त्यासाठी सरकारने काम करणे आवश्यक आहे. शेतीसाठी मी जो पंचसुत्री कार्यक्रम सूचविला आहे, त्यासाठी बजेटमध्ये तरतूद करावी अशी मी अपेक्षा करते व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, उद्योग विभाग बाब क्रमांक 41 पान क्रमांक 67 बाबत बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, उद्योग विभागाने सोलापूर जिल्ह्यसाठी नवीन एमआयडीसीला परवानगी द्यावी अशी मागणी केली आहे. आता कोणत्याही एमआयडीसीसाठी एकाच ठिकाणी 3 ते 4 हजार एकर जागा मिळणे कठीण झाले आहे. सोलापूर येथील माळ तालुक्यात सहा व चार पदरी मोठे हायवे मार्ग होत आहेत, त्याच्या बाजूला पाच किलोमीटर अंतरावर 500 एकर व दुसऱ्या बाजूला 1000 एकर अशा जमिनी उपलब्ध आहेत. उद्योगमंत्री महोदयांनी या बाबीला मान्यता दिलेली आहे. एका ठिकाणी मोठी एमआयडीसी करण्यापेक्षा त्याचे मॉडेल आम्ही वेळापूर ते धर्मापूर माळशिरस तालुक्यात तयार केले आहे. संपूर्ण तालुक्यातून मधून जाणारा तेथे हायवे मार्ग आहे. त्या तालुक्याचे नाव माळ आहे, एका बाजूला 400 ते 500 एकर व रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला 1000 एकर जागा उपलब्ध आहे. अशा प्रकारे उभ्या पध्दतीची एमआयडीसी तयार करावी. त्या एमआयडीसीपासून हायवे मार्गापर्यंत फक्त रस्ता करावा लागणार आहे. त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे पण एकाच ठिकाणी चार ते पाच हजार एकर जागा मिळत नाही म्हणून एमआयडीसी करण्यात येत नाही हे धोरण बरोबर नाही. त्या दृष्टीकोनातून सरकारने पावले उचलावी अशी विनंती केलेली आहे परंतु यामध्ये तशी तरतूद केल्याचे दिसत नाही. सरकारला मी विनंती करतो की, छोट्या एमआयडीसी एरियाला त्यांनी परवानगी दिली पाहिजे.

सभापती महोदय, समाज कल्याण विभागावर बोलत असताना मी असे सांगतो की, यामध्ये भटक्या विमुक्त समाजाबाबत शासनाचे धोरण चुकीचे चालू आहे असे मला वाटते. सरकार भटक्या विमुक्त समाजाबाबत कोणतेही धोरण ठरवित नाही. त्या मुलांची शैक्षणिक फी दिली जात नाही. आश्रमशाळांना अनुदान देण्यात येत नाही. कर्मचाऱ्यांना पगार दिला जात नाही. भटक्या व विमुक्त जातीबाबत सरकारचे नेमके धोरण काय आहे. इतर सर्व शाळांमध्ये सातवी नंतर आठवीचा वर्ग दिलेला आहे. आश्रमशाळांना मात्र सातवी नंतर आठवीचा वर्ग दिलेला नाही. एका तालुक्यात एकच आश्रमशाळा असेल तर सातवीच्या पुढे भटक्या विमुक्त जातीतील मुलांनी शिकायचे नाही काय ? याबाबत सरकारकडे किती वेळा प्रस्ताव मांडला तरी याबाबत सरकार कोणतेही धोरण तयार करण्यास तयार नाही. गेल्या दहा वर्षापासून आश्रमशाळांना सातवीच्या पुढे आठवीच्या वर्गांना



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर...

परवानगी दिली जात नाही. एका तालुक्यात एकच शाळा असते दुसरी असली तर त्या शाळेकडे जावे जागते. पंरतु अशा शाळाच उपलब्ध नाहीत. याबाबत मागील वर्षी आश्वासन दिले होते की, तुमच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात येईल. या वर्षात मंजुरी देण्यात आलेली नाही. विधीमंडळात आश्वासन देऊन सरकार किंवा मंत्री महोदय त्याची पूर्तता करीत नसतील तर ते योग्य नाही. त्यामुळे या वर्षात तरी परवागनी द्यावी व तरतूद करावी. ज्या ठिकाणी सातवीच्या पुढे आठवीच्या वर्गाची सोय नाही अशा ठिकाणी नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार माध्यमिक शाळेसाठी परवानगी दिली पाहिजे. सभापती महोदयांनी निर्देश दिले व मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, अशी परिस्थिती असेल तर प्रस्ताव मागविण्यात येतील. प्रस्ताव आलेले असताना परवानगी दिलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारची परवानगी दिली पाहिजे. अनेक शाळांना गेल्या दोन वर्षापासून अनुदान देण्यात आलेले नाही. ते अनुदान दिले पाहिजे, शिक्षकांचे पगार मिळाले पाहिजेत.

सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाबतीत बाब क्रमांक 10 पान क्रमांक 20 बाबत बोलतांना मी असे सांगू इच्छितो की, कृषीवर आधारीत उद्योग निर्माण केले पाहिजेत. जो पर्यंत कृषी मालाची किंमत शेतकरी ठरवीत नाही तोपर्यंत आत्महत्येचे दृष्टचक्र थांबणार नाही. आज दुष्काळ विदर्भात आहे, पुढील वर्षी तो पश्चिम महाराष्ट्रात येईल, उत्तर महाराष्ट्रात येईल. या दुष्काळावर मात करण्यासाठी सरकार काय उपाययोजना करते. पॅकेज व इतर मागण्या या ठीक असल्या तरी सरकारला माझी अशी सूचना आहे की, जोपर्यंत शेतकरी स्वतःच्या मालाची किंमत ठरवीत नाही. त्याला योग्य दाम मिळत नाही, पाऊस कमी झाला तरी दुष्काळ, जास्त झाला तरी दुष्काळ, बरोबर झाला व एकदम धान्य बाजारात आले तरी भाव पडतात, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणजे सर्व बाजूंनी शेतकऱ्यांचे नुकसान होते. पाऊस कसाही पडला तरी शेतकऱ्यांचे नुकसान ठरलेले आहे.शेतकरी जेव्हा त्याच्या मालाची किंमत ठरवेल व त्याच्या मालाचे दाम त्याला मिळेल तेव्हा त्याचा फायदा होईल. शेतकऱ्यांनी कांदा बाजारात आणला तर त्याचा भाव दहा रुपये किलो मिळतो. आमचा कांदा घेऊन व्यापाऱ्याने साठा केल्यावर कांद्याचे भाव 200 रुपये किलो होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा काहीही फायदा होत नाही. हा सर्व फायदा दलाल खात आहेत ते बंद करण्यासाठी सरकारने कृषीवर आधारीत उद्योग निर्माण करावेत. माझ्या माहिती प्रमाणे या कामासाठी केंद्र सरकार राज्य सरकारला 40 हजार कोटी रुपये देते.

या नंतर श्री.सांगळे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

गेल्या वर्षी राज्य सरकारने त्यापैकी नवा पैसा खर्च केला नाही. यामुळे सर्व निधी परत गेला. आपल्याला माहिती नाही का, आपल्याकडे यासंबंधी यंत्रणा उपलब्ध नाही. पुणे आणि महाराष्ट्रामध्ये काही एनजीओ आहेत, ते लोकांना उद्योग उभा करुन देतात, त्यांना प्रशिक्षण देतात, कामगार देतात, यंत्रे देतात. यापूर्वी 10 वर्षांपासून एनजीओ काम करीत होते. परंतु केंद्रात माननीय श्री.नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी एनजीओंना पैसे न देता राज्य सरकारकडे पैसे दिले. राज्य सरकारकडे कोणतीही यंत्रणा नसल्यामुळे सर्व निधी परत गेला. केंद्र शासनाकडून कृषीवर आधारित अनुदान येत आहे, ते युटीलाईज करण्याकरिता तरतूद केली पाहिजे. त्यासाठी निधी देण्याची केंद्र शासनाची तयारी आहे. परंतु त्या संदर्भात तरतूद न केल्यामुळे पैसे परत जात असल्यामुळे शासनाने यात लक्ष घालून तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक - 16, पृष्ठ क्रमांक 22, पशुसंवर्धन विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ऑस्ट्रेलिया सारख्या देशाचा मूळ पाया शेळी-मेंढी आहे. आज किती पशुधन कमी झाले आहे हे सरकारला माहीत नाही. जगाच्या बाजारात शेळी मेंढीच्या मटनाची मागणी आहे, त्यापैकी आपण एक टक्का पुरवठा करतो. ज्या धंद्यात 99 टक्के स्कोप आहे, तो आपल्याला परदेशी चलन मिळवून देवू शकतो. परदेशात नव्हे तर देशातील जेवढी मागणी आहे, ती सुध्दा पूर्ण होवू शकत नाही. तो धंदा पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाला आहे. गारपीटीत अनेक शेळ्या मेंढ्या मेल्या, त्याबद्दल कोणीही बोलत नाही, त्याकरिता अनुदान द्यावे असे कोणीही म्हणत नाही. शेळी-मेंढीच्या चरायचे सर्व कायदे वन खात्याने उलटे केले, त्यांना चराईसाठी गवत मिळत नाही. शासनाकडून त्यांच्यासाठी कोणतीही तरतूद केली जात नाही. त्यांच्या कातड्यापासून विविध वस्तू तयार केल्या जातात. त्या वस्तुंचे मार्केटिंग कसे होईल, याकरिता शासन कोणतीही तरतूद करीत नाही. बंदिस्त शेळी पालनाचा धंदा अतिशय चांगल्या पध्दतीने चालू शकतो. परंतु शासनाचे त्याकडे अजिबात लक्ष नाही. बंदिस्त शेळी पालनाबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे, बंदिस्त शेळी पालन करणाकरिता अनुदान देणार आहे का, शेड देणार आहे का ? या संदर्भात कमेंट करण्यापेक्षा तरतूद करणे अत्यावश्यक आहे. यासंबंधी फक्त बोलले जाते, परंतु कोणतीही तरतूद केली जात नाही. शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या दारात दोन शेळ्या असतात. परंतु दुधाचा धंदा पूर्ण नष्ट होत

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

चालला आहे. शेतीचे उत्पन्न न आल्यास शेतकरी दुधाच्या उत्पन्नावर जगत होता. परंतु दुधाचा धंदा आणि शेती संपल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांना 2-3 पूरक उद्योग असतात. तो पशुपालन करतो, दुग्ध व्यवसाय करतो आणि त्यांच्या विक्रीवर आपले जीवन जगतो. परंतु पुरे उद्योग बंद पडत असल्यामुळे शासनाने त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच शेळी-मेंढींचा व्यवसाय विकसित करण्यासाठी आवश्यक असलेला चारा, पाणी, अनुदान आणि त्यांच्या विक्रीची व्यवस्था शासनाने करावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक - 9, पृष्ठ क्रमांक 12, महसूल विभागाच्या संदर्भात मी एक गंभीर प्रश्न मांडणार आहे. विधिमंडळात लक्षवेधी सूचना आल्यानंतर त्यावर सदनात चर्चा झाली त्यात महसूल मंत्र्यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यातील कलेक्टर वीट उद्योग बंद करतो. परंतु त्यांना तसे करता येणार नाही. राज्यात सर्व ठिकाणी सारखे धोरण पाहिजे. एका जिल्ह्यात तसे धोरण राबविता येणार नाही. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील वीट भट्टया सुरु करण्यात याव्यात असे महसूल मंत्र्यांनी जाहीर केले. तरी तेथील कलेक्टर असे सांगतात की, कोण विधिमंडळ, माझ्याकडे अद्याप कोणतीही माहिती आलेली नाही. सभापती महोदय, येथे अधिकारी बसतात, ते कशासाठी बसतात ? मी यासंबंधी स्वत: मंत्रालयात सचिवांची भेट घेतली. परंतु सचिव त्याबद्दल काही बोलत नाहीत. मी त्यांना लेखी दिले व त्यासोबत प्रोसिंडिंग जोडून दिले. तरी सुध्दा ते काम करीत नसल्यास संविधानाप्रमाणे सभागृह चालणार आहे की नाही ? सध्या त्यांनी माढा तालुक्यातील 4 वीट भट्टया जेसीबीद्वारे उद्ध्वस्त केल्या आहेत. मी त्याबद्दल संबंधितांविरुध्द विशेषाधिकार भंग दाखल करणार आहे. अशा प्रकारे सरकार आणि अधिकारी यांच्यामध्ये समन्वय नसल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महसूल सचिव व त्यानंतर असलेल्या सचिवांचे कर्तव्य आहे की, विधिमंडळात यासंबंधी जे ठरले आहे, त्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे अत्यावश्यक आहे. आम्ही विधिमंडळात वारंवार बडबडतो, त्याचे थोडे फार तरी फलित झाले पाहिजे. अन्यथा काही अर्थ नाही.

सध्या नवीन आणेवारी नाही. माण तालुक्याच्या पलीकडे सातारा जिल्हा आहे, तेथे 10 पैसे आणेवारी आहे आणि ओढा ओलंडल्यानंतर माळशिरस तालुक्यात 90 पैसे आणेवारी आहे. ही बाब

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

कशी शक्य आहे, ओढा ओलंडल्यानंतर निर्सगात बदल होऊ शकतो का ? पूर्ण तालुक्यात 50 पैशापेक्षा जास्त आणेवारी असल्यामुळे त्यांना कोणतीही मदत मिळत नाही. यामुळे आणेवारीची पध्दत बदलली पाहिजे आणि नवीन आणेवारी पध्दत सुरु केली पाहिजे. वस्तुस्थितीनिहाय दुष्काळाच्या परिस्थितीत आणेवारी आली पाहिजे. सातारा जिल्ह्यात आणेवारी असल्यास ती ओढ्याच्या अलीकडे सोलापूर जिल्ह्यात सुध्दा असली पाहिजे. महसूल विभागात कोतवालांचा प्रश्न मोठा आहे. त्यांचे अनेक प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासनाने तातडीने प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

सभापती महोदय, शासनात कौशल्य विकास नावाचे खाते आले आहे, त्याकरिता मोठ्या प्रमाणात निधी आल्याचे सांगितले जात आहे. परंतु त्या निधीचा काय उपयोग, तो निधी कोणाला देणार आहात ? एक-एक महिन्याच्या कोर्सकरिता निधी दिला जातो. परंतु आयटीआयमध्ये 2 वर्षे, 3 वर्षांचे कोर्सेस असतात, ते मेक इन इंडियाकरिता कुशल कामगार देत आहेत. माननीय मंत्री आमचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकत आहेत. माननीय मंत्र्यांनी आम्ही मांडलेले विषय लक्षपूर्वक लक्ष देवून ते सोडवण्याकरिता प्रयत्न करावेत याकरिता मी हा मुद्दा पुन्हा उपस्थित केला आहे. मी सदनाला सांगू इच्छितो की, माळशिरस येथील आय.टी.आय. कॉलेज चालवावे की बंद करावे असा मला प्रश्न पडला आहे. त्यात 80 ते 90 लाख रुपयांचे भांडवल गुंतविण्यात आले आहे. त्याकरिता अनेक जाचक अटी आहेत. यामुळे ही कल्पना कोठून डोक्यात आली आणि आय.टी.आय. कॉलेज काढले इतका पश्चाताप झाला आहे. त्याकडे अधिकाऱ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन मोठा आहे. त्याकरिता परवानगी देण्याकरिता खूप भानगडी असल्यामुळे हा मुद्दा अनेक वेळा मांडणे गरजेचे आहे. कौशल्य विकास विभागाकडून सांगितले जाते की, आमच्याकडे कोणतेही धोरण नाही. परंतु यात एक दोन वर्षांचा कालावधी गेल्यास शाळेवाले लोक मरतील. यामुळे शासनाने तातडीने धोरण ठरवावे. आय.टी.आय. कॉलेज काढून विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत व त्याद्वारे मेक इन इंडियासाठी कुशल कामगार मिळणार आहेत. आपण एखादी योजना करीत आहात, ही चांगली बाब आहे. परंतु या संदर्भात प्रथम इन्फ्रास्ट्रक्चर तयार केले पाहिजे. उदाहरण सांगायचे झाल्यास कारखाने काढल्यास त्याकरिता कामगार कोठून आणणार आहात ? तसेच ज्यांच्याकडून कामगार

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर....

तयार केले जात आहेत, त्यांच्यासाठी शासनाचे कोणतेही धोरण नाही. "वर वर माया आणि उपाशी मी बया" या प्रमाणे काही द्यावयाचे नाही. अशा प्रकारे धोरण आणून कसे होणार ? आपल्याला त्यांच्यावर मनापासून प्रेम करायचे असल्यास खरी माया करावी लागेल व त्याकरिता तरतूद करुन त्यांना आर्थिक मदत करावी लागेल. या संदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात मी ज्या मागण्या केल्या आहेत, त्याचा शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांचा पुरवणी मागण्यांमध्ये समावेश करावा अशी विनंती करतो व याच ठिकाणी थांबतो.

-----------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मला सर्व प्रथम माननीय वित्त मंत्र्यांकडून एक गोष्ट समजून घ्यावयाची आहे की, बाब क्रमांक 12 आणि 13, पृष्ठ क्रमांक 20 याकरिता किती रकमेच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यास सांगितले आहे ? त्याकरिता 2 हजार रुपयांची पूरक मागणी केली आहे का ?

डॉ.दीपक सावंत : ती टोकन प्रोव्हिजन आहे.

श्री.प्रकाश गजभिये : अनेक ठिकाणी पूरक मागण्यांमध्ये दोन हजार, एक हजार नमूद केले आहे. पूरक मागणीद्वारे आपल्याला नेमके काय पाहिजे आहे, आपला नेमका उद्देश काय आहे ? आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणात एक हजार करोड, पंधरा हजार करोड, वीस हजार करोड असे ऐकले आहे. अनेक ठिकाणी पूरक मागण्यांमध्ये दोन हजार, एक हजार नमूद केले असल्यामुळे मी भाषणाला कोठून सुरुवात करायची, हे मला समजत नाही.

श्री.दीपक केसरकर : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, माहिती व तंत्रज्ञान संचलनालयात कंत्राटी पध्दतीने लिफ्ट दिलेल्या आहेत, त्यांच्या पेमेंटसाठी प्रत्येक महिन्याला एक लाख 60 हजार रुपयांप्रमाणे 6 महिन्यांची ही पुरवणी मागणी असून ती 18 लाख रुपयांची आहे. तसेच बाब क्रमांक 21 आहे.

श्री.प्रकाश गजभिये : मी बाब क्रमांक 12 व 13 च्या संदर्भात माहिती विचारली आहे.

श्री.दीपक केसरकर : बाब क्रमांक 12 व 13 वित्त विभागाशी संबंधित नाहीत.

यानंतर RR-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

बाब क्रमांक 12 व 13 ही वित्त विभागाची मागणी नसली तरी टोकन तरतूद केल्याशिवाय निधी खर्च करता येत नाही. म्हणून टोकन तरतूद केली आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, बजेटमध्ये किती तरतूद केली होती, त्यापैकी किती रक्कम खर्च झाली आणि पुरवणी मागण्यांमध्ये किती तरतूद केली आहे?

**तालिका सभापती** (श्री.रामराव वडकुते) : माननीय सदस्यांनी त्यांचे मुद्दे मांडावेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो कोणत्या बाबीशी संबंधित आहे? माननीय सदस्यांना डायरेक्ट बाबीवर बोलता येणार नाही. तरतूद का केली, कशासाठी केली असे बोलता येत नाही. तसे संकेत आहेत. बाबीसंबंधी प्रश्न उपस्थित करता येत नाही. बाबीच्या अनुषंगाने बोलता येते.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांना बाबीच्या अनुषंगाने काही सूचना करावयाच्या असतील तर त्या कराव्यात. प्रश्नोत्तराच्या स्वरूपात मुद्दा मांडू नये. मुद्यांच्या अनुषंगाने उत्तराच्या भाषणात मंत्री महोदयांकडून खुलासा केला जाईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, राज्य आर्थिक संकटातून जात आहे. पैसे नसताना राज्य सरकार काही करु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. कर्मचाऱ्यांना पगार द्यायला पैसे नाहीत. सभापती महोदय, बाब क्रमांक 56 मध्ये मान्यताप्राप्त अशासकीय कला, विज्ञान व विधी महाविद्यालयांना वेतनावरील खर्च भागविण्याकरिता 28.23 कोटी रूपयांची पुरवणी मागणी सादर केली आहे. या राज्यामध्ये अनेक महाविद्यालये विनाअनुदान तत्वावर चालविली जात आहेत. या सभागृहात आम्ही अनेकदा प्रश्न मांडून उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना विनंती केली होती. कायम विनाअनुदान तत्वासंबंधीचा कायदा करण्यात आला त्यापूर्वी म्हणजे 2012 पूर्वी जेवढ्या महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली त्या सर्व महाविद्यालयांना अनुदान देणे क्रमप्राप्त आहे. ती सरकारची जबाबदारी आहे. त्यांच्या बाबतीत 'कायम' शब्द वगळला पाहिजे. हा मुद्दा मांडून दीड वर्ष झाले, परंतु आजही त्यासाठी तरतूद केलेली नाही. मागील अधिवेशनात उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी विचार करण्याचे आश्वासन दिले होते. आम्हाला अपेक्षा होती की, पुरवणी मागण्यांमध्ये त्या अनुषंगाने तरतूद केली जाईल. परंतु आमचा अपेक्षाभंग झाला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 12 व 13 चा यासाठी उल्लेख केला होता की, अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना सबसिडी दिली पाहिजे ती दिलेली नाही. त्यांना जी यंत्रसामुग्री पाहिजे ती दिली गेली नाही. त्यामुळे अनुसूचित जाती जमातीचा शेतकरीवर्ग अडचणीत सापडला आहे. धामणगावमध्ये एका शेतकऱ्याने ज्या झाडाला लटकून आत्महत्या केली, त्याच झाडाला लटकून त्या शेतकऱ्याच्या पत्नीने देखील आत्महत्या केली. परंतु अद्याप त्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी कोणी मंत्री महोदय गेले नाहीत किंवा आमदार गेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीच्या निमित्ताने आपण हे वर्ष समता आणि सामाजिक न्याय वर्ष साजरे करीत आहोत. या राज्यामध्ये नव्हे तर देशामध्ये असहिष्णुतेचे वातावरण निर्माण केले जात आहे. रोहित वेमुला या संशोधकाला आत्महत्या करावी लागली.......(अडथळा).......

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, ज्या विद्यार्थ्याचा मृत्यू संपूर्ण देशाला हळहळ व्यक्त करायला लावतो. तो विषय माननीय सदस्यांनी सभागृहात मांडला, तो अगदी योग्य आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, बाब क्रमांक 17. पूर्णकालीन शिक्षकांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद केली आहे. शिक्षकांना पगार मिळाला नाही तर ते विद्यार्थ्यांना शिकवणार नाहीत, त्यामुळे विद्यार्थी ज्ञानार्जनापासून वंचित होणार आहेत. विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर होता. आज दिल्ली व उत्तरप्रदेश राज्य महाराष्ट्राच्या पुढे गेले आहे. याचे कारण असे की, सत्तेत असलेल्या शिवसेना व भारतीय जनता पक्षापैकी कोण कोणाबरोबर आहे हे कळून येत नाही. त्यामुळे अविश्वास निर्माण होत आहे. या राज्यामध्ये निश्चितच गुंतवणूक वाढली पाहिजे. परंतु गुंतवणूकदार पुढे येत नाहीत, त्यामुळे राज्याच्या प्रगतीला खीळ बसत आहे. शासनाने स्मार्ट सिटी निर्माण करण्यासाठी दोन शहरांची निवड केली आहे.

17-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR.3

SGB/ AKN/ AKN/ AKN/ AKN/ KTG/ AKN/ ST/ ST/ 17:40

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालते. पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना माननीय सदस्यांना बाब क्रमांकाचा उल्लेख करून मुद्दे मांडावे लागतात.

श्री.प्रकाश गजभिये : तसे संकेत आहेत. परंतु अभिभाषणाकरिता माननीय राज्यपाल विधानभवनामध्ये येत असताना त्यांनी राज्यपाल महोदयांना अडविले होते. सभापती महोदय, बाब क्रमांक 9. आजपर्यंत राज्यात जेवढ्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्याची कारणे काय आहेत याचा शासनाने शोध घेतला आहे का?

नंतर 2एस.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

पण आता पर्यंत आपण ते कारण शोधले नाही. या राज्यात काय सुरू आहे ? जी मुळे सडत असतील त्यावर इलाज करयाला पाहिजे. ते झाड जर उन्मळून पडले तर त्याची फळे आपल्याला खायला मिळणार नाहीत. हे सरकार फक्त फांदी आणि पानावरच इलाज करीत आहे. त्या शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे. त्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्यास कोणती अडचण आहे. आपण येथे दुसरे प्रकल्प आणू इच्छिता. आपण आठ हजार कोटी रूपयांचे करार केले आहेत. जपान हा एक छोटासा देश आहे. जपान हा बुद्धीस्ट देश आहे. या देशाकडून आपल्याला कर्ज मिळणार आहे. आपण हिंदुस्थान, हिंदुस्थान म्हणून हिंदूंच्या नावाने राजकारण करत आहात. जपान सारख्या बुद्धिस्ट देशाची मदत घेऊन आपल्या देशातील 100 शहरे स्मार्ट करणार आहात. हे फक्त जपानमुळे होणार आहे. काल धर्मा-धर्माच्या नावाने भांडणे झाली. ते कुठे तरी थांबायला पाहिजे. त्यावर कुठे तरी अंकुश ठेवला पाहिजे. .... (अडथळा)..... स्मार्ट शहरे बनविण्यासाठी दहा कोटी रूपये खर्च येणार आहे. हा सर्व खर्च आपण आपल्या डोक्यावर घेत आहोत. आपल्या महाराष्ट्रातील माणसापेक्षा दिल्लीतील माणसाचे डरडोई उत्पन्न जास्त आहे. या राज्यातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढेल तेव्हाच महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होईल. आपला राज्यावर या देशातील गुंतवूणकदारांचा विश्वास नाही. आपल्या देशातील गुंतवणूकदार दुबईमध्ये जाऊन 19 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक करतात. पण या महाराष्ट्रामध्ये ते गुंतवणूक करीत नाही. याचे कारण देखील शोधले पाहिजे. आपल्या देशातील लोक परदेशात जाऊन सामंजस्य करार करीत आहेत. असे बोलल्यानंतर आपण कोणत्या बाबीवर बोलत आहात असे मला विचारतात. आम्ही बाब क्रमांकाविषयी बोलणार नाही. तसेच पुरवणी मागणीच्या बाहेर देखील जाणार नाही.

हे राज्य फुले, शाहू आंबेडकरांचे आहे. आपण फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव बरे वाटण्यापुरतेच घेतात. परंतु, त्यांचे नुसते नाव घेऊन चालणार नाही. आपल्या अंतरआत्म्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर असावयास पाहिजे. आपले राज्य सक्षम असताना आज आपल्याला दुसऱ्या देशाची गरज काय पडते आहे ? आपल्या राज्यात खनिज आहे, वीज आहे. असे असताना

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

आपल्याला कर्ज काढण्याची आवश्यकता काय आहे ? आपल्याला विद्वान मुख्यमंत्री मिळाले आहेत. तरी कर्ज काढण्याची गरज काय आहे ? आपल्या राज्यातूनच उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केले पाहिजे. आपण पंचतीर्थाचा उल्लेख केला आहे. ....(अडथळा)..... डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबरच अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाच्या तरतुदीसंबंधी सांगायला पाहिजे होते. पण त्यासाठी कुठल्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही.

आता मी बाब क्रमांक 9 वर बोलणार आहे. मागेल त्याला शेततळे आपण देणार आहात. त्यामुळे आम्ही गावातील शेतकऱ्यांकडे गेलो. त्यांना विचारले की, आपल्याला शेततळे पाहिजे काय, तेव्हा ते म्हणाले की, दादा आमच्याकडे दोन एकर जागा असून एक एकर जागेत शेततळे बांधले तर उरलेल्या एक एकर जागेचे आम्ही काय करणार ? आज 50 हजार रूपयांमध्ये खरोखर शेततळे होऊ शकते काय ? आमच्या विदर्भामध्ये ऑनलाईन शेततळी व विहिरी मागितल्या आहेत. पण बऱ्याच ठिकाणी आता शेततळ्यांना देखील विरोध होत आहे. आम्ही आमचे सरकार असताना शेततळ्यांसाठी एक लाख रूपये देत होतो. ही तरतूद आपण दोन लाख रूपये करायला पाहिजे होती. आपण पन्नास हजार रूपयांवर आला आहात. आज खरोखर पन्नास हजार रूपयांमध्ये शेततळे होऊ शकते काय ? अशी परिस्थिती आज राज्यामध्ये आहे. आज शेतकऱ्यांकडे पैसे नसल्यामुळे मग शोकांतिका होते.

कृषि उत्पन्न उन्नती योजने अंतर्गत विविध केंद्र पुरस्कृत योजनेवर मी बोलणार आहे. यासाठी रूपये 4000/- चे टोकन दिले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण या चर्चेसाठी काही वेळ ठरवून दिला आहे काय ?

**तालिका सभापती (श्री.रामराव वडकुते) :** रात्रौ 7.00 वाजेपर्यंतचा वेळ दिलेला आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 27 वर बोलणार आहे. आमच्या कार्यकाळामध्ये चंद्रपूर येथे मेडिकल कॉलेज तयार झाले. परंतु, गोंदियाला मेडिकल कॉलेज का होत नाही, यासाठी निधीची तरतूद आपण पुरवणी मागणीमध्ये का केलेली नाही ? मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची एकपण टीम तेथे आलेली नाही. त्यामुळे गोंदिया येथे आपण खरोखर मेडिकल कॉलेज बांधणार आहात काय असा प्रश्न मला विचारावयाचा आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 53 बोलणार आहे. हे शासन गोंदिया येथे कॉलेज करतील असे मला वाटत नाही. आपण नागरपूरला एम्स करणार आहात. त्यासाठी आपण कुठली जमीन घेतली आहे व त्यासाठी किती निधी ठेवला आहे ?

सहकारी सूत कताई गिरण्यांसाठी 10 कोटी रूपयांचे भांडवल ठेवले आहे. मागील वर्षी 7 लक्ष 65 हजार एवढा निधी खर्च झालेला आहे. असे असताना 9 कोटी 92 लाख 35 हजार रूपयांची मागणी केली आहे. हे सरकार फक्त पोकळ घोषणा देऊन वर्ष फुकट घालवत आहे. त्यामुळे लोकांना न्याय मिळत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने 17 सूत कताई गिरण्या आहेत. त्यांनी राज्य शासनाकडे कर्ज मागितले. पण आपण एकाही सूत गिरणीला निधी देण्याचा प्रयत्न केलेला नाही.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

किंवा त्याचे निवेदन स्वीकारले नाही.

बाब क्रमांक 55 - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला एक इतिहास आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने ते विद्यापीठ आहे. त्या विद्यापीठाने 20 कोटी रूपये मागितले परंतु त्यांना फक्त दोन कोटी रूपये देण्यात आले, ही फार शोकांतिकेची बाब आहे.

बाब क्रमांक-3 - आज सायबर गुन्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. मागील सरकारच्या तुलनेत आता जास्त वाढ झालेली आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीचा वापर केला पाहिजे आणि त्यासाठी आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी करून माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

बाब क्रमांक 20-21, पृष्ठ क्रमांक 33 - वित्त विभाग- राज्यातील सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांना एक तारखेला वेतन दिले जाईल आणि वेतन देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाईल अशाप्रकारचा आदेश वित्त विभागाने काढला. हा शासन निर्णय काढल्यानंतर असा एकही महिना गेला नाही की, शिक्षक कर्मचाऱ्यांना एक तारखेला वेतन मिळाले आणि वेतन देण्यास दिरंगाई झाल्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असा एकही महिना गेला नाही. जो शासन निर्णय काढण्यात आलेला त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी आणि वेतन देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 रोजी वित्त विभागाने एक शासन निर्णय काढून या सभागृहाने पारीत केलेला नागरी सेवा, सेवानिवृत्ती वेतन नियम 1982 रद्द करुन अंशदायी नवीन परिभाषित योजना लागू केली. वित्त विभागाने काढलेला हा शासन निर्णय सभागृहाच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करणारा असल्यामुळे हा शासन निर्णय रद्द करुन सर्व कर्मचारी आणि शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा करावी.

सभापती महोदय, वित्त विभागाकडे येणाऱ्या फाईल्स ज्यास आपण नस्ती म्हणतो, त्यामध्ये वारंवार त्रुटी काढून परत पाठविल्या जातात. नस्ती प्रलंबित ठेवणे, त्रुटया काढणे आणि नस्तीला पारीत करण्यासाठी वेळ लावणे ही नेहमीची पद्धत आहे त्यामध्ये बदल करावा अशी माझी विनंती आहे. योजनांतर्गत ज्या योजना आहेत त्या योजनेत्तर योजनेमध्ये सहभागी कराव्यात म्हणजे वेतन आणि अनुदान देण्यात विलंब होणार आहे.

बाब क्रमांक 17, पृष्ठ क्रमांक 25 - शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - या ठिकाणी दोन शिक्षकांच्या वेतनाची तरतूद केली याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो. परंतु एकात्मिक अपंग समावेशित योजनेतील 29 शिक्षकांना 2013 पासून वेतन देण्याबाबत तरतूद केली नाही, ती करण्यात यावी अशी विनंती करतो.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार.....

सभापती महोदय, दिनांक 2 मे, 2012 रोजी शिक्षण विभागाने एक शासन निर्णय काढून राज्यातील शिक्षकांच्या नियुक्तीवर बंदी टाकली होती. परंतु राज्यातील शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालकांनी आणि संस्थाचालकांनी हा निर्णय डावलून शेकडो शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या आणि शासनाला जवळपास 60 ते 70 कोटी रुपयांना लुबाडले आहे. या प्रकरणाची शिक्षण आयुक्तांनी चौकशी केली. परंतु संबंधितांवर कारवाई झाली नाही. ज्यांनी सरकारी तिजोरीला लुबाडले ते संस्थांचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण उप संचालकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, एप्रिल 2008 च्या वेतनाच्या आधारावर वेतनेतर अनुदान दिले जाते. हे वेतनेतर अनुदान पाच टक्के दरवर्षीच्या 31 मार्च वेतनाच्या आधारावर देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये 324 वाढीव पदांना मान्यता देण्याचा प्रश्न प्रलंबित आहे. हा प्रश्न ताबडतोब निकाली काढावा आणि त्यांना वेतन देण्याची तरतूद करावी. अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याचे कबूल केले त्याप्रमाणे तो शब्द पाळला जाईल अशी मी अपेक्षा बाळगतो.

बाब क्रमांक 55-56-57, पृष्ठ कमांक 87- उच्च व तंत्रशिक्षण विभाग - प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षेवर बहिष्कार टाकला, अध्यापनावर नाही. त्यानंतर त्यांनी हा बहिष्कार मागे घेतला. विद्यापीठाच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठाच्या परीक्षेत काम केल्याचा मोबदला त्यांना मिळाला. परंतु प्राध्यापकांचा अध्यापनावर बहिष्कार नसताना त्यांना 71 दिवसांचे वेतन देण्यात आले नाही. ते वेतन देण्यासाठी तरतूद करावी, अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सनल 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2015-2016 चे खर्चाचे पूरक विवरणपत्र आमच्या सर्वांच्या हातामध्ये आलेले आहे. अशाप्रकारच्या पुरवणी मागण्या प्रत्येक अधिवेशनात नियमित यायला लागल्या आहेत. त्यामुळे काही वर्षांनी अशी परिस्थिती येण्याची शक्यता आहे की, राज्याचे वार्षिक अंदाजपत्रक सादर न करता नवीन पद्धतीप्रमाणे प्रत्येक तीन-तीन महिन्यांचे अंदाजपत्रक केले तर ते अधिक सोयीचे होण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये काही संकटे उद्‌भवली म्हणजे कधी भूकंप झाला असेल, दुष्काळ असेल, त्यावेळेला आपल्या खर्चाचे अंदाजपत्रक बदलणे आवश्यक असते. परंतु ज्या नियमितपणे होणाऱ्या गोष्टी आहेत, त्या गोष्टींवर आणि ज्यांची आपण नियोजनामध्ये तरतूद केलेली आहे अशा सर्व बाबींसाठी जी तरतूद आवश्यक आहे ती महसूल आणि खर्च या दोन्हींचा ताळमेळ घालताना जर आपल्याकडे फिस्कल डेफिशियन्सी नसेल आणि आपल्याला त्याबद्दलची शिस्त लावायची नसेल तर तो एक चुकीचा पायंडा राज्यात पडू शकतो. पूर्वी हे होत नव्हते आणि आता ते होत आहे असे मी म्हणत नाही. ते पूर्वीही होत होते आणि आताही होत आहे. परंतु जे बरोबर नाही ते सांगितले पाहिजे, एवढ्या उद्देशाने मी बोलत आहे. प्रत्येक अधिवेशनात येणाऱ्या पुरवणी मागण्यांच्या आकडेवारीची तुलना केली तर ती आकडेवारी वाढत चाललेली दिसत आहे. उद्या अर्थसंकल्प सादर होणार आहे आणि अर्थसंकल्पाच्या आधीच्या दिवसापर्यंत आपल्या पुरवणी मागण्या येत असतील तर व्यवस्थेमध्ये दुरूस्ती करण्याची आवश्यकता आहे याची शासन निश्चितपणे नोंद घेईल असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, आपण याठिकाणी सांगतो की, सर्व विभागाचे मंत्री बसतील. आपल्या सूचना लिहून घेतील. ज्या रिच्युॲलिस्टीक गोष्टी आहेत त्याचा फेरविचार आपण सर्वांनी एकत्र बसून केला पाहिजे अशी मला मनापासून विनंती करावीशी वाटते. आपण सर्व भाषण करतो. विरोधी पक्ष हातामध्ये जे-जे साधन उपलब्ध होईल त्यातून शासनकर्त्या पक्षावर टीकात्मक बोलण्याचा प्रयत्न करणार.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

आपण विरोधी पक्षात बसत होता त्यावेळी आपण यापेक्षा काहीही वेगळे करीत नव्हता किंवा आज आम्ही या बाजूला आहोत म्हणून काही तरी वेगळे करीत आहोत अशातील भाग नाही. सध्याची सभागृहातील उपस्थिती बघितली तर असे लक्षात येईल की, जेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील तेव्हा एक औपचारिकता म्हणून माननीय मंत्री पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देतील. पूर्वी अपेक्षा होती की, नव्याने जे सदस्य निवडून सभागृहात येत होते त्यांना वाटायचे की, अमुक विषयावर मी पोटतिडकीने बोललो म्हणून संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांनी त्या बाबत दखल घेऊन उत्तर द्यावे. परंतु आता ती प्रथा बंद पडणार आहे. आता सरकारकडून आपापसात बोलतानाच ठरविले जाते की, ज्या मागण्या सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत त्या आम्ही ऐकल्या असून त्यावर कोणी तरी एक मंत्री महोदय एकत्रितरित्या उत्तर देतील आणि त्यानंतर मागण्या मंजूर करण्यात येतील. महोदय, पुरवणी मागण्या मंजूर होणारच आहेत. आपण त्यावरील भाषणे ऐकून न ऐकल्यासारखे करणार आहात. या बाबतीत दुरुस्ती करण्याची कोणतीही शक्यता नाही. या मागण्या मंजूरच होणार आहेत. माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री त्यांच्या भाषेत मला सांगत आहेत की, पुरवणी मागण्या हा एक उपचार आहे. वास्तविक पाहता सन्माननीय सदस्यांनी ज्या पुरवणी मागण्या मांडलेल्या असतात त्याचा सरकारने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्र.1, पृष्ठ क्र.3 वर मी बोलतो. या मागणी अंतर्गत मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद आणि डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थांना सहायक अनुदान देण्याचे नमूद केले आहे. या प्रबोधिनी अतिशय महत्त्वाचे शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. परंतु या संस्थांना सहायक अनुदान देत असताना तेथे किती प्रशिक्षण दिले जातात, त्याचा अभ्यासक्रम कोण ठरविते हा महत्त्वाचा भाग आहे. आपण या ठिकाणी कर्मचारी/प्राध्यापकांच्या उपलब्धतेबाबत जे नमूद केले आहे त्यावरुन प्रशिक्षणविषयक कामाचा काहीही बोध होत नाही. हे काम सुध्दा पुरवणी मागण्यासारखेच उरकून टाकण्यासारखे आहे काय, या संस्थांतून खरोखरच प्रशिक्षण दिले जाते काय ? माननीय सामान्य प्रशासन राज्यमंत्री हे वैद्यकीय क्षेत्राशी निगडित असल्यामुळे रिफ्रेशेस कोर्सेस काय असतात याची त्यांना चांगली माहिती आहे. या माध्यमातून त्या संस्थांतील पदांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मंजुरी द्यावयाची आहे. या पदांना मंजुरी देण्याशिवाय पर्याय नाही. प्रशासनाचे जे इन्फ्रास्ट्रक्चर



श्री.हेमंत टकले....

असते त्यातून प्रशासन बळकट करण्यासाठी प्रशिक्षणाच्या योजना केल्या जातात. त्यामुळे आपण दिलेला निधी आणि त्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडून खरोखरच प्रशिक्षणाचे काम होते काय याचा लेखाजोखा मांडण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्र.3, पृष्ठ क्र.7 वर मी बोलतो. या मागणी अंतर्गत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माणासाठी बांधकाम करणे आणि महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे यासाठी 111 कोटी 93 लाख रुपयांची तरतूद केली आहे. हा खर्च आपण केवळ निदर्शनास आणून देत आहात. परंतु राज्यात पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारती किती आहेत आणि घरे किती आहे याचे विवरण या ठिकाणी नमूद करणे आवश्यक होते. सर्व अधिवेशनात हा प्रश्न सातत्याने मांडला जातो. राज्यात पोलिसांच्या घरांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे पोलिसांसाठी अधिकची घरे बांधण्याची आवश्यकता आहे. या पुरवणी मागणीच्या माध्यमातून राज्य सरकार जो निधी उपलब्ध करुन देणार आहे त्यातून केवळ 30-35 टक्के लोकांनाच घरे मिळू शकतील. तसेच दुसरी बाब अशी की, पोलिसांची घरे 30-40 वर्षे जुनी झालेली आहेत. त्यांच्या घरांची दुरुस्ती आणि देखभाल होत नाही. उलट या माध्यमातून अनेक प्रश्न निर्माण केले जातात. या प्रश्नाचे उत्तर दिले जात असतानाच पुन्हा त्यातील त्रुटी समोर येतात.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाची बाब क्र.9, पृष्ठ क्र.13 वर मी बोलत आहे. या मागणी अंतर्गत शेततळी, विहिरी तयार करणे, जल व मृद संवर्धनाची कामे यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मला वाटते या आकडेवारीत कुठेतरी गोंधळ झालेला आहे. त्यामुळे या आकडेवारीबाबत माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी खातरजमा करुन घ्यावी. एकूण तरतूद किती आणि एकूण खर्चापैकी किती खर्चाला मान्यता दिली हे त्यांनी समजावून सांगावे. मंजूर अनुदानातून जेवढी गरज लागणार आहे त्या बाबत सांगावे. जर 50 गुणांपैकी केवळ 1 गुण मिळाला आणि 49 गुण मिळाले नाही, असे होत असेल तर या बाबतीत आपले काय नियोजन आहे ? या संदर्भात विभाग काय करीत आहे, हे समजले पाहिजे. दरवर्षी मार्च महिन्यात एक बातमी नक्की येते की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मंजूर झालेल्या निधीपैकी प्रत्येक विभागाने 30 टक्क्यांपेक्षा जास्त खर्च केलेला नाही. परिणामी, तो

..3..



श्री.हेमंत टकले....

निधी तसाच पडून आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागापासून सर्व विभागांची अशीच परिस्थिती असते. त्यामुळे अर्थसंकल्पात मंजूर केलेली रक्कम खर्च होत नसेल, ती रक्कम तशीच पडून राहत असेल आणि तरीही पुरवणी मागण्या वाढत असतील तर यामागील नेमकी कारणे काय आहेत ते शोधले पाहिजे. मला वाटते तात्पुरता इलाज करण्यापेक्षा मूळ रोग काय आहे याकडे लक्ष देऊन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाची बाब क्र.7, पृष्ठ क्र.29 वर मी बोलत आहे. या मागणी अंतर्गत नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी सहाय्य करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. महोदय, वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी योजना जाहीर केली जाते. जेव्हा ही योजना जाहीर केली जाते तेव्हा ती योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी काही तरी खर्च करावा लागणार आहे ही बाब आपल्या लक्षात का येत नाही ? मुळात या संदर्भातील मागणी मूळ अर्थसंकल्पात न येता पुरवणी मागण्यांमध्ये का येते हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे या संदर्भातील उत्तर माननीय मंत्र्यांनी देणे आवश्यक आहे. महोदय, अशा अनेक बाबी पुरवणी मागण्यांमध्ये आहेत.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्र.31, पृष्ठ क्र.45 वर मी बोलत आहे. या मागणी अंतर्गत ग्रामीण क्षेत्रांतील विविध बांधकामासाठी आस्थापना खर्च आणि हत्यारे व संयंत्रे यांच्या खर्चासह 6 कोटी 28 लाख 62 हजार रूपयांची मागणी केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रूग्णालयाच्या बांधकामाबाबत या मागणीमध्ये नमूद केलेले आहे. आज बऱ्याच बांधकामाची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. त्यामुळे अर्धवट कामे पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. याशिवाय बृहन्मुंबई न्यायालयाचे संगणकीकरण करणे यासाठी सुध्दा मागणी करण्यात आली आहे. सर्वसाधारण असा अनुभव आहे की, ज्यावेळी या बाबी लक्षात येतात त्यावेळी नियोजनात प्रत्यक्ष खर्च झालेला असतो. पण तो अकाऊंट फॉर करण्यासाठी जी तरतूद आहे तेवढ्यापुरत्याच या बाबी असतात. त्यामुळे यामध्ये सुध्दा आपल्याला लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची बाब क्र.57, पृष्ठ क्र.87 वर बोलतो. या मागणी अंतर्गत मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च भागविण्यासाठी 41 कोटी 37 लाख 66 हजार

..4..



श्री.हेमंत टकले....

अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. मुळात शिस्त म्हणून व्हरिअन्स फॅक्टर किती आहे याचा अभ्यास केला पाहिजे. जी तरतूद केली आहे त्यामध्ये किती टक्के वाढ वा घट होऊ शकते या बाबतची टक्केवारी आपण धरु शकतो. ज्या पध्दतीने आपण मागणी करीत आहात त्या पध्दतीने ती विवरणात बसत नसेल तर या बाबतची शिस्त आपण केव्हा तरी आणणार आहात की नाही ? आपल्याला प्रत्येक वेळी ऐकायला मिळते की, अर्थ विभागाकडून बहुतेक विभागांचे प्रस्ताव थांबवून ठेवण्यात येतात. शिक्षण विभागाची तर या बाबतीत फारच तक्रार असते.

2 व्ही....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

माननीय शिक्षण मंत्री प्रस्ताव पाठवितात आणि अर्थ खाते सांगते की, याची प्रोव्हिजन नाही. हे जे प्रकार चालले आहेत त्याकडे आपल्याला निश्चितपणे बघितले पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 109, बाब क्रमांक 67 - अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध योजनांवरील खर्च भागविण्यासाठी 65 कोटी 64 लाख इतकी मागणी आहे. 75 कोटी एवढ्या निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. 75 कोटी खर्च असून यापैकी 9 कोटी 35 लाख 95 हजार एवढा खर्च चालू वर्षांत मंजूर अनुदानातून भागविता येणे शक्य आहे. ही सर्व प्रकारची कॉंट्राडिक्शन्स आहेत. असे कसे चालू शकते ? तुम्ही तुमच्या घराचे, तुमच्या पगाराचे जेव्हा नियोजन करता तेव्हा तुम्हाला निश्चित बाबी माहीत असतात. तुम्ही राज्याच्या तिजोरीचे कस्टोडियन आहात. जनता कररूपाने तुम्हाला पैसे त्यामध्ये देत असते. हा सगळा जनतेकडून आलेला पैसा सर्व योजनांवर खर्च करीत असतो. पैसे कमी पडतात म्हणून कर्ज काढत असतो, कर्जावर व्याज भरत असतो, त्याचीही काही तरी कॉस्ट राज्याला मोजावी लागते. मग एवढे 75 कोटी मंजूर झालेले आहेत आणि वर्षभरात 9 कोटी 35 लाख 95 हजार एवढाच खर्च होऊ शकतो याचा अर्थ हे खाते काम करीत आहे किंवा नाही असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे केवळ मंजुऱ्या देणे उपयोगाचे नाही. आपण सांगितले की, आता हा एक उपचार आहे, आपल्याला पूर्ण करावा लागेल. आपण त्या पध्दतीने याकडे बघितले तर यात फार गांभीर्याने चर्चा करण्याची सुध्दा आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. परंतु राज्य शासन योग्य पध्दतीने चालण्यासाठी आणि राज्य शासनाच्या प्रशासनावर आाणि आर्थिक शिस्तीवर आपल्याला काही नियंत्रण ठेवण्यासाठी आताच्या परिस्थितीत पाहिले पाहिजे. कारण मघाशीच माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्य एका कठीण परिस्थितीतून जात असताना सुध्दा राज्याचा जीडीपी वाढलेला आहे, राज्याचा इंडस्ट्रियल ग्रोथ रेट वाढलेला आहे, एम्प्लॉयमेंट ऑपॉर्च्युनिटीज वाढलेल्या आहेत, म्हणज् सगळे सकारात्मक चित्र असताना जर आर्थिकदृष्ट्या त्याचे नियोजन आपण चुकत असू तर या सर्व गोष्टींचा सरकारने आणि संबंधित माननीय मंत्र्यांनी गांभीर्याने विचार करावा आणि चांगल्या आर्थिक शिस्तीने अर्थसंकल्प एकदा सादर झाल्यावर पुढील प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या कमीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

कमी कशा ठेवता येतील याकडे लक्ष द्यावे. सर्व खात्यांनी आपल्या ज्या योजना आहेत त्यासाठी मंजूर केलेल्या निधीचा योग्य उपयोग होतो की नाही हे पाहण्यासाठी यावरील कायमस्वरूपी एक देखभाल यंत्रणा आपल्या मंत्रालयात असावी असे मला आपल्याला सुचवावेसे वाटते. आपण या सगळ्या गोष्टींचा एका वेगळ्या पध्दतीने विचार कराल अशी आशा आहे. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सर्वच खाती या नंतरच्या काळात लक्ष देतील, आपल्या सर्व मागण्या पाहतील, असे मला वाटते. आपण काय उद्दिष्ट ॲचिव्ह केले किंवा काय करू शकलो नाही हे पाहिजे पाहिजे आणि अभूतपूर्व परिस्थिती आणि राज्यावर येणारी संकटे यासाठी सुध्दा एक कायमचा राखीव निधी करून या सर्वांचे नियोजन केले तर या पुरवण्ी मागण्यांच्या संदर्भात आता यामध्ये दिसणारे विरोधाभास आहेत ते पुढील काळात दिसणार नाहीत. आपण या सर्वांची खबरदारी घ्याल असा मला विश्वास वाटतो. त्यमुळे एवढ्या गोष्टींचा विचार करावा अशी मी शासनाला विनंती करून या ठिकाणी थांबतो.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष झांबड (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अर्थसंकल्प मांडला जातो, तो वर्षाचा लेखाजोखा, आवक-जावक या दोन्ही गोष्टी गृहीत धरून मांडला जातो. गेल्या अर्थसंकल्पानंतर आतापर्यंत 3 वेळा पुरवणी मागण्या झाल्या, जुलैच्या अधिवेशनात पुरवणी मागण्या झाल्या, डिसेंबरच्या अधिवेशनात पुरवणी मागण्या झाल्या आणि आता शेवटी मार्चमध्ये पुरवणी मागण्या आहेत. 4581 कोटी 32 लाख रूपयांच्या पुरवणी मागण्या झाल्या आहेत. आतापर्यंत मूळ अर्थसंकल्प 2 लाख 78 हजार 494 कोटी 61 लाख रूपयांचा होता, त्यावर 3 वेळा पुरवणी मागण्या झाल्या आहेत, त्या 35468 कोटी 52 लाख रूपयांच्या म्हणजे अर्थसंकल्पाच्या 15 टक्के पुरवणी मागण्या 3 अधिवेशनात झाल्या आहेत. प्रश्न हाच आहे की, ज्यावेळी तुमच्याकडे आवक फिक्स आहे, जावक त्या आधारे ठरविता तर मग या पुरवणी मगाण्या ठरविता, त्यावेळी आवक कोठून येते, याचा खुलासा या पुरवणी मागण्यांमध्ये नाही.

सभापती महोदय, आता मला स्पेसिफिक विषयावर यायचे आहे. महसूल विभाग, पृष्ठ क्रमांक 12, बाब क्रमांक 6 व 7 - आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य देण्याकरिता अतिरिक्त तरतूद - नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य करण्यासाठी अतिरिक्त तरतूद असे आहे. अस्मानी संकटे येतात, त्यावेळी पुरवणी मागण्या त्या-त्या संकटांकरिता करणे हे अनिवार्य आहे, योग्य आहे, त्यासंबंधी कोणाचा विरोध होण्याचे काही कारण नाही. सभापती महोदय, मला अशा संकटाच्या वेळी सरकारला काही सुचवावेसे वाटते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, कोकण, पश्चिम महाराष्ट्र येथे गारपीट व अवकाळी पावसामुळे केळी, द्राक्षे, आंबा, हरभरा, ज्वारी, गहू, संत्रे, धान या पिकांचे व बागायतीचे कोट्यवधी रूपयाचे नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून दिवसेंदिवस आत्महत्या करणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. झालेल्या नुकसानीच्या संदर्भात व आत्महत्या रोखण्यासाठी भरीव आर्थिक मदत झाली पाहिजे होती, ती आमच्या दृष्टीने झालेली नाही. राज्यात वारंवार होणाऱ्या अवकाळी पावसामुळे ओल्या, कोरड्या दुष्काळामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून सुमारे 1 लाख रूपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात येते. परंतु आपद्ग्रस्त कुटुंबाची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष झांबड ....

हानी भरून काढू शकत नाही. दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई आणि या महागाईच्या काळात 1 लाख रूपयांत मृत व्यक्तीच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नाही. त्यामुळे त्याकरिता सानुग्रह अनुदानात वाढ केली पाहिजे. आम्हाला याकरिता मागावे लागते याचे दुःख आहे. मला सांगावेसे वाटते् की, शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत लावण्यात आलेल्या निकषामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य मिळत नाही, त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंब आर्थिक विवंचनेत सापडले आणि त्यामुळे परत आमहत्यांच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाकडून शासन निकषांत बदल करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना दिलासा देण्यात यावा. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबाला जास्त मदत मिळाली पाहिजे ही मागणी अत्यंत दुःखाने मी येथे मांडत आहे. कारण हेच आहे की, मागील अधिवेशनापासून आम्ही कर्जमाफीची मागणी करीत आहोत. फक्त आमचीची नाही तर राज्यातील शेतकऱ्यांची सुध्दा हीच मागणी आहे. अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या पत्रांत कर्जमाफीची गरज नमूद केली आहे. किमान माझ्या मृत्यूनंतर तरी सरकारने कर्जमाफी जाहीर करावी, जेणेकरून इतरांवर ही वेळ येणार नाही अशा स्पष्ट शब्दांत शेतकऱ्यांनी पत्र लिहून ठेवली आहेत. सभापती महोदय, अशी अनेक उदाहरणे आहेत. नेहमी कर्जमाफी झाली पाहिजे असे आम्ही कधीही म्हणणार नाही. परंतु राज्यातील सध्याची अभूतपूर्व परिस्थिती पाहता, अनेक शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे वाढते चिंताजनक प्रमाण पाहता, शेतकऱ्यांची कर्जमाफी हा तातडीने सर्वाधिक प्रभावी उपाय आहे हे सरकारने लक्षात घेण्याची गरज आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, कर्जमाफी हा काही एकमेव उपाय नाही. मान्य आहे. बरोबर आहे. परंतु हा एक उपाय तर आहे ना ? मागील सव्वा वर्षांत आपण अनेक उपाययोजना केल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री सांगतात की, कर्जमाफी ही काही एकमेव उपाययोजना नाही. आम्ही शेतकऱ्यांना डायरेक्ट बेनिफिट मिळेल अशा योजना राबवित आहोत, ज्यामुळे शेतकरी कर्जबाजारीच होण्ार नाहीत. पण मला आवर्जून सांगावेसे वाटते की, इतक्या योजना जाहीर केल्यानंतरही सन 2015 या कॅलेंडर वर्षात महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वाधिक 3228 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत.

....W

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड........

आपण गेल्या हिवाळी अधिवेशनात मदत जाहीर केली होती. पण जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यात 400 आत्महत्या झाल्या. आमचे म्हणणे एवढेच आहे की, सरकार तुमचे आहे, निर्णय तुम्हाला घ्यावयाचे आहेत, तुमच्या धोरणानुसार आजपर्यंत निर्णय आपण घेत आला आहात. पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होताना दिसत नाही. त्यामुळे आमचे आणि शेतकऱ्यांचे एवढेच म्हणणे आहे की, सरकारने एकदा कर्जमाफी करावी.

सभापती महोदय, उद्योग व ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 39 व 40, पृष्ठ क्रमांक 64 वर मी बोलणार आहे. या पुरवणी मागणीअन्वये 3 हजार कोटी रुपयांची व्यवस्था या विभागासाठी करण्यात आली आहे. राज्यातील उद्योगधंद्यांना चालना मिळावी, त्यामधून जास्तीत जास्त गुंतवणूक होऊन राज्यात रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी या सरकारने 'मेक इन महाराष्ट्र' धोरण राबविले आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली 'मेक इन महाराष्ट्र'साठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. 10 मोठ्या उद्योगांना राज्यात परवानगी देण्यात आली आहे. वास्तविक पाहता 'मेक इन महाराष्ट्र' धोरणाच्या माध्यमातून राज्यातील अविकसित जिल्ह्यात उद्योग सुरु झाले पाहिजेत. मला आवर्जून विचारावयाचे आहे की, हे 'मेक इन महाराष्ट्र' धोरण आहे की, 'मेक इन विदर्भ' धोरण आहे ? मराठवाडा हा दुष्काळी भाग आहे. मराठवाड्यात डीएमआयसीच्या माध्यमातून येणाऱ्या कारखान्यांबाबत राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात असा उल्लेख आहे की, "या माध्यमातून 4 हजार हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात आली असून कामाला सुरुवात करण्यात आली आहे." परंतु, मला असे म्हणावयाचे आहे की, 4 हजार हेक्टरपेक्षा अधिक जमीन संपादित करुनही त्या भागात जर उद्योग येणार नसतील तर काय उपयोग होणार आहे ? मराठवाड्यात एका वाहन उद्योगाने सर्व्हे केला. औरंगाबाद डीएमआयसी कार्यालयाला हा प्रकल्प फायनल करावयाचा होता. परंतु, तो प्रकल्प विदर्भाकडे वळविण्यात आला. म्हणूनच माझ्यासमोर प्रश्न पडला आहे की, हे 'मेक इन महाराष्ट्र' आहे की, 'मेक इन विदर्भ' आहे ? याचा खुलासा माननीय उद्योग मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांनी आपल्या उत्तराच्या भाषणातून करावा, अशी माझी विनंती आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड........

सभापती महोदय, 1714 लघुउद्योग बंद पडले आहेत आणि त्या माध्यमातून 9054 लोक बेरोजगार झाले आहेत. आपण 'मेक इन महाराष्ट्रा'ची भाषा करीत असलो तरी 11360 कामगारांना रोजगाराला मुकावे लागले आहे. या बंद पडलेल्या लघुउद्योगांबाबत सरकार काही विचार करणार आहे का, असा प्रश्न मला विचारावयाचा आहे.

सभापती महोदय, उद्योगांना परवानगी देत असताना स्थानिक लोकांना रोजगार देण्याची अट घालण्यात येत असते. परंतु, स्थानिकांना डावलण्यात येत आहे. स्थानिकांना रोजगार देण्यामध्ये जे उद्योग कुचराई करणार असतील त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागाची बाब क्रमांक 18 व 19 वर मी बोलणार आहे. नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी 43 कोटी 55 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सन 2015-2016 मध्ये नगरविकास विभागाने मुलभुत सोयीसुविधा पुरविण्यासाठी तरतुदच केलेली नव्हती. मात्र वर्षभरात पुरवणी मागणीव्दारे 139 कोटी 89 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पातून एकही पैसा न देता पुरक मागणीव्दारे एवढी मोठी रक्कम काढणे म्हणजे अर्थसंकल्पाच्या संकेतांचा भंग आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, नागरी आणि दलित वस्ती सुधार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये दिरंगाई होत असून दलित वस्तीचा निधी अन्यत्र वापरला जात आहे. याकडे सरकारने काटेकोरपणे लक्ष देऊन दलित वस्तीचा निधी त्याच कारणासाठी वापरला जावा, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांचे अनेक प्रस्ताव नगरविकास विभागाकडे येत असतात. परंतु, त्यांना विहित मुदतीत मान्यता दिली जात नाही. या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. मूळ अर्थसंकल्पात नियोजन न करता पुरवणी मागणीमध्ये तरतूद करण्यात आल्यामुळे प्रस्ताव प्रलंबित रहात आहेत.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड........

सभापती महोदय, गुंठेवारी विकास अधिनियम, 2001 मध्ये काही दुरुस्त्या करुन मुदतवाढ द्यावी. कारण, अद्याप 25 ते 30 टक्के लोकांची प्रकरणे राहिलेली आहेत.

सभापती महोदय, महानगरपालिका, नगरपालिका यांना विशेष अनुदान देण्याचा प्रश्न देखील महत्वाचा आहे. ज्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेला विशेष अनुदान दिले जाते तसेच अनुदान इतर महानगरपालिकांनासुध्दा देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, 'मेक इन महाराष्ट्र' आहे की, 'मेक इन विदर्भ' आहे, हे मला कळलेले नाही. नगरपालिका, महानगरपालिका हद्दींना जोडणारे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत असतात. अनेक शहरांना जोडणारे रस्ते नादुरुस्त असतात. हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महागरपालिकेचे असतात. त्याबाबत सुध्दा काटेकोरपणे कार्यवाही झाली पाहिजे.

सभापती महोदय, केंद्राच्या अनेक योजनांमध्ये मॅचिंग ग्रँटची तरतूद राज्य सरकारने न केल्यामुळे केंद्राचा मोठा निधी परत जात असतो. शासनाने भविष्यात मॅचिंग ग्रँटची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अनेक नगरपालिका, महानगरपालिकांचे प्रारुप विकास आराखडे शासनाकडे आले आहेत. पुणे शहराचा विकास आराखडा सन 2004 पासून प्रलंबित आहे. या विकास आराखड्यांना लवकरात लवकर मंजुरी प्रदान करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अनेक शहरांना कचरा विल्हेवाटीचा प्रश्न सतावतो आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. नैसर्गिकरित्या कचऱ्याची विल्हेवाट करीत असताना इंधन निर्मिती करणे, यासारख्या प्रकल्पांसाठी शासनाने अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महानगरपालिकेच्या 10 कि.मि.क्षेत्रापर्यंत डी.सी.रूल्स लावणे गरजेचे आहे. त्या परिसराचा देखील प्लॅन झाला पाहिजे. त्याचप्रमाणे शहरी भागातील जुन्या वाड्यांबाबत एसआरएच्या धर्तीवर योजना राबविणे आवश्यक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

17-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) WW-4

SRR/ KTG/ AKN प्रथम श्री.मंगेश........ 18:30

श्री.सुभाष झांबड........

सभापती महोदय, अर्थसंकल्प तयार करीत असताना पूर्ण वर्षाचे नियोजन केले जात असते व प्रत्येक विभागाकडून त्याबाबतच्या मागण्या आपण प्राप्त करुन घेत असतो. प्रत्येक विभागाचा खर्च, प्राप्त होणारा महसूल हे लक्षात घेऊन आपण बजेट सादर करीत असतो. परंतु, वर्षभराच्या काळात एखाद्या विभागाला देण्यात आलेली तरतूद अन्य विभागाकडे वर्ग केली जाते. ही कार्यपध्दती थांबली पाहिजे. ज्या विभागाला तरतूद दिली असेल ती त्याच विभागाने वापरणे गरजेचे आहे. त्या विभागात काम करणारे अधिकारी सक्षमरित्या काम करीत नसतील तर रक्कम अखर्चित राहते. त्यामुळे या विभागाची तरतूद दुसऱ्या विभागाला वर्ग केली जाते. त्याचप्रमाणे मराठवाड्यासाठी केलेली तरतूद पश्चिम महाराष्ट्राला वापरली जाते, मराठवाड्याची तरतूद नागपूर विभागाला वापरली जाते. ही जी तरतुदीची अफरातफर आहे ती सुध्दा थांबली पाहिजे, अशा प्रकारची मागणी करतो आणि माझ्या शब्दांना विराम देतो.

----------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सप्लीमेंटरी डिमांडस् ही एक कॉन्स्टिट्युशनल प्रोव्हिजन आहे. आपण आर्टिकल 205 अन्वये सप्लीमेंटरी डिमांडस् मांडतो. संविधानिक तरतुदीचा वापर अत्यंत गंभीरपणे आणि अतयंत काळजीपूर्वक व्हावयास पाहिजे, असे माझे प्रामाणिक मत आहे. एका वर्षात तीन वेळा पुरवणी मागण्या मांडल्या जातात. ज्यावेळी मागील वर्षी 17 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या मांडल्या जातात, त्यानंतर 4.5 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या जातात त्यावेळी यातून राज्याचे फिस्कल इंडिसिप्लीन दिसून येते. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला खरोखर राज्याची प्रगती करावयाची असेल, सन 2029 पर्यंत सर्व प्रकल्प पूर्ण करावयाचे असतील तर अशा फिस्कल इंडिसिप्लीनने ते होऊ शकत नाही. मला सांगताना अत्यंत दुःख होते की, आपण सभागृहात वारंवार पुरवणी मागण्यांवर चर्चा करतो. सत्ताधारी पक्ष मागणी करतात, इतर सदस्य त्यावर चर्चा करतात, त्यासाठी सभागृहाचा वेळ खर्च होतो, जनतेचा पैसाही खर्च होतो. परंतु, आपण या वर्षात टोटल बजेटरी फंडस् पैकी केवळ 54 टक्के फंडस् खर्च केलेले आहेत. आपण केवळ 54 टक्के फंडस् खर्च करतो आणि त्यानंतर सभागृहात पुरवणी मागण्या मांडतो. याचा अर्थ आपण वेगवेगळ्या विभागांसाठी जे बजेटरी ॲलोकेशन केलेले आहे ते योग्य रीतीने केलेले नसल्यामुळे आपल्याला वारंवार अशा प्रकारे पुरवणी मागण्या मांडाव्या लागतात. माझी आपल्या माध्यमातून सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना आणि शासनाला विनंती राहील की, यापुढे तरी हा फिस्कल इंडिसिप्लीनचा कार्यक्रम बंद करावा. आपण उद्या सभागृहाला बजेट सादर करणार आहोत. पुरवणी मागण्यांवर बरेच बोलता येईल. आपण 4.5 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या विषयावर आपले मत मांडलेले आहे. मी देखील काही विषयांवर माझे मत मांडू इच्छितो.

सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र.4, पृष्ठ क्र.7-पोलिसांच्या इमारतींचे बांधकाम करण्यासाठीचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यासाठी 111.93 कोटी रुपयांची पुरवणी मागणी

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर.......

करण्यात आलेली आहे. मुंबई शहरात चेंबूर जवळ माहुल एरिया आहे. शासनाने डीसी रेग्युलेशन 3.11 प्रमाणे टीडीआर प्रदान करुन तेथे जवळपास 15 हजार खोल्या बांधून घेतलेल्या आहेत. मागील कित्येक वर्षापासून त्यातील 13 हजार खोल्या रिकाम्या पडलेल्या आहेत. आपण 13 हजार खोल्या रिकाम्या ठेवतो आणि पुरवणी मागणीच्या माध्यमातून पुन्हा 111 कोटी रुपयांची मागणी करतो. हा चांगला कारभार आहे ? मागील अधिवेशनात मी स्वत: या संदर्भात गृह निर्माण मंत्र्यांना दोन वेळा पत्र लिहिले होते. माननीय सभापतींच्या दालनात या विषयावर बैठक देखील झालेली आहे. आपण शासनाचा पैसा वाया घलवीत आहोत, हे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. आपण 13 हजार खोल्या रिकाम्या ठेवलेल्या आहेत. परंतु, अद्याप त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेले नाही. आपण आता पुन्हा 111 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. (...अडथळा...) संपूर्ण राज्यासाठी असेल, हे मला मान्य आहे. परंतु, मुंबईमध्ये जे बांधकाम झाले त्यासाठी शासनाने पैसे खर्च केलेले आहेत. त्यासाठी माझ्या किंवा तुमच्या खिशातून पैसे खर्च झालेले नाहीत. तुम्ही 13 हजार खोल्या अफोर्टेबल हाऊसिंग अंतर्गत विकल्या असत्या तर किमान 1500 कोटी रुपये उभे केले असते.

सभापती महोदय, महसूल व वन विभाग, बाब क्र.6, पृष्ठ क्र.11 वर मी बोलणार आहे. आपण दुष्काळासाठी 1 कोटी 24 लाख रुपयांची ॲडिशनल प्रोव्हिजन करीत आहोत. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी त्या दिवशी सांगितले होते की, मत्स्य व्यवसायामध्ये देखील दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मत्स्य व्यवसाय करणाऱ्या बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या व्यवसायामध्ये किती तरी फरक पडलेला आहे. मागील वर्षभरात किती तरी होड्या, ट्रॉलर्स बंद पडलेले आहेत. म्हणून आपण या व्यवसायाला सुद्धा एक डिझास्टर स्टेटस देऊन मत्स्य व्यवसायातील बांधवांना मदत केली तर ती योग्य ठरेल, असे मला वाटते.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्र.24, पृष्ठ क्र.40-मुंबई येथील राजभवनात तात्पुरत्या निवासस्थानाचे बांधकाम करणे व अग्निशमन यंत्रणा बसविणे यासाठीचा खर्च

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर.......

भागविण्यासाठी तरतूद करणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आपण "Construction of fire-fighting equipment at Raj Bhavan, Estimated Cost Rs.72 lakhs 18 thousand." आपण प्रोव्हिजन किती केली ? आपण फक्त 20 लाख रुपयांची प्रोव्हिजन केलेली आहे. मी सन 2015-16 ची आकडेवारी सांगत आहे. ही मागील बजेटची आकडेवारी आहे. राजभवनातील फायर फायटिंग इक्वीपमेंटसाठी 72 लाख रुपयांची गरज असताना आपण त्यासाठी फक्त 20 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. राजभवन येथे महामहिम राज्यपाल राहतात. जेथे फॉरेन डिग्निटरीज येतात, जेथे प्रमुख बैठका होतात, तेथील कामासाठी आपण एवढी कमी बजेटरी प्रोव्हिजन करुन आता पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून अधिकची मागणी करीत असू तर यातून शासनाला सुरक्षेबाबत किती गांभीर्य आहे हे यातून दिसून येते.

सभापती महोदय, अनेक मुद्यांवर बोलता येईल. इतर मुद्यांवर माझे सहकरी सदस्य बोलतीलच. परंतु, मी पोटतिडीकेने जे मोजके मुद्दे मांडलेले आहेत त्याचा शासन गंभीरपणे विचार करील आणि योग्य ती पावले उचलेल, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभाग, बाब क्र.3, 4, व 5, पृष्ठ क्र.7- कायदा व सुव्यवस्था.....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. आपल्याला रात्री 7.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज करावयाचे आहे. पुरवणी मागण्यांवर आणखी किती सन्माननीय सदस्य बोलणार आहेत ?

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य सर्वश्री मुझफ्फर हुसेन, हरिसिंग राठोड हे दोन वक्ते पुरवणी मागण्यांवर बोलणार आहेत.

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर आजच होणार आहे ना ?

**तालिका सभापती :** मंत्री महोदयांचे उत्तर आज होणार नाही.

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, उद्या अर्थसंकल्प सादर होणार आहे. त्यामुळे आपल्याला आज कोणत्याही परिस्थितीत पुरवणी मागण्यांवरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावी लागेल.

...2Y-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : उद्या बजेट असल्यामुळे पुरवणी मागण्यांवरील मंत्री महोदयांचे उत्तर आज पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यात येईल.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, पान क्रमांक 7 बाब क्रमांक 3/4/5 वर मी बोलणार आहे. बाब क्रमांक 3 मध्ये सायबर गुन्हे प्रयोग शाळेसाठी, त्याचबरोबर बाब क्रमांक 4 मध्ये पोलिसांच्या इमारती बांधण्यासाठी व बाब क्रमांक 5 मध्ये मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च या सर्वांसाठी निधीची तरतूद करावी अशी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांचे भाषण आताच झाले आहे, राज्य कसे उत्तम चालले याबाबत त्यांनी रोजगार, शिक्षण, उद्योग, कायदा व सुव्यवस्था, इन्फ्रास्ट्रक्चर याबाबत सभागृहाला माहिती दिली आहे. शहरात व राज्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे अत्यंत गरजेचे आणि महत्वाचे असते. टी.व्ही.चॅनेल व वर्तमानपत्रांच्या माध्यमातून आपण या सर्व बाबी पाहत असतो. त्यासंदर्भातील एक उदाहरण मी देतो. जगाच्या धर्तीवर असे काही देश आहेत की, त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अत्यंत चोख पध्दतीने ठेवली जाते. त्यासंदर्भातील मी एक उदाहरण देतो. मिडल ईस्ट भागातील सौदी अरेबिया येथे लाखो नाही तर करोडोच्या संख्येने वर्षभर लोक तीर्थ यात्रेसाठी जातात. कायदा व सुव्यवस्था कशी असायला पाहिजे व त्याचे परिणाम काय होतात यासंदर्भातील मी एक उदाहरण सांगतो. नमाजाची वेळ झाल्यावर लोक आपली दुकाने उघडी व मोकळी सोडून जातात. करोडोच्या संख्येने जगभरातील माणसे तेथे जात असताना परंतु त्या ठिकाणी आजपर्यंत कोणाचे सामान चोरी झाले, पासपोर्ट, किंवा दुकानातील सामानाची चोरी झालेली नाही. हातातील घड्याळ कोणी काढलेली नाही. चैन खेचली, बलात्कार झाला, महिलांवर अत्याचार झाला, मुलींचे अपहरण झाले, अशी एकही बाब माझ्या कधीही ऐकण्यात किंवा वाचण्यात आलेली नाही. याचे कारण असे आहे की, त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था कशी असायला पाहिजे त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्या ठिकाणी कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी होत असते. गुन्हा घडला व आरोपी पकडल्यावर न्यायपालिकांची जी पध्दत असेल त्यानुसार त्याचा निकाल लवकरात लवकर व तातडीने लागतो. याच भितीपोटी कायदा व सुव्यवस्था तेथे राखली जाते. महाराष्ट्रात जवळपास 11.50 ते 12 कोटी लोकसंख्या असून त्यांचे संरक्षण करण्यासाठी फक्त अडीच ते तीन लाख पोलीस कर्मचारी आहेत. इतक्या पोलीस दलापासून राज्याचे संरक्षण व्यवस्थित होईल असे आपणाला वाटत असेल तर हे शक्य नाही. गुन्हा करणाऱ्यांना कायद्याची भीती वाटेल तेव्हाच या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन...

बाबी शक्य होतील. एखाद्याने गुन्हा केला व त्याला पकडून तातडीने शिक्षा झाली तरच गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल. महाराष्ट्रात मागील दीड वर्षात महिलांवरील अत्याचारात वाढ झाली आहे, मुला-मुलींच्या अपहरणाचे प्रमाण वाढले आहे. सन 2014 मध्ये 62 मुलांच्या अपहरणाची प्रकरणे होती, 2015 मध्ये 166 मुला-मुलींच्या अपहरणाची प्रकरणे होती. बलात्काराच्या प्रकरणात वाढ झालेली आहे. मुला मुलींच्या अत्याचाराच्या प्रकरणात वाढ झाली आहे. सरासरीमध्ये राज्याचा क्राईम रेट वाढलेला आहे. शासनाचा वचक नसल्यामुळे हे प्रकार वाढले आहेत. पोलिसांच्या बदल्या होतात, एपीआय ते हवालदार यांच्यापासून डीजीपर्यंत किंवा सीपी किंवा डीवायएसपीपर्यंत तीन, सहा व दीड महिन्यात आमची बदली केव्हाही होऊ शकते, असे त्यांच्याकडून सांगण्यात येते. याचा अर्थ असा आहे की, नगरपालिकेत एखाद्या सदस्यांचा वॉर्ड पुढील टर्ममध्ये आरक्षित होणार आहे म्हणून तेथे निवडून आलेला लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही. हे आपणाला सामाजिक जीवनात दिसत असते. त्याच पध्दतीने गृह खात्याचा कारभार सुरु झालेला आहे. मागील वर्षात मुंबई पोलिसांमधील 6 महिला पोलीस व 163 पोलिसांचा मृत्यू झालेला आहे. त्यापैकी 7 पोलिसांनी आत्महत्या केली तर दोन पोलिसांची हत्या झाली आहे. 36 पोलीस ह्रदयविकाराने मृत्यू पडले तर अन्य आजाराने 35 पोलीस मृत्युमुखी पडले आहेत.(..अडथळा..) मी कायदा व सुव्यवस्था या बाबीवर बोलत आहे. पुरक मागणीसाठी निधी मागण्यात आलेला आहे त्यावरच मी बोलत आहे.

सभापती महोदय, येथे जी रक्कम मागण्यात आलेली आहे ती पोलीस स्टेशनच्या इमारती बांधण्यासाठी असेल, पोलिसांची घरे बांधण्यासाठी असेल, त्या बाबींवर मी बोलत आहे. कायदा व सुव्यवस्था चांगली ठेवायची असेल तर ज्या पध्दतीने कायद्याचा धाक असायला पाहिजे तसा धाक नाही. आपणाकडे लिमिटेड फोर्स आहे. शासनाने पोलिसांची भरती थांबविली आहे. पोलीस दलात 60 हजार कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. तरी देखील पोलीस भरती बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे क्राईम रेट वाढला आहे काय ? रिक्त जागा असल्यामुळे क्राईम रेट वाढला आहे काय ? या सर्व बाबींचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, नागपूर शहरातून मुख्यमंत्री महोदय निवडून आले आहेत तेथील कारागृह गेस्टहाऊस सारखे झाले आहे. त्या ठिकाणी आरोपींना वाटेल त्या सुखसोई पुरविल्या जात आहेत. अशा प्रकारे तेथील कारागृहाची परिस्थिती आहे. राज्यात कधीही अशी घडना घडली



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन...

नाही तशी घटना नागपूर येथे घडली आहे. नागपूर कारागृहातून पाच गुन्हेगार पळून गेले. त्यांना पकडण्यात आले ही नंतरची बाब आहे. याचा अर्थ तुम्ही सर्व गुन्हेगारांना पळू देणार व नंतर पकडणार आहात काय ? नागपूर शहरात कायदा व सुव्यवस्थेची अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, मुंबईनंतर सर्वात मोठा जिल्हा ठाणे हा आहे. त्या ठिकाणी एक पोलीस कमिशनर आहेत, एक पोलीस अधीक्षक आहे, या जिल्ह्यात सात ते आठ महानगरपालिका आहेत. कोस्टल कमिशनरचा प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. मागील पाच वर्षात कोस्टल पोलीस स्टेशन म्हणून पाच ते सहा पोलीस स्टेशनची निर्मिती केली आहे. ठाणे ग्रामीण भागातील शहापूर, मुरबाड, कसारा, मिरा-भाईंदर या परिसरासाठी पोलीस अधीक्षक आहेत. एका बाजूला पोलीस आयुक्तालय आहे. एका बाजूला पोलीस अधीक्षकांच्या ताब्यात हा भाग देण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी काही पोलीस स्टेशन तयार करण्यात आले आहेत.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ पुरवणी मागण्यांवरील चर्चा व त्यावरील माननीय मंत्र्यांचे उत्तर होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली होती. त्यावेळी असे ठरविण्यात आले होते की, पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने जे प्रश्न उपस्थित होतील त्यांना संबंधित खात्याचे मंत्री महोदय उत्तरे देतील. परंतु वेळेचे नियोजन लक्षात घेता सन्माननीय सदस्यांनी येथे जे मुद्दे मांडलेले आहेत, त्यांची शासनाने दखल घ्यावी. तसेच सर्व मंत्री महोदयांच्या वतीने माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यास ते सदनाला मान्य राहील. तसेच सन्माननीय सदस्यांनी ज्या खात्यांच्या संदर्भात प्रश्न विचारले आहेत, त्याबाबत संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी लेखी उत्तरे पाठवावीत. यामुळे हा प्रश्न सुटू शकेल.

**तालिका सभापती** : कामगार सल्लागार समितीमध्ये संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी उत्तर देण्याचे ठरले होते. परंतु सदनातील सर्व सन्मानीय सदस्यांची एकमताने अनुमती असल्यास सर्व मंत्र्यांच्या वतीने माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्यास काही हरकत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, नव्याने तयार करण्यात आलेले पोलीस स्टेशन कोठे बांधण्यात आले, याची माहिती ऐकून आपल्याला आश्चर्य वाटेल. मीरा रोड येथे रस्त्यावर नवीन पोलीस स्टेशन बांधण्यात आले. त्या पोलीस स्टेशनकरिता जागा कमी पडल्यामुळे अनधिकृत इमारतीमध्ये पोलीस स्टेशन सुरु आहे. पोलीस स्टेशनकरिता जागा आरक्षित आहे. या संदर्भात संबंधित अधिकऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, शासनाकडे निधी शिल्लक नसल्यामुळे आम्ही आरक्षणाची जागा ताब्यात घेऊ शकत नाही. उत्तन येथे एका मच्छीमाराच्या घरात पोलीस स्टेशन सुरु आहे. दहशतवाद्यांचे विषय समोर असताना सागरी आयुक्तालयाला स्ट्रेंदन करुन मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे. त्याच्या बांधकामासाठी किती निधी दिला आहे, याची मला माहिती नाही. पुरवणी मागण्यांमध्ये सर्व पोलीस स्टेशन्सकरिता निधी उपलब्ध करुन दिला आहे का ? नसल्यास त्यांच्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करावी.

सभापती महोदय, पोलिसांकडून होणाऱ्या अत्याचारांबाबत राज्य शासनाने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले व त्याद्वारे असे सांगितले की, पोलिसांकडून करण्यात आलेल्या

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन...

अत्याचारांबाबतची चौकशी करण्यासाठी आम्ही पुढील 3 महिन्यांत नियंत्रण कक्ष स्थापन करणार आहोत. परंतु शासनाने या संदर्भात अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही. एका बाजूला राज्यात गुन्हेगारी व अत्याचार वाढणे, कायदा व सुव्यवस्था नसणे अशा परिस्थितीत दुसऱ्या बाजूला राज्यात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. कोणतीही मल्टीनॅशनल कंपनी राज्यात गुंतवणूक करीत असताना प्रथम कायदा व सुव्यवस्थेची कशी परिस्थिती आहे, याचा आढावा घेत असते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 39, 40, 41, 42 व 43 पूरक मागणी क्रमांक 15 व 16, पृष्ठ क्रमांक 65, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले भाषण आपण सर्वांनी ऐकले. सदनात "मेक इन इंडिया", "स्मार्ट सिटी" यासंबंधी चांगली घोषणा झाली व चांगले कार्यक्रम झाले. या संदर्भात लाखो कोटी रुपयांचे एम.ओ.यु. करण्यात आल्याचे चित्र निर्माण करण्यात आले. एम.ओ.यु. करताना ठराविक कंपन्यांची नावे जाहीर करण्यात आली, रेमंड वगैरे. परंतु लाखो कोटी रुपयांचे एम.ओ.यु. कोणत्या सेक्टरमध्ये झाले आहेत, शासनाची ताकद नव्हती का, शासनाकडे टेक्नालॉजी व मॅन पॉवर नव्हती का ? शासनाला पी.पी.पी. आणि बी.ओ.टी. तत्वावर एम.ओ.यु. करण्याचे कारण काय आहे ? याबाबत शासनाने सदनाला माहिती देणे आवश्यक आहे. या सदनात चर्चा झाली होती त्यावेळी असे सांगण्यात आले की, आम्ही त्या इंडस्ट्रींना पाणी पुरवठा करुन देणार आहोत. सदर इंडस्ट्रींना किती हजार कोटी रुपयांया, किती लाखो कोटी रुपयांचा किंवा किती लाखो हजार कोटी रुपयांचा पाणी पुरवठा केला जाणार आहे ? एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या, ग्लोबलायझेशन, ग्लोबल वार्मिंगमुळे निर्माण झालेल्या होत असलेल्या प्रश्नांमध्ये हा प्रश्न सुध्दा निर्माण होत आहे.

सभापती महोदय, "मेक इन इंडिया" चा लोगो तयार करण्यात आला. महाराष्ट्रात टायगर, वाघ आहेत. आपल्या भाजपा सरकारसोबत वाघ आहेत. परंतु त्या वाघाला कोंडून गुजरातच्या वाघाचा लोगो तयार करण्याचे कारण काय आहे ? या प्रश्नाचे जनतेला उत्तर मिळू शकले नाही.

डॉ.दीपक सावंत : या प्रश्नाचे उत्तर आपण दोघे मिळून शोधू या.

श्री.मुझफ्फर हुसेन : मंत्री महोदय, या प्रश्नाचे उत्तर तुम्हालाच शोधावे लागणार आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 109, अल्पसंख्यांक विकास विभागाच्या संदर्भात मी सदनाला सांगू इच्छितो की, राज्यघटनेच्या प्रिॲम्बलमध्ये असा उल्लेख आहे की,

"WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:
JUSTICE, social, economic and political;
LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;
EQUALITY of status and of opportunity;
and to promote among them all
FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity and integrity of the Nation;..."

संपूर्ण देशात "सबका साथ, सबका विकास" असा चांगला स्लोगन ऐकण्यास मिळतो. भाजपाचे सर्व लोक असे म्हणतात की, आम्ही घटनेला मानतो. यामुळे घटनेच्या प्रिॲम्बलमध्ये जो उल्लेख करण्यात आला त्यावर आपला विश्वास आहे का ? नसल्यास प्रश्न निर्माण म्हणतो. आपण "सबका साथ, सबका विकास" असे म्हटले आहे. मागील बजेटमध्ये जे फंड अलोकेशन झाले होते, त्यापैकी किती निधी वापरण्यात आला, याबाबत सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सदनाला माहिती वाचून दाखविली. सच्चर समितीच्या अनुषंगाने यावर्षी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधीपैकी 95 टक्के निधी लॅप्स होवून परत पाठविण्यात आला. हा विषय एवढ्यापुरता मर्यादित राहिला नाही. मागील वर्षी मौलाना आझाद कॉर्पोरेशनला द्यावयाच्या निधीपैकी किती निधी देण्यात आला व त्या माध्यमातून किती लोकांना शिक्षणासाठी कर्ज देण्यात आले, किती मुलांना स्वयंरोजगारासाठी मदत करण्यात आली ? औरंगाबाद येथे हज हाऊसचे काम सुरु करायचे आहे. नागपूर येथे हज हाऊसचे काम सुरु आहे, त्याकरिता किती निधी देण्यात आला, पुरवणी मागण्यांमध्ये त्यासंबंधी उल्लेख का करण्यात आला नाही ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन....

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात उर्दु ॲकेडमी आहे. उर्दु भाषा इस्लाम धर्माशी व मुसलमानांशी संबंधित नाही. मुगल सल्तनतने सर्व आर्मीच्या लोकांना एक भाषा बोलता यावी यासाठी दिल्लीत एका भाषेची निर्मिती केली होती. उर्दु भाषेत आपल्याला मराठी, संस्कृत, इंग्रजी, गुजराती शब्द आढळून येतील. परंतु एक दीड वर्षांपासून उर्दु ॲकेडमीच्या संदर्भात शासन कोणतीही भूमिका घेण्यास तयार नाही.

सभापती महोदय, मागील अर्थसंकल्पात असे सांगण्यात आले होते की, राज्यात मुलींना शिक्षण देण्यासाठी, अल्पसंख्याक समाजाच्या मुलींना पुढे आणणे व त्यांना शिक्षण देण्यासाठी मुलींच्या होस्टलची निर्मिती करु. या संदर्भात मुंबई, विदर्भ व मराठवाड्यात मुलींच्या हॉस्टेलकरिता एकही जागा ताब्यात घेण्यात आली नाही व त्याकरिता एक रुपयाचा निधी देण्यात आला नाही.

यानंतर CCC-1 .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मुझफ्फर हुसेन.......

सभापती महोदय, एरिया विकास डेव्हलपमेंटच्या दृष्टीने ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात अल्पसंख्याक समाज एकसंख्येने, टक्केवारीने रहात आहे त्या ठिकाणी दरवर्षी निधी दिला जातो. परंतु आजपर्यंत महापालिकांच्या कोणत्याही प्रभागामध्ये अशा प्रकारच्या निधीचे वाटप केलेले नाही. ही घटना मानणाऱ्यांची भूमिका आहे का? माझी या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, राज्य कारभार चालवित असताना घटनेच्या आधारे सर्वधर्मसमभाव या नात्याने सर्व जातीच्या लोकांना एकत्र घेऊन राज्य चालवावे. ज्या चुका झाल्या आहेत त्या सुधारण्याचा प्रयत्न करावा आणि पुरवणी मागण्यांमध्ये त्या दृष्टीने नियोजन करावे एवढे बोलून मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

-----

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्य सरकारला कोणताही खर्च भागवायचा असेल तर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 215 अन्वये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता घेणे आवश्यक असते. याचा अर्थ असा की, आवश्यक खर्च भागविण्यासाठी ती बाब नियमित बजेटमध्ये आली नसेल तर त्याकरिता पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली जाते. एक अत्यंत गंभीर बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. भटक्या विमुक्तांच्या महाराष्ट्रात 1000 आश्रमशाळा सुरु असताना त्यासाठी मागील बजेटमध्ये जाणीवपूर्वक तरतूद केलेली नव्हती. किमान आता तरी पुरवणी मागण्यांमध्ये त्यांच्यासाठी तरतूद केली जाईल अशी आम्हाला अपेक्षा होती. ती अपेक्षा फलद्रूप ठरली नाही. मी दाव्यानिशी सांगतो की, येणाऱ्या 2016-17 च्या बजेटमध्ये सुध्दा कोणतीही तरतूद नाही. मी सरकारला विचारु इच्छितो की, राज्यातील भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांना देशोधडी लावायचे ठरविले आहे का? मंत्री पदाची शपथ घेताना तुम्ही म्हटले आहे की, कोणाबद्दल आकसाने ममत्व भाव ठेवणार नाही. भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांबद्दल तुमच्या मनात किती आकस आहे हे तुमच्या वागण्यावरुन दिसून येते. ही अत्यंत गंभीर बाब आहे. जर या संदर्भात गुन्हा दाखल करावयाचा झाला तर विभागाचे सचिव, राज्यमंत्री, मंत्री यांच्यापैकी कोणावर गुन्हा दाखल करायचा? हा सामाजिक गुन्हा आहे. ज्या लेकरांना स्वत:चे घरदार नाही, आई वडील नाही अशी मुले या आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. मी स्वतः अशाच एका आश्रमशाळेतून शिक्षण घेतले. या राज्यामध्ये काय चालले आहे?

सभापती महोदय, राज्यामध्ये भटक्या व विमुक्त जातीची लोकसंख्या 25 टक्के आहे. म्हणूनच स्व.गोपीनाथ मुंडे यांनी सांगितले होते की, या समाजासाठी वेगळा विभाग स्थापन केला पाहिजे. त्यानुसार वेगळा विभाग स्थापन करण्यात आला. त्या विभागासाठी स्वतंत्र मंत्री असला पाहिजे. परंतु या समाजासाठी वेगळा मंत्री मिळाला नाही. विभागासाठी वेगळा सचिव असला पाहिजे, परंतु सरकारने अद्याप विभागाला स्वतंत्र सचिव दिलेला नाही. कृपा करुन या प्रश्नाबद्दल चेष्टा करु नये. माझी शासनाला विनंती आहे, पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केलेली नसली तरी उद्या सादर होणा-या बजेटमध्ये देखील तरतूद केलेली नाही. त्यामुळे शासन या आश्रमशाळांसाठी पैसे कुठून आणणार आहे? मी कोणत्याही मंत्र्यांचे नाव घेणार नाही. त्या मंत्र्यांकडे मी प्रस्ताव घेऊन गेलो होतो. ते मंत्री असे म्हणाले की, हे तर कॉंग्रेसचे पाप आहे. हे सरकार बजेटमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.......

तरतूद न करुन महापाप करीत आहे. उद्या सादर होणाऱ्या 2016-17 च्या बजेटमध्ये तरतूद केली नाही तर आम्ही योग्य त्या मार्गाने दाद मागणार आहोत. ते मंत्री पुढे असे म्हणाले की, यांच्याकडून आम्हाला आश्रमशाळा काढून घ्यायच्या आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड अत्यंत गांभीर्याने सामाजिक प्रश्न मांडत आहेत. मंत्री महोदयांनी या मुद्याची गंभीरपणे नोंद घेतली पाहिजे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलत असताना बाब क्रमांक उल्लेख करणे आवश्यक आहे याची मला जाणीव आहे. परंतु जो विषय पुरवणी मागण्यामध्ये नाही त्यासाठी भाष्य करावयाचे असेल तर नियम काय आहे हे सुध्दा स्पष्ट केले पाहिजे. या पुरवणी मागण्यांच्या पुस्तिकेमध्ये सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळेच्या संदर्भात कोणतीही बाब नाही. त्यासाठी कोणता नियम बनविण्यात आला आहे हे मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

सभापती महोदय, ते मंत्री महोदय पुढे असे म्हणाले की, यांच्याकडून सर्व आश्रमशाळा काढून घ्यायच्या आहेत आणि आमच्या लोकांना द्यायच्या आहेत. तुमचे लोक कोण आहेत? तुमच्या एनजीओना आश्रमशाळा द्यायच्या आहेत. त्यासाठी तुमचे हे कारस्थान सुरु आहे. महात्मा फुले, शाहु महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आम्ही हे घडू देणार नाही. 31 मार्चच्या आत उत्तर मिळाले नाही तर आम्ही हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात दाद मागू, रस्त्यावर येऊन न्याय मागणार आहोत. 25 वर्षापासून या आश्रमशाळा सुरु आहेत. स्व.वसंतराव नाईक, पंडित नेहरु यांनी सोलापूरमध्ये जाहीर केले होते की, भटक्या विमुक्तांसाठी दरवर्षी 50 आश्रमशाळा देऊ. ज्या मुलांचे पालक नाहीत त्या मुलांना आश्रमशाळेच्या माध्यमातून दोन वेळचे जेवण मिळते, त्यांची प्रतारणा सुरु आहे. मंत्री महोदयांनी या बाबत उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, असंघटित कामगारांसाठी केंद्र सरकारने कायदा मंजूर केला होता. त्यावेळेला मी लोकसभेचा सदस्य होतो. मी त्याबाबत पुढाकार घेतला होता. याचे कारण असे की, महाराष्ट्रात बंजारा समाज नाका कामगार म्हणून उभा राहतो. रस्ते, धरण, इमारतीच्या बांधकामावर हे कामगार काम करतात. त्यांच्यासाठी पुढाकार घेऊन मी देश स्तरावर कायदा मंजूर करुन घेतला आणि योजना आखावयास लावली. आज महाराष्ट्रामध्ये या असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी गोळा झालेले 4 हजार कोटी रुपये विनावापर पडून आहेत. राज्यात या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड.......

असंघटित कामगारांची नोंद होत नाही. आम्ही कामगार नोंदीची प्रक्रिया सुचविली होती. त्याऐवजी सरकारने हजारो कोटी रुपये खर्च करुन जाहिराती दिल्या. जे शिकलेले नाहीत त्यांना कामगार विभागामध्ये नावाचे रजिस्ट्रेशन कुठे करायचे हे माहित नसते. हजारो कामगार मुंबईमध्ये काम करीत असूनही त्यांचे रजिस्ट्रेशन झालेले नाही. स्मार्ट सिटीचा देशामध्ये गाजावाजा सुरु आहे. लाखो लोकांना बेघर करुन टाकले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. प्रत्येक वक्त्याने बोलण्यास सरकारची हरकत नाही. परंतु बाब क्रमांक व पृष्ठ क्रमांकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, नगरविकास विभाग बाब क्रमांक 18. मुंबईमध्ये जेवढी देवालये आहेत त्या देवालयांच्या बाहेर एक गाय उभी असते. भक्तगणांकडून त्या गाईला चारा दिला जातो.

नंतर 3 बी.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

देवळाच्या बाहेर असणाऱ्या गायीवर उपजीविका करणारे 2 लाख 15 हजार जण आहेत. ते या मुंबईमध्ये वर्षानुवर्षे हा व्यवसाय करीत आहेत. स्मार्टसिटीच्या नावाखाली देवळा बाहेर उभ्या असणाऱ्या सर्व गायींना आता देशोधडीला लावण्यात येणार आहे. गायीवर प्रेम करणारी मंडळी, गायीला माता म्हणणारी मंडळी त्या गायीची उपासमार करणार आहेत. मग या गायी कुठे जातील. या गायीवर हे लोक आपले पोट पाणी भरत होते. त्यांचा धंदा स्मार्टसिटीमुळे बंद होणार आहे.

प्रत्येक शहरामध्ये न्हाव्याचे दुकान असते. एक टेबल व खुर्ची टाकून तो न्हावी आपला व्यवसाय करीत असतो. पण स्मार्टसिटीच्या नावाखाली रस्त्याच्या कडेला न्हाव्याचा व्यवसाय करणाऱ्या हजारो, करोडो लोकांना या शासनाने देशोधडीला लावले आहे. त्यांच्यासाठी शासनाने पर्यायी कोणतीच व्यवस्था केलेली नाही. अशा किती तरी टपऱ्या आज रस्त्याच्या कडेला आहेत. पण आज स्मार्टसिटीच्या नावाखाली नंगानाच सुरूआहे. काल मी नवी मुंबईमध्ये गेलो होतो. तेथे एकही टपरी नाही. एकही दुकान नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असंसदीय श्ब्द उच्चारला आहे तो आपण रेकॉर्डवरून काढून टाकावा.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मी नंगानाच हा शब्द मागे घेतो. पण या शासनाने त्यांना देशोधडीला लावले आहे. धन्यवाद.

....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभपती महोदय, मी नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 19, पान क्र.29 वरील मागणीवर बोलण्यासाठी उभा आहे. आज महाराष्ट्रात जवळ जवळ 48 टक्के नागरीकरण झालेले आहे. ते प्रमाण 62 टक्क्यांपर्यंत जाईल असे राज्य शासनाकडून सांगितले जाते. पण टाऊन प्लानिंगमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी तरतूद कुठेही दिसत नाही. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. आता ग्रामपंचायतीमध्ये मध्ये देखील मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे. तेथे देखील ड्रेनेजची सिस्टीम सुरू होत आहे. त्यामुळे नियोजन केले पाहिजे. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी चांगला रिप्लाय दिलेला आहे. ज्या योजना दिल्या आहेत त्याची प्रगती सांगितली. त्यामुळे त्यांच्या उत्तरावर शंका घेण्याची संधी देखील आम्हाला मिळाली नाही. राज्यात प्रत्येक ठिकाणी वन विभागाची जागा पडून आहे. त्यामुळे खास बाब म्हणून वन विभागाकडे त्यांच्या जागेसाठी मागणी करावी लागणार आहे. वन विभागाच्या अखत्यारित जी खडकाळ जागा आहे, जेथे वन निर्माण करता येऊ शकत नाही ती जागा आपण घेण्यासाठी गंभीरपणे विचार करावा. बजेच्या वेळी मी यावर निश्चितपणे बोलणार आहे.

मी दोनच गोष्टीसाठी उभा राहिलेलो आहे. मी मराठवाड्यातील दुष्काळी भागात काम करीत आहे. आता मी पान क्र.97 वरील बाब क्रमांक 64 वर बोलणार आहे. बीड जिल्ह्यात पाटोदा तालुक्यात 930 शेतकऱ्यांनी एमआरइजीएस अंतर्गत जी कुशल/अकुशल कामे घेतली होती त्याची देयके देणे अजून बाकी आहेत. कालच या सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले होते की, असे काही होणार नाही. प्रा.राम शिंदे यांच्या शेजारील हा तालुका आहे. तेथे रोजगार हमी योजनेतून काम करण्यास मजूर तयार आहेत. तेथे रोजगार हमी योजनेतून कामे होण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला पाहिजे. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांची जलसिंचनाच्या कामापोटी प्रलंबित देणी मोठ्या प्रमाणात आहेत. काल मंत्री महोदयांनी सांगितले की, काही कामे बोगस आहेत. तरतूद नसताना नियोजना पेक्षा जास्त विहिरी झाल्या आहेत. आता शासनाने कितीही शेततळी करा, कितीही विहिरी करा आम्ही पैसे देऊ असे जाहीर केलेले आहे. तेव्हा मराठवाड्यातील प्रश्न हा सोडविला पाहिजे. जवळ जवळ 3000 विहिरींची बिले देय आहेत. याचा शासनाने गंभीरपणे विचार करावा.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील...

यानंतर मी बाब क्रमांक 48, पान क्र.72 वर बोलणार आहे. मौजे कोथरे, ता.करमाळा, जिल्हा सोलापूर येथील संगोपा यात्रा तीर्थस्थळाचा विकास करण्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

यानंतर बाब क्रमांक 40, पान क्र.66 वर बोलणार आहे. मी माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधणार आहे. त्यांनी मघाशी प्रश्नोत्तराच्या वेळी सांगितले की, 100 एकराच्या आत स्मार्टसिटीच्या बाजूला एमआयडीसीसाठी इंडस्ट्रीयल झोन करावे लागतील. माझ्या जिल्ह्यामध्ये खोपोली नगरपालिकेमधील अनेक उद्योग बंद पडले आहेत. तेथे हजारो कामगार काम करीत होते. त्या जमिनी आता फुकट गेलेल्या आहेत. तेव्हा त्या जमिनी शासनाने संपादित कराव्यात व तेथे पूरक असे उद्योग सुरू करावेत. तेथे डायमंड इंडस्ट्री जागा शोधत आहे. तसे उद्योग येथे येऊ शकतील. तेव्हा यासाठी काही तरी प्रयत्न करावेत. जेणे करून येथील कामगार जो बेकार झाला आहे त्यांना तेथे रोजगार मिळेल. खोपोली शहराकडे कामगारांचे शहर म्हणून बघितले जाते. त्या दृष्टीने शासनाने पाहणी करावी एवढी विनंती करतो. धन्यवाद.

.....

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, आजच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, प्रा.जोगेंद्रजी कवाडे, श्री.विक्रमजी काळे, श्री.रामनाथजी मोते, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.रामहरी रूपनवर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नागो गाणार, आदरणीय श्री.हेमंतजी टकले, श्री.सुभाषजी झांबड, ॲड.राहुलजी नार्वेकर, श्री.मुजफ्फरजी हुसेन, श्री.हरिभाऊ राठोड, श्री.जयंतजी पाटील यांनी जे प्रश्न मांडले आहेत त्याची नोंद संबंधित खात्याच्या माननीय मंत्र्यांनी घेतली आहे. त्याची लेखी उत्तरे पाठविण्यात येतील. वित्त खात्याच्या वतीने मागण्या मांडल्या असल्या तरी काही गोष्टींचा खुलासा हा झाला पाहिजे. पुरवणी मागण्यांसाठी केलेली मागणी ही जास्त आहे, आयत्या वेळेच्या ज्या मागण्या असतात त्याच्या पलीकडे जाऊन या मागण्या केल्या आहेत असे येथे म्हटले गेले आहे. मी सभागृहाच्या अत्यंत नम्रपणाने निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अत्यंत आवश्यक असे विषय आहेत त्यासाठीच या पूरक मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. एकूण मागण्या 4581.33 कोटी रूपयांच्या आहेत. त्यापैकी शेती पंप आणि हातमागाच्या सबसिडी या एकाच आयटमसाठी वीज मंडळाला आपण 2775 कोटी रूपये देण्याची तरतूद केलेली आहे. दोनच विभागाचे 3300 कोटी रूपयांचे आयटम आहेत. त्याचे सर्व विभागांच्यावतीने मी स्पष्टीकरण देऊ शकतो. सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, महसूल व वन विभाग, कृषी, पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नगरविकास विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, विधि व न्याय विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, अल्पसंख्यांक विभाग या सर्व विभागांच्या एकूण 4581.33 कोटीच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती :** सन 2015-16 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

.....

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामराव वडकुते )** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 18 मार्च, 2016 दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 7 वाजून 30 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 18 मार्च, 2016 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION